# सत्यशोधक समाजाचा इतिहास

## प्रस्तावना खंड

महेश जोशी

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मुंबई : १४

# सत्यशोधक समाजाचा इतिहास

## प्रस्तावना खंड

लेखक

महेश जोशी

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथम आवृत्ती : फेब्रुवारी, १९८७
व्दितीय आवृत्ती : २००२

**प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.

© प्रकाशकाधीन :

**मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,
५, फोटोझिंको पथ, पुणे-४११ ००१.

किंमत : रू. ६०/-

# निवेदन

श्री. महेश जोशी यांच्याकडे साहित्य संस्कृती मंडळाने 'सत्यशोधक समाजाच्या इतिहासा'चे काम सोपविले होते. त्याप्रमाणे त्यांचा प्रस्तावना खंड तयार झाला असून आता मंडळातर्फे तो प्रसिद्ध होत आहे. ह्या प्रकल्पाचे इतर खंडही लवकरच प्रसिद्ध होतील अशी आम्हाला आशा आहे. ह्या पुस्तकाचे मुद्रण उत्तम करून दिल्याबद्दल श्री. प्रभाकर देसाई यांचे आभार.

४२ यशोधन,
मुंबई–४०० ०२०
२६ जानेवारी १९८७

**सुरेंद्र बारलिंगे**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# प्रस्तावना

साहित्य संस्कृती मंडळाने "सत्यशोधक समाजाचा इतिहास" लिहिण्याचे काम श्री. महेश जोशी यांना सांगितले व ते त्यांनी आनंदाने स्वीकारले. त्या इतिहासाचा हा पहिला भाग "आमूलाग्र परिवर्तनाचा काळ [इ. स. १७६० ते १८६०]" या शीर्षकाने प्रसिद्ध होत आहे. या भागात १७६० ते १८६० या शंभर वर्षातील महाराष्ट्रातील व त्याच अनुषंगाने भारतातील व इंग्लंडमधील काही घटनांचा परामर्श घेतला आहे. महात्मा फुले यांचा जन्म १८२७ साली झाला व निधन २८ नोव्हेंबर, १८९० साली झाले. १८४८ साली त्यांनी शूद्रातिशूद्रांच्या मुलींसाठी शाळा सुरू केली. या वर्षापासून त्यांच्या सामाजिक क्रांतीच्या कार्याला सुरुवात झाली. श्री. महेश जोशी यांच्या विवेचनात ज्योतिबांच्या कार्याची पार्श्वभूमी विशद केलेली आहे. या अवधीत ज्या विविध ऐतिहासिक व सामाजिक घडामोडी झाल्या त्यांचे परिणाम ज्योतिबांच्या कार्यावर कसे झाले हे स्पष्ट करण्याचा हेतू श्री. जोशी यांचा आहे. विशेषतः, पानिपतच्या तिसऱ्या युद्धानंतर ज्या घडामोडी झाल्या व जे राजकीय प्रवाह निर्माण झाले त्यामुळे निर्माण झालेली पार्श्वभूमी ही ज्योतिबांच्या कार्याला कशी पोषक झाली, याचे विवेचन या पुस्तकात आहे. त्याचबरोबर, इंग्रजी राजवट आल्याने जी आर्थिक परिस्थिती निर्माण झाली, त्या परिस्थितीचे पण विवेचन या पुस्तकात आहे. कारण, या आर्थिक परिस्थितीचा मराठी समाजावर दूरगामी परिणाम झालेला आहे. सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यामागे ज्योतिरावांची विश्वव्यापी दृष्टी ज्याप्रमाणे कारणीभूत होती, त्याचप्रमाणे जे राजकीय, सामाजिक व आर्थिक बदल १८४० पूर्वी आले तेही कारणीभूत होते. श्री. महेश जोशी यांनी याच हेतूने या इतिहासाचा पहिला भाग लिहिला आहे.

श्री. जोशी यांच्या विवेचनातील सर्वच मुद्दे सर्वांना मान्य होतील असे नाही. मराठी समाजाची वाढ कशी झाली, या समाजाची जडणघडण कशी झाली, या प्रश्नांचा कोणी मागोवा घेतांना दिसत नाही, असे विधान पान तीनवर केलेले आहे. या संदर्भात इतिहासचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांच्या लेखांचा विचार करणे आवश्यक आहे. राजवाड्यांनी "महाराष्ट्राची वसाहत" "महाराष्ट्र व उत्तर कोकणची वसाहत" या दोन लेखात या विषयी केलेले संशोधन उपलब्ध आहे.[१] श्री. जोशी मराठी राज्याची स्थित्यंतरे दाखवितांना मराठी राज्याचा पाया घालणारा शहाजी याच्या कार्याचे मूल्यमापन करीत नाहीत. शिवाजी महाराजांना शहाजीच्या कार्याची फार मोठी मदत झाली हे केवळ श्री. राजवाडे यांनीच सिद्ध केले,[२] असे नव्हे तर इतर इतिहासकारही ते मान्य करतील. मराठी इतिहासावर प्रेम करणारांनी हा लेख आवर्जून वाचावा. छत्रपती शाहू महाराजांच्या

---

१. 'राजवाडे लेखसंग्रह' साहित्य अकादमी पृ. ११४ ते १६७...२

२. तत्रैव १९९

कार्याचे जे मूल्यमापन श्री. जोशी यांनी केले आहे तेही एकांगी आहे असे वाटते. कारण, काही इतिहासकार शाहूच्या कार्याचे मूल्यमापन निराळ्या प्रकारे करतात, हे लक्षात ठेवले पाहिजे. पान ६ ते १० या पानावर शाहूच्या कार्याचे मूल्यमापन श्री. जोशी यांनी केले आहे. श्री. जोशी लिहितात, "शाहू छत्रपतीनेच मराठी लोकांच्या जीवनात एकवाक्यता आणून त्यांचे राजकारण एकमुखी केले हे स्पष्टपणे दिसून येईल. मराठी समाजातील सर्व जाती–जमातीचे राजकारण शाहू छत्रपतीच्या रूपाने एकवटले आणि शाहूच्या मृत्यूनंतर ते विस्कटून गेले." (पान १०) श्री. त्र्यं. शं. शेजवलकर यांचे मत मात्र वेगळे आहे. ते लिहितात, "शिवाजीच्या मागे संभाजीने धार्मिक बाबतीत त्याचा बाणा चालविला. राजकीय बाबतीत राजारामकाळच्या मराठ्यांनी त्यांचे कार्य मागे पडू दिले नाही. आणि ताराबाई व्यक्तिशः अधिकारकांक्षी व जहांबाज असली तरी, राजकीयदृष्ट्या तिचा मार्ग शिवाजीची योजना टिकवून धरण्याच्या दृष्टीने शाहूपेक्षा जास्त उपयुक्त होता. शाहूने स्वतःला राज्य मिळविण्यासाठी या योजनेच्या मुळावरच घाव घातला व मोंगलांचे स्वामित्व पत्करिले. या एका घोडचुकीने मराठ्यांचा एवढा नैतिक अधःपात झाला की त्यांच्यात कायमची राजकीय फूट पडली. शिवाजीने मारून काढीलेला व्यक्तिस्वार्थ बोकाळला. त्याला असंमत असलेली वंशपरंपरागत अधिकाराची चटक मराठ्यांत वाटली. त्याने आखून दिलेले अष्टप्रधान मंडळाचे राज्य मोडून पुनश्च मुसलमानी पध्दतीचे एकतंत्री राज्य निर्माण झाले.........शाहूच्या मार्गाने हिंदुस्थान दुबळा होऊन त्यात दुफळी आली."[3] वरील उतारा देण्याचा उद्देश एवढाच की शाहूच्या कार्याबद्दल दुसरेही मत इतिहासकारांनी मांडिलेले आहे.

राजकीय पार्श्वभूमीचा विचार करताना श्री. जोशी एक विधान करतात. "पानिपत येथील दारुण पराभवानंतरही मराठेशाहीला साठ वर्षाहून अधिक काळ जीवदान कसे मिळाले आणि अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातील राजकारणात प्रमुख सत्ता म्हणून "पुणे सरकारचे" अस्तित्व का टिकून राहिले," या प्रश्नाचे उत्तर देतांना पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचे मूल्यमापन करतात. हे विवेचन महत्वाचे आहे.[४] ते सर्वांनी अवश्य वाचावे. मात्र दिल्लीच्या तख्ताचा अधिक्षेप मराठशाहीच्या ऱ्हासाला कारणीभूत झाला, हे पान २९ वरील विधान सर्वांना मान्य होईल, असे नाही.

सामाजिक रचनेचा विचार करतांना श्री. जोशी ग्रामस्वराज्याचे वर्णन करतात. ग्राम स्वराज्यात "गांव" हाच हजारो वर्षे राजकीय सामाजिक व आर्थिक जीवनाचा मूलघटक होता. इंग्लिशांनी ही व्यवस्था नष्ट केली. हे अनिष्ट होते, असा श्री. जोशी यांचा अभिप्राय दिसतो. या प्रश्नाला दुसरीही बाजू आहे. ग्रामस्वराज्यांत गाव हाच स्वयंपूर्ण घटक असल्यामुळे एकराज्याची किंवा एकराष्ट्राची भावना निर्माण होऊ शकली नाही. त्यामुळे

३. शेजवलकरांचे लेख, पुस्तक २ रे, ह. वि. मोट प्रकाशन, पान ८१ ते ९०
४. पान १६ ते २२

हिंदुस्थानवर आक्रमण आल्यास सर्व देश एकदिलाने प्रतिकाराला सिध्द झाला नाही. डॉ. आंबेडकरांनी ग्रामपंचायतींच्या कल्पनेला विरोध केला होता व त्याचे कारणही विशद केले होते.

इंग्लिश राजवटीने हिंदुस्थानच्या आर्थिक व्यवस्थेवर फार मोठे विपरीत परिणाम झाले. याचे विवेचन श्री. दादाभाई नौरोजी, न्या. म. गो. रानडे, श्री. गणेश व्यंकटेश जोशी यांनीही खूप लिहिले आहे. शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचा प्रश्न पुढे म. फुले यांनी सविस्तर मांडला. त्याला वरील विद्वानांचे लेख कारणीभूत झाले असण्याची शक्यता आहे. इंग्लिश राजवटीचा आर्थिक क्षेत्रात हिंदुस्थानवर काय परिणाम झाला, याचे विवेचन न्या. रानडे यांच्या लेखातील एक उतारा ( पान ५१ ) देऊन स्पष्ट केलेले आहे. पान ५३ वरील खालील विधान महत्वाचे आहे.

“ ब्रिटिशांना किंवा अन्य युरोपियांना या भूमीवर पाय ठेवावयास जागा मिळण्यापूर्वी भारतातील मालाला प्रत्यक्ष सोने किंवा चांदी देऊनच युरोपातील व्यापारी व्यवहार करु शकत. त्यामुळे सोन्या चांदीची कमतरता कधीच भासली नाही. पण ईस्ट इंडिया कंपनी इथे स्थिरावल्यावर ती इथल्याच चलनात माल खरेदी करावयास लागली आणि सोन्या-चंदीचा भारताकडील ओघ एकदम थांबला. ”

भारताच्या दारिद्र्याला इंग्लिश राजवट कशी कारणीभूत झाली, याचे अगदी थोडक्यात विवेचन वरील उताऱ्यात दिसते. पूर्वी शेतकरी शेतात उत्पन्न झालेल्या शेती-मालाचा विशिष्ट हिस्सा शेतसारा म्हणून देत असे. इंग्लिशांनी ती पध्दती बदलून शेतसारा रोख रकमेने भरला पाहिजे असा नियम केला. त्यामुळे पिकाच्या हंगामात धान्याला कमी किंमत मिळे. त्या किंमतीला धान्य विकून शेतसारा भरावा लागे; व नंतर सावकाराकडून कर्ज काढावे लागे. खेड्यापाड्यात जो सावकारांचा वर्ग उदयाला आला व पुढे दृढमूल झाला. याचे एक कारण शेतसारा रोख रकमेत देण्याची केलेली सक्ती होय. जोतिबांच्या लिखाणात शेतकऱ्यांच्या दारिद्र्याविषयी आलेले उल्लेख या पार्श्वभूमीवर विचारात घेतले पाहिजेत.

रोख रकमेत सारा भरण्याची सक्ती होती. त्याच बरोबर नवीन न्यायदान पध्दतीही शेतकऱ्यांच्या दारिद्र्याला कारणीभूत झाली. याचे विवेचन पान ५५,५६ वर श्री. जोशी यांनी केलेले आहे, ते अगदी सार्थ आहे. गेल्या साठ वर्षात सुशिक्षित लोकात इंग्लिश न्यायदान पध्दतीचे गुणवर्णन करण्याची स्पर्धा असलेली दिसून येते. काही अंशी ते गुणगान योग्य आहे, हे मान्य करावयास हरकत नाही. पण या न्यायदान पद्धती-मुळे सामान्य जनतेची पिळवणूक झालेली आहे, हे विसरता कामा नये. त्या काळात जनतेची आर्थिक परिस्थिती खालावत चालली होती व जनतेच्या मानगुटीवर ही खर्चिक

व किलेकदा अन्यायकारक अशी न्यायदान पद्धती बसली होती, हे विचारात घेणे हे जोतिबांच्या कार्याचे मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.

श्री. जोशी सातारच्या जाहीरनाम्याचे निवदेन करतात. त्यांनी त्या जाहीरनाम्यातील निदान महत्त्वाचा भाग दिला असता तर बरे झाले असते. या जाहीरनाम्याची पार्श्वभूमी श्री. जोशी यांनी निवेदन केली आहे. (पान ५८). "एल्फिन्स्टनने सातारचा किल्ला ताब्यात येताच त्यावर अर्धा घटका युनियन जॅक फडकाविला आणि मग तो उतरवून पुन्हा सातारचा ध्वज फडकाविला व पुढे १० एप्रिल १८१८ रोजी प्रतापसिंह महाराजास मोठ्या समारंभाने सिंहासनावर बसविले." या जाहिरनाम्याचा परिणाम म्हणजे ब्राह्मण आणि मराठे यांच्या संबंधात पाचर ठोकण्यात झाली. छत्रपती नावाचे छत्रपती राहिले. पेशव्यांचे वर्चस्व तर नष्ट झाले होतेच. एल्फिन्स्टनने यानंतर ब्राह्मण वतनदारांची व इनामदारांची हक्काखणी केली. यामुळे मराठे आणि ब्राह्मण यांच्यातील संबंध आणखी बिघडले. म्हणून श्री. जोशी लिहितात, "एल्फिन्स्टनचा सातारचा जाहिरनामा हाच महाराष्ट्राच्या आधुनिक कालखंडातील सामाजिक ताणतणावांचे मूळ आहे."

१८१८ सालात इंग्लिश सत्ता महाराष्ट्रात प्रस्थापित झाली. एल्फिन्स्टनने १८२० साली नेटिव स्कूल बुक कमिटी स्थापन केली व प्रजेला मातृभाषेतून शिक्षण देण्यासाठी उपयुक्त अशी पुस्तके तयार करण्याचे काम या समितिकडे दिले. पहिले मराठी पुस्तक पंचोपाख्यान १८२२ साली प्रसिद्ध केले. हे पुस्तक त्यावेळी मुंबईला प्रसिद्ध असलेल्या कुरियर या छापखान्यात छापले होते. स्कॉटिश मिशनरी सोसायटीच्या वतीने खिस्ती धर्म प्रसाराचे काम करण्याच्या हेतूने रेव्ह. डॉ. जॉन विल्सन १८२८ ला मुंबईला सपत्निक आले. महंमद इब्राहिम मकबा या सुप्रिम कोर्टातील दुभाष्याने कंपनी सरकारच्या इंग्लिश नोकरास मराठी शिकणे सुलभ व्हावे, म्हणून १८२७ साली 'अ ग्रामर ऑफ मराठी लँग्वेज' हे पुस्तक लिहिले. जॉन विल्सन खिस्ती धर्माचा प्रसार करीत होता म्हणून त्याच्याशी वादविवाद घालून हिंदुधर्माचे मोठेपण स्थापन करण्यासाठी मोरोभट्ट दांडेकर नावाच्या ब्राह्मणाने १८३१ साली 'हिंदुधर्म स्थापना' हे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले. या पुस्तकाला उत्तर म्हणून विल्सनने १८३२ साली 'ॲन एक्स्पोझर ऑफ हिन्दु रिलिजन' या नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले. मराठी भाषेचे पाणिनी दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी आपला व्याकरण ग्रंथ १८३६ साली लिहून तयार केला.[५] रॉबर्ट झेवियर मर्फी यांनी (हे सुप्रिम कोर्टात

५. दादोबा पांडुरंगाच्या पूर्वी गंगाधरशास्त्री फडके यांनी 'महाराष्ट्र भाषेचे व्याकरण' हे पुस्तक लिहिले होते.

मराठी ट्रान्स्लेटर होते) १८२९ साली बॉंबे नेटिव जनरल लायब्ररी ही संस्था स्थापन केली. ही संस्था १८४० पर्यंत अस्तित्वात होती. नंतर ती बहुतेक बंद पडली असावी. कारण, १८४५ साली मुंबईला एक सभा होऊन नेटिव जनरल लायब्ररी स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला व ती संस्था स्थापन झाली. ३० मार्च १८४५ ला ग्रँट मेडिकल कॉलेजची इमारत पुरी झाली होती व तिचे उद्घाटन करण्यात आले. मे १८४५ ला 'जे जे हॉस्पिटल' सुरू झाले.

स्त्री शिक्षणाची सुरुवात मुंबईला अमेरिकन मराठी मिशनने १८२४ ला व चर्च मिशन सोसायटीने १८२८ या साली केली. मुलींच्या शिक्षणासंबंधी एक मनोरंजक गोष्ट होती. मुली शाळेत येत नसत. शिक्षकाला त्यांना गोळा करून आणावे लागत असे. मुलींच्या संख्येवर शिक्षकांचा पगार अवलंबून असे. शाळा फी तर नसेच; उलट, शाळाच विद्यार्थिनींना पैसे देत असे [६] १८३० च्या सुमारास श्रीमती विल्सन मुंबईत मुलींच्या तीन शाळा चालवीत असत. २१ ऑक्टोबर १८४९ रोजी 'स्टुडंटस् लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी' च्या वतीने तीन शाळा उघडण्यात आल्या.

दादोजी पांडुरंग यांनी १८४९ च्या सुमारास परमहंस सभा स्थापन केली. या संस्थेचा हेतू मानवधर्माचा प्रसार करणे हा होता. ही संस्था भरीव कार्य करु शकली नाही. मात्र मानवधर्म ही कल्पना त्यांनी पुढे मांडली. जोतिबांनी हीच कल्पना पुढे स्वीकारली असावी, असे वाटते. कारण, दादोबा पांडुरंगानी दुर्गाराम मंछाराम यांच्या मदतीने सुरतेला १८४४ साली मानवधर्म सभेची स्थापना केली होती. सत्यशोधक समाजाची स्थापना १८७३ साली झाली. विधवा विवाहासंबंधी जागृती महाराष्ट्रात १८३७ ते १८४० या अवधीत झाली.

वरील विवेचनाचा हेतू हा की इंग्लिश राजवट आल्यानंतर शिक्षणाचा प्रसार झाला. समतेचा विचार स्वीकारावयास सुरुवात झाली. परिवर्तनाच्या दिशेने समाज सरकू लागला. या पार्श्वभूमीवर जोतिबांचे कार्य सुरु झाले.

श्री. जोशी यांनी लॉर्ड मेकॉले याच्या धोरणाचा निर्देश केला आहे. (पान १५७) व त्याच्या सल्ल्याने लॉर्ड बेंटिंक याने जो निर्णय ७ मार्च १८३५ रोजी घेतला त्याचा उल्लेख केला आहे. तो निर्णय खालील प्रमाणे होता.

"युरोपियन वाङमय आणि शास्त्र यांचा या देशात प्रसार करणे हेच कंपनी सरकारचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे. हिंदुस्थानातील सरकारजवळ शिक्षणासाठी उपलब्ध असलेला संपूर्ण निधी इंग्लिश भाषेच्या माध्यमातून इंग्रजी ज्ञान विज्ञानाचा बोध एतद्देशीय लोकांना करुन देण्यासाठी वापरण्यात यावा." श्री. जोशी लिहितात, "लॉर्ड बेंटिंक यांचे धोरण

---

६. प्रियोळकर अ. का. 'मुंबईच्या सार्वजनिक जीवनाची गंगोत्री' ज्ञानदीपिक अमृत महोत्सव अंक, १९५९, पान–११

झिझिया करापेक्षा दुष्ट होते. " व त्याचे कारणही त्यांनी ( पान १५८ ) दिलेले आहे. पण मेकॉलेच्या धोरणाला दुसरीही बाजू होती, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.[७]

१८५७ साली तीन विद्यापीठांची स्थापना झाली. त्यातून बाहेर पडलेल्या भारतीयांनी १८८५ साली इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना केली; व याच काँग्रेसच्या व्यासपीठावरुन दादाभाईनी १९०६ साली स्वराज्याची मागणी केली. १८८७ साली सोशल रिफॉर्म कॉन्फरन्सची स्थापना झाली व सामाजिक सुधारणेच्या चळवळीला जोर आला.

इतिहास पाहिला की मेकॉलेच्या उद्गारांची सत्यता पटते.

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी पाश्चिमात्य शिक्षणाचा कोणता फायदा आहे, हे स्पष्ट केले. होते.[८] कार्ल मार्क्सने १८४८ साली जे विधान केले ते श्री. जोशी उद्धृत करतात. ( पान ९२ ) त्यात खालील वाक्य आहे.

" ब्रिटिशांच्या राजवटीत हिंदुस्थान हा आपल्या संस्कृतीपासून आणि इतिहासापासून पूर्णपणे तोडला गेला आहे. असे जरी असले तरी आशियातील सामाजिक जीवनात मूलभूत परिवर्तन केल्याशिवाय मानवजातीला आपले भविष्य हस्तगत करता येईल काय?... मार्क्सने पुढे इंग्लंडच्या या विधायक कार्याची काही लक्षणे नमूद केली आहेत. ती अशी : ( १ ) राजकीय ऐक्य ( २ ) देशी फौज ( ३ ) स्वतंत्र वृत्तपत्र संस्था ( ४ ) जमिनीमध्ये खाजगी मालकीचे युग ( ५ ) नाखुषीने का होईना पण हिंदुस्थानात सरकारी कारभाराच्या गरजा पूर्ण करणारा आणि युरोपीय विज्ञानाने भारून गेलेला नवा वर्ग ( ६ ) युरोपशी

---

७. १० जुलै १८३३ रोजी मेकॉलेने हाऊस ऑफ कॉमन्समध्ये इंडिया बिलावर जे भाषण केले त्यात खालील विधाने होती.

" The destinies of our Indian Empire are covered with little darkness. It may be that the public mind of India may expand our system; That by good government we may educate our subjects into a capacity for better government; That having become instrumental in the European language they may in some future age demand european institutions. Whether such a day will ever come, I know not. But never will I attempt to avert or retard it. Whenever it comes, it will be the proudest day in English history."

८. The greatest work of western education in the present state of India is not so much as encouragement of learning as the liberation of Indian mind from the tradition of old world ideas and the assimilation of all that is highest and noble in the life and thought and character of the west. I think Englishmen should have more faith in the influence of their history and their literature. Nanda. 'Gokhale and Liberal Tradition. ( 1977 ) page 184.

नियमित आणि जलद दळणवळण" (पान ९२–९३) मार्क्सला प्रेषिताची दृष्टी होती, याचा प्रत्यय भारतात नंतर झालेली प्रगती पाहून कोणालाही पटेल. पण श्री. जोशी मात्र 'बहुमुखी राष्ट्रवाद मार्क्सला कळलाच नाही.' असे विधान करतात व त्या विधानाचे समर्थनही करतात. या विषयाची सविस्तर चर्चा करण्याचे स्थान या इतिहासात नाही. म्हणून प्रस्तावनेत याविषयी लिहिण्याचे मी टाळतो आहे. मात्र येथे एक विधान करावेसे वाटते. जोतिबांना जो मानवधर्म अभिप्रेत आहे व स्त्रीशूद्रादिशूद्रांना मानाचे स्थान मिळवून देणारी समाजरचना अभिप्रेत आहे, ते साम्यवादी राष्ट्रात शक्य आहे.

पान १०९ वर दादाभाई आणि महात्मा जोतिबा फुले हे भारतीय समाजातील दोन परस्पर विरोधी शक्तींचे प्रवक्ते असे विधान केले आहे. त्या विधानात दादाभाईंवर अन्याय झाला आहे. दादाभाई केवळ इंग्रजी सत्तेच्या संदर्भात भारतीय स्वायत्ततेचा विचार करीत होते, असे नाही. दादाभाईंनी भारतीय स्वायत्ततेचा विचार भारताच्या आर्थिक परिस्थितीतून केलेला आहे. १९०६ साली कलकत्ता येथील काँग्रेस अधिवेशनात केलेल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी काढलेले उद्‌गार या संदर्भात लक्षात ठेवणे आवश्यक आहे.[९] शिवाय दादाभाईंनी सामाजिक सुधारणेचे महत्व ओळखले होते. त्याच भाषणात त्यांनी मत व्यक्त केले होते की, समाजसुधारणा आणि औद्योगिक प्रगती यासाठी प्रत्यक्ष स्वतंत्र कार्यकर्ता वर्ग असणे जरुरीचे आहे. व या सर्व क्षेत्रात एकाच वेळी काम झाले पाहिजे.[१०] इथे आणखी एका बाबीचा विसर होता कामा नये. ज्योतिबांचे कार्य पुण्यात एका विशिष्ट सामाजिक पार्श्वभूमीवर सुरू झाले; तर दादाभाईंचे कार्य मुंबई व इंग्लंड येथील पार्श्वभूमीवर चालू होते. असे असताना देखील दादाभाईंनी कुणब्यांची दयनीय स्थिती या विषयावर निबंध लिहिला होता. एवढे मात्र खरे की, श्री जोशी यांचे खाली दिलेले विधान सत्य आहे. श्री. जोशी लिहितात, "महात्मा फुले यांचे विचार (पहा पान १००) शांतपणे ऐकून घेण्यास त्यावेळी कोणालाही सवड नव्हती." त्याचप्रमाणे ता. १५ जानेवारी १८८५ रोजी जोतिबांनी न्या. रानडे यांना पाठविलेले पत्र (पान ११२) फार बोलके आहे. हे पत्र इंडियन नॅशनल काँग्रेसची आणि सोशल रिफॉर्म कॉन्फरन्सची स्थापना होण्यापूर्वी लिहिले आहे.

---

9. "Be united, preserve and achieve self-government so that the millions now perishing by poverty famine and plague and the section of millions that are starving on scanty subsistance may be saved." T. K. Tope Bombay and Congress Presidents. page-247 दादाभाईंनी Poverty and Unbritish Rule in India हा ७०० पानांचा ग्रंथ १८७५ च्या सुमारास लिहिला.

10. All the three great purposes-political, social and industrial-must be set working side by side. The progress in each will have it influence on the other,-Ibid page. 91.

एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात सुधारणेच्या बाबतीत दोन प्रवृत्ती होत्या. राष्ट्राचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे व त्यासाठी राजकीय, आर्थिक व सामाजिक या तिन्हीही क्षेत्रात प्रगती होणे आवश्यक आहे, या प्रवृत्तीचे जनक न्या. रानडे होते.[११] जोतिबांना मात्र शूद्रादिशूद्रांच्या परिस्थितीत ताबडतोब बदल व्हावयास पाहिजे होता. त्याच दृष्टीने ते इतिहासाकडे पाहत होते. खुद्द छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल त्यांचे विधान श्री. जोशी यांनी पान १६३ वर दिले आहे. ते विधान असे आहे. "शिवाजी राजाने मुसलमानी राज्य हाणून पाडले. नवीन हिंदु राज्य स्थापिले. याची काही गरज नव्हती. मुसलमानी राज्य काही वाईट नव्हते. मुसलमानी राज्यात जातीभेदाचे प्रस्थ कमी होत चालले होते. जातीनिष्ठ पक्षपात नाहीसा होत चालला होता." जोतिबांनी इस्लामधर्म संस्थापक महंमदाला नायक कल्पून त्याच्या कार्याच्या महती गाणारी एक प्रदीर्घ काव्यरचना केलेली आहे.[१२] जगात सर्व मानव समान आहेत, कुणी श्रेष्ठ नाही, कनिष्ठ नाही, ही महंमद प्रणीत मानवी समानता जोतिबांनी हिरिरीने उचलून धरली आहे. इंग्लिश राजवटीबद्दल जोतिबांना आपुलकी वाटत होती. श्री. जोशी यांनी जोतिबांचे एक विधान पान ७३ वर दिले आहे. ते विधान असे आहे.

"परंतु मी तुला सांगतो की इंग्रज लोक आज आहेत, उद्या नाहीत. आपल्या जन्मास पुरतील म्हणून कोणाच्याने सांगवत नाही. यास्तव या लोकांचे राज्य या देशात आहे तोच आपण सर्व शूद्रांनी जलदी करुन भटांच्या वडिलोपार्जित दास्यत्वापासून मुक्त व्हावे, यात मोठा शहाणपणा आहे."

वरील उतारे जोतिबांची समानतेसंबंधी असलेली आंतरिक तळमळ तर दाखवितातच. पण त्याबरोबर त्यांना जी भीती वाटत होती ती किती सार्थ होती, हे स्वातंत्र्यानंतरची प्रचलित असलेली समाजरचना पाहून वाटते. स्वातंत्र्यानंतरच्या सदतीस वर्षात शूद्रातिशूद्रांवर भारताच्या विविध भागात होणारे अत्याचार स्वातंत्र्यपूर्वकाळात शूद्रातिशूद्रांना

11. "You cannot have a good social system when you find yourself low in the scale of political rights, nor can you be fit to exercise political rights and privileges unless your social system is based on reason and justice. You cannot have a good economical system when your social arrangements are inperfect. If your religious ideas are low and grovelling, you cannot succeed in social, economical and political spheres. The interdependence is not an accident, but is the law of Nature." D. D. Karve. Ranade: The Prophet of Liberated India. p. 20.

१२. प्रभाकर वैद्य : 'महात्मा फुले व त्यांची परंपरा'– २५५ मानव महमंद हे काव्य महात्मा फुले समग्र वाङमय, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, पान ४८९ वर दिलेले आहे.

मिळणाऱ्या वागणुकीपेक्षाही भयंकर आहेत. त्यांचा दुस्वास इतर लोक करीत आहेत. त्यांच्या प्रगतीआड येतात व त्यासाठी उग्र आंदोलने करतात. राखीव जागांबाबतच आंदोलन हे या वृत्तीचे निदर्शक आहे. भारताच्या संविधानात सामाजिक समतेचे ध्येय मान्य केले आहे. पण त्या ध्येयाप्रत आपण पोहोचलो नाही. इतकेच नव्हे, तर त्या दिशेने वाटचालही समाधानकारक नाही, हे विदारक सत्य आहे. जोतिबांना जी समाजरचना अभिप्रेत होती त्या रचनेसारखीच समाजरचना विष्णुबुवा ब्रम्हचारी यांना अभिप्रेत होती.[13] पण तेही स्वप्नच ठरले. जोतिबांच्या बाबतीत तर त्यांचे अनुयायी म्हणविणाऱ्यांनीच शूद्रातिशूद्रांविरुध्द चळवळ केली. जातीभेदाचा आधार घेऊन सत्ता संपादन केली व ती सत्ता कायम टिकविण्यासाठी जातीभेद दृढ केले आहेत. सांसदीय लोकशाहीत या गोष्टी अटळ आहेत, असे वाटते. जर खरोखरच सामाजिक समता पाहिजे असेल तर आज आपण स्वीकृत केलेल्या आर्थिक आणि राजकीय तत्त्वांचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. जोतिबांनी मुसलमान राजे असताना व ब्रिटिश राज्य असताना शूद्रातिशूद्रांची परिस्थती बरी होती, असे मान्य केले होते. हे त्यांचे मत कां झाले होते, याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. त्यांना परकीयांचे राज्य पाहिजे होते, असे मुळीच नाही. त्यांना अशी एक राज्यपध्दती पाहिजे होती की त्या पध्दतीत शूद्रातिशूद्रांना समानतेचे हक्क मिळतील व त्यांना माणूस म्हणून जगता येईल. आजच्या जगात असली राज्यपद्धती मार्क्सवादावर आधारलेली राज्यपद्धती आहे. शूद्रातिशूद्रांना समानता मिळावी असे ज्यांना खरोखर प्रामाणिकपणे वाटत असेल त्यांनी ही राज्यपद्धती अमलात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महात्मा जोतिबांनी फार मोठा विचार केवळ महाराष्ट्राला नव्हे तर मानवजातीला दिलेला आहे; व तो म्हणजे मानवधर्माचा. महाराष्ट्राचे भाग्य कीं जोतिबा महाराष्ट्रात जन्मले. आजचा महाराष्ट्र जोतिबांचे विचार पचवून त्याप्रमाणे समाजरचना करणार की ज्युडासने ज्याप्रमाणे जिससचा विश्वासघात केला तसा विश्वासघात करणार ?

श्री. महेश जोशी यांच्या इतिहासाचा हा पहिला भाग आहे. या भागाला प्रस्तावना लिहिताना मला एक अडचण वाटली. श्री. जोशी यांनी संदर्भ ग्रंथांची यादी दिलेली नाही किंवा निर्देशही दिलेले नाहीत. त्यामुळे त्यांनी केलेली विधाने तपासून पाहता आली नाहीत, एवढेच नमूद करावेसे वाटते. मात्र, सत्यशोधक समाजाच्या इतिहासाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन त्यांनी मांडला आहे, हे खरे आहे. जोतिबांच्या कार्याचे मोटेपण दाखविताना उत्साहाच्या भरात, 'लॉर्ड मेकॉले यांना अभिप्रेत असलेल्या भारतीय समाजाच्या पश्चिमीकरणाच्या क्रांतीची धुरा दादाभाईंनी तेलघाणीच्या बैलासारखी आपल्या खांद्यावर सतत ५२ वर्षे डोळयांना झापडे लावून निष्ठेने वाहिली' (पान ११३) असे वाक्य ते लिहून जातात. हे विधान सत्य तर नव्हेच. पण भारतातील आधुनिक जीवनात ज्यांना 'महर्षि' ही सार्थ पदवी अनेक मान्यवरांनी दिली, त्या दादाभाईंवर अन्याय करणारे आहे. अभिरुचीस सोडून आहे. असा एखादा अपवाद सोडून दिल्यास श्री. जोशी यांनी आपला दृष्टिकोन

---

१३. तत्रैव–२४०

उत्तम रीतीने मांडला आहे. जोतिबांचा मोठेपणा स्वयंभू आहे. पण श्री. जोशी यांनी चितारलेल्या पार्श्वभूमीवर तर तो जास्तच उठावदार दिसतो. दुसऱ्या भागात जोतिबांचे कार्य यावर जास्त विवेचन येणार आहे. त्या भागाची वाचकवर्ग उत्सुकतेने वाट पाहील, असा मला विश्वास वाटतो.

महाराष्ट्राने नवसमाज निर्मितीच्या क्षेत्रात अनेक सक्रिय विचारवंत तत्त्वज्ञ दिले. त्यामध्ये महर्षि दादाभाई नौरोजी, न्या. रानडे व महात्मा फुले यांनी ज्या समाजरचनेचे स्वप्न पाहिले, ती समाजरचना स्वातंत्र्योत्तर काळात सदतीस वर्षे झाली तरी अस्तित्वात आली नाही. इतकेच नव्हे, तर दृष्टिपथातहि नाही. ही मोठी शोकांतिका आहे. हे या पिढीपुढील एक मोठे आव्हान आहे. शूद्रातिशूद्रांचे प्रश्न सोडविण्यास राष्ट्र असमर्थ ठरले तर राष्ट्रावर मोठी आपत्ति येण्याचा संभव आहे. म्हणूनच जोतिबांनी ज्या प्रेरणा दिल्यात त्या प्रेरणांचा झेंडा खांद्यावर घेऊन त्यांनी दाखविलेल्या मार्गाचा अवलंब करणे आवश्यक आहे. जोतिबांनी ब्राम्हण्याविरुध्द हत्यार चालविले. आजच्या जगात जन्मजात ब्राम्हण्यापेक्षा नवीन प्रकारचे ब्राम्हण्य. अनेक क्षेत्रात उदयाला येत आहे; व हे ब्राम्हण्य शूद्रातिशूद्रांचे प्रश्न सोडविण्याच्या मार्गात अडथळे आणीत आहे. या नवीन ब्राम्हण्याला कित्येकदा राजसत्तेचा आशीर्वाद व पाठिंबा मिळतो, ही चिंतनीय बाब आहे. अशा वेळी जोतिबांच्या आसुडाची आठवण येते. जोतिबांचा हल्ला ब्राम्हण्य या पध्दतीवर होता. या नवीन ब्राह्मण्य-पद्धतीवरही जोतिबांचा आसूड चालवावा लागेल.

मुंबई
६।२।८७

— त्र्यंबक कृष्णराव टोपे

# अर्पणपत्रिका

मराठी समाजाच्या एकीकरणाचे
आधुनिक मंत्रद्रष्टे,

मराठी भाषिकांची अस्मिता
साक्षात् ज्यांच्या रूपाने
चालती बोलती झाली,

आणि

मराठी लोकजीवनाचे
एकमुखी राजकारण
ज्यांनी आजन्म
अढळ श्रद्धेने जोपासले

ते,

**महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार,**

हेच,

या 'सत्यशोधक समाजाच्या इतिहासा' चे
आराध्य दैवत होत.

**महेश जोशी**

# हृद्हुंकार

मराठी लोकजीवनाचा अर्वाचीन कालखंड सर्व अंगांनी तपासून पाहून त्याचे यथामती दर्शन वाचकांना घडविण्याचा एक नम्र प्रयत्न "सत्यशोधक समाजाचा इतिहास" लिहिण्याच्या निमित्ताने हाती घेतला. तो दोन वर्षे नेटाने रेटला. एकूण पाच खंडांची योजना. त्यापैकी पहिला खंड वाचकांच्या हाती देताना आनंद वाटतो. हा खंड मी २४ नोव्हेंबर १९८३ रोजी मंडळाच्या सचिवांच्या हाती दिला. तो आता प्रकाशित होत आहे, याचा आनंद वेगळाच.

भारतीय लोकजीवनात किमान तीनदा तरी असे घडले आहे की, परकीय आक्रमकाचे हत्यार एतद्देशीयांपेक्षा अधिक प्रगत आणि म्हणून अधिक संहारकारी होते. त्यामुळे, ज्याचे हत्यार श्रेष्ठ त्याची संस्कृती श्रेष्ठ, असा सिध्दान्त इतिहासाचार्य राजवाडे यांनी मांडला आणि रुढ केला. पण १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपातील श्रेष्ठ हत्यारांनी जी संस्कृती इकडे आणली ती काही श्रेष्ठ नव्हती. माझे इतिहासगुरु महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी १९६४ साली, पंढरपूर येथे, मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनासाठी आचार्य विनोबाजी आले असता, या संदर्भात मूलप्रश्न उपस्थित केला. महामहोपाध्यायांची आणि आचार्यांची ही पहिली, आणि शेवटचीही, भेट पंढरपुरातच झाली. या भेटीत महामहोपाध्याय दत्तो वामनानी आचार्य विनोबांना प्रश्न विचारला की, "इंग्रजी राज्य आल्यामुळे भारताचा ऐहिक लाभच झाला. पण इंग्रजी कायद्यामुळे मात्र भारतीयांचा अधःपात झाला, असे आपणांस वाटत नाही काय?" त्यावर आचार्य विनोबा उद्गारले, "मला आपला प्रश्न समजला नाही." काळवेळ पाहून महामहोपाध्य यांनी आपला प्रश्न तसाच, तिथेच सोडून दिला. महामहोपाध्याय श्री. दत्तो वामन पोतदार यांनी उपस्थित केलेल्या त्या मूलप्रश्नाचा सांगोपांग मागोवा घेण्यासाठीच 'सत्यशोधक समाजाचा इतिहास प्रकल्प' उभा करण्याचे आणि हाती घेण्याचे धारिष्ट्य केले आहे.

मराठी लोकजीवनाचा आधुनिक कालखंड तपासण्यापूर्वी आधुनिक भारतीय लोकजीवनाचा ठाव घ्यावा लागला. तसा ठाव घेताना ध्यानात आले की ब्रिटिश राजवटीत नेमण्यात आलेली विविध कमिशने आणि त्या कमिशनांपुढे सादर करण्यात आलेले पुरावे यांचा ऐतिहासिक साधनांत समावेश केला पाहिजे. तसेच, सरकारचे 'जी आर' हेही महत्वाचे ऐतिहासिक साधन होय. विधिमंडळातील चर्चा आणि प्रश्नोत्तरे यांचाही साकल्याने अभ्यास केल्याशिवाय अनेक घटनांचा अन्वयार्थ लावता येत नाही. हा प्रचंड

उद्योग हाती घेतला खरा. पण तो अद्याप पूर्ण झालेला नाही. केवळ याच उद्योगाला वाहून घेतल्याशिवाय ते काम पूर्ण होणे शक्य नाही. जशी दोन वर्षे दिली तशी आणखी किमान पाच वर्षे द्यावी लागतील. जेव्हा जमेल तेव्हा पाहू.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने दोन वर्षांसाठी संशोधन कार्याचा आणि इतिहास लेखनाचा प्रकल्प मार्गी लावण्यास अनुदान दिल्यामुळेच निदान प्रस्तावना खंड तरी लोकांस नजर करता आला. म्हणून मंडळाचे मनःपूर्वक आभार. १९८० ते १९८३ या कालखंडात साहित्य संस्कृती मंडळाचे जे सदस्य होते, त्या सर्वांचा एकत्र आणि प्रत्येकाचा अलग-अलग मी सदैव ऋणी रहावा, एवढा लोभ त्यांनी मजवर आपला एक सभासदबंधू या नात्याने केला. त्या सर्वांची स्नेहपूर्ण आठवण माझ्या मनात सदैव ताजीच राहील. विशेषतः, प्रि. त्र्यं. कृ. टोपे, डॉ. मा. गो. माळी, प्रा. के. ज. पुरोहित आणि श्री. बाळ सामंत यांची निरपेक्ष सल्लामसलत आणि हुकमी साथ मिळाली म्हणूनच प्रकल्पाचा प्रारंभ झाला. त्याच बरोबर, सत्यशोधक समाज इतिहास प्रकल्पाच्या सल्लागार मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे आणि सदस्य श्री. शंकरराव सुरडकर प्रा. डॉ. आनंद यादव आणि डॉ. मा. गो. माळी या चौघांचा सहयोग कार्याला गती देणारा ठरला. प्रि. टोपे यांनी प्रस्तावना खंड संपूर्ण वाचून बहुमोल सूचना केल्या आणि प्रस्तावना खंडाला 'प्रस्तावना' लिहून दिली याबद्दल त्यांचे ऋण कोणत्या शब्दांनी व्यक्त करावे हेच कळत नाही. त्यांचा मजवरील दृढ विश्वास ही माझी शक्तीच ठरली, यात शंका नाही.

या प्रकल्पाच्या कार्यात अनेक संस्थाचे आणि व्यक्तींचे सहकार्य आणि सहाय्य मला लाभले. त्या सर्वांचा नामोल्लेख या ठिकाणी करणे शक्य नाही. प्रकल्पाच्या समाप्तीनंतर त्या सर्वांचे यथावत् आभार मानण्याचे मनात आहे. आज त्या सर्वांचे केवळ जाहीर आभार मानून थांबतो. तसेच, साहित्य संस्कृति मंडळाचा सर्व कर्मचारी वर्ग आणि मंडळाचे सचिव श्री. सूर्यकांत देशमुख यांनी तर मजवर सदैव स्नेहाचा वर्षावच केलेला आहे. त्या सर्वांचा मीं नितांत ऋणी आहे.

महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतरावदादा पाटील आणि मुख्य सचिव श्री. भालचंद्र देशमुख या दोघांचा माझ्यावर पूर्ण विश्वास असल्यामुळेच प्रस्तावना खंड हातावेगळा होऊ शकला, हे येथे सांगणे आवश्यक आहे. या कार्यात ज्या अडचणी आल्या त्यांचे निराकरण करण्यात या दोन महाभागांचा मोठाच वाटा आहे.

आणखी एक महत्त्वाचा नामोल्लेख म्हणजे 'मौज प्रकाशन' गृहाचे एक अध्वर्यू श्री. राम पटवर्धन यांचा. ते माझे गेली तीसपस्तीस वर्षे स्नेही आणि हितचिंतक आहेत.

त्यांनी 'प्रस्तावना खंडा'चे हस्तलिखित डोळ्याखालून घातले. त्यांच्याशी चर्चा केल्याने मला अनेकदा वाट दिसली, हे सांगायला हवे. विशेषतः, टिपांचा प्रश्न. सर्व टिपा पांची खंडांच्या अखेरीस समग्र आणि एकत्र देणेच इष्ट होईल, हा त्यांचा सल्ला मला मोलाचा वाटला. म्हणून टिपांचे संकलन पाचव्या खंडांच्या अखेरीस समग्र व एकत्र देण्याचे ठरविले आहे.

'मायक्रोग्राफचे'चे मालक श्री. प्रभाकर देसाई यांच्या सहनशीलपणाचा अगदी अंतच मी पाहिला. तरीही सदैव हसतमुखानेच ते माझे स्वागत करतात, याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

राहता राहिले माझे घरातील हक्काचे साथीदार. माझी पत्नी सौ. उमा, मुली चि. कल्याणी आणि चि. मनश्री आणि मुलगा चि शीतांशु. या चौघांनी मला सर्वतोपरी मदत केली. टिपणे काढण्यापासून डिक्टेशन घेईपर्यंतच्या सर्व कार्यात त्यांची उत्कट साथ होती म्हणूनच दहा माणसांना पाच वर्षे पुरले असते एवढे काम मी एकटा दोन वर्षात करू शकलो. आमचे गुरू श्रीमुक्तानंदस्वामी यांनी खरोखर मला या अग्निदिव्यातूनच बाहेर काढले—त्यांची कृपा सदैव लाभो, एवढीच प्रार्थना.

१४–१–८७

१७७, नंदनवन लेआऊट,

नागपूर, ४४० ००९

**महेश जोशी**

# आमूलाग्र परिवर्तनाचा काळ

## (इ. स. १७६०–१८६०)

**वर्तमानकाळ म्हणजे मागावरचे वस्त्र !**

मराठी लोकजीवनाचे जे दर्शन आपल्याला आजकाल होते, त्याचे जे रंगरूप आपणांस दिसते, ते काही एका रात्रीत यक्षिणीची कांडी फिरवून कोणी घडविलेले नाही. कोणत्याही समाजाच्या विद्यमान लोकजीवनात त्या समाजाचे सर्व ऐतिहासिक संदर्भ आणि संबंध दडून बसलेले असतात. त्यामुळेच अस्पृश्यतेचा विचार आणि व्यवहार थेट शंबुक आणि एकलव्य यांच्या काळापासून आपल्या आठवणीत साठवला आहे, असे आपणांस जाणवते. हे जाणवणे कधी प्रकट रूप घेते, कधी घेत नाही. पण समाजमनाच्या तळाशी या आठवणींचा झरा कळत नकळत झुळूझुळू वाहत असतो. शंबुकाच्या आठवणीने दलितांना जसा गहिवर येतो, तसाच गहिवर, एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय करणाऱ्या परशुरामाच्या आठवणीने, ब्राह्मणांनाही येतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आठवणीने शहाण्णवकुळी बांधवांना जो गहिवर येतो, तो, महाराजांच्या आठवणीने अन्य मराठी माणसांना

येणाऱ्या गहिवरापेक्षा थोडासा दाटच असतो. यात काहीही गैर नाही उलट, तेच स्वाभाविक होय. कारण, वर्तमानकाळ हा भूतकाळाचा सर्वात वरचा, भूतकाळाच्याच मातीचा, थर होय. कोणत्याही समाजातील विद्यमान प्रेरणांचा आणि धारणांचा, प्रथांचा आणि पंथांचा, हट्टांचा आणि थट्टांचा, इतकेच काय, पण एकूणच सर्व सामाजिक उद्गारांचा, उन्मेषांचा आणि उद्रेकांचा अन्वयार्थ यथार्थपणे ध्यानी यावा, असे आपणांस वाटत असेल, तर त्या समाजाच्या भूतकाळाची वीण आपल्याला माहीत असली पाहिजे. वर्तमानकाळ हा खरोखर मागावरच्या वस्त्रासारखा असतो. उभे आडवे धागे–ताणा आणि बाणा–एकत्र गुंफून वस्त्र विणले जाते. या वर्तमानकालरूपी वस्त्राचे सूत भूतकाळाची रुई पिंजून निघालेले असते. मराठी लोकजीवनाचे आधुनिक पर्व कोणत्याही अर्थाने या प्रक्रियेला अपवाद नाही.

## राज्यकर्ता बदलला म्हणून कालखंड बदलत नसतो

मराठी लोकजीवनाचे आधुनिक पर्व असा उल्लेख तर केला खरा; पण हे पर्व केव्हा सुरू झाले, त्याचा काहीच निर्देश नाही, असे वाचकांस वाटण्याचा संभव आहे. तसे वाटले तर काहीच नवल नाही. कारण, मराठी लोकजीवनाचे आधुनिक पर्व केव्हा सुरू झाले, याविषयी नक्की भूमिका आजवर कोणी घेतलेलीच नाही. बहुतेक लोक आधुनिक कालखंड हा इ. स. १८१८ पासून, म्हणजे पेशवाईच्या समूळ उच्चाटणानंतर धरतात. काही विद्वानांच्या मते आधुनिक पर्वाचा आरंभ १८५७ साली होतो. मध्ययुगीन राजघराणी तोवर हालचाल करीत होती आणि त्यांचा पूर्ण पाडाव जेव्हा झाला, तेव्हाच आधुनिक पर्वाचा आरंभ झाला, असा त्यांचा अभिप्राय दिसतो. कित्येक अभ्यासक या काळाची सुरुवात, राष्ट्रीय सभेची स्थापना १८८५ साली झाली म्हणून, तेव्हापासून मानतात. खरे म्हणजे, एकूण भारतीय लोकजीवनात आधुनिक पर्व नेमके केव्हा सुरू झाले, याविषयी कोणीही निश्चित, निरपवाद आणि निर्णायक असा विचार मांडलेला दिसत नाही. कोणत्याही समाजाच्या इतिहासात किंवा जीवनात असा एखादा नवा कालखंड उदयाला येतो, तेव्हा नेमके काय घडलेले असते, याविषयी आपल्या कल्पना

स्पष्ट असल्याशिवाय या संबंधात, म्हणजे आधुनिक कालखंडाच्या निर्णया-संबंधात समाधानकारक विचार हाती लागणार नाही.

कोणत्याही समाजाच्या जीवनात केवळ राज्यकर्ता बदलला म्हणून नवीन कालखंड येत नाही. आदिलशाही, निजामशाही जाऊन शिवछत्रपतींचे राज्य आले; तरी कालखंड मध्ययुगीनच राहिला. राज्यकर्ता बदलला; पण एकूण समाजव्यवस्था काही बदलली नाही. शिवछत्रपतींचा मानस समाज-व्यवस्थेत बदल करण्याकडे होता; नाही असे नाही. पण समाजव्यवस्था बदलली नाही. ज्ञानेश्वर–नामदेवांचा कालखंड आणि तुकाराम–रामदासांचा कालखंड एकच मानावा लागतो. कारण, या संपूर्ण पाचशे वर्षांच्या कालखंडात सामान्यपणे मराठी लोकजीवनात समान प्रेरणा आणि समान धारणा माणसांना कार्यप्रवृत्त करताना दिसतात. त्यांचे कर्तृत्व एकाच प्रेरणेने आणि धारणेने भारलेले दिसते. या दृष्टीने पाहिले, तर शिवाजी महाराज आणि अकबर बादशहा यांचा समावेश एकाच कालखंडात करावा लागतो.

महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्री चक्रधरस्वामीं यानी मराठी भाषेला धर्मभाषेचे स्थान आणि वळण निर्माण करून दिले. त्यापूर्वी, किंवा मराठी लोकजीवनात ज्ञानेश्वरादि संतांचा काळ येण्यापूर्वी, काय स्थिती होती, याविषयी अद्यापही पुरेसे संशोधन झालेले नाही. उदाहरणार्थ, महारट्टिक हे जर मराठी लोकांचे आद्य पूर्वज मानले तर मराठी समाजाची पहिली जडणघडण वैनगंगेच्या तीरावर सध्या मध्यप्रदेशात समाविष्ट झालेल्या, बस्तर–बालाघाट या, निसर्गरम्य प्रदेशात झाली असावी, असे समजावयास हवे. मराठीतील आद्य कवि श्री. मुकुंदराज यांचे वास्तव्य याच भागात होते. त्यांनी आपला ‘विवेकसिंधु’ हा ग्रंथ त्याच परिसरात लिहिला, असे साधार म्हणता येते. पण याविषयी मराठी समाजात अद्यापही पुरेशी शास्त्रीय चिकित्साबुद्धी आढळत नाही. किंबहुना मराठी समाज हा मुळात ऑस्ट्रोलॉईड लोकसमूहातून वाढीस लागलेला समाज आहे की काय, आणि तसा तो असल्यास, या समाजाची जडणघडण कशी झाली, याही प्रश्नाचा कोणी मागोवा घेताना दिसत नाही. अजिंठा–वेरूळची बौद्धलेणी, हा, मराठी

समाजाची जडणघडण कशी झाली, याविषयीच्या संशोधनातील महत्त्वाचा दुवा ठरू शकतो, हेही अद्याप आमच्या लक्षात येत नाही. मराठी भाषेचा, संस्कृतीचा वा समाजाचा विकास कोणत्या स्थानी, कोणत्या टप्प्याने झाला, याविषयी पूर्वग्रहरहित बुद्धीने संशोधन करण्याची गरज आहे. मराठी लोकांचे उगमस्थान कोणते, असा मूळ प्रश्न हाती घेऊनच संशोधन व्हावयास हवे.[१] अशा संशोधनाच्या अभावी ज्ञानेश्वर-पूर्वकालीन मराठी समाजाचा इतिहास अपुराच राहिलेला आहे. खरे म्हणजे, आद्य कालखंडाचा नीट उलगडा झाल्याशिवाय आधुनिक कालखंडाचाही पूर्ण उलगडा होऊ शकणार नाही.

## राज्याभिषेक हा राष्ट्रनिर्मितीचाच संकेत!

मराठी समाजाचा इतिहास पाहू जाता ज्ञानेश्वर–नामदेवांचा काळ हा समाजजागृती करण्याचा काळ ठरतो. कोणत्याही समाजाच्या हातची सत्ता निघून गेल्यानंतर समाजजागृतीचे कार्य केवळ भाषेच्याच माध्यमातून होऊ शकते, हा आपला आधुनिक काळातील अनुभव जमेस धरता, ज्ञानेश्वरादि संतांच्या पूर्वी मराठी समाजाच्या हाती सत्ता असली पाहिजे, असा निष्कर्ष काढता येतो. पण या मराठी सत्तेला आधारभूत असणारी संपत्ती नंतरच्या काळात कुठे लुप्त झाली, याचा काहीच उलगडा होत नाही. किंबहुना, ज्ञानेश्वर–नामदेवांच्या काळापासूनच मराठी समाजाचा स्वतःचा असा धनिक-वर्ग-वैश्यवर्ग कोणता याचाही उलगडा होत नाही. मध्ययुगीन कालखंडात मराठी समाजात श्रीमंत म्हणता येईल असा वर्ग म्हणजे तेली, माळी आणि धनगर या तीन समाजांचाच. मराठा समाजातील देशमुखी–पाटीलकीची घराणी श्रीमत असत. पण एकूण संपत्तीचा आणि धनाचा व्यवहार मराठी समाजाच्या हाती होता का, हा प्रश्नच आहे. व्यापाराचे क्षेत्र सदैव मराठी समाजाच्या आवाक्याबाहेरच राहिलेले होते. व्यापार कोणा समाजाच्या हाती होता, याविषयीही पुरेसे संशोधन झालेले नाही.[२] पण एक बाब निश्चित की, पश्चिम किनाऱ्यावरील व्यापार अरबांच्या हाती असल्यामुळेच, ओरिसाचा थोर सम्राट गजपति कपिलेंद्रदेव याचे हातून पूर्ण बीमोड होऊनही, बहामनी राजवट कन्याकुमारीपासून जगदलपूरपर्यंत तीनशे वर्षे अबाधीत राहिली. (बहामनी घराण्याच्या पाच फळ्या झाल्या; त्यांचा कालखंड धरून सर्वांना मिळून

‘ बहामनी राजवट ’ हा शब्दप्रयोग आहे. ) बहामनी राज्याच्या पोटशाखांमुळे मराठी समाज खंडित झाला. या दृष्टीने पाहिले, तर सर्व मराठी भाषिकांना एका छत्राखाली आणणारी पहिली राजवट हसन गंगू बहामनीचीच म्हणावी लागेल! आदिलशाहीचा कारभार मराठी भाषेतही चालत असे. त्यावरून ‘ मराठी ’च्या अस्तित्वाला राजकीय धार आलेली होती, असे म्हणता येईल. याचा अर्थ एवढाच कीं, संतांनी मराठी भाषेत ज्ञानाचे भांडार लुटून आणल्यामुळे ती शक्तिसंपन्न झाली होती. या शक्तीचा संचार तेवढा व्हायचा राहिला होता. तो शिवछत्रपतींच्या रूपाने झाला. मराठी समाजात स्वत:ची राजकीय सत्ता निर्माण करण्याची ऊर्मी साकार व्हावयास सुमारे चारशे वर्षे लागली. अशी स्वकीय सत्ता निर्माण होताच मराठी लोकसमूहाला ‘ राष्ट्र ’ ही संज्ञा प्राप्त झाली. या अर्थाने पाहिले, तर शिवछत्रपतींच्या राज्याभिषेकापासूनच मराठी लोकजीवनातील आधुनिक पर्वाला प्रारंभ झाला, असे म्हणता येईल.

१६७४ साली शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला या घटने इतकीच निर्णायक घटना १७६१ साली पानिपतच्या लढाईत सदाशिवरावभाऊचा धुव्वा उडाला, ही होय. शिवछत्रपतींनी जे राज्य निर्माण केले ते या दोन घटनांमधील ८६ वर्षांच्या काळात वाढले आणि टिकले. पहिली घटना मराठी समाजाच्या उत्कर्षाला आणि दुसरी घटना ऱ्हासाला कारणीभूत झाली. मराठी राजवटीचा एकूण कालखंड १६७४ ते १८१८ असा १४४ वर्षांचा पैकी ८६ वर्षे उत्कर्षाची आणि ५८ वर्षे ऱ्हासाची. पण शिवछत्रपतींपूर्वी शहाजी राजांनी आपल्या कर्तृत्वाने स्वराज्यनिर्मितीचे वातावरण उभे केले होते आणि पेशवाईच्या अस्तानंतरही १८५७ सालाचा इंग्रजांविरुद्धचा सशस्त्र उठाव नानासाहेब पेशव्यांच्या पुढाकारामुळेच झाला. या दोन दृष्टींनी एकूण स्वराज्यप्रभावाचा काळ १६२० ते १८६० असा २४० वर्षांचा धरावा लागेल. शिवराज्याभिषेकाला तर राष्ट्रनिर्मितीचा संकेत म्हणूनच लोकजीवनात स्थान मिळाले. ब्रिटिश राजनीतीला शह देण्यासाठी लोकमान्य टिळक यांनी १८९७ साली ‘ शिवजयंती ’ दरवर्षी साजरी करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आणि अलीकडे स्वातंत्र्यकालात १९७४ साली शिवराज्याभिषेकाचे तृतीय शतक मोठ्या गौरवाने साजरे झाले. या दोन्ही उत्सवांमागे, ‘ राज्याभिषेक हा राष्ट्र

निर्मितीचा संकेत होय, हीच भूमिका होती. अगदी हेमाडपंतापासून दत्तो वामनापर्यंत आपल्याला सलग, एकच एक, अखंड इतिहास असल्याचा दावा मराठी माणूस त्यामुळेच करीत असतो. शिवछत्रपतींच्या नावावर आजमितीस चलनी नाण्याचे महत्त्व आणि प्रवाहित्व, तिळावर साखरेचा पाक चढावा, तसे चढले आहे. खरोखर, आम्ही शिवनामाचा ' केशरी हलवा 'च फुलवला आहे! वर्तमानकाळावरील भूतकाळाची पुटे ही अनेकदा हलव्याइतकीच सुरेख, सुंदर आणि सुगंधी असतात!! त्यामुळेच १७६१ सालचा पानिपतचा पराभव नकळत आमच्या डोळ्याआड होतो. त्या दुर्दैवी घटनेच्या योगाने मराठी लोकजीवनाचे मध्ययुगीन पर्व संपले, हे अजूनही आमच्या ध्यानी येत नाही.

## शाहूने विजेची चपळाई दाखवली

मराठी राज्याची पाच स्थित्यंतरे झाली. पहिली स्थिती इ. स. १६७४ ते १७०७; (२) १७०७ ते १७४९; (३) १७५० ते १७७२; (४) १७७२ ते १८०० आणि (५) १८०० ते १८१८. या पाच स्थित्यंतराचा आढावा घेतला तर आपणांस असे दिसेल की, शाहूकाल सोडला तर कोणत्याच काळात मराठी राजवटीचा सतत विस्तार झालेला नाही. पहिला कालखंड आपण ' शिवकाल ' या नावानेच ओळखला पाहिजे. कारण, शिवछत्रपतींनी जेवढे राज्य संपादन केले तेवढें कायम ठेवण्यासाठीच त्यांच्या पश्चात २७ वर्षे संभाजीराजे, राजा राजाराम आणि राणी ताराबाई यांना आपल्या जीवाची शर्थ करावी लागली. तिसरा कालखंड हा ' पेशवाई काळ ' म्हणता येईल. कारण, नानासाहेब आणि थोरले माधवराव या दोन पेशव्यांनी बरेवाईट कर्तेपण याच काळात दाखविले. चौथा कालखंड ' बारभाई काळ '. तो नाना फडणीस, महादजी शिंदे आणि अहिल्याबाई होळकर यांच्या कर्तृत्वाने गाजला. इंग्रजांच्या राजनीतीला अडसर घालता घालता त्यांची कारकीर्द संपली. पांचवा कालखंड हा सर्वस्वी ' यशवंतराव होळकरां 'चा काळ. या शेवटच्या पर्वात ' कंपनी सरकारा 'ची जीत होऊन मराठशाहीचा पूर्ण अस्त झाला.

कोणत्याही समाजाच्या जीवनातील एखादा कालखंड संपतो तेव्हा त्याच्या सामाजिक एकजिनसीपणाचे एखादे तरी मूळ उपटले जाते. पण येथे

पाहावे तो मराठी समाजजीवनाची सर्वच मुळे पानिपतच्या पराभवानंतर पार उखडली गेली. मराठी राजवटीचा प्रभावकाळ २४० वर्षांचा असला तरी प्रत्यक्ष अंमलाचा काळ १४४ वर्षांचाच येतो. या प्रत्यक्ष राज्याचे दोन भाग पडतात. मराठशाही आणि ब्राह्मणशाही. (इतिहासाचार्य राजवाडे यांनीच पेशवाईला उद्देशून 'ब्राह्मणशाही' हा शब्द वापरलेला आहे.) पैकी मराठशाही ७५ वर्षे आणि ब्राह्मणशाही ६९ वर्षे होती. ही विभागणी पाहिली तर शाहू छत्रपती यांची राजवट हींच सर्वात मोठी राजवट ठरते. एकूण ४२ वर्षे त्यांची कारकीर्द झाली. त्यांच्याच कारकीर्दीत मराठी साम्राज्याचा विस्तार तुंगभद्रे-पासून सिंधूपर्यंत आणि बडोद्यापासून जगन्नाथपुरीपर्यंत हिंदुस्थानच्या चारी भागांत झाला. शाहू छत्रपतींच्या कार्याचे आणि कर्तृत्वाचे रहस्य लक्षात येण्यासाठी शाहूपूर्वी आणि शाहूनंतर मराठी राज्याची स्थिती काय होती हे आपण नीट पाहिले पाहिजे.

शिवछत्रपती, संभाजी राजे किंवा राजा राजाराम आणि ताराबाई या सर्वांची दृष्टी आणि शक्ती स्वराज्याच्या स्थापनेवर आणि संरक्षणावर खिळून राहिली होती. औरंगजेब बादशहाच्या मृत्यूने स्वराज्यावरील बाह्य संकट नाहीसे झाले; पण शाहूच्या सुटकेमुळे मराठशाहीत दोन तट पडले. छत्रपति-पदाचा लाभ होताच शाहूने स्वराज्याच्या दोन पात्या अधिकृतपणे मान्य करून अंतर्गत विरोध पोटात पचविला आणि तो, लागलीच, नर्मदेच्या उत्तरेकडील राजकारणात, विजेच्या चपळाईने, अहमहमिकेने उतरला.

## साम्राज्याचे बाळकडू शाहूला औरंगजेबानेच पाजले!

संभाजी राजांनी उत्तरेच्या राजकारणात हात घातला होता; नाही असे नाही. औरंगजेबपुत्र अकबर यास आपल्या पित्याच्या विरोधात बंडाला प्रवृत्त करण्याचा चांगलाच घाट त्यांनी घातला होता. मोगल घराण्यात अंतर्गत कलह लावण्याचा हा प्रयत्न अखेर फसला. पण राज्यकर्त्यांच्या घरात दुही पेरण्याची ही नीती शाहू महाराजांनी उचलली नाही. त्यांनी जो मार्ग स्वीकारला तो शाहूपूर्वी मराठी राजवटीच्या कुणाही धुरिणाने स्वीकारलेला नव्हता. किंबहुना, या मार्गाने जावे, साम्राज्य वाढवावे आणि केवळ मराठ्यांचेच

नव्हे, तर अखिल भारतवर्षाचे राजकारण करावे, अशी उर्मी मराठशाहीत फक्त शाहू छत्रपतींच्याच अंतःकरणात जोर करून उठली होती. पण साम्राज्य-विस्तारासाठी जो दूरदर्शीपणा, जो धीर आणि जो लोकसंग्रह अंगी असावा लागतो, तो शाहूच्या ठायी कसा निर्माण झाला ? कारण, शाहूचे सर्व बालपण आणि अर्धेअधिक यौवन तर औरंगजेबाच्या कैदेतच गेले ! या ठिकाणी आपण नेमके हे विसरतो की, शाहूला कैद केले तरी औरंगजेबाने त्यास राजपुत्राच्या इतमामानेच वाढविले; त्यास किंवा त्याची आई राणी येसूबाई यांना काही अंधारकोठडीत ठेवण्यात आले नव्हते. उलट, शाहूचा तंबू बादशहाच्या तंबूला लागूनच उभा केला जाई. त्यामुळे त्यास अगदी लहानपणापासूनच संपूर्ण हिंदुस्थानचा आणि दख्खनचा राज्यकारभार कसा चालतो हे प्रत्यक्ष पाहावयास आणि ऐकावयास मिळाले.[१] प्रांतोप्रांतीचे सरदार आपली सुभेदारी कशी चालवितात आणि बादशहा त्यांचेवर आपली पकड कशी जमवतो, हे त्यास किमान पंधरा वर्षे जवळून अजमावता आले. आपणास दिल्लीश्वराने 'सुभेदारीची वस्त्रे बहाल केली आहेत' अशी द्वाही फिरवून हे सरदार पाटील-देशमुख, पटेल-देसाई किंवा ठाकूर-प्रधान यांना कसे आपल्या दावणीला बांधत, हे त्यास बसल्या जागी समजले होते. इतकेच नव्हे, तर सुभेदारीची वस्त्रे पाहिली की ही पाटील-देशमुख मंडळी साराभरणीची कशी गर्दी करतात, हेही त्यास कळून चुकले होते. अशा रीतीने औरंगजेबाच्या कैदेत शाहू राजाला साम्राज्याचे बाळकडूच मिळाले. त्यामुळे त्याची नजर फाकली, हिंमत वाढली आणि बुद्धी प्रगल्भ झाली. म्हणूनच, छत्रपतींची गादी मिळताच, त्याने आपसातील भाऊबंदकीला आळा घालून, गोदावरीच्या उत्तरेला आपले सुभेदार नेमून टाकले. गुजरात, नागपूर, माळवा आणि हिंदुस्थान या ठिकाणी आपले सुभे स्थापन करण्याची हिंमत आणि हिकमत शाहू राजाला औरंगजेब बादशहाच्या सावलीतच प्राप्त झाली असली पाहिजे. स्वराज्यस्थापना आणि साम्राज्यविस्तार ही दोन भिन्न कार्ये होत. ही साम्राज्यविस्ताराची विद्या शाहू राजांनी औरंगजेब बादशहाकडून उचलली, यात शंकाच नाही. 'आज्ञापत्र' या राजनीति ग्रंथात शिवाजी महाराजांनी देशमुख-देसायांना राज्याचे 'दायाद' म्हणजे 'वाटेकरी आणि शत्रू' असे संबोधले आहे. देशमुखीची वस्त्रे कोणास द्यावयाची नाहीत, असा त्यांनी नियमच केला. पण याच 'दायादा'च्या

जिवावर शाहू महाराजांनी मराठी साम्राज्याचा डोलारा रचला. स्वराज्य आणि साम्राज्य यातील फरक याद्वारे जसा लक्षात येतो, तसाच मोगल साम्राज्याचा विस्तार देशभर कसा होऊ शकला, याचाही उलगडा होऊन जातो. ही साम्राज्यनीती शाहू महाराजांनी प्रत्यक्ष अंगीकारून मोगल साम्राज्याऐवजी मराठी साम्राज्याची बांधणी केली. शाहूची ही पावले पोर्तुगीजांनी तात्काळ हेरली असावीत. कारण, १७३० साली गोव्याच्या व्हाइसरॉयने दिल्ली दरबारातील आपल्या ( पोर्तुगीज ) वकिलास असे कळविले होते की, "शाहूराजे इतके बलाढ्य झाले आहेत की त्यांच्यापासून आता बादशहाच्या साम्राज्यालाही धोका निर्माण झाला आहे."[४] माळव्यावर मराठ्यांचा पूर्ण अमल बसताच दिल्लीचा आणि दख्खनचा सांधा निखळला आणि निजाम स्वतंत्र झाला! मोगलांचे साम्राज्य शाहू राजांनीच खिळखिळे करून टाकले; मराठ्यांचे साम्राज्य त्यांनीच उभे केलें.

## सलोखा, समंजसपणा आणि समृद्धी यांचा काळ

शाहू छत्रपतींच्या कार्याचे हे रहस्य लक्षात आले नाही म्हणूनच मराठशाहीच्या विस्ताराचा अर्थबोध तत्कालीन आणि तदनंतरच्या पिढ्यांना झाला नाही. १६५६ साली स्वराज्याचे तोरण बांधल्यापासून १६७४ साली राज्यभिषेक होईपर्यंतच्या १८ वर्षांच्या काळात मराठी लोकजीवनाचे घट्ट संमिश्रण झाले होते. ही प्रक्रिया अर्थातच शहाजी राजांच्या काळापासून म्हणजे १६२० पासून सुरू झाली होती आणि तीच शिवछत्रपतींच्या रूपाने पुढे स्थिरावली. या रीतीने जो एकजीव मराठी समाज उभा झाला त्याची कसोटी शिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर सतत २७ वर्षे लागली आणि तो समाज एकजुटीच्या प्रत्येक कसोटीवर बावनकशी ठरला. शाहूमहाराजांचे वैशिष्ट्य हे की, मराठी समाजातील सर्व जातीजमाती एकजीव झाल्या आहेत, हे त्यांनी हेरले आणि त्या एकजीवपणाच्या पायावरच आपली सर्व राजनीती रचली. बाळाजी विश्वनाथानंतर अवघ्या विशीतील बाजीरावास पेशवाईची वस्त्रे देताना शाहूमहाराजांची राजनीती स्पष्ट होऊन गेली. मराठी समाजाचे राजकारण शाहूमहाराजांनीच एकमुखी केले. त्यासाठी राणी ताराबाईशी समझोता करून तिला कोल्हापूरची गादी वेगळी करून दिली. १७०७ ते १७४९ हा

बेचाळीस वर्षांचा काळ म्हणजे मराठी लोकजीवनातील सलोख्याचा, समंजसपणाचा आणि समृद्धीचा काळ होय. शाहूची कारकीर्द संपल्यानंतर मात्र, अवघ्या दहाच वर्षात, या एकजुटीला आणि त्यातून उभ्या झालेल्या एकमुखी राजकारणाला जागोजाग सुरुंग लागले. पानिपतच्या पराभवाने ते उघड झाले. नव्हे; त्या सुरुंगांमुळेच पानिपतचा पराभव अटळ झाला. शिंदे, होळकर, गायकवाड आणि भोसले हे पेशव्यांच्या बरोबरीचे सरदार होते आणि छत्रपती शाहूच्या मृत्यूनंतर दक्षिणेत पेशवे जरी निरंकुश झाले तरी उत्तरेकडील हे सरदार त्यांना छत्रपतींचा मान द्यावयास तयार नव्हते. पेशव्यांना सर्वस्व अर्पण करावयास त्यापैकी कोणीच तयार झाले नाही. पेशव्यांनी नियमन करून पाहिले; पण ते जमले नाही. बारभाईच्या काळात नाना फडणीस, महादजी शिंदे आणि देवी अहिल्याबाई होळकर या तिघांनी आपल्यापरीने शर्थ केली. पण अखेरीस आपसातील तंटेबखेडे वाढत जाऊन पुणे शहराला अक्षरशः आगच लागली. शाहूपूर्वीची पन्नास वर्षे, शाहूची बेचाळीस वर्षे आणि शाहूनंतरची पन्नास वर्षे असा दीडशे वर्षांचा मराठी समाजाचा आर्थिक–सामाजिक इतिहास स्वतंत्रपणेच लिहावयास हवा आहे. तसा तो लिहिला गेला, तर शाहू छत्रपतीनेच मराठी लोकांच्या जीवनात एकवाक्यता आणून त्यांचे राजकारण एकमुखी केले हे स्पष्टपणे दिसून येईल. मराठी समाजातील सर्व जातीजमातींचे राजकारण शाहूछत्रपतींच्या रूपाने एकवटले आणि शाहूच्या मृत्यूनंतर ते विस्कटून गेले.

## स्वकीय सत्तेचा अंत पेशव्यांनीच केला!

शाहूछत्रपतींच्या कार्याचा एवढा विस्तारपूर्वक ऊहापोह करण्याचे कारण हे की, १७६० ते १९६० या दोनशे वर्षांच्या कालखंडातील सर्व राजकीय–सामाजिक घटनांच्या मुळाशी शाहूकाळात मराठी लोकजीवनात निर्माण झालेल्या या एकवाक्यतेचाच संदर्भ आहे. ही एकवाक्यता शाहूच्या पश्चात टिकली नाहीं किंवा टिकविता आली नाही. पानिपतच्या लढाईपूर्वीच मराठी महामंडळात दुहीची, दुस्वासाची आणि दुराव्याची भावना बळावली होती. त्यामुळेच अहमदशहा अब्दालीशी लढताना मराठी सैन्यात पूर्वीची एकदिलाची भावना नव्हती. पानिपतच्या लढाईनंतर महामंडळातील सर्वच वातावरण

एकदम पालटले. साताऱ्याहून पुण्यास राजधानी आल्यावर, म्हणजे १७५० सालानंतर, परिस्थिती कशी पालटली, याचे वर्णन करताना न्या. रानडे लिहितात, " या नंतरच्या काळात असे स्पष्ट दिसते की, कीर्तिशाली आणि मुलुखगिरी करणाऱ्या लष्करी सरदारांत निखालसपणे ब्राह्मण लोकच प्रामुख्याने झळकू लागले. प्रभु, शेणवी इत्यादी पांढरपेशा ब्राह्मणेतरांचाही पुणे दरबारात टिकाव लागेनासा झाला. याचा परिणाम पक्षोपपक्षांची बजबजपुरी माजण्यात झाला. समाजाच्या सगळ्याच वर्गात सक्रिय सहानुभूतीचा अभाव दिसू लागला. शिवाजी, राजाराम आणि शाहू यांच्या काळात हे समाजातील वर्ग एकोप्याने राहावे अशी राजकीय दृष्टी होती. ब्राह्मणांना पेशवाईत असे वाटू लागले, की आता आपणच खरेखुरे राजे आहोत. ब्राह्मणांना स्वतंत्र सवलती उपभोगावयास मिळू लागल्या. अनेक बाबतीत इतरांना लागू असलेल्या कायद्यातून त्यांना सूट मिळू लागली. "[५] अठराव्या शतकाच्या उतरार्धातच अशा रीतीने मराठी लोकजीवनाची एकमुखी मूस फुटून गेली होती. सर्व ज़ातीजमातींचे मिळून एकवटलेले आणि एकमुखी झालेले मराठ्यांचे राजकारण पानिपतच्या पराभवाने जे भंगले ते कायमचेच. मराठी लोकजीवनातील मध्ययुगीन कालखंडाचा अंत म्हणूनच पानिपतच्या पराभवापाशीच जाऊन भिडतो.

## इंग्रजांनी उत्पादनव्यवस्था मोडीत काढली

पण १७६१ साली मराठी लोकजीवनातील मध्ययुगीन कालखंड संपला, हे जरी स्पष्ट झाले तरी तेव्हापासूनच आधुनिक कालखंडाला आरंभ झाला, असे मानावयास प्रमाण काय? अर्थात, मराठी सत्तेचे मध्यवर्ती केंद्र नष्ट झाले, ही एकच एक गोष्ट आधुनिक कालाची सुरुवात मानता येत नाही. पण येथे एवढेंच स्पष्ट करावयास हवे की, पेशवाईची स्थापना झाली, राजधानी साताऱ्याहून पुण्यास आली, हेच मराठ्यांच्या मध्यवर्ती केंद्राचे विसर्जन होते. पेशवाईनेच मराठशाही बुडविली; मराठी लोकजीवनातील स्वकीय सत्तेचा अंत पेशव्यांनीच केला; इंग्रजांनी नाही. इंग्रजांनी पेशवे संपवले, गायकवाड संपवले, शिंदे संपवले, भोसले संपवले आणि होळकर संपवले. बहामनी राज्याची जशी पाच शकले झाली तशीच पाच शकले

मराठशाहीची झाली. इंग्रजांचे राजकीय आगमन हे ही शकले पडल्यानंतरचे आहे. प्लासीची लढाई १७५६ सालची.

पण, इंग्रजांची राजवट सुरू झाली म्हणून आधुनिक कालखंड सुरू झाला, असे मात्र नव्हे. ही राजवट जर मोगल बादशहांसारखीच असती, तर कदाचित आधुनिक कालखंडाची सुरुवातही लांबली असती. पण ती पूर्वीच्या प्रत्येक राजवटीहून वेगळी होती. ती राजवट एका 'व्यापार कंपनी'ची होती. बंगालच्या दिवाणीचे अधिकार, क्लाईव्हने प्लासीची लढाई जिंकून, ईस्ट इंडिया कंपनीच्या हाती टाकले न टाकले तोच भारतीय समाजाच्या शिक्षणव्यवस्थेलाच 'कंपनी' सरकारने हात घातला. १७६५ साली बनारस येथील एक 'पाठशाळा' आणि कलकत्ता येथील एक 'मदरसा' यांना अनुदान देण्यात आल्याची नोंद आहे. आजमितीस शिक्षणक्षेत्रात जे सरकारी अनुदान युग अवतरलेले आहे, ते अशा रीतीने १७६५ सालीच सुरू झाले. 'शासकीय शिक्षण अनुदान' ही, भारतीय संदर्भात, आधुनिकतेचीच एक कसोटी होय. भारतीय समाजात शिक्षणाच्या व्यवस्थेचे व्यवसायानुरूप जातिनिहाय विकेंद्रीकरण झालेले होते. देशातील राजकीय सत्तेचे मध्यवर्ती केंद्र बाराव्या शतकापासून जरी तुर्कांच्या हाती गेले होते, तरीही या जातिनिहाय व्यवसायानुरूप शिक्षणव्यवस्थेला यत्किंचितही धक्का लागलेला नव्हता किंवा एखादा तडाही गेलेला नव्हता. उलट, या जातिनिहाय शिक्षण-पद्धतीचा अवलंब करून पिढीजात व्यवसायनिष्ठ शिक्षणाची प्रथा येथील मुसलमान समाजाच्या अंतरंगातही घुसली. पण १७६५ सालापासून या विकेंद्रित शिक्षणव्यवस्थेला सारखा सुरुंगच लागत गेला आणि अखेर, अवघ्या पाऊणशे वर्षांत, शिक्षणाचा आणि समाजाचा जो एकजीव, परस्परावलंबी संबंध होता, तोच, सांधा निखळावा तसा, तुटून गेला. शासनाचा आणि शिक्षणाचा 'दाता–याचक' संबंध प्रस्थापित झाला; तोच आजही चालू आहे. 'शाळा' कोणती, याची व्याख्याच बदलली! 'मदरसा' आणि 'पाठशाळा' यांची पाहणी करण्यासाठी, 'इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस' किंवा 'इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स' यासारखा 'इन्स्पेक्टर जनरल ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' नेमण्यात आला होता. तसे पाहिले, तर भारतीय

समाजातील शिक्षणाचे मूळ शेकडो वर्षांचे जुने. ते उपटले जाणे हे अतर्क्य आणि असंभाव्य; पण तेही पार उखडले गेले. मात्र आधुनिक कालखंडाचे वैशिष्ट्य हे की, केवळ शिक्षणासारखे एखादेच मूळ उपटेले गेले असे नव्हे, तर सर्वच सामाजिक मुळे एकापाठोपाठ एक उपटली गेली. शिक्षणापाठोपाठ व्यापार, उद्योग, शेती या प्रत्येक क्षेत्रात 'कंपनी' चे सरकार घुसले. येथील परदेशी व्यापार पूर्णपणे कंपनीने आपल्या ताब्यात घेतला; त्यास पन्नासच वर्षें लागली. येथील विणकर व्यवसायाला पूर्ण शह दिला गेला आणि जाडेभरडे कापड विणण्यापलिकडे त्या व्यवसायाची कुवत राहिली नाही. हे घडावयास पाऊणशे वर्षें लागली. शेतीच्या संदर्भात साराबंदीची नवी व्यवस्था तर पहिल्या अवघ्या तीसतीस वर्षातच, पण बंगाल, मद्रास आणि मुंबई इलाख्यात भिन्नभिन्न वेळी लावण्यात आली. कारण, बंगालमध्ये 'कंपनी'चे सरकार १७६५ मध्ये, मद्रासममध्ये १८०० मध्ये आणि मुंबईमध्ये १८१८ साली असे क्रमाक्रमाने स्थिरावत गेले. याहीपेक्षा सर्वंकष असा बदल लष्करी क्षेत्रात झाला. १७५६ साली प्लासीची लढाई जिंकल्यापासूनच एतद्देशियांना निःशस्त्र करण्याचा सपाटा 'कंपनी सरकारने लावला. इतका की, १८६० साली संपूर्ण हिंदुस्थानच्या हिंदुस्थान संपूर्णपणे निःशस्त्र झाला. कोणाही भारतीयाला 'सरकार'च्या पूर्वपरवानगीशिवाय हत्यार बाळगता येणार नाही, असा कायद्याच, 'आर्म्स ॲक्ट' या नावानेच, करण्यात आला. भारतीय समाजाचा शस्त्र बाळगण्याचा, शस्त्रविद्या शिकण्याचा आणि शस्त्रास्त्रे तयार करण्याचा मूळ सार्वभौम राजकीय अधिकारच नष्ट करण्यात आला. या सर्व परिवर्तनाची सुरुवात १७६० सालापासून झाली, असेच मानणे युक्त होय. अशा रीतीने आधुनिक कालखंड भारतीय लोकजीवनाचे समूळ उच्छेदन करीत करीतच वाढीस लागला. असा कालखंड, २५०० वर्षांपूर्वी, बौद्ध धर्माच्या स्थापनेपूर्वी, आला होता. त्यानंतर, एकूण सामाजिक जीवनच उन्मळून टाकणारे परिवर्तन 'कंपनी'चेच सरकार आपल्याबरोबर घेऊन आले. १७६५ नंतर जे युग आले ते भारतीय लोकजीवनाच्या मुळालाच हात घालीत गेले. पण 'टोपीवाला' आपल्या जीवनात कोणते उत्पात घडवीत आहे, याचे भान कुणाही भारतीय राज्यकर्त्याला अठराव्या शतकात आले नाही आणि एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर जेव्हा ते भान आले, तेव्हा येथील प्रत्येक राज्यकर्ता सैन्यहीन आणि

शस्त्रहीन होऊन गेलेला होतो. संपूर्ण भारतीय समाजाचे निःशस्त्रीकरण हे या समाजाच्या उत्पादनशून्यतेचेच बाह्य लक्षण होते. अवघ्या शंभर वर्षांत (१७५६ ते १८५६) या देशातील एकूण उत्पादनव्यवस्थाच कोलमडून पडली. हा केवळ एका कालखंडाचा अंत नव्हे; तर एकूण 'समाजा'चाच अंत होता.

## मराठे आणि मोगल एकाच माळेचे मणी !

मुख्य म्हणजे, 'सरकार' या शब्दालाच नवा अर्थ, नवा संदर्भ, नवा संबंध आणि नवा व्यवहार चिकटला. 'सरकार' हा शब्द भारतीय भाषांमध्ये स्थानिक संदर्भाने आणि संबंधाने युक्त होता. पाटीलकी, देशमुखी ही सारावसुलीची किंवा बंदोबस्ताची कामे करणे एवढाच व्यवहार त्यातून डोकावत असे, 'सरकार' म्हणजे धनी वा राजा असा अर्थ होई, पण १७६१ सालानंतर 'कंपनीचे' सरकार :अस्तित्वात आले. या 'सरकार' चा संदर्भ 'सार्वदेशिक,' संबंध 'जागतिक', व्यवहार 'आर्थिक उलाढाली'चा आणि अर्थ 'शासनयंत्रणा' असा होता. समाजाच्या राजकीय व्यवहाराचे अधिष्ठान बदलले, सामाजिक व्यवहाराचे संधान सुटले; आर्थिक व्यवहाराचे मूळ उखडले आणि एकूण लोकजीवनात अनर्थाचे पेव फुटले. हे सर्व अवघ्या शंभर वर्षात घडले. 'सरकार' हे पूर्वी व्यक्ती होते; १७६१ सालानंतर ते 'संस्था' बनले, राजद्रोह, वकील, दरबार यासारखे अनेक जुने शब्द अर्थांची नवी शेलापागोटी लावून मिरवू लागले. 'स्वामी' जाऊन 'साहेब' आला; 'स्वामिद्रोहा' ऐवजी 'राज्यद्रोह' आला—हा तर सांस्कृतिक परिवर्तनाचाच प्रकार. सारांश, प्लासीची क्लाईव्हची जीत आणि पानिपतची सदाशिवरावभाऊची हार या दोन घटनांनी भारतीय लोकजीवन आधुनिक काळाच्या उंबरठ्यावर आणून सोडले, असे निश्चित, निरपवाद आणि निर्णायक विधान आपणांस करता येईल.

प्रश्न पडतो तो हा की, हा एवढा उत्पात होऊ घातला आहे, हे निदान महाराष्ट्रातील राजकार्यधुरंधरांच्या तरी कसे लक्षात आले नाही? निदान म्हणण्याचे कारण हे की, यावेळी म्हणजे अठराव्या शतकाच्या

उत्तरार्धात तीनचतुर्थांश भारतीय भूमीवर मराठ्यांचीच सत्ता होती. एक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोडली तर 'टोपीवाल्यां'चे हे गोरेगोमटे राजकीय संकट नेमके कोणत्या स्वरूपाचे आहे, हे अन्य कोणाही मराठी मुत्सद्यास दिसले नव्हते. पण 'टोपीवाला' सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक अशी सर्व प्रकारच्या संकटांची मोटच आपल्या डोईवरून वाहून आणतो आहे, हे तर 'बाई'च्याही गावी नव्हते. किंबहुना, 'टोपीवाला' कोण, कुठला कशाला आला नि काय करणार याचाही फारसा विचार कोणी केला नाही. मराठेच काय, पण मोगलसुद्धा तसलेच.[७] ब्रिटिश व्यापाऱ्यांना हिंदुस्थानात व्यापाराला मुभा आणि सवलत शहाजहान बादशहाने दिली आणि औरंगजेबाने ईस्ट इंडिया कंपनीला, व्यापाराला सोयीचे व्हावे म्हणून, 'कालिकता' 'सूतामाटी' आणि 'गोविंदपूर' या तीन खेड्यांची जहागीर दिली. पुढे कंपनी जेव्हा तिथे एक कडेकोट किल्लाच बांधावयास निघाली आणि तिथे सशस्त्र सैन्याचीही उभारणी करू लागली तेव्हा बंगालच्या सुभेदाराने—अझमशहाने—बादशहास तसे कळविले आणि त्याविषयी 'कंपनी'ला ताकीद द्यावी, अशी विनंती केली. या अपराधाचे निमित्त करून औरंगजेब बादशहा ईस्ट इंडिया कंपनीला सहज बंगालच्या उपसागरातच बुडवू शकला असता! पण औरंगजेबाने चक्क सांगितले, "तेथील आपल्याच प्रजेने केवळ मत्सरापोटी या फिरंग्यांची खोड काढली. गरीब बिचाऱ्या फिरंग्यांनी आपल्या स्वतःच्या बचावाची व्यवस्था आपली आपणच केली, तर त्यात गैर काय? ते फार दूरवरून येथे आले आहेत आणि तसे मोठे मेहनती आहेत. मी या प्रकरणी मुळीच हस्तक्षेप करणार नाही."[८]

## पण दिल्लीचे तख्त निष्प्रभ कां झाले?

ही घटना १६९९ सालची, आणि तो किल्ला म्हणजे कलकत्त्याचा 'फोर्ट विल्यम', आणि या टोपीवाल्यांना ताकीद द्या म्हणणारा सुभेदार खुद्द औरंगजेबाचा नातू होता! खरे म्हणजे, याच औरंगजेबाने या ब्रिटिशांच्या दुष्टपणाला आणि कुटिल कारवायांना कंटाळून काही वर्षांपूर्वी सुरत, विशाखापट्टणम् आदि ठिकाणच्या ईस्ट इंडिया कंपनीच्या वखारी ताब्यात घेतल्या होत्या आणि तेथील ब्रिटिशांची हकालपट्टीही केली होती. मुंबई बंदराचाही

ताबा घेण्यात आला होता. पण ते ब्रिटिश व्यापारी इतके चतुर की त्यांनी औरंगजेब बादशहाचे अक्षरशः पायच पकडले! त्यासरशी औरंगजेबाने त्यांची सर्व ठाणी त्यांना परत केली आणि त्यानंतर लागलीच हुगळीच्या किनाऱ्यावर वखार बांधावयास परवानगी दिली! भारताच्या एकाही राजकर्त्याला सतराव्या किंवा अठराव्या शतकात युरोपात कोणत्या उलाढाली चालू आहेत, तेथील लोकजीवनात कोणते बदल होत आहेत, युरोपातून अमेरिकेकडे धावत गेलेल्या निर्वासितांचा ताफा कसा एकजीव होतो आहे, खुष्कीचा व्यापार मागे पडून सागरी व्यापाराला कसे उधाण येते आहे आणि वाफेच्या इंजिनांमुळे उत्पादनाच्या आणि प्रवासाच्या क्षेत्रात कोणते बदल होत आहेत, याविषयी काहींही माहिती नव्हती.

पानिपत येथील दारुण पराभवानंतरही मराठेशाहीला साठ वर्षांहून अधिक काळ जीवदान कसे मिळाले आणि अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातील राजकारणात हिंदुस्थानातील प्रमुख सत्ता म्हणून 'पुणे सरकार'चे अस्तित्त्व कां टिकून राहिले, याविषयी आजवर अनेकदा ऊहापोह होऊन गेलेला आहे. या ऊहापोहातून महादजी शिंदे यांचे बहुरंगी लष्करी कर्तृत्व आणि नाना फडणीस यांचे अष्टावधानी राजनैतिक चातुर्य याविषयी जाणकारांची आणि सामान्यांची खातरजमा होऊन चुकलेली आहे. आणि तरीही, संपूर्ण अठराव्या शतकात दिल्लीचे तख्त, औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर, सतत निष्प्रभ आणि नायकहीन का राहिले, या मूळ प्रश्नाचा समाधानकारक उलगडा होत नाही. कारण, 'पाटीलबावा' आणि 'श्रीमंत नाना' यांच्या कार्याचा आणि कर्तृत्वाचा जेवढा अभ्यास संशोधकांकडून झाला, तेवढा काहीं देवी अहिल्याबाई होळकर यांच्या प्रयत्नांचा आणि परिस्थितींचा अभ्यास त्यांच्याकडून झाला नाहीं. इतकेच नव्हे, तर अठराव्या शतकात भारतीय राजकारणाचे मुख्य अनुसंधान कोणते, प्रमुख प्रभाव कोणते, बहुविधता कोणती, एकूण राजकारणाची मूळ दिशा कोणती, राजकीय रंगमंचावरील कलह कोणता आणि त्या शतकात मराठशाहीला केन्द्रवर्ती सत्तेचे 'कार्य' अखिल हिंदुस्थानात करावे लागूनही अखेरपर्यंत केन्द्रीय सत्तेचे 'स्थान' कां प्राप्त झाले नाहीं, असे अनेक प्रश्न केवळ

अनुत्तरित नव्हे, तर मुळात अनुच्चारितही राहिले आहेत. कारण, माळव्याचे राजकारण गौण लेखले गेले. देवीं अहिल्याबाई होळकर यांच्या राजकीय दूरदृष्टींचा अंदाज आणि आवाका संशोधकांच्या नजरेतून निसटला, याचे कारण, त्यांनी माळव्याला भरतखंडात लाभलेले निसर्गदत्त 'मध्यस्थान' गौण लेखले, हेच होय.'

## 'ही गुणक्रिया एक बाईचे पायाशी'

मात्र माळव्याचे राजकीय महत्त्व 'श्रीमंत नाना' यांच्या लक्षात आले होते असे म्हणावयास पुरावा आहे. देवी अहिल्याबाईने चंद्रावंताचा पुरा बीमोड केल्याचे वृत्त आल्यावर नाना असे म्हणाल्याचे नमूद आहे की, "शापादपि शरादपि असे बायकात अहिल्याबाई दिसण्यात आली. आजपावेतो स्नानसंध्या कर्माची प्रवृत्ती ऐकण्यात येत होती. आता पराक्रमाची गोष्टही मोठीच केली. पुण्याचा उत्तर दरवाजा म्हणजे माहिष्मती नर्मदातीरचे आम्हास आज समजले" म्हणजे खुद्द नाना फडणीसांना, 'हे आपणास उशिरा समजत आहे' याची जाणीव झाली होती, असे या उद्गारातूनच दिसते. चंद्रावंतांनी अंब्राजीपंतांवर हल्ला करून त्यास ठार मारल्यावर उरलेली फौज जावद येथे माघारी परतली तेव्हा देवी आपल्या सेनानीवर कडाडली होती, "मेलेहो, तोंड दाखवायला आलात तर मेकसू घालून मारून टाकीन. मेवाड होते की नव्हते असे करून टाका." हा निग्रहीपणा पेशवाईच्या उत्तरार्धात फक्त दोन व्यक्तींमध्येच होता. एक म्हणजे, श्रीमंत थोरले माधवराव पेशवे आणि दुसरी म्हणजे देवी अहिल्याबाई! त्यामुळेच पेशव्यांचा दिल्ली दरबारचा वकील १७९३ साली खुद्द 'श्रीमंत नाना' यांना लिहितो की, "दवलत तारावयाचे आणि वाचवावयाचे गुणक्रिया एक बाईचे पायाशी." देवराव हिंगणे दिल्ली दरबारात राहून हे लिहितो आहे, हे लक्षात घेता या विधानाच्या पाठीमागे जे राजकारण दडले आहे ते शोधले आणि अभ्यासले पाहिजे. दवलत म्हणजे मराठशाही आणि ती तारावयाची म्हणजे दिल्लीतील तिचा प्रभाव कायम ठेवावयाचा आणि ती वाचवावयाची म्हणजे ती पुण्यात जिवंत ठेवावयाची, असा या विधानाचा अन्वयार्थ तत्कालीन राजकारणाच्या संदर्भात निघतो. आता 'गुणक्रिया' म्हणजे काय ? 'गुण' म्हणजे 'राजनैतिक चातुर्य'

आणि 'क्रिया' म्हणजे 'लष्करी सामर्थ्य'. म्हणजे मराठशाहीचा आब आणि फड यांचे रक्षण एक देवी अहिल्याबाईच करीत आहे, असे पेशव्यांचा दिल्ली दरबारचा जाणकार वकील देवराव हिंगणे हाच खुद्द 'श्रीमंत नाना' यांना लिहितो आहे. सारांश, देवी अहिल्याबाईंच्या राजकीय दूरदृष्टीचा नंतरच्या अभ्यासकांना थांगपत्ता लागलेला नसला, तरी तत्कालीन जाणकारांना देवीच्या राजकीय दूरदृष्टीची प्रचीती आली होती. माळव्याची सुभेदारी १७३३ साली होळकरांच्या घराण्यात आली. सालिना ६० लाखांची जायदाद घेऊन पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर बाळाजी बाजीराव हे जेव्हा पेशवाईचे धनी झाले, तेव्हा बादशहाने नवी सनद दिली. पण या सनदीसाठी बादशहाने पेशव्यांकडून शिंदे होळकरांची हमी मागितली. ती हमी पेशव्यांनी मानली आणि शिंदे होळकर पवार यांनी ती लिहून दिली. ती अशी : 'राणोजी शिंदे, मल्हारजी होळकर, जसवंतराव पवार आणि पिलाजी जाधव असे आम्ही चौघेजण आमच्या सहीनिशी लिहून देतो की, बाळाजीराव मुख्य प्रधानाने आता कबूल केल्याप्रमाणे (बादशाहीचे रक्षण) पुढे न करता तो आपल्या कर्तव्यापासून च्युत झाला तर त्याने तसे करू नये अशी समज आम्ही त्यास देऊ. पण तशी समज दिल्यानंतरही त्याने आपले कर्तव्य सोडूनच द्यावयाचे ठरविले तर आम्ही पंडित प्रधानाची चाकरी सोडून देऊ. याचा पुरावा म्हणून हा करार लिहिला असे.' हे घडले १७४३ मध्ये.

## अहिल्याबाई सर्वांनाच पुरून उरली

तेव्हापासून शिंदेहोळकर हे मराठशाहीचे चाकर; पण दुसऱ्या बाजूने तिचे विश्वस्त बनले. या करारामुळेच शिंदे-होळकर हे केवळ सुभेदार न राहता स्वायत्त सुभेदार झाले. १७५१ पासून माळव्याच्या सुभ्यातील मुलकीची व्यवस्था अहिल्याबाईचे हाती आलेली होती. कारण बाईंचे पती खंडेराव यांचे चित्त विलासात गुंतलेले असे आणि नंतर १७५५ साली कुंभेरीच्या वेढ्यात सूरजमल जाटाच्या तोफेच्या तोंडी खंडेरावाचा काळ झाल्यानंतर मल्हारजींच्या सुभेदारीचा कारभार देवीच्याच हाती आला. खंडेरावानंतर मालोजीच्या अकाली मृत्यूनंतर सुभेदारीची वस्त्रे तुकोजी होळकराच्या नावे आणविली गेली, तरी सुभेदारीची सर्व सूत्रे अखेरपर्यंत

म्हणजे १७९५ पर्यंत देवीच्याच हाती राहिली होती. देवी अहिल्याबाईने आपल्या सेनापतीला सतत ३५ वर्षे कसे काबूत ठेवले असेल याचे सर जॉन माल्कम यांनाही आश्चर्य वाटले होते. देवीच्या या कर्तृत्वाची दोन विलक्षण उदाहरणे बखरीत नमूद आहेत. इ. स. १७६६ मध्ये जेव्हा खंडेरावपुत्र मालोजीरावाचाही अंत झाला, तेव्हा देवी अहिल्याबाईला बाजूला सारून, दत्तक देववून, रघुनाथरावाच्या म्हणजे राघोबादादाच्या मदतीने आपण सुभेदारीचा कब्जा घ्यावा, असे होळकरांचा दिवाण गंगोबा तात्या याच्या मनाने घेतले. त्याने देवी अहिल्याबाईस मुलगा दत्तक घेऊन कारभार आपणावर सोपवावा असा सल्ला दिला. तशीं देवी म्हणाल्या, 'माझी मी समर्थ आहे. तुम्ही किंवा अन्य कोणी लुडबूड करू नये.' एवढे होऊनही गंगोबा तात्याने मान टाकली नाही. उलट, राघोबादादास खत लिहिले की, 'दौलत बेवारशी झाली. कोणाकोणास हिशोबाचा भरवसा नाही. आपण दरमजल येऊन दौलत समेटावी. येथील लोक काळजीत आहेत.' या निरोपानुसार राघोबादादाने माळव्यावर स्वारी करण्याचे योजले. त्या प्रसंगी देवीने घराघरातून बाई बोलावून मैदानात उभी केली आणि प्रत्येकीचे हाती भाले बरची दिली. इतकेंच नव्हे, तर आपल्या आवडत्या हत्तीवर अंबारी टाकून बासडा (भाला) पाठीवर घेऊन ती राघोबाशी युद्धास उभी ठाकली. पण या प्रसंगापूर्वीच राघोबाचा हेतू थोरल्या माधवराव पेशव्यास कळवून देवीने आधीच त्यांचेकडून राघोबाची कानउघाडणी करविली होती. त्यामुळे युद्धाचा प्रसंग टळला. या सर्व संकटाच्या समयी तुकोजी होळकर हे गोहदला छावणी टाकून होते. त्यास जो निरोप सांडणीस्वाराचे हाती देवीने पाठवला तो देवीच्या करारीपणाचा बोलका पुरावा होय. तो निरोप असा : 'फौज जेथील तेथे मुस्तकीम ठेवून तुम्ही जेवीत असल्यास पाणी प्यावयास येथे आम्हापाशी यावे.' हा निरोप पोचताक्षणी तुकोजीराव लगोलग महेश्वरला दाखल झाले. पुढे १७८० च्या सुमारास या तुकोजीरावांचे आणि 'पाटीलबावां'चे आपसात 'गुफ्तंगू' होऊन देवी अहिल्याबाईची कुरापत काढावयाचा आणि तुकोजीरावांकडे सुभेदारी खेचण्याचा घाट घालण्यात आला आहे, अशी वार्ता होळकरी फौजेत पसरली. तेव्हा फौजेतील सर्व लहानमोठे सरदार एकत्र झाले आणि त्यांनी तुकोजीरावाची भेट घेऊन

त्यास निक्षून सांगितले की, 'एकवेळ श्रीमंतांशी युद्धास तयार होऊ, पण बाईविरूद्ध कोणीही हात उचलणार नाही.' या दोन उदाहरणांवरून स्पष्ट होते की, आपल्या सेनेचा संपूर्ण विश्वास संपादन करून बाईने आपल्या सेनापतीस धाकात ठेवले होते. त्यापायीच महादजी शिंदे तुकोजीरावास वारंवार बोल लावीत. लष्करी सत्ता ही मुलकी सत्तेच्याच आधीन असली पाहिजे, हे राज्यकारभाराचे मूळ तत्त्व देवीने घट्ट पकडून ठेवले होते. राज्यकर्ती या नात्याने देवीने अंतर्गत कारभारात सेनापतीची मुजोरी किंवा सेनेची बंडाळी कधीही चालू दिली नाही. १७५५ ते १७९५ या चाळीस वर्षांच्या कालखण्डात देवी अहिल्याबाईने मोठ्या हिमतीने आणि हिकमतीने संपूर्ण माळवा आपल्या काबूत ठेवला होता. इतकेच नव्हे, तर देवीने माळव्यात कोणाचाही पुंडावा चालू दिला नाही. त्यामुळे अन्य सुभ्यांच्या मानाने माळव्यातील लोकांना लढायांचा आणि लुटालुटीचा जाच फारच कमी झाला. त्या चाळीस वर्षात उर्वरित भरतभूमी दरवर्षी युद्धाने कुठे ना कुठे भाजून, होरपळून निघत असताना माळव्यात मात्र शांततेचे आणि उद्योग-धंद्यांच्या समृद्धीचे युग नांदत होते. देवी अहिल्याबाईचा खजिना कधीही रिता पडला नाही, याचे रहस्य या 'गुणक्रियेत' आहे.

## दक्षिणेचे सत्ताकेंद्र पुनश्च उभे झाले होते

१७६५ साली बंगालची दिवाणी ईस्ट इंडिया कंपनीकडे आल्याने पेशवे, निजाम, गायकवाड, होळकर, शिंदे, सवाई जयसिंग आणि खुद्द बादशहा यांच्याप्रमाणेच कंपनीचेही सरकार स्थापन झाले. पण कंपनीच्या सरकारची धास्ती कोणाला वाटली नाही. कारण, दक्षिण आणि उत्तर या दोन सत्ताकेंद्रांचाच व्यवहार आणि विरोध आधीच्या ३०० वर्षांपासून साचत साचत हळू हळू पृष्ठभागावर येऊन पोचला होता. विजयनगरच्या साम्राज्याचे विसर्जन झाल्यानंतर दक्षिणेतील सत्ताकेन्द्र राजकीय दृष्ट्या मृतवत् झाले होते. दक्षिणेतील या सत्ताकेन्द्राला आता धुगधुगी आलेली आहे, हे शिवाजी महाराजांच्या चौथाईच्या मागणीने शहाजहान बादशहा आणि मिर्झाराजे जयसिंग यांच्या ध्यानी येऊन चुकले होते. राज्यारोहण विधीनंतर शिवछत्रपतींनी गोवळकोंडयाच्या शहाशी जो तह केला तो ऐकून औरंगजेब

बादशहाची पक्की खात्री पटली की दक्षिणेचे सत्ताकेन्द्र आता जिवंत झालेले आहे. आणि म्हणून त्या सत्ताकेन्द्राच्या पाडावासाठी तो जातीने नर्मदेच्या दक्षिणेला उतरला. शिवछत्रपतींचे श्रेष्ठत्व यात आहे की अवघ्या सत्तावीस वर्षांत हे दख्खनचे सत्ताकेन्द्र त्यांनी इतके प्रबळ आणि प्रभावी केले की आपल्या सर्व शक्तीनिशी सतत सत्तावीस वर्षे प्रहार करूनही औरंगजेबासारख्या अव्वल दर्जाच्या लढवय्याला आणि मुत्सद्याला ते नष्ट करता आले नाही ! दिल्लीचे तख्त १८ व्या शतकात औरंगजेबाच्या मृत्यूनंतर निष्प्रभ आणि नायकहीन कां राहिले याचे उत्तर, या शतकात दख्खनचे सत्ताकेन्द्र पुनश्च आपल्या पायांवर उभे झाले हे आहे. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात आपले स्वातंत्र्य दिल्लीपासून रक्षिण्यासाठी निजामाला माळवा दुर्बल आणि आपल्या दाबाखाली ठेवावयाचा होता. आणि दिल्लीवर आपला प्रभाव जमवण्यासाठी महादजी शिंदे यांना माळवा प्रबळ पण आपल्या आधिपत्याखाली हवा होता. म्हणून सालबाईचा तह होईपर्यंत निजाम आणि महादजी या दोघांचीही नजर माळव्यावर होती. देवी अहिल्याबाईच्या दूरदृष्टीचो कसोटी लागली ती या वेळीच. या सर्व संदर्भात अहिल्याबाईचे मनोगत काय, हे होळकर दरबारातील पेशव्यांचा वकील विठ्ठल शामराव एका बातमीपत्रात म्हणतो, 'बाई बोलत होती (जे) इंग्रजांनी चहूकडून प्रसार करावयाचा मनसुबा केला आहे. त्यास या समयास श्रीमंतांनी शिलेदारांचा आणि हुजरातींचा भरणा पुष्कळ करावा आणि इंग्रज जागांजागां, कोठे दोन पलटने, कोठे तीन पलटने अशी तोंडे काढली आहे. अशात जागांजागां फौजा पाठवून ते जेथील तेथीच ठेचावे..........म्हणजे मागल्याला दहशत पडेल. पुढे कोणी येऊ पावणार नाही. नबाब व भोसले सारे जमा होऊन इंग्रजांचे पारिपत्य करावे.' दक्षिणेच्या सत्ताकेंद्राचे तत्कालीन रक्षणकर्ते पेशवे दुबळे व्हावेत यासाठी निजाम आणि टिपू यांची खटपट होती; ते केन्द्र आपल्याच अखत्यारीत असावे, अशी त्या दोघांत चुरस होती. इंग्रज पूर्वेकडून आणि पश्चिमेकडून असा दोन्ही अंगानी पुढे पुढे सरकत होता. फक्त बादशहा मुहमदशहा आणि देवी अहिल्याबाई याच दोघांना या परिस्थितीची जाण आणि आच होती. तेच दोघे, इंग्रजांचे पारिपत्य करावे, या धोरणाचा पुरस्कार करीत होते. पुण्याचे सरकार प्रबळ राहिले तरच दक्षिणेचे सत्ताकेंद्र

शाबूद राहील, अशी देवीची धारणा होती. आणि म्हणून ती माळवा प्रबळ आणि स्वायत्त राखण्यासाठी जीवाचा आकांत करीत होती. म्हणून प्राप्त परिस्थितीत दक्षिणेचे सत्ताकेंद्र अबाधित राखण्यासाठी माळवा स्वतंत्र ठेवणे, महादजी शिंद्याच्या महत्त्वाकांक्षेला वाव न देणे, निजामाचे हेतू तडीस जाऊ नये म्हणून काळजी घेणे आणि पेशव्यांना स्वतःचा फौजफाटा मोठ्या प्रमाणावर उभा करावयास लावणे, अशा सर्व बाजू देवीने आपल्या मनाशी उलगडून पाहिल्या होत्या. म्हणून १७६५ ते १७९५ या तीस वर्षांच्या काळात महेश्वर आणि पुणे यांची युती देवीने कधीही तुटू दिली नाही. या उलट, गादीच्या संरक्षणाच्या मिषाने तुकोजी होळकरास दक्षिणेत पाठवावे आणि माळवा आपल्या घशात घालावा, तसे केले म्हणजे उत्तरेचे सत्ताकेन्द्र आपल्याच हाती येईल अशी 'पाटीलबोवा'ची नजर होती. तसे झाले तर दक्षिणेचे सत्ताकेन्द्र धोक्यात येईल, अशी देवीची खात्री पटली होती. म्हणून तुकोजीस दक्षिणेस पाठविण्यास तिने कधीही संमती दिली नाही. मराठ-शाहीतील या आपसातील दुहीमुळे १७६५ ते १७९५ या तीस वर्षांच्या कालखंडात दिल्लीचे तख्त निष्प्रभ आणि दक्षिणेचे केन्द्र दुर्बळ राहिलेले आढळते. ही दोन्ही सत्ताकेन्द्रे एकदम नष्ट करता येत नाहीत, म्हणून, किमान-पक्षी, ती प्रभावी किंवा प्रबळ होता कामा नयेत, याविषयी निजाम आणि इंग्रज यांच्या हित-विचारात साम्य होते. आणि म्हणूनच १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात त्यांच्या राजकीय मैत्रीला स्थैर्य प्राप्त झाले. ईस्ट इंडिया कंपनीच्या वतीने वॉरन हेस्टिंग्जने शिंद्यांशी सलोखा करून आणि कॉर्नवॉलिसने नाना फडणीसशी सलोखा करून उत्तरेतील आणि दक्षिणेतील सत्ताकेन्द्रांचा वेगवेगळ बंदोबस्त केला. या सगळ्या घडामोडीमध्ये १७८२ साली सालबाईचा तह होईस्तोवर देवीला देशाच्या राजकारणात रस होता. नंतरच्या म्हणजे १७८३ नंतरच्या काळात देवीने माळव्याच्या रक्षणापलिकडे फारसा विचार केल्याचा पुरावा कुठे आढळत नाही. असे कां घडले ? सालबाईच्या तहाने नेमके काय घडले ? याचे ज्ञान तत्कालीन अन्य कोणाही मुत्सद्यापेक्षा देवी अहिल्याबाईला अधिक वेगाने आणि अधिक डोळसपणाने झाले असले पाहिजे. कारण, माहिष्मती हाच पुण्याचा उत्तर दरवाजा होय, असे समजून देवी १७५५ पासून माळव्याचे रक्षण करीत आली होती.

दक्षिणेचे सत्ताकेन्द्र हेच संपूर्ण देशाचे अधिकारी केन्द्र व्हावे, ही शिवछत्रपतींनी निर्माण केलेली आणि नंतर शाहू छत्रपतींनी वाढविलेली राजकीय धारणा प्रमाण मानून बाई आपले सर्वस्व पणाला लावीत होती. त्यासाठीच तिने 'पाटीलबोवा' आणि तुकोजीराव या दोघानांही सदैव नाना फडणीसाच्या मनसुब्याशीच जुळते घ्यावयास लावले. महादजींचे आसन इंग्रजांच्या सहाय्याने दिल्लीत स्थिर झाले नव्हते तोपर्यंत तेही देवीस वचकून असत. पण सालबाईच्या तहानंतर शिंद्यानी अहिल्याबाईचा धाक पार गुंडाळून ठेवला. इतका की 'पाटीलबोवा' जेव्हा दक्षिणेस जाण्यासाठी १७९२ च्या सुमारास नर्मदा पार करू लागले तेव्हा होळकरांच्या ठाण्यास न जुमानता तसेच पुढे सरकले. आणि, ठाणेदाराने जेव्हा टोल मागितला, तेव्हा होळकरांचे ते ठाणेच्या ठाणे त्यांनी उध्वस्त केले. 'पाटीलबोवा' आता बाईस मोजत नाहीत, असा डांगोराच जणू या घटनेने त्यांनी पिटला. साल-बाईचा तह झाला तेव्हाच देवीच्या अंतर्मनाला पुढचे हे सगळे थेर दिसले असावेत. हे आता असेच होणार हे तिला कळले असावे. सालबाईच्या तहाने शिंद्यांची इभ्रत वाढली की नाही अथवा मराठे इंग्रज यांचा समझौता होऊन शांतता प्रस्थापित झाली की नाही, हे प्रश्न बाईपुढे नव्हते. तत्कालीन परिस्थि-तीत या तहाने पुणे सरकारचे वजन घटले की वाढले एवढाच प्रश्न बाईपुढे होता. पुणेसरकाचे वजन घटले असाच निष्कर्ष देवीने काढला. सतत चाळीस वर्षे उत्तर विरुद्ध दक्षिण या राजकारणाचा तोल दक्षिणेच्याच बाजूने झुकेल अशी चिंता वाहणाऱ्या या निग्रही राज्यकर्तीला दक्षिणेच्याच राजकारणाचा तोल गेला आहे, हे कळावयास उशीर थोडाच होणार? सालबाईच्या तहाला मान्यता देण्यात नाना फडणीसाने बरेच ताणून धरले. पण हैदरअलीच्या निधनानंतर त्याने सालबाईच्या तहावर आपलेही शिक्कामोर्तब केले. नाना-सारखा मुत्सद्दीही अखेर कचरला, असे मनातल्या मनात समजून देवीने आपले दुःख गिळले असेल. पण त्याजबरोबर, 'आता पुणेच पडले तर पुण्याचा उत्तर दरवाजा तरी काय करणार?' असे ओळखून देवीने भारतीय राज-कारणातून आपले अंग काढून घेतले असावे. सालबाईच्या तहाचा हाच अर्थ देवीच्या मनात होता असे म्हणावयास जागा आहे. सैन्याला पैसा पुरवि-

ण्याच्या तिच्या वृत्तीतच या तहानंतर पालट झालेला दिसतो. इंग्रजांच्या पारिपत्यासाठी वाटेल तेवढा पैसा पुण्याला पाठवीन म्हणणाऱ्या देवीने सालबाईच्या तहानंतर खुद्द आपल्याच सैन्याला पैसा पुरविण्यात हात आखडता घेतला. या सर्व विवेचनाचा भर देशांतर्गत लोकजीवनात १८ व्या शतकात जो आंतरिक संघर्ष दाटला होता त्यावर आहे. पण तत्कालीन जगतात अन्यत्र किंवा निदान इंग्लंडात काय घडत होते याचा कानोसा घेण्याची बुद्धी येथील कोणाही राज्यकर्त्याला झाली नव्हती. देवीने किंवा पेशव्याने किंवा बादशहाने देखील आपला वकील इंग्लंडात पाठवून तेथील परिस्थिती काय आहे, याची खबर घेतली नाही; किंवा, 'कंपनीचा हा उपद्व्याप बंद करा नाहीतर व्यापारास बंदी करू,' असा इशारा देण्याचा विचार देखील आपल्या मनात आणला नाही. एक राघोबादादा तेवढा हरीचा लाल निघाला की ज्याने आपला वकील इंग्लंडात पाठवला. तो केवळ पार्लमेंटपुढे आणि इंग्लंडच्या राजाकडे 'मला वाचवा हो वाचवा' अशी आर्त किंकाळी फोडण्यासाठी! भारतीय राजकारणाच्या तत्कालीन स्थितीगतीचे इंग्लंडात काय पडसाद उठले किंवा ईस्ट इंडिया कंपनीच्या हिंदुस्थानातील घोडदौडीमुळे ब्रिटिश लोकांच्याच एकूण राजकारणात कशी उलथापालथ होत होती, याचे साद्यंत वर्तमान भारतातील कुठल्याही राज्यकर्त्याने आपल्या दूतांमार्फत मिळविले नाही, ही वस्तुस्थिती होय. इतकेच काय, दक्षिणेचे सत्ताकेन्द्र इंग्रजांनी मुळातच पोखरून टाकले आहे, हे देखील निजामाच्या, टिपूच्या किंवा पेशव्यांच्या ध्यानात आले नव्हते."[१०]

## फ्रेंच आणि इंग्रज यांची चुरस भोवली

१७४० साली इंग्रज आणि फ्रेंच यांचे युरोपातील भांडण भारताच्या भूमीवर प्रथम अवतरले, आणि त्यानंतर जवळ जवळ पावशतक त्यांची सत्तास्पर्धेची चुरस दक्षिण हिंदुस्थानात स्थानिक राजवटींना दुर्बळ करीत राहिली. १७४० साली ऑस्ट्रियाचा सम्राट सहावा चार्लस मृत्यू पावल्यावर त्याची मुलगी मारिया थेरेसा ही गादीवर आली. आपले साम्राज्य वाढवायला ही वेळ बरी आहे असे प्राशियाचा नवा राजा फ्रेड्रिक याला वाटले आणि त्याने ऑस्ट्रियाच्या सायलेशिया प्रान्तावर हल्ला चढवला. या प्रकरणी फ्रान्सने

प्रशियाची बाजू उचलून धरली आणि ब्रिटनने ऑस्ट्रियाची बाजू घेतली. हे इंग्रज-फ्रेंच युद्ध १७४२ मध्ये सुरू झाले, आणि १७४८ मध्ये संपले. या सहा वर्षात आपापल्या व्यापाराचे रक्षण करण्यासाठी इंग्रज आणि फ्रेंच व्यापारी कंपन्यांमध्ये युद्धाला तोंड फुटले. या युद्धाचे निमित्त करून ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा पूर्ण बीमोड करून संपूर्ण दक्षिण हिंदुस्थानावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा डाव डुप्ले या फ्रेंच गव्हर्नरने टाकला. पण तेवढ्यात युरोपात इंग्रज-फ्रेंचांचे युद्ध थांबून तह झाला. आणि, डुप्लेला मद्रास ब्रिटिशांना परत द्यावे लागले. पण त्याच वेळी हैदराबादचा निजाम मरण पावला आणि त्याचा दुसरा मुलगा नासिरजंग गादीवर आला. तसेच, मराठ्यांनी चंदासाहेबाची सुटका केली होती आणि तो मराठ्यांच्या साह्याने कर्नाटकात उतरला होता. डुप्लेने चंदासाहेबाला मदत केली आणि नासिरजंगाचा १७५० साली खून झाल्यानंतर निजामाचा नातू मुजफ्फरजंग याला निजामाच्या गादीवर बसविले. निजामाने डुप्लेला कृष्णेच्या दक्षिणेचा राजा म्हणून किताब बहाल केला. डुप्लेने निजामाच्या संरक्षणासाठी बुसीच्या नेतृत्वाखाली फ्रेंच फौज हैदराबाद येथे ठेवली. पण यानंतर क्लाइव्हने अवघ्या २१० शिपायां-निशी अर्काट अचानक काबीज केल्यामुळे डुप्लेच्या दक्षिणेतील घोडदौडीला आळा बसला. त्यामुळे फ्रेंचांचे हैदराबादमधील स्थान अबाधित राहिले तरी कर्नाटकाचा कब्जा त्यांना मिळाला नाही. पुढे १७५६ साली युरोपातील राजकारणाला पुनः एकदा ऑस्ट्रियाच्या संदर्भात वेगळे वळण मिळाले. यावेळी ऑस्ट्रियाने आपला सायलेशिया परगणा परत मिळविण्यासाठी चढाई केली होती. या युद्धात पुनः एकदा इंग्रज आणि फ्रेंच युरोपात परस्परांचे शत्रू म्हणून रणांगणात उतरले. साहजिकच हे इंग्रज-फ्रेंच युद्ध हिंदुस्थानातही आले. यावेळी हिंदुस्थानात दोन्ही बाजू कमकुवत होत्या. पण ब्रिटिश कंपनीला इंग्लंडातून भरपूर रसद मिळाल्यामुळे तिचे पारडे अखेर जड झाले. १७६० साली इंग्रज सेनापती कूट आणि फ्रेंच सेनापती ल्याली यांची निर्णायक लढाई होऊन तीत फ्रेंचांचा पराभव झाला आणि बुसी हा इंग्रजांचा कैदी बनला. पुढे ल्यालीने पाँडिचरी येथे तळ ठोकून आठ महिने तग धरली, पण अखेरीस १६ जानेवारी १७६१ ला तो इंग्रजांना शरण गेला. पुढे १७६३ साली युरोपात इंग्रज-फ्रेंचांचा तह झाल्यामुळे पाँडिचरी फ्रेंचांना परत

मिळाले. पण त्यांचे राजकीय महत्त्व संपून इंग्रज हे दक्षिणेत पक्के पाय रोखून बसले.

## हिंदी भांडवलाने इंग्लंडात उत्पात केला

इंग्रज आणि फ्रेंच व्यापारी कंपन्यांना सरकार म्हणून जी मान्यता मिळाली त्याच्या मुळाशी वतनदारीची व्यवस्था आहे. वतन म्हणजे सारामाफी. हिंदुस्थानात फार प्राचीन काळापासून जमिनीचा सारा राजाकडे जमा केला पाहिजे अशी प्रथा होती. राजा सारा वसूल करण्याचा आपला अधिकार दानपत्र देऊन स्वतःच विसर्जित करीत असे. सारा माफी सामान्यतः धार्मिक कारणासाठी किंवा आपल्या सरदारांच्या उपजीविकेसाठी दिली जाई. हीच पद्धत पुढे तुर्की आणि मोगल शासकांनी पुढे चालवली. त्यास वतन हे नाव पडले. जेवढी फौज बाळगणे शक्य होईल तेवढे वतन. फौज मोठी तर वतन मोठे. यातूनच पाच हजारी, दहा हजारी असे सरदार निर्माण झाले. यास मनसब म्हणत. मनसब मिळाली की तो परगणा मनसबदाराच्या मालकीचाच होई. भारतीय राज्यपद्धतीतील ही ग्यानबाची मेख डुप्लेने प्रथम ओळखली. आणि मुजफ्फरजंगाला गादीवर बसविण्याचा मोबदला म्हणून त्याने निजामाकडून पाँडिचरी आणि त्या भोवतालच्या भागाचे वतन मिळवले. पुढे ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरीतील क्लाइव्हला ही मेख उमजली. आणि प्लासीच्या लढाईनंतर त्यानेही वतन मिळविण्याचाच निकराचा प्रयत्न केला. १७६५ साली पुनः बंगालमध्ये गव्हर्नर म्हणून आल्यानंतर त्याने बंगाल, बिहार आणि ओरिसा या तीन प्रांतांची दिवाणी कंपनीला मिळवून दिली. ही दिवाणी म्हणजे वतनच होते. हे वतन मिळाल्यामुळे कंपनी 'सरकार' झाली. या वतनदारीच्या व्यवस्थेमुळे राज्यकर्त्यांमध्ये स्वकीय आणि परका असा भेदभावच उरला नव्हता. दिल्लीचा बादशहा ज्याला कोणाला वतन देई तो त्या परगण्याचा मालक होई. त्या परगण्याचे संरक्षण त्याला करता आले तर त्याचे वतन अबाधित चालू राही. आपल्या वतनाचे रक्षण करण्याचे ईस्ट इंडिया कंपनीचे सामर्थ्य या देशातील अन्य कोणाही राज्यकर्त्यापेक्षा अधिक होते आणि ते सर्व एक झाले असते तरी त्यांच्याहूनही अधिक होते. कारण इंग्रजांचे समुद्रावरील प्रभुत्व. इंग्लंड ही १८ व्या शतकातील सर्वात प्रबळ

आरमारी सत्ता ठरली होतो. कंपनी सरकार हिन्दुस्थानात स्थापन झाल्यानंतर अवघ्या २० वर्षात तिचे वजन इंग्लंडात डोळ्यात भरण्याइतके वाढले. कंपनींच्या नोकरीतील लहानमोठे अधिकारी खाजगी व्यापार करून अमाप संपत्ती आपल्याबरोबर इंग्लंडात नेत. आणि त्या संपत्तीच्या जोरावर तेथे उद्योगधंद्यात आणि राजकारणात पुढे येत. १७८० साली ब्रिटिश पार्लमेंटमध्ये अशा भारतीय हितसंबंधियांची संख्या ७० वर गेली होती. हिन्दुस्थानातील पैशाच्या आणि प्रतिष्ठेच्या भरंवशावर ते सहज निवडणुका जिंकीत. त्यामुळे तत्कालीन इंग्लंडमध्ये ईस्ट इंडिया कंपनीचा व्यापारातील आणि हिन्दुस्थानातील प्रभाव कमी झाला पाहिजे, असा विचार मूळ धरू लागला होता. आणि पुढील ७० वर्षात हा विचार सतत बळावत गेला. प्रथम १७८३ साली या भारतीय हितसंबंधांनी इंग्लंडला आपला इंगा दाखवला. कंपनीचा आपले नोकर नेमण्याचा अधिकार काढून घेण्याचा प्रयत्न लॉर्ड नॉर्थ यांच्या मंत्रिमंडळाने करताच त्यांचे मंत्रिमंडळच कंपनीने कोसळून टाकले. तेव्हापासून १८५८ पर्यंत इंग्लंडातील सर्व मंत्रिमंडळे या भारतीय हितसंबंधांच्या मर्जीवर आणि लहरीवर अवलंबून असत. किंबहुना, असेही म्हणता येईल, की इंग्लंडच्या अंतर्गत राजकारणावरील ईस्ट इंडिया कंपनीचा सतत वाढणारा प्रभाव मोडून काढण्यासाठीच इंग्लंडमधील राजकीय पक्षांची सर्व शक्ती आणि युक्ती सतत ७० वर्षे खर्ची पडत होती.'' कंपनीला तुल्यबल असा प्रतिस्पर्धी हिंदुस्थानच्या राजकारणात उरला नव्हता. पण इंग्लंडातील सर्व राजकीय पक्ष एकीकडे हिंदुस्थानच्या व्यापाराची कंपनीकडे असलेली मक्तेदारी काढून घेण्याचा आणि दुसरीकडे कंपनीने हिंदुस्थानात नवीन प्रदेश आपल्या अंमलाखाली आणू नये म्हणून हट्ट धरण्याचा सतत अट्टाहास करीत होते. दर २० वर्षांनी कंपनीची सनद वाढवून देण्याचा प्रश्न पार्लमेंटपुढे येई. त्या प्रत्येकवेळी याच दोन मुद्यांवर संघर्ष होई आणि दरवेळी कंपनीचे पारडे जडच राही.

## पण इथे समयोचित धारिष्ट्यच नव्हते

इंग्लंडातील राजकीय पक्षांना कंपनीची व्यापारी मक्तेदारी हिंदुस्थानातून तेव्हाच उठवता आली की जेव्हा हिंदुस्थानात निर्यात व्यापार पूर्ण थंडावला आणि त्यांना कंपनीचा राज्यविस्तार तेव्हाच रोखता आला की जेव्हा

कंपनीने पूर्ण हिंदुस्थान आपल्या काबूत आणला. या ७० वर्षांच्या कालखंडात कोणत्याही वेळी भारतीय हितसंबंधांची ब्रिटिश लोकसभेतील संख्या ६० पेक्षा कमी नव्हती. त्यांच्यामधील आपसातील हेवेदावे काहीही असले तरी कंपनीचा आपला नोकरवर्ग नेमण्याचा अधिकार त्यांनी अखेरपर्यंत शाबूद ठेवला. म्हणजे कंपनी सरकारला आपल्या अस्तित्वासाठी खरी लढाई इंग्लंडातच द्यावी लागली. १७८० ते १८२० या कालखंडात कंपनीला राज्यविस्तारासाठी इंग्लंडात तीव्र विरोध होता. तो येथील कोणाही राज्यकर्त्याच्या, त्याने आपला वकील इंग्लंडात पाठवून माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता, तर सहज ध्यानात आला असता. इंग्लंडातील कंपनी विरोधकांशी हातमिळवणी करण्याचे राजकारण त्यास लढविता आले असते. पण असे समयोचित मुत्सदीपण कोणाही भारतीय राज्यकर्त्याने आपल्या अंगी बाणविले नव्हते.

मराठ्यांच्या ऱ्हासाला जागतिक राजकारणाचे अज्ञान हे जसे कारणीभूत झाले, तसेच देशांतर्गत राजकारणाचे तोरणच त्यांना बांधता आले नाही, हे त्यांचे वैगुण्यही कारणीभूत झाले. महम्मदशहा अब्दालीचा पाडाव करण्यासाठी सदाशिवरावभाऊ यास मराठी फौजेचा सेनापती करण्यात नानासाहेब पेशव्यांचा उद्देश नेमका काय होता याचा कुठेच लेखी पुरावा नाही. परंतु सदाशिवरावभाऊने शिंदे, होळकरांशी अगदी पहिल्या दिवसापासून जे अरेरावीचे, असमंजसपणाचे आणि अतिक्रमणाचे धोरण स्वीकारले ते नानासाहेब पेशवे यांच्या सल्लामसलतीशिवाय असेल असे व्यवहारतः मानता येत नाही. १७४३ साली शिंदे, होळकरांचे जे दडपण, दक्षिणेतील सदनेचे विश्वस्त म्हणून, आपल्या मानेवर आले होते ते फेकून देण्याची हीच संधी आहे, असा त्या दोघांचा आधीच खल झाला असावा आणि म्हणूनच, केवळ शिंदे, होळकरच नव्हे, तर खुद्द बादशहालाच शह देण्याचा मनसुबा पक्का ठरवून सदाशिवरावभाऊने पुण्याहून प्रयाण केले असावे. दिल्लीचे तख्त फोडण्याची कल्पना अशा अंतस्थ विचारापोटीच येऊ शकते. आणि शाहू छत्रपतींच्या मृत्यूनंतर सातारची गादी गुंडाळून ठेवण्याचे कार्य बिनबोभाट पार पडल्यामुळे दिल्लीचे तख्तही आपण तसेच गुंडाळून ठेवू अशी भावना

पेशव्यांच्या मनात उद्‌भवली असणे असंभव नाही. एवढे मात्र खरे, की शिंदे होळकरांचा उपमर्द आणि दिल्लीच्या तख्ताचा अधिक्षेप मराठशाहीच्या ऱ्हासाला कारणीभूत झाला. मराठशाहीचा अंत त्यामुळे अटळ झाला. इतकेच नव्हे, तर या मध्ययुगीन राज्यकर्त्यांचा अंत लोकांना स्वागतार्ह वाटला. न्यायमूर्ती रानडे यांनी ब्रिटिश राजवटीविषयी, 'हे तर ईश्वरी वरदानच होय.' असे धन्योद्गार काढले. ब्रिटिश राजवटीचे असे अपूर्व स्वागत या देशातील लोकांनी का केले ! कंपनी सरकार कोण, कुठले, याचा विचारही न करता लोकांनी त्यास का साथ दिली !

### साडेतीन शहाणे म्हणजे कोण?

या प्रश्नाचा विचार करता १७५६ ते १८१८ हा सुमारे साठ वर्षांचा कालखंड डोळ्यांपुढे ठेवावा लागेल. हिंदुस्थानची स्थिती पाहिली तर मोगल बादशाही खिळखिळी झाली होती, असे दिसेल. दिल्लीचे अधिपती निष्प्रभ आणि दुर्बल झाले होते. शियासुन्नी पंथांच्या वैमनस्यामुळे मुसलमानी राज्यकर्त्यांची समाजावरील आणि सैन्यावरील पकड ढिली पडली होती. संपूर्ण देशातील चौथाईचा अधिकार मराठ्यांच्या हाती आला होता—इ. स. १७४३ साली. म्हणजे, सर्व देशाच्या संरक्षणाची हमी मराठ्यांकडेच आली होती. मराठे या कर्तव्यात कमी पडले. १७६१ साली पानिपत येथे अब्दालीशी दोन हात करण्यापूर्वी सदाशिवरावभाऊने दिल्लीचेच तख्त फोडले. छत्रपतीशाहूच्या मृत्यूनंतर, म्हणजे १७४९ सालानंतर, पेशव्यांनी साताऱ्याची छत्रपतींची गादी जशी गुंडाळून ठेवली, तशीच दिल्लीची बादशाहीदेखील गुंडाळून ठेवली. पेशव्यांची ही नीती आत्मघातकी होती. छत्रपती आणि बादशहा हे समाजाच्या एकीचे द्योतक होते. त्यांना पुढे करूनच बाजीरावाने आपले कर्तृत्व सत्कारणी लावले. अर्थात शियासुन्नी कलहांचे नियमन करण्याची कुवत कुणाही हिंदूचे ठायी असणे त्याकाळी शक्य नव्हते. पण मराठी समाजातील कलह मिटविण्याचे तरी सामर्थ्य पेशव्यांचे ठायी असावयास हवे होते. तसे ते त्यांच्यापाशी कधीच नव्हते. सर्व मराठी समाजाला एकत्र आणण्याचे आणि ठेवण्याचे चातुर्य छत्रपती शाहूबरोबर निजधामास गेले.

इतकेच नव्हे, तर शाहूच्या पश्चात अवघ्या दहाच वर्षांत ब्राह्मणशाहीचा जोर वाढला; पण तोही फार काळ टिकला नाही. नानासाहेब पेशव्यांच्या अकाली मृत्यूने पानिपतवरील पराभवाचे दुष्परिणाम दसपट झाले. मुख्य म्हणजे ब्राह्मणांचे अंतर्गत संघर्ष विकोपाला गेले. थोरला माधवराव पेशवा गादीवर आल्याआल्याच या संघर्षाला तोंड फुटले. १७६२ सालच्या जानेवारीतील ६ व्या तारखेला माधवराव आपल्या मातोश्री गोपिकाबाई यांना लिहितात, 'ती. दादासाहेबांचे विचार स्नानसंध्या करावी, मेहनत होत नाही, असे मन:पूर्वक आहे. सखारामपंतानेही अंग काढून घेतले. कारभार करीत नाही म्हणतात. पण अंत:करणापासून नाही. सारे कोकणस्थ एकीकडे होऊन फशी पडतील यास्तव अंगानिराळे टाकतात.'[१२]

माधवरावाची आख्खी कारकीर्द याच चक्रव्यूहात सापडली. या बारा वर्षांच्या काळात देशस्थ विरुद्ध कोकणस्थ एवढा एकच संघर्ष सर्व राजकारणाच्या मुळाशी दिसतो. या संघर्षातून मराठी भाषेत 'साडेतीन शहाणे' असा नवा शब्दप्रयोगच रूढ झाला. रियासतकार सरदेसाई या संदर्भात सांगतात, "शहाअलम, शुजाउद्दौला अशा उत्तरेच्या सत्ता सोडल्या तर दक्षिणेतच पेशवे, निजाम व नागपूरकर भोसले या तिघांचा निकट शेजार एकमेकांना खुपल्याशिवाय राहात नसे. त्यांच्या पदरच्या तीन व्यक्ती त्यावेळी लौकिकात प्रसिद्ध होत्या. पेशव्यांचा सखारामबापू बोकील, निजामाचा विठ्ठल सुंदर परशुरामी व भोसल्यांचा दिवाकरपंत चोरघोडे. ही देशस्थ ब्राह्मणत्रयी काही काळ दक्षिणेचे राजकारण खेळवीत असता पेशव्यांचे दरबारी फडणीस, पटवर्धन वगैरे कोकणस्थ मंडळी माधवरावांचा पुरस्कार करण्यात अग्रेसर होती; हळूहळू निजाम व भोसले या दोघांवरही माधवरावाने आपल्या कर्तबगारीची छाप बसविली. याचा परिणाम असा झाला, की अल्पबळ कोकणस्थांपुढे देशस्थ शहाणे हलके पडले. नाना फडणीसासारख्या अर्ध्या शहाण्याने तीन देशस्थ शहाण्यांना निष्प्रभ केले, असा भावगर्भ ह्या साडेतीन शहाण्यांच्या आख्यायिकेत सूचित आहे....नाना फडणीस माधवरावाचे शिस्तीत वाढला, माधवरावाने या शहाण्यांच्या खटपटी हाणून पाडताना नानाचा उपयोग केला. एकास स्वर्ग दाखवला, दुसऱ्यास कैदेत घातले आणि

तिसऱ्यास निर्माल्यवत बनविले....ह्यावरून अर्ध्या कोकणस्थ शहाण्याने तीन देशस्थ शहाण्यास जिंकले, अशा उपरोधिक अर्थाचा जातिनिष्ठ भाव या साडेतीन शहाण्यांच्या आख्यायिकेत अभिप्रेत आहे. सख्या, देवा, विठ्ठला ही तीन नावे पूर्ण शहाण्यांची प्रचलित असली तरी रायरीकर, चंद्रचूड, काळे अशी कित्येक मंडळी त्याच मासल्याची होती. उलटपक्षी; रामशास्त्री प्रभुणे देशस्थ असूनही माधवरावाच्या रेखीव पद्धतीचा गुरूच म्हटला तरी चालेल. बारभाईच्या कारस्थानात सखाराम बापूने पुढाकार घेऊन राज्यसंरक्षण केले याबद्दल त्याला सर्वतोमुखी शाब्बासकीच मिळते. पण माधवरावचे कारभारात दादाचा पक्ष घेऊन या मंडळींनी राज्यास अपाय केला, म्हणून हे शहाणे दोषास पात्र होतात. राज्याची अनास्था उघड दिसत असता ती सुधारण्याकडे बुद्धीचा व्यय न करिता त्यातून स्वतःचा मतलब साधण्याची तत्कालीनांची प्रवृत्ती असे. मुख्यतः पेशवाईतील चुलते-पुतण्यांच्या कलहात यांचे हे खेळ विशेष गाजले. तेणेकरून समाजात ब्राह्मण जातीबद्दल अनादर झाला.''[१३]

## थोरला माधवरावच थिटा पडला

यापुढे जाऊन रियासतकारांनी म्हटले आहे की, ' साडेतीन शहाणे या शब्दप्रयोगातच मराठ्यांचे बुद्धिवैभव व्यक्त होते. त्या बुद्धीचा उपयोग स्वराज्य-संवर्धनाकडे झाला की तो मुत्सद्दी ठरतो. पण तीच बुद्धी तो राज्याला अपाय करण्यात वेचू लागला म्हणजे इतिहासात त्याला राजद्रोही संज्ञा प्राप्त होते. या देशस्थ ब्राह्मणांचा कैवार घेणारे टीकाकार ही वरील कसोटी विसरतात. '—या ठिकाणी रियासतकार हे विसरले की, राघोबादादाने १७७५ साली ब्रिटिशांचा आसरा घेतल्यानंतर सखारामबापू बोकीलाने कधीही राघोबाची बाजू उचलून धरली नाही. आपमतलबीपणापायी राघोबाच राजद्रोहाला प्रवृत्त झाला. चुलत्या पुतण्यांच्या वादात कोणी चुलत्याची तर कुणी पुतण्याची बाजू घेणे स्वाभाविकच होते. त्यात राजद्रोहाचा अंशही नव्हता. पण तत्कालीन राज-कारणाचा वेध घेता असे दिसते की, माधवरावाची आई गोपिकाबाई हिचा विश्वास नसल्यामुळे साडेतीन शहाण्यापैकी तीन शहाणे राघोबाची बाजू घेत होते. वास्तविक पाहता अगदी असाच पेच शाहू छत्रपतीपुढेही होता. तेव्हाही चुलती व पुतण्या यांचाच कलह होता. ताराबाईची खोड मोडण्याची

बुद्धी शाहू बाळगता तर त्याचाही अंत आपसातील दुहीनेच झाला असता. पण त्याने तशी बुद्धी ठेवली नाही; उलट, ताराबाईचा मान आणि शब्द दोन्ही राखले. माधवरावाला असे चातुर्य सुचले नाही. आपल्या घरातील भांडणात परक्यांचा हात घुसेल इतक्या थरावर ते भांडण त्याने नेले. नेले तर नेले; मग त्याची निष्ठुरपणे तड लावावयास हवी होती. तीही तो लावू शकला नाही. माधवरावाच्या कारकीर्दीतच पेशवाई दुभंगली. कंपनी सरकारने या भाऊबंदीचा पुरेपूर उपयोग केला. मोस्टिन नावाचा जो कंपनीचा वकील पुणे दरबारात होता तो कुटिलनीतीत निपुण असून पेशव्यांच्या घराण्यातील माणसांची नसन्नस त्यास माहीत होती. जवळजवळ पंचवीस वर्षे त्याने एकट्याने सर्व कारस्थाने रचली आणि शेवटास नेली.[१४]

थोरल्या बाजीरावाने गुजराथची चौथाई आपल्याच नांवे बादशहाकडून लिहवून घेतली आणि १७३१ साली त्या प्रकरणी दाभाडे–गायकवाड यांनी पेशव्यांविरुद्ध बंड पुकारले तेव्हा बाजीरावाने त्यांचा पूर्ण बीमोड केला होता. याच युद्धात त्र्यंबकराव दाभाडे मारला गेला. हे बडोद्याचे–गुजराथचे–राज्य पुढे बाजीरावाने दाभाडे–गायकवाडांकडेच सुपूर्द केले. पण, त्यावेळचे वैमनस्य ४५–५० वर्षांनंतरही टिकून होते. या वैमनस्याचा फायदा घेऊन कंपनी सरकारने गुजराथमध्ये गायकवाड यांच्यावर आपला जम बसविला. पुणे दरबारातील मोस्टिनलाच बडोदे दरबारात पाठविण्यात आले होते. या मोस्टिन-साहेबांचे चरित्र कुणी लिहिलेले नाही; पण, महाराष्ट्रात इंग्रजी राजवटीचा पाया त्यानेच रचला. राघोबादादाला त्याने जी मगरमिठी १७७५ साली मारली ती १८०० सालापर्यंत कायम राहिली. राघोबाचा खरा सल्लागार तोच होता. खुद्द नाना फडणीसाविरुद्ध मोरोबाला चिथविण्यात त्याचाच हात होता. सांगायचा मुद्दा हा, की थोरल्या माधवरावाला, शाहूप्रमाणे, घरातले भांडण आपल्याच हाताने मिटविता आले नाही आणि त्यामुळेच इंग्रजांचा मराठ्यांच्या राजकारणात शिरकाव होऊ शकला. ब्राह्मण जातीबद्दल समाजात अनादर उत्पन्न व्हावयास अशा रीतीने थोरल्या माधवरावातील दूरदर्शीपणाचा अभाव आणि राघोबादादातील महत्वाकांक्षेचा अतिरेक कारणीभूत ठरले. १७६२ ते १७७२ या दहा वर्षातच पुढील पन्नास वर्षांच्या राजकारणाची दिशा

ठरून गेली. नाना फडणीसाच्या मृत्यूपर्यंत पुणे दरबारचा प्रभाव थोडातरी कायम होता. पण त्यानंतर कुणाचा पायपोस कुणाच्या पायात राहिला नाहीं.

## आपसातील दुहीचाच पिसारा

खरे तर श्रीमंत नाना फडणीसाच्या हयातीतच पुणे दरबारचा वचक पूर्णपणे गेलेला होता. तळेगांवची लढाई जिंकल्यावर महादजी शिंदे याने राघोबादादांची व दोन्ही इंग्रज ओलिसांची सुटका करून टाकली. महादजीला 'दिवाण' व्हायचे होते; ती इच्छा जाणून घेऊन इंग्रजांनी राघोबा-महादजी यांची युती गुप्तपणे जुळविली. पण पुढे या युतीला कंपनी सरकार उचलून धरू शकले नाही. उलट वॉरन हेस्टिंग्जने शिंद्याचा गोहदचा किल्ला सर केला. त्यावरून पुढे युद्ध जुंपले आणि इंग्रजांचा पराभव झाला. १७८२ साली सालबाईचा तह झाला. त्या तहाने मराठे आणि हैदर यांची युती तुटली; पण राघोबाचे भूत मानगुटीवर बसले. शिंदे–होळकर यांची आपसातील भांडणे चालूच होती आणि पेशव्यांविषयीची भूमिका या भांडणा-नुसार बदलत होती. अहिल्यादेवीचा माधवरावाला आणि माधवरावानंतर सवाई माधवरावाला पाठिंबा म्हणून महादजीला राघोबाला जवळ करण्याची बुद्धी असा सर्व आपसातील दुहीचाच पिसारा हिंदुस्थानभर पसरलेला होता. शिंदे–होळकर आपसात भांडत होते. बडोद्याचे गायकवाड इंग्रजांच्या पायाशी बसले होते आणि नागपूरकर भोसले इंग्रजांशीं आतून मिळाले होते. खुद्द पेशव्यांच्या दरबारात दोन तट पडलेले. अशा स्थितींत राज्यकर्त्यांचा दाब म्हणून उरला नव्हता. देशात अशी अंदाधुंदी चालू असतानाच सागरी वाहतुकीची सर्व केंन्द्रे इंग्रज, फ्रेंच आणि पोर्तुगीज यांच्या हाती गेली होती. शिवाजी महाराजांनी नाविकदलाची स्थापना करून पश्चिम किनाऱ्यावर इंग्रज आणि पोर्तुगीज या दोघांनाही चांगलीच जरब बसविली होती. जंजिऱ्याचा सिद्दीहो त्यांनी वठणीवर आणला होता. पुढे १७२९ मध्ये कान्होजी आंग्रे यांच्या निधनानंतर मात्र मराठ्यांचे सागरी कर्तृत्व उणे पडले. चिमाजी अप्पाने बरीच शर्थ केली; पण त्याचे पश्चात समुद्रकिनाऱ्यावर मराठ्यांची वहिवाटच राहिली नाही. हिंदुस्थानची भूमी अशी सागरी अंगाने संपूर्णपणे परकीयांनी व्यापली होती.

### संपूर्ण सागरतीर इंग्रजांच्या कह्यात गेले

अठराव्या शतकाच्या अखेरच्या पंचवीस वर्षात हिंदभूचा संपूर्ण किनारा जसा सर्वस्वी परकीयांच्या ताब्यात गेला तसा तो त्या त्यापूर्वी कोणत्याही कालखंडात कधीच गेलेला नव्हता; तोवर जो कोणी येथील भूमीचा स्वामी असे तोच सागरतीरावरही प्रभुत्व गाजवीत असे. अगदी पंधराव्या आणि सोळाव्या शतकातील असे पुरावे उपलब्ध आहेत. वॉस्को द गामाच्या पूर्वी पश्चिम किनाऱ्यावर आणि क्लाईव्हपूर्वी बंगालच्या उपसागरावर किंवा डुप्लेपूर्वी पूर्व किनाऱ्यावर स्थानिक एतद्देशीयांचेच अधिराज्य होते. इतकेच नव्हे, तर त्याच काळातील ओरिसाचा राजा गजपती कपिलेंद्र देव याने आपल्या कारकीर्दीत जावा, सुमात्रा, चीन आणि इजिप्त आदि देशांशी व युरोपशी सागरी मार्गाने व्यापार वाढविल्याचे इतिहासात नमूद आहे. पश्चिम किनाऱ्यावरील भडोच आणि सुरत या दोन्ही बंदरातील व्यापार अरब लोकांच्या हाती होता. ते अहमदाबादच्या सुलतानाची हुकूमत मानीत. शाहू छत्रपतीने गुजराथवर कब्जा पक्का केल्यावर या अरब व्यापाऱ्यांनी दाभाडे–गायकवाडांची सत्ता मान्य केली होती आणि तेच पुढे त्यांचे सावकार झाले. पण गायकवाड पुढे इतके कर्जबाजारी झाले की या अरबी सावकारांच्या तावडीतून सुटका करून घेण्यासाठी त्यांने इंग्रजांची मदत मागितली. इंग्रजांनी अरब व्यापाऱ्यांचे कर्ज बडोद्याच्या सरकारी तिजोरीतून फेडण्याची हमी घेतली आणि ते कर्ज फेडलेही. पण त्यातूनच क्रमाक्रमाने कंपनी सरकारची तैनाती फौज बडोद्यात घुसली. गायकवाड यांची मांडलिक असलेली सौराष्ट्रातील अनेक छोटीछोटी राज्ये कंपनीने या कर्जफेडीच्या पोटीच स्वत:ची मांडलिक बनविली.[१५] साताऱ्याची आणि कोल्हापूरची गादी पेशव्यांनीच केवळ नावापुरती शिल्लक ठेवली होती. त्यामुळे तैनाती फौजेचा प्रश्न इकडे आला नाही. इकडे जी प्रकरणे घडली ती सर्व दत्तक प्रकरणे होत.

अवघ्या पन्नास वर्षात तैनाती फौज किंवा दत्तक प्रकरणी नकार अशा दोन मार्गांनी संपूर्ण हिंदुस्थान आपल्या अमलाखाली आणायची इंग्रजांना फुरसत मिळाली याचे रहस्य जर कशात साठविलेले असेल तर ते या

किनाऱ्यावरील वर्चस्वात. भारताचा किनारा चहूबाजूंनी आधीच व्यापल्यामुळे अन्य कोणाही सत्तेला येथे रिघाव करता आला नाही; आणि येथील कोणाही सत्तेला इंग्रजांचा पराभव करता आला नाही. लष्करी दृष्टया विचार केला तर पूर्व, पश्चिम आणि दक्षिण अशा तीन दिशानी कलकत्ता, मुंबई आणि मद्रास अशी ठाणी पक्की करावयाची आणि एकदम तीन आघाड्यांवरून स्वारीचा पवित्रा घ्यावयाचा ही नीती अपूर्वच म्हणावी लागेल. (वायव्येकडून येणारा शत्रू मराठ्यांनी परस्पर अंगावर घेतला आणि त्यात खुद्द त्यांचाच अंत होऊन गेला होता.) ही तीन पदरी लष्करी नीती इंग्रजांना सुचली व जमली याचे मूळ कारण भारताचा किनारा सर्व बाजूंनी त्यांनी आपल्या ताब्यात आणला होता, हेच होय.

## कापसाची बाजारपेठ रेल्वेकाठी वाढत गेली

या सागरकोंडीचा मुख्य परिणाम हा झाला की, १८०० सालानंतर भारतीय व्यापाराची गंगा उलटी वाहू लागली. भारतातील प्रत्येक प्रांतात एकेका विशिष्ट पद्धतीचा विणकरी माल पैदा होत असे-डाक्क्याची मलमल, बनारसचा शालू, पैठणची पैठणी, इचलकरंजीची धोतरे, नागपूरच्या साड्या असा एकेका उद्योगकेंद्राचा लौकिक होता. महाराष्ट्र हा या काळात पेशवाई, निजामी मोगलाई, नागपूरकर भोसलेशाही असा विभागला गेलेला होता. वऱ्हाड पूर्णपणे हैद्राबादच्या ताब्यात होते. ईस्ट इंडिया कंपनीने बंगाल-बिहारची दिवाणी मिळाल्यानंतर तेथील भारतीय व्यापाऱ्यांना जसे जकातीच्या जाचाने बेजार केले आणि सर्व व्यापार कंपनीच्या किंवा कंपनीच्या नोकरांच्या हाती केंद्रित केला, तसेच मद्रास आणि मुंबई या दोन्ही व्यापारकेंद्रातूनही केले. मुंबई किंवा मद्रास ही काही त्यावेळीं व्यापाराची मोठी केंद्रे नव्हती. मालवण, मडगाव, लातूर, अहमदनगर, इचलकरंजी, नागपूर, महाड, वाशीम, उमरखेड, पैठण, कऱ्हाड, नाशिक, जालना, बऱ्हाणपूर ही खरी त्यावेळची महाराष्ट्रातील नावाजलेली बाजारपेठांची गांवे अशी म्हणता येतील. येथे जो विणकारी माल पैदा होई किंवा विक्रीस येई तो येथली गरज भागवीत असे. पण १८०० सालानंतर ही स्थिती बदलत गेली आणि विणकारी मालाच्या पैदाशीऐवजी कापसाची पैदासच

महत्त्वाची ठरली. येथील कापूस विलायतला जाऊ लागला. मुंबई ते हौरा असा लोहमार्ग तयार होईपर्यंत कापसाची निर्यात हा फार मोठा फायदेशीर व्यवहार ठरला होता आणि त्यामुळे या जी. आय. पी. रेल्वेच्या काठाकाठाने कापसाच्या व्यापाराचे मोठमोठे दलाल निर्माण झाले. कापसाच्या लागवडीचे क्षेत्रही त्यामुळे सातत्याने वाढूच लागले. कापसाची शेती आणि कापडाचा उद्योग यांचे स्थानिक अर्थकारण जे एकजीव होते तेच मुळी विस्कटले. नाशिक ते बैतुल या सुमारे ४०० मैलांच्या लांब पट्टीत हे कापसाचे पीक म्हणजे वरदानच ठरले. १८७३ मध्ये पहिली कापडाची गिरणी टाटांनी नागपुरात टाकली. म्हणजे, मूळ कोष्टी धंद्याला विलायती गिरण्यांचा शह बसत बसत सुमारे ७५ वर्षात अशी स्थिती आली की, कोष्टी व्यवसायाच्या महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या केंद्रातच त्याला शह देणारी कापडाची आधुनिक गिरणी उभी झाली. भारत ही परदेशी पक्क्या मालाची बाजारपेठ व्हावयास ७५ वर्षे लागली; यावरून व्यापारी उलाढालीचा वेग किती विलक्षण होता, ते कळून येते. या कापसाच्या व्यापारामुळे वऱ्हाड, नागपूर, मराठवाडा हे भाग आर्थिक दृष्ट्या मुंबईशी जोडले गेले. मुंबईचा व्यापार मँचेस्टरशी आणि महाराष्ट्राचा व्यापार मुंबईशी अशी एक नवीच साखळी तयार झाली. म्हणजे, व्यापाराची गंगाच उलटी वाहू लागली. हा सर्व त्या सागरकोंडीचा प्रताप होता, हे कळावयास मात्र आणखी पन्नास वर्षे जावी लागली जलपर्यटनासाठी प्रायश्चित सांगणारे शास्त्र आम्ही संपूर्ण एकोणविसाव्या शतकात शिरोधार्यच मानीत होतो.

## अरबांचा हा श्रीमंती लोंढा पूर्वीही होताच

या इंग्रजी सागरकोंडीचा पश्चिम किनाऱ्यावरील गुजराथ, कोकण, कर्नाटक आणि मलबार या भागात आणखी एक घोर परिणाम झाला. या पश्चिम किनाऱ्यावरील व्यापार शतकानुशतके अरब लोकांच्या हाती होता—मग तो व्यापार गुळाचा असो की मसाल्याच्या पदार्थांचा असो की कापडाचा असो. अरब लोकांचा प्रभाव या किनाऱ्यावर एवढा की आम्ही पश्चिम किनाऱ्याला 'अरबी समुद्र' या नावानेच ओळखू लागलो. अरबस्थानमधील घोडा आणि खजूर याचे आकर्षण आजही कायम आहे. खरे म्हणजे हिन्दु-

स्थानच्या दक्षिणेकडील टोकामुळे हिंदी महासागराचे दोन भाग झाले आहेत. एक अरबी समुद्र आणि दुसरा बंगालचा उपसागर. पूर्व किनारा जावासुमात्राशी आणि पश्चिम किनारा इजिप्त–इराणशी जलमार्गाने कायमचा जोडला गेलेला. अरबस्थानातील श्रीमंतांचा लोंढा आजकालच महाड–मुरूडकडे येतो आहे, असे नव्हे; तो तसा सुमारे दोन-तीन हजार वर्षे सारखा अधूनमधून येतोच आहे. अरबांच्याकडे पैसा वाढला की तो हिंदुस्थानकडे निघालाच म्हणून समजायचे! खलिफा उमर याने तर असे फर्मानच काढले होते की हिंदुस्थानात तलवारीच्या बळावर धर्मप्रसार करावयाचाच नाही! इसवी सनाच्या आठव्या आणि नवव्या शतकात वेदांपासून पंचतंत्रापर्यंत अनेक संस्कृत ग्रंथांची अरबी भाषेत भाषांतरे झाली होती आणि खुद्द दाराशुकोह याने भगवद्गीतेचे फारसी भाषांतर केल्याचे प्रसिद्धच आहे. चरक-सुश्रुत आदि भिषग्वरांच्या आयुर्वेदावरील ग्रंथांचीही याच काळात अरबी भाषांतरे झाली. त्याही पूर्वीच्या प्राचीन काळाचा शोध घेतला तर अजिंठा–वेरूळ येथील लेण्यात वापरलेले रंग–विशेषतः निळारंग–इजिप्तमधून आणलेले होते आणि त्या रंगाची कांती अजूनही ताजीच वाटते. म्हणजे महाराष्ट्र आणि इजिप्त–अरबस्थान यांचे व्यापारी संबंध फार पुरातन होते. भारतीय समुद्रकिनारा ब्रिटिशांच्या छायेखाली गेल्यानंतर अवघ्या पन्नास वर्षात हा पूर्वापार व्यापारी संबंध तुटला.

## शनवार तेलीच बिनीचे वीर होते!

मुद्दाम तोडण्यात आला. कोकणकिनाऱ्यावरील संमिश्र वंशाची लोकस्थिती किंवा बहामनी राजवटीची कहाणी दक्षिण भारत आणि इजिप्त–अरबस्थान यांच्यातील स्नेहाची, सलोख्याची आणि सामंजस्याची पूर्ण कल्पना यावयास निश्चितच उपयोगी आहे. पश्चिम किनाऱ्यावरील सर्व राजांचे सावकार अरब व्यापारीच होते. महाड, मालवण ही त्यांची महाराष्ट्रातील मुख्य ठिकाणे होती. सुरतेला आणि भडोचला त्यांचेच प्राबल्य होते. त्यांच्या सावकारी पाशातून मुक्त होण्यासाठीच पश्चिम किनाऱ्यावरील हिंदू राजांनी प्रथम पोर्तुगीजांचे आणि नंतर इंग्रजांचे स्वागत केले आणि काहींनी तर त्यांच्याकडून ख्रिश्चन धर्माचीही दीक्षा घेतली.

या संदर्भात, मुंबई येथील ईस्ट इंडिया कंपनीला आपला राजकीय

प्रभाव आणि लष्करी व्याप वाढविण्यासाठी १७०० ते १८०० या शंभर वर्षांच्या कालखंडात कोकणातील 'शनवार तेल्यां'ची फार मदत झाली, हे येथे सांगितले पाहिजे.[१६] हे शनवार तेली म्हणजे कोकणात स्थायिक झालेले ज्यू लोक ! यांचा व्यवसाय तेलघाण्यांचा आणि म्हणून ते तेली. शनवार तेली म्हणजे शनिवारी प्रार्थना करणारे ! यांची लोकसंख्या १८०० च्या सुमारास निदान तीस हजारापर्यंत तरी असावी. यांची वस्ती जास्तीकरून विद्यमान रायगड जिल्ह्याच्या परिसरातच होती. ईस्ट इंडिया कंपनीच्या फौजेत जे पहिले एतद्देशीय सामील झाले ते म्हणजे हे शनवार तेलीच. यांची जमात स्वतःला बेने-इस्राएल म्हणवून घेते. म्हणजे 'इस्राएलचे संतान' म्हणवून घेते. तळेगावच्या १७७८ सालच्या पहिल्या इंग्रज–मराठे युद्धात बहुसंख्य अधिकारीवर्ग बेने–इस्राएलांचाच होता. त्यांना मराठी समाजात आपलाच एक घटक या नात्याने मान्यता मिळालेली होती आणि इंग्रजांना एतद्देशियांची सैन्यभरती करण्यासाठी अशाच मध्यस्थाची जरूरी होती. बेने–इस्राएल जमातीने ब्रिटिशांना जी साथ आणि जे सहाय्य दिले, ते केवळ इंग्रजांच्या प्रभावामुळे तरी अरबी व्यापाऱ्यांचे प्रस्थ आणि प्रमाण कमी होईल, याच उद्देशाने दिले असले पाहिजे, यात शंका नाही. कंपनी सरकारात त्यांना जो हुकमी मान मिळत असे तोही फार बोलका होय. आणि ईस्ट इंडिया कंपनीला केवळ बेने–इस्राएलांचाच पाठिंबा होता, असे नव्हे; तर बगदादी ज्यू म्हणून जे येथे अठराव्या शतकापासूनच आलेले होते, त्यांचाही पाठिंबा होता. मुंबईतील पहिले 'डॉक' म्हणजे ससून डॉक. हे ज्यांनी बांधले—ते डेव्हिड ससून यांनी बांधलेले आहे–हे ससून बगदादी ज्यू ![१७] सागरी व्यापाराची झपाट्याने होणारी वाढ हेरून त्यास सोयीचा असा धक्का बांधण्याची दूरदृष्टी त्यांनी दाखविली, हे तर खरेच. पण त्यांचाही दबदबा ईस्ट इंडिया कंपनीच्या दरबारी होता यास अरब व्यापाऱ्यांचा संदर्भच कारणीभूत असावा. १८४० सालचा एक सामाजिक किस्सा यादृष्टीने मोठाच सूचक वाटतो. तत्पूर्वी जवळ जवळ शंभर वर्षे बगदादी ज्यू आणि बेने–इस्राएली ज्यू यांची स्मशानभूमी एकच होती. पण १८४० साली बगदादी ज्यू मंडळींनी, आम्ही अरबी ज्यू आहोत आणि बेने–इस्राएली यांचे आमचे रीतिरिवाज मुळीच जुळते मिळते नाहीत, म्हणून या स्मशानभूमीत भिंत बांधून आमचे स्मशान वेगळे ठेवण्यास

परवानगी द्यावी', अशी मागणी मुंबई सरकारकडे केली. त्यांची ही मागणी फेटाळण्यात आली. पण चारपाच वर्षातच मुंबई महापालिकेने त्यांना वेगळ्या स्मशानासाठी स्वतंत्र जागाच देणगी म्हणून दिली! अरबस्तानी मुसलमान व्यापाऱ्यांचा प्रभाव कमी होऊन अरबस्तानी ज्यूंचा प्रभाव वाढला. ही घटनादेखील इंग्रजांनी भारताची सागरवर्ती कोंडी केली म्हणूनच घडली. पश्चिम किनाऱ्यावर परकीयांचाच प्रभाव होता आणि त्यांचे आपसातील राजकारण परस्परच एतद्देशियांचे भवितव्य घडवीत होते. सह्याद्रीच्या पश्चिमेला चाललेले हे अभिसरण सह्याद्रीच्या पूर्वेकडील मंडळींना दिसले नाही, समजले नाही, उमजले नाही. पानिपतच्या पराभवानंतर देशावरचे सर्वच मराठे केवळ आपसातील वैमनस्यांनाच उजाळा देत राहिले–केवळ 'पंत मेले, राव चढले' या बुद्धीनेच राजकारण करीत राहिले. १७६० ते १८२० हा कालखंड म्हणूनच मराठी साम्राज्याचा ऱ्हासकाल ठरला. या साठ वर्षात राज्य करण्याची, राज्य सांभाळायची आणि राज्य राखायची विद्याच भारतीयांच्या नजरेआड झाली.

## ग्रामस्वराज्याचा मूळ राजकीय पायाच उखडला

—आणि याच साठ वर्षांत इंग्रजांनी हिन्दुस्थानवर राज्य करण्याची व ते टिकविण्याची विद्या हस्तगत केली. किंबहुना, आपण जी विद्या विसरलो तीच त्यांनी उचलली, असेही म्हणता येईल. अर्थात्, त्यांनी आपल्या गरजे-नुसार नवी भर या विद्येत घातली, नाही असे नाही. पण भारतीय समाजाची मूळ धारणा कोणती, या समाजाची मनोवृत्ती कशी आहे आणि शासनाविषयी या समाजाची दृष्टी कोणती, या सर्वांचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला आणि येथील आधीच्याच प्रथांवर आणि पद्धतींवर नवा साजशृंगार चढविला. प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की, १७७६ साली अमेरिकेतील ब्रिटिश वसाहतींनी इंग्लंडविरुद्ध युद्ध पुकारून आपले स्वातंत्र्य सिद्ध केल्यामुळे हिंदुस्थानांतील साम्राज्याला कुठेही तडा जाऊ द्यायचा नाही, असा ठाम निर्धार ब्रिटिश राज्यकर्त्यांनी केला होता. या निर्धारापोटी व हिंदुस्थानात पाय रोवून उभे राहण्यासाठी जे जे करणे आवश्यक वाटले ते ते सर्व त्यांनी निष्ठुरपणे केले. उदाहरणार्थ, ब्रिटिशांपूर्वी या देशातील पोलिस यंत्रणा ही

सर्वस्वी स्थानिक अखत्यारीतील बाब होती. ग्रामपंचायतीलाच तो अधिकार होता आणि कोतवाल हा सर्वार्थाने गावालाच जबाबदार होता. न्यायदानाचे पूर्ण काम गावातील ग्रामसभेकडे होते आणि सामाजिक स्वरूपाच्या कार्यावर जात पंचायतीची कडक नजर होती. वाळीत टाकण्याची शिक्षा ही जात-पंचायतच देत असे. गाव हाच हजारो वर्षे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनाचा मूलघटक होता. राज्य कोणाचेही असो, मौर्यांचे वा गुप्तांचे वा हर्षाचे वा अकबराचे असो, गावाचे हे स्वयंपूर्णत्व कोणीही नाकारले किंवा धुडकावले नाही. पण ब्रिटिशांनी मात्र मूळ ग्रामघटकांची ही स्वायत्तता पार उखडून फेकून दिली.

## कॉर्नवालिस याने अमेरिकेचा सूड भारतावर उगवला !

१७७३ साली ब्रिटिश पार्लमेंटने 'रेग्युलेशन ॲक्ट' मंजूर केला आणि ही एतद्देशीय परंपरागत लोकव्यवस्था मोडून त्याऐवजी नोकरशाही व्यवस्था आणली. हा कायदा झाला तो अमेरिकेतील स्थानिक स्वायत्ततेच्या आधारावर उभी झालेली राज्यक्रांती पाहूनच झाला, यांत शंका नाही. हा कायदा अमलात आला लॉर्ड कॉर्नवालिस हा गव्हर्नर जनरल असताना. हाच जॉर्ज वॉशिंग्टन याचेशी लढणारा इंग्रज सेनापति. अमेरिकेतील आपल्या पराभवाची भरपाई त्याने हिंदुस्थानात कंपनीचे राज्य बळकट करण्याची नवी नीती शोधून केली. येथे मोगलांच्या वेळेपासून सुभेदारांच्या भरवशावर राज्य करण्याची प्रथा होती. लॉर्ड कॉर्नवालिसने या प्रथेचे रहस्य ओळखले आणि तीच आपल्या हेतूसाठी राबविली. सुभेदार सारा वसुली करीत आणि तो बादशाही तिजोरीत जमा करीत. न्यायनिवाडाही तोच करी. म्हणून त्यास 'कलेक्टर ऑफ रेव्हेन्यू ॲंड डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट' असे जोडनाव मिळाले. या जागेवर नेमणूक करण्यासाठी कसोट्या कॉर्नवालिसनेच ठरविल्या. प्रथम त्यानेच 'तीस वर्षांच्या सेवेची हमी' देऊन इंग्लंडातून कर्तबगार तरुण इकडे आणले—'इंडियन सिव्हिल सर्विस'चा मूळ जनक तोच. मात्र त्यावेळी तीस 'इंडियन कोव्हेनेटेड सर्विस' म्हणत. सुभेदार पदाचे हे जे पगारी आधुनिकीकरण झाले ते हिंदुस्थानच्या भूमीला सर्वस्वी नवीन होते. येथील समाजातील कुठल्याही अपराधाविषयी किंवा गुन्ह्याविषयी

ग्रामांतर्गत आणि जात्यंतर्गत दंडयोजना होती. कॉर्नवालिसने ही दंडयोजना 'डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट'च्या अधिकारात नेली. गावागावातील अधिकार परंपरा नष्ट व्हावयास नंतर सुमारे चाळीस-पन्नास वर्षे लागली. आपला हा अधिकार परत मिळविला पाहिजे, असे खेड्याखेड्यातील जातप्रमुखांना तीव्रतेने वाटले, म्हणून १८५७ साली बंडाची लाट सर्व देशभर उठली.[१८] अफगाण युद्धाच्या निमित्ताने १८४१ सालानंतर एतद्देशियाची फौजभरती मोठ्या प्रमाणावर करण्यात आली होती. त्यांच्या मनात आपल्या गांवातील सत्ता-हानीची खंत धगधगत होती आणि त्यांचा गावपाटीलकीची परंपरा असलेल्या घराण्यांशी निकटचा संबंध होता. म्हणून बंडाची गुप्त निरोपानिरोपी वेगाने आणि खात्रीने होऊ शकली. या बरोबरच, याच चाळीस पन्नास वर्षात हळुहळू 'कलेक्टर' म्हणजे 'सरकार' अशी लोकांची अनुभवाने खात्री पटली. इतकेच नव्हे, तर तो आपल्याला न्याय देईल, अशीही भावना बळावली. गावात पूर्वी प्रथम जातपंचायत आणि नंतर ग्रामपंचायत अशी स्थिती होती. आता म्हणजे कॉर्नवालिसच्या शासन व्यवस्थेत जात आणि गाव ओलांडून एकदम जिल्हा हाच सर्व सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेचा मूलघटक झाला. ही राज्यव्यवस्थेतील क्रांतीच होती. कारण, ग्रामस्वायत्तता त्यामुळे पूर्णपणे लोप पावली. १८५७ चा उठाव हा या ग्रामस्वायत्ततेचा उठाव होय, अशी ब्रिटिश मुत्सद्यांची खात्री पटली. म्हणूनच स्थानिक स्वराज्य संस्थांची उभारणी करण्याची भूमिका त्यांनी तात्काळ घेतली आणि जिल्हा लोकल बोर्डांची स्थापना १८६० साली सर्व देशभर करण्यात आली. व्हिक्टोरिया राणीचा १८५८ सालचा जाहीरनामा म्हणजे स्थानिक स्वायत्ततेचा विजयच होय, असे येथील समाजधुरीणांना मनापासून वाटल्यामुळेच त्या जाहीरनाम्याचे प्रचंड स्वागत झाले.

## 'इंग्लंडात बसून राज्य करता येणार नाही!'

हिंदुस्थानचा कंपनीकारभार मागे घेऊन तो पार्लमेंटने स्वतःकडे घेऊ नये, अशा आशयाचा 'अर्ज' ईस्ट इंडिया कंपनीने त्याचवेळी पार्लमेंटला सादर केला होता. तो लिहिला होता जॉन स्टुअर्ट मिल याने. या अर्जात म्हटले होते, 'ज्यावेळी अटलांटिक समुद्राच्या पलिकडील तीरावर असलेले

ब्रिटिश राजवंशाचे महान साम्राज्य पार्लमेंटच्या नियंत्रणाखालील अधिकारीवर्ग मोडीत काढीत होता, त्यावेळी पार्लमेंटची कोणतीही मदत न घेता किंवा पार्लमेंटची देखभाल नसतानाही प्रस्तुत कंपनीने पूर्वेकडे नवीन साम्राज्याची पायाभरणी केली, हे विसरू नका.' अमेरिकेतील अनुभवाने शहाणे होऊन येथील शासनव्यवस्था कंपनीने लावली, असा स्पष्ट अर्थ यातून व्यक्त होतो. तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यांनी इंग्लंडमधील आपल्या एका उच्चपदस्थ मित्राला असे पत्र लिहिले होते की, "तुम्ही वसाहतींवर जसे राज्य केले तसे हिंदुस्थानवर करू शकणार नाही. या वसाहतीत भाषा, धर्म, भावभावना आणि संस्था या सर्व अंगांनी मातृभूशी समान अनुबंध असणाऱ्या लोकांनी व्यापलेल्या आहेत आणि तरीही मंत्र्याच्या आधीन असलेल्या सरकारच्या हातून आपल्या मोठ्यात मोठया वसाहती निखळून पडल्या आहेत. अशा स्थितीत मातृभूमी आणि सर्व वसाहती मिळून जेवढी लोकसंख्या होते त्याच्या पाचपट लोकसंख्या असलेल्या भारतासारख्या प्रचंड आणि मातृभूशी भाषा, धर्म, भावभावना आणि संस्था या अंगानी कोणतेही साधर्म्य नसलेल्या देशावर इंग्लंडमध्ये बसून एखादा मंत्री राज्य चालवू शकेल, असे मानणे बुद्धीला पटणारे नाही."[११]

भारत ही एक वसाहत आहे, असे लॉर्ड डलहौसी मानीत नाही. कंपनीने शंभर वर्षे राज्य केल्यानंतरही तो तसे मानीत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. या संदर्भात, 'इंडियन सिव्हिल सर्विस' २१ मे १८५५ रोजी स्थापन करण्यात आली होती, हे नमूद करावयास हवे. म्हणजे, शंभर वर्षात येथील शासनव्यवस्था अमूलाग्र बदलून गेली. १८५५ पासून आय. सी. एस. ही नोकरशाहीची पोलादी चौकटच येथे राज्य करू लागली. आपला राज्य-कारभार आपण करावयाचे सोडून दिले आणि 'कलेक्टर'लाच 'माय बाप सरकार' म्हणून डोईवर घेतले. आपल्या लोकजीवनातील या परिवर्तनामुळे त्रयस्थपणा, तटस्थपणा हा शासनाचा मुख्य गुण ठरला. कारण हे 'परके' सरकार इथे कुणाही समाजघटकाशी एकजीव झाले नाही आणि १८५७ नंतर खिश्चन धर्माशीही ते एकरूप होऊन वागू शकले नाही. त्यामुळे सर्व संबंधित वर्गांहून आपण भिन्न, वेगळे आणि श्रेष्ठ आहोत, अशी भूमिका

घेऊनच ब्रिटिश राज्यकर्ते येथे वागू लागले. समाजांतर्गत स्वायत्त नियमन–शक्तीचा संकोच होऊन समाजबाह्य सार्वभौम नियंत्रणशक्तीचा विस्तार झाला. सतीबंदीचा कायदा हा या मूलभूत परिवर्तनाचाच पहिला पुरावा होता.

## मेकॉले म्हणजे चार्लस ग्रँटचे भूतच!

या मूलभूत परिवर्तनामागे केवळ योगायोग नव्हता; निश्चित योजना होती. १७६५ च्या सुमारास चार्लस ग्रँट नामक एक इंग्रजी तरुण व्यापाराच्या निमित्ताने मद्रास येथे येऊन पोहोचला. त्याचे इकडील आयुष्य चांगले संपन्नतेत गेले आणि बराच पैसा गाठी साठल्यामुळे इंग्लंडात परत जाऊन कांही राजकारण करावे अशी उर्मी त्याच्या ठायी उठली. ग्रँट तिकडे गेला तो १७९५ च्या सुमारास ४८–४९ वर्षांचा असताना. तेथे त्याने 'भारतातील शिक्षणव्यवस्थेविषयी काही विचार' नामक पुस्तिका प्रसिद्ध केली आणि भारतीयांना इंग्रजी भाषेचे शिक्षण देण्याविषयी आग्रह धरला पण त्याचे कोणी ऐकेना म्हणून तो पार्लमेंटमध्ये निवडून गेला. तरीही त्याचेकडे कोणी लक्ष देईना. म्हणून तो बोर्ड ऑफ ट्रेडचा सदस्य झाला. तरीही त्याचा प्रभाव पडेना. अखेरीस त्याने बोर्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्षपदच आपल्या पायाशी आणले. बोर्ड ऑफ ट्रेडचा अध्यक्ष या नात्याने जवळजवळ बारा वर्षे तो भारतातील शिक्षणव्यवस्थेत बदल करण्यासाठी झगडत होता. डॉ. मेकॉले यास याच सर चार्लस ग्रँटने पार्लमेंटावर निवडून आणले आणि हिंदुस्थानात शिक्षण सल्लागार म्हणून पाठविले. १८३३ च्या हिंदुस्थानविषयक कायद्यात इंग्रजी शिक्षणाची दीक्षा भारतीयांना देणारे कलम समाविष्ट करण्यात ग्रँट–मेकॉले या जोडगोळीला यश आले आणि जुन्या पाठशाळा आणि जुने मदरसे या हिंदु-मुसलमानांच्या पिढीजात शिक्षणकेंद्रांवरच घाला पडला. आपल्या या शिक्षणसुधारणेमुळे, मेकॉले यांची धारणा होती, 'भारतीय लोक कालांतराने केवळ पोषाखात भारतीय राहातील; ते मनाने मात्र पाश्चिमात्य बनतील.' मेकॉले यांच्या या शिक्षणनीतीमुळे ब्रिटिश राज्यकर्त्यांना जे दुय्यम किंवा तिय्यम दर्जाचे नोकर शासनाच्या सर्व क्षेत्रामध्ये हवे होते, ते मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. शिक्षणानेच समाज घडत असतो; हा घडलेला समाज पुढे काळानुरूप शिक्षणाला नवे वळण देत असतो. पण ते

केव्हा ? तर कोणत्याही समाजाचे सरकार हे ज्यावेळी स्वकीयांचे स्वतंत्र सरकार असते, तेव्हाच. कारण, समाजातील सर्व शास्त्रांचा उगम आणि विकास राज्य चालविण्याच्या विद्येतच सामावलेला असतो.[२०]

## जातीचा नि पोटाचा संबंध तुटला !

राज्य ब्रिटिशांच्या हाती होते म्हणून तेव्हा ब्रिटिशांच्या सोयीने शिक्षणाची व्यवस्था लागली. ब्रिटिशांनी येथे नवे तंत्रविज्ञान आणले. पण ते सामावून घेण्याची क्षमता येथील जातिव्यवस्था दाखवू शकली नाही. प्रत्येक जातीचा विविक्षित व्यवसाय होता; त्या व्यवसायाचे पिढीजात तंत्रज्ञान होते. ते नवीन तंत्रविज्ञानापुढे थिटे पडले. आगगाडी आली म्हणून बैलगाडी मागे पडली; कापडाची गिरणी आली म्हणून हातमाग मागे पडला. बैलगाडी आणि हातमाग मागे पडला याचा अर्थ शेती आणि कापडउद्योग मागे पडला. नांगराचा लाकडी फाळ जाऊन लोखंडाचा फाळ यावयास विसाव्या शतकाचे दुसरे दशक उगवले, यावरून नवे तंत्रज्ञान जीवनात घुसून बसायला किती वेळ लागतो, हे लक्षात येईल. हे नवे तंत्रविज्ञान ही मेकॉलेची देण आहे—त्यानेच भारतीयांना ज्ञानाच्या क्षेत्रात युरोपशी समकालीन पातळीवर आणले. पण आधुनिक तंत्रविज्ञानाला आपल्या पोटात सामावून घेणारी एकही जात निघाली नाही. म्हणून आपल्याच जातीला अधिकाधिक घट्ट चिकटून बसण्याची प्रवृत्ती भारतीय समाजात निर्माण झाली. जातीच्या आधाराने पोटाचा प्रश्न सुटत नाही आणि पोटाचा प्रश्न सुटला तरी जात सुटत नाही, अशा दुश्चक्रात भारतीय समाज जो १८३३ साली सापडला तो १९८३ साली देखील त्यातून बाहेर पडलेला नाही. आधुनिक तंत्रविज्ञान आणि प्राचीन समाजव्यवस्था यांचे सांधे जुळले नाहीत, जुळविता आले नाहीत किंवा जुळविता येणे शक्य नाही, अशा तीन प्रकारच्या प्रतिक्रिया जशा मेकॉलेकाली होत्या तशाच त्या विनोबाकालीही दिसतात. एवढे हे परिवर्तन मूलगामी आणि दूरपरिणामी होते. भारतीय समाजाची मती गेल्याचेच हे लक्षण नव्हे काय ?

ग्रँट-मेकॉले या जोडगोळीचे कर्तृत्व सांगतासांगता आपण फार पुढे येऊन पोचलो. ब्रिटिश राज्यकर्ते येथे राज्यविद्या कशी संपादन करीत होते,

हे सांगायचे अर्धेच राहून गेले. मराठ्यांनी आपले साम्राज्य चौथाईच्या माध्यमातून वाढवले. हे इंग्रजांना दिसतच होते. सर्व बादशाही प्रदेशाचे रक्षण करण्याची जबाबदारी चौथाईपोटीच मराठयांवर येऊन पडली होती. मराठयांची ही विद्या वेलस्लीने उचलली आणि तिला तैनाती फौजेचा आकार दिला. तैनाती फौज ठेवून घ्या आणि तिच्या खर्चाची तरतूद करा; अशी भूमिका घ्याल तर तुमचे रक्षण करू, असा नवा मंत्रच वेलस्लीने आपल्या सहकाऱ्यांच्या गळी उतरविला आणि त्यांनी तो येथील गायकवाड-निजाम आदि राज्यकर्त्यांच्या माथी मारला. १७९४ ते १८४४ पर्यंत अवघ्या पन्नास वर्षांत एकोणचाळीस राज्ये तैनाती फौजेच्या साह्याने ब्रिटिशांनी मांडलिक बनविली. आपला असा समज आहे की, पेशवाई बुडाली तेव्हा इंग्रजांचा दक्षिणेत जम बसला. पण हा समज इतिहासाला धरून नाही. वेलस्लीने ज्या दिवशी हैद्राबादचा निजाम संपवला त्याच दिवशी कंपनी भारतात निरंकुश झाली. हैदराबादच्या निजामाला लांडीलबाडीनेच संपविण्यात आले.

## कंपनीचे राजकारण निरंकुश कसे झाले?

हकीगत सांगण्याजोगी आहे. हैदराबादेत निजामाच्या दरबारात कॅ. कर्कपॅट्रिक नावाचा हुन्नरी माणूस इंग्रजांचा रेसिडेंट होता. त्याने भारतीय पोषाख आणि राहाणी चांगलीच आत्मसात केलेली होती. इतकेच नव्हे, तर हैदराबादच्या दरबारातील एका प्रमुख मुसलमान सरदाराच्या मुलीशीच लग्न लावले होते आणि त्यास निजामाच्या गोतावळयात हशमतजंग या नावानेच ओळखले जाई. त्याकाळी अझिमल उमरा हा निजामाचा वझीर होता. या हशमत जंगाने वझिर अझिमलशी संधान बांधून एक अचाट कट रचला. त्यांचे असे ठरले की, वझिराने निजामाचे सगळेच्या सगळे सैन्य थोडे थोडे करून विसर्जित करावयाचे। आणि त्या जागी ब्रिटिश फौजेला क्रमाक्रमाने स्थान द्यायचे. ही अदलाबदल पूर्ण होईतोवर निजामाला अंधारात ठेवण्याचे ठरले. पण पुढे असे झाले की अझिमल उमराने कच खाल्ली आणि तो वेळकाढूपणा करू लागला. पण ठरल्याप्रमाणे मद्रासहून ब्रिटिश फौजांनी तर कूच केले होते. मात्र या कटाबरोबरच निजामाच्या सैन्यात असंतोषाचा वणवा पेटवायचेही कारस्थान कर्कपॅट्रिकने रचले होते. जेव्हा त्यास

दिसले की वझिराचा उपयोग नाही तेव्हा त्याने निजामाच्या फौजेतील फ्रेंच अधिकाऱ्यांच्या विरुद्ध बंड घडवून आणले. निजामापुढे असा पेच पडला की इंग्रजांना तोंड द्यायचे तर आपल्याच सैन्यात दुफळी. अखेरीस त्याने आपले सैन्य विसर्जित केले आणि इंग्रजांची तैनाती फौज कायम केली. निजाम सैन्यहीन होताच संपूर्ण दख्खनचे राजकारण इंग्रजांच्या मुठीत आले. नंतर फक्त काळवेळेचा तेवढा प्रश्न उरला. १८०० साली हैद्राबाद असे घशात घातल्यानंतर पुढील अवघ्या वीस वर्षात पूर्ण भारतवर्ष, कंपनीच्या दावणीला बांधणीला गेला. या कामी वेलस्लीने ज्या धाडसी तरुण अधिकाऱ्यांचा उपयोग केला ते पुढे मोठे मुत्सद्दी म्हणून गाजले. मन्रो, मेटकाफ, माल्कम, एल्फिन्स्टन ही प्रभावळ वेलस्लीचीच. छत्रपती शाहूच्या कर्तृत्वाचे रहस्य वेलस्लीने ओळखले आणि त्याच 'चौथाई'च्या मिषाने त्याने शाहूप्रमाणेच नवनवीन गुणी, धोरणी आणि धाडसी तरुणांना पुढे करून अखिल हिंदुस्थान आपल्या छत्राखाली आणला. वेलस्ली इतका धूर्त की, इंग्लंडात आपल्या या साम्राज्यविस्तारावर विपरीत आणि विरोधी टीका होऊ नये म्हणून निजामाशी जो तह केला तोच मुळी कावेबाजपणाचा अट्टल नमुना. या तहाची सुरुवातच अशी आहे की, 'ज्याअर्थी माननीय कंपनीशी असलेल्या आपल्या मैत्रीचे महात्म्य जाणून खुद्द नबाब निजाम उल्मुल्क असफजा बहादूर यांनीच कंपनीच्या फौजेत वाढ करावी अशी इच्छा प्रदर्शित केली आहे, त्याअर्थी....'' या हैद्राबाद तहाविषयी इंग्लंडमधील मंत्रिमंडळ बेहद्द खुषीत आले आणि त्यांनी लॉड वेलस्ली यास तहाच्या तारखेपासून २० वर्षेपर्यंत सालीना ५००० पौंडाचे पेन्शन बहाल केले!

पेशव्यांच्या दरबारातील वकीलासही अशीच सैन्य विसर्जनाची अटकळ लढविण्याविषयी सांगण्यात आले होते—१७९८ च्या जुलै महिन्यातच. पण तेथील वकीलास कर्कपॅट्रिकसारखे अगदी हुकमी असे यश काही मिळू शकले नाही. पुण्याची तेवढीच लाज राहिली, इतकेच. बाकी इंग्रजांशी शरणागती पत्करण्यावाचून पुणे दरबारपुढे तरी काय मार्ग उरला होता? अशा प्रकारे हैदराबादचा निजाम गलितगात्र आणि निःशस्त्र होताच कंपनीच्या राजवटीला भारतात कुठलाही अडसर, आडकाठी किंवा अडथळा उरला नाही.

साहजिकच वायव्यसीमेच्या संरक्षणाकडेच नंतरच्या गव्हर्नर जनरलांनी आपले लक्ष केंद्रित केले.

## हे दोन ध्रुवांइतके अंतर का पडले?

१८४१ च्या अफगाण युद्धाबद्दल भारतीय समाजात त्यावेळी जी भावना निर्माण झाली ती पुढे सतत १०० वर्ष तशीच कायम राहिली. हे अफगाण युद्ध ब्रिटिश सरकार केवळ आपल्या हट्टापोटी भारतावर लादीत आहे, अशी धारणा येथील जाणकरांनी करून घेतली आणि अफगाणयुद्धावरील खर्च भारताच्या तिजोरीतून खर्च होता कामा नये, अशी आग्रही भाषा त्यांच्या तोंडी वर्षानुवर्षे येत राहिली. ब्रिटिश राज्यकर्ते मात्र, हिन्दुस्थानच्या सीमांचे रक्षण करण्यासाठीच आम्ही अफगाणिस्तानात युद्धास प्रवृत्त झालो आहोत, असे ठासून सांगत. ना. गोपाळकृष्ण गोखले आणि लॉर्ड कर्झन हे या दोन परस्परविरोधी दृष्टिकोनांचे प्रवक्ते. वेल्बी कमिशनपुढे १८९७ साली साक्ष देताना ना. गोखले म्हणाले, "खिव प्रांताचा कब्जा रशियाने केल्यानंतर मध्य आशियातील ब्रिटिश राजनीतीने नवीनच वळण घेतले. अफगाणिस्थान हे तटस्थ राष्ट्र राहिले पाहिजे, या भूमिकेवर पाणी सोडण्यात येऊन रशियाने अकारण केलेल्या या आक्रमणाविरुद्ध अमीराला सर्व प्रकारे शस्त्रसामुग्रीची आणि नैतिक पाठिंब्यांची हमी देण्यात आली. त्यामुळे अफगाणिस्थान हीच ब्रिटिश साम्राज्याची सरहद्द होऊन बसली. ब्रिटिश हिन्दुस्थानची सीमा सिंधू नदीच्या काठाकाठाने आहे, ही पूर्वीची भूमिका सुटली. मध्य आशियातील साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी भारतीय तिजोरीची दारे सताड उघडी करण्यात आली. लष्करी गरजांना प्राधान्य देऊन भारतीय हितसंबंधाची साम्राज्यवृद्धीच्या नीतीपोटी गळचेपी करण्यात आली."[२१] पुढे १९०५ साली इंपेरियल लेजिस्लेटिव कौन्सिलमध्ये लॉर्ड कर्झन यांनी असे स्पष्टपणे सांगितले की, "हिन्दुस्थानच्या भूमिकेविषयी माझी दृष्टि अशी : दोन बाजूला खंदकासारखे समुद्र आणि उरलेल्या बाजूंना तटांसारखे पर्वत असलेल्या प्रचंड किल्ल्याचेच रूप हिन्दुस्थानला लाभलेले आहे. अर्थात् अनेक ठिकाणी या तटाच्या भिंती फारशा उंच नाहीत आणि सहज खिंडारे पाडता येण्याजोगी स्थितीही अनेक ठिकाणी आहे. पण या तटाच्या पलीकडे लांबीरुंदी सारखा

बदलत जाणारा बर्फाळ प्रदेश आहे. हा प्रदेश पादाक्रांत करावयाचे आमच्या मनात नाही; पण त्या प्रदेशावर आमच्या शत्रूने ठाण मांडले, तर आम्हाला बघ्याची भूमिका घेता येत नाही. हा प्रदेश आमचे मित्र आणि साथीदार यांच्या हाती राहील तर आम्हांस संतोष वाटतो; पण प्रतिस्पर्धी आणि विरोधी असा एखादा प्रभाव तिथे निर्माण झाला तर अखेरीस आमची स्थिरताच धोक्यात येऊ शकते. म्हणून आम्हाला तिथे हस्तक्षेप करावाच लागतो. अरबस्थान, इराण, अफगाणिस्थान आणि पूर्वेकडे तर थेट सयामपर्यंत आम्ही जी भूमिका घेतो तिचे रहस्य हे आहे. आणि वर या संपूर्ण भागात आपले वर्चस्व कायम राहावे आणि विरोधी शक्तींच्या वाढीला वेळीच प्रतिबंध बसावा हेच गेल्या पाच वर्षातील धोरणामागील मुख्य सूत्र होय.''[२२] ना. गोखले आणि लॉर्ड कर्झन यांच्या या परस्परविरोधी भूमिकेचे मूळ कशात आहे ?

## उदारमतवादाचा विलायती वेताळ भोवला !

ईस्ट इंडिया कंपनीची राजवट हिंदुस्थानात जसजशी वाढत गेली, तसतशी ब्रिटनमध्ये अशी भावना वाढत गेली की, दहा हजार मैलांवरील नको त्या भानगडीत आपले राष्ट्र अकारण अडकत चालले आहे. कंपनीने फक्त व्यापार करावा, राज्य करण्याचे सोडून द्यावे, अशी भाषा पार्लमेंटातही वारंवार ऐकू येऊ लागली. कंपनीच्या कारभाराची चौकशी करा असा ओरडा तर सारखाच चालू असे. वॉरन हेस्टिंग्जवर पार्लमेंटने पुढे १७८७ साली दोषपत्रच ठेवले; पण नंतर १७९५ साली हाऊस ऑफ लॉर्डस्‌ने त्यास दोषमुक्त केले. अगदी १७७३ पासून १८५८ साली राणीचा जाहीरनामा प्रसिद्ध होईपर्यंत दर वीस वर्षांनी कंपनीचे राजकीय अधिकार मर्यादित होत होत अखेरीस पूर्ण नष्ट झाले. व्यापाराचे क्षेत्र तर आधीच हातातून गेले होते. हा जो कंपनीला विरोध होता तो मुख्यतः उदारमतवादी पुढाऱ्यांचा होता. या उदारमतवाद्यांना युरोप आपला आणि हिंदुस्थान परका वाटे; इतकेच नव्हे. तर पूर्वेकडे ब्रिटिश साम्राज्य वाढले तर युरोपशी आपले दुराव्याचे संबंध येतील, अशीही भीती त्यांना वाटे. आशियाचे हित न पाहता युरोपचे हित पहावे आणि इंग्लंडला युरोपच्या राजकारणातच अधिक रस घ्यावयास लावला पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. या मूळ धारणेपोटी अफगाणिस्थान,

तिबेट, सयाम आदि देशांशी आपला संबंध नाही आणि हिंदुस्थानच्या रक्षणासाठी एवढा अवाढव्य खर्च आपण करता कामा नये, हे सांगण्यासाठी ते 'साम्राज्यविस्तार' नको, अशी भूमिका घेत. 'साम्राज्यविस्तार नको,' ही भूमिका येथील सर्व समाजधुरीणांना भारतहिताची भूमिका वाटे.[२२] याचे एकमेव कारण हे की, शिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर म्हणजे १६८० सालानंतर अंतस्थ राजकारणाचाच आगडोंब पेटला आणि परदेशसंबंधाचा विचार किंवा व्यवहार करावयास राज्यकर्त्यांना उसंतच मिळाली नाही—१६८० पासून १८३० पर्यंत १५० वर्षे परराष्ट्रनीती ठरविण्याचा आणि राबविण्याचा अनुभव कुणालाही मिळाला नाही आणि नंतर ब्रिटिश राजवटच अवतरली. जागतिक राजकारणात आपली नीती कोणती असावी, हे ठरविण्याची मतीच आपल्याला राहिली नव्हती. पण केवळ जागतिक राजकारणातच अशी स्थिती होती, असे नव्हे, तर देशांतर्गत स्थितीही तशीच होती. शाहूच्या मृत्यूनंतर अहिल्यादेवी शिवाय देशाचा एकसमयावच्छेदे विचार करण्याचा आवाका कुणामध्येच नव्हता आणि अर्थकारणावर तर कुणाचीच पकड उरली नव्हती. *यापार* स्वकीयांचे हातून परकीयांचे हाती गेल्यामुळे स्थानिक उत्पादनाचा वेग मंदावला होता. मुख्य म्हणजे देशी सैन्याचे विसर्जन १७९० ते १८३० या चाळीस वर्षात इतके झपाट्याने झाले की सैन्यासाठी नाना वस्तू पुरविणारे छोटेमोठे हातमागाचे, तांब्यापितळेचे, लोहारांचे, सुतारांचे उद्योग एकदम एकाएकी खंगू लागले. कोणत्याही समाजाची उत्पादनव्यवस्था ही त्या समाजाच्या संरक्षणव्यवस्थेशी एकजीव रीतीने जुळून गेलेली असते. त्यामुळे संरक्षणव्यवस्था कोसळताच उत्पादन व्यवस्थाही कोसळते. नेमके हेच १७६० ते १७९० या तीस वर्षांच्या कालखंडात येथे घडले. असे घडले म्हणजे राज्यकर्त्यांची देणी वाढतात; कर्ज फेडण्याची क्षमता कमी कमी होत जाते. नारायणराव पेशव्याला मारावयास गेलेले गारदी, 'आमच्या तनख्याची सोय करा,' अशी मागणी करीत करीतच तेथवर पोचले होते. तत्कालीन समाजात एक अहिल्यादेवी सोडली तर कुणीही राज्यकर्ता, हिंदु अथवा मुसलमान, समाजोपयोगी दानधर्माचा प्रपंच करू शकत नव्हता. अहिल्याबाईने माळव्यात लढाई दंगाधोपा होऊ दिला नाही, म्हणून हे जमले.



५-४-२३

### जुना संदर्भ, संबंध आणि सहारा गेला

पण एकूण उत्पादनव्यवस्था कोलमडून पडली होती. ईस्ट इंडिया कंपनीने या स्थितीचा फायदा उचलला आणि येथील कापूस मँचेस्टर–लिव्हरपूल या ठिकाणच्या गिरण्यांकडे पाठवावयास आरंभ केला. अमेरिकन वसाहतींनी ब्रिटिश सत्तेशी असहकार पुकारल्यानंतर तिकडील कापसाची आयात इंग्लंडमध्ये कमी झाली होती. इंग्लंडला कापसाची नवी बाजारपेठ हवीच होती. तसेच येथील शेतकरी ईस्ट इंडिया कंपनीला आपला कापूस विकायला उत्सुकही होता. १८६८–१८६९ साली निमा कापूस अमेरिकेतील व निमा आपल्या देशातील पिकलेला विलायतेच्या बाजारात खपला.[२१] पण याचा एक अत्यंत अनिष्ट असा परिणाम झाला; हिंदुस्थानातील हातमागाच्या उद्योगाला मूठमाती मिळाली. तोच एकमेव मोठा आणि सार्वत्रिक उद्योग येथे होता. कापडाची उत्पादनव्यवस्था बुडताक्षणी सुताराची, लोहाराची, विसाड्याची, धनगराची बाजू हळुहळू लंगडी पडत जाऊन देशातील विविध समाजगटांना एकत्र बांधून ठेवणाऱ्या अंतस्थ आर्थिक व्यवहाराचे अखेरीस कंबरडे मोडले. एका सूत्रात गुंफलेला मण्यांचा हार जसा ते सूत्र तुटताच ते मणी खळकन् निखळून इकडे तिकडे विखुरतात तसे संपूर्ण भारतीय समाजाचे होऊन गेले. जो तो समाज आपापल्यापुरतेच पाहू लागला. पण तो केवळ मतिभ्रम होता–ते सर्व समाज एकत्र बांधले होते तोपर्यंतच त्यांच्या अस्तित्वाला संदर्भ, संबंध आणि सहारा होती. आर्थिक गतिमानता ही या सामाजिक विविधतेतील एकतेतून उद्भवली होती आणि ही एकता उत्पादनगतीला चालना देत होती. ही साखळी ब्रिटिशांची राजवट येण्यापूर्वीच तुटली होती--ब्रिटिशांमुळे ही विविधता केवळ शासकीय पातळीवर पुन्हा एकवटली गेली. हेही एक नवेच वळण भारतीय समाजाला मिळू लागले होते. कारण, भारतीय समाजाची एकता आणि आर्थिक गतिमानता ही यापूर्वीच्या काळात कधीही चक्रवर्ती सम्राटावर वा केंद्रावर अवलंबून नव्हती. 'केंद्र सरकार' समाजातील घडामोडींचे नियंतेपण करू लागले याचा अर्थ भारतीय समाजाची मूळ संवर्धननीतीच काळाचे ओघात लुप्त झाली, असाच करावयास हवा.

## साठ वर्षांत शंभरपटींचा फरक !

त्यावेळच्या या स्थितीचा पडताळा पहावयाचा तर न्या. रानडे यांनी १८७२–७३ साली देशातील व्यापारासंबंधी केलेले विश्लेषण डोळ्याखाली घालता येईल. ते म्हणाले, "आपल्यास असे वाटते की पहिल्यापेक्षा आपल्या देशाचा बंदोबस्त चांगला आहे. ह्या घमेंडीत आपण निःशस्त्र झालो आहों ही गोष्ट विसरतो. ह्राच अनुभव सर्वत्र येत आहे. म्हणजे राज्यसत्तेच्या संबंधाने आपल्या स्वतःचा बचाव करण्यास जसे आपण निर्बळ, त्याप्रमाणेच व्यापार व व्यवहार यांच्या संबंधाने आपण आपले पोषण व आच्छादन करण्यासही असमर्थ झालो आहोत. ज्याप्रमाणे राज्यसत्तेच्या संबंधाने आपण परद्वीपस्थ लोकांचे दास झालो आहोत, त्याचप्रमाणे व्यवहाराच्या संबंधानेही आपण त्यांच्या दासांचे दास बनलो आहोत. एकंदरीत दिवसेंदिवस व्यवहारसंबंधाने पराधीनपणाची व निःसत्वपणाची दशा देशास प्राप्त होत आहे, ही गोष्ट अनिष्ट आहे, इष्टफलदायी नाही. यात दुसरा विचार असा आहे की, हा देश अगदी रानटी स्थितीत असता तर असली पराधीनताहि इष्ट झाली असती. परंतु ज्या पदार्थांच्या संबंधाने आपण आज इतके विलायतेवर अवलंबून राहत आहोत तेच पदार्थ उलटे आपल्या देशातून आज ३०–४० वर्षांपूर्वी विलायतेस जात होते, हा विचार मनात आणला म्हणजे आपण हल्लीची स्थिती बरी आहे असे मानून समाधान करून घेतो यात आपल्या मूर्खपणाची पराकाष्ठा होते. ह्याबद्दल मुंबई बंदराच्या व्यापाराची तपशिलवार हकीगत मिळाली नाही, परंतु कलकत्त्याबद्दल हकीकत तिकडील एका एतद्देशीय विद्वान गृहस्थाने छापली आहे. त्यावरून असे दिसून येते की, १८१३–१४ साली विलायतेहून ९,००,००० रुपयांचे कापड इकडे आले. तेच कापड १८७१–७२ साली ९॥ कोटी रुपयांचे आले. म्हणजे साठ वर्षात शंभरपटीने फरक पडला."[१५]

## नाणेटंचाईचा भस्मासूर उभा झाला

या साठ वर्षांतच आपल्या देशात नाणेक्रांती झाली. ही नाणेक्रांती व्हावयास ब्रिटिशांची राजवटच प्रामुख्याने कारणीभूत होती. ब्रिटिश येण्या-

पूर्वी इकडे तांब्याचा पैसा, चांदीचा रुपया आणि सोन्याची मोहर अशी तीन प्रकारची नाणी प्रचारात होती. सामान्य माणसांच्या रोजच्या व्यवहारात तांब्याचीच नाणी अधिक असत. मोगल येण्यापूर्वी तर सोन्याची मोहर आणि तांब्याचा पैसा अशी दोन प्रकारची नाणी होती. रुपयाचे नाणे शेरशहाने पक्के केले आणि नंतर अकबराने तेच चालू ठेवले. पण दक्षिणेत चांदीच्या रुपयाचे नाणे फारसे प्रचलित नव्हते. तिकडे सोन्याचेच नाणे होते. नाण्यांची टाकसाळ एकच एक अशी नव्हती. संपूर्ण देशात १८०० च्या सुमारास २०० टांकसाळी होत्या! अकबरी, जहांगिरी, शहाजहानी, आलमगिरी, सुरती मुर्शिदाबादी अशी सातआठ प्रकारची रुपयांची नाणी पाडली जात. साधारण-पणे या रुपयाचे वजन अकरा माशांचे असे. पण मोगलाईला उतरती कळा लागल्यानंतर रुपयाचा भार आणि चांदीची भर यातील प्रमाणात भेसळ फार होऊ लागली. तसेच, जवळ जवळ प्रत्येक जिल्ह्यागणिक वेगवेगळे नाणे असा प्रकार प्रत्यक्षात झाला होता. ईस्ट इंडिया कंपनीने १७९३ साली या नाणे-गोंधळाला आवर घालण्याचा पहिला प्रयत्न केला. मुर्शिदाबादी रुपया बंगाल, बिहार आणि ओरिसा या तीन प्रांतात चलन म्हणून स्वीकारला होता. पण तरीही व्यापारी आपापल्या भागातील शिक्के ( रुपये ) घेऊन येत. त्यामुळे रुपयाचा भार आणि त्यातील चांदीची भर यांचे निश्चित प्रमाण ठरवून देणे आवश्यक होते. ही गरज लक्षात घेऊन कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाने १८०६ साली, तोळाभर वजनाचा पण अकरामासे चांदीचा रुपया कंपनीने पाडावा, अशी भूमिका घेतली. ही भूमिका घेण्याचे एक कारण हे, की नाण्याचे वजन आणि वजनाचे प्रमाण यांचा एकजीव संबंध इकडे होता. ८० तोळ्यांचा शेर असे-त्याचेशी ब्रिटिश वजनांचा मेळ घालण्यासाठी १०० पौंडाचा एक मण असे प्रमाण ठरवून देण्यात आले. शिवाय रूढ असलेल्या रुपयाच्या वजनाशी हे प्रमाण जुळते मिळते होते. पण याबरोबरच डायरेक्टर बोर्डाने, 'हिंदुस्थानात फक्त चांदीचेच नाणे चलन म्हणून स्वीकारले जाईल,' अशी स्पष्ट भूमिका घेतली. सोन्याचे आणि चांदीचे अशी दोन्ही नाणी चालू ठेवण्यातील अनुभव काही चांगला नव्हता. उदाहरणार्थ, मुंबईच्या बाजारात कंपनीने सुरती रुपया चलन म्हणून मान्य केले होते. त्याचे प्रमाण मोहरेशी १५ रुपयांस एक मोहर असे होते. पण पुढे सुरतेच्या नबाबाने रुपयातील

चांदीची भर दहाबारा टक्क्याने घटविली. परिणाम हा झाला की, कंपनीच्या टाकसाळीतील रुपया गडप झाला. मद्रासमध्ये निराळाच प्रकार झाला. तेथे ३५० रुपयांना १०० पगोदे असा चांदी–सोन्याचा मेळ घालण्यात आला. परिणाम, पगोदे गडप झाले. या प्रकाराला विटून कंपनीने फक्त चांदीचेच चलन अशी भूमिका १८३५ साली घेतली. पण चांदीचे उत्पादनच पुढील पंचवीस वर्षात जगात घटले आणि भारतात नाण्याचीच टंचाई निर्माण झाली.

## या नाणेक्रांतीने सगळ्यांनाच नागवले

तरी अशी स्थिती आली की, १८५५ च्या सुमारास जगांत एका वर्षाचे चांदीचे जेवढे उत्पादन तेवढे सगळेच्यासगळे भारतानेच खरीदले! खरे म्हणजे, ब्रिटिशांना किंवा अन्य युरोपीयांना या भूमीवर पाय ठेवायला जागा मिळण्यापूर्वी भारतातील मालाला प्रत्यक्ष सोने किंवा चांदी देऊनच युरोपातील व्यापारी व्यवहार करू शकत. त्यामुळे सोन्या–चांदीची कमतरता कधीच भासली नाही. पण ईस्ट इंडिया कंपनी इथे स्थिरावल्यावर ती इथल्याच चलनात माल खरेदी करायला लागली आणि सोन्याचांदीचा भारताकडील ओघ एकदम थांबला. शिवाय, १८४१ ते १८५२ या दहा बारा वर्षांच्या काळात 'सोने देऊन रुपे घ्या' असा प्रकार मोठया प्रमाणावर घडला. कारण, सोन्याचे भाव घसरले आणि चांदीचे वाढले. म्हणून लोकांनी आपल्या जवळच्या सोन्याच्या मोहर टाकसाळीत नेऊन भरल्या आणि त्याच्या मोबदल्यात रुपयाची नाणी घेतली हिंदुस्थानातले सगळे सोने या काळात धुतले गेले. १८३५ ते १८५५ या वीस वर्षात हिंदुस्थानातील गरीब आणि श्रीमंत असे दोघेही या नाणे क्रांतीमुळे पुरते नागवले. १८५७ साली बडाचा वणवा पेटावयास ही आर्थिक मंदाधुंदीही कारणीभूत होती. त्यामुळेच, बंडाचा उपशम झाल्यावर लागलीच, १८६१ साली, 'कागदी नोटां'चे चलन भारत सरकारने सुरू केले. १८३३ साली हिंदुस्थानातील आपल्या ताब्यातील सर्व प्रदेशांचे एकमुखी देशव्यापी शासन ब्रिटिश पार्लमेण्टने निर्माण केल्यामुळेच देशभर ज्याची वट आहे असे चलन निर्माण झाले. कंपनीने स्वतःच्या नावाचा आणि छापाचा

रुपया प्रथम १८३५ साली काढला. १८३५ साली एक खास कायदा करून हे घडविण्यात आले. या कायद्याने जेवढे उत्पात आणि उद्रेक घडविले तेवढे अन्य कोणत्याही कायद्याने घडले नाहीत. १८५७ च्या सैनिकी उठावास लोकांचा जो प्रचंड प्रतिसाद मिळाला त्यास अशा रीतीने १८३५ सालचा हा नाणे कायदाच मुख्यतः कारण ठरला."

## विद्या याचा अर्थ दंडविद्याच !

ब्रिटिशांचे हिंदुस्थानातील आगमन हे असे संपूर्ण भारतीय लोकव्यवस्था उखडून टाकणारे ठरले. भारतीय समाजाच्या पोटात चाललेले उत्पात आणि उद्रेक तत्कालीन समाजधुरीणांना दिसले नाहीत. हे जरी खरे, तरी ते दिसले असते तरी निराळे काय घडले असते, हा प्रश्नच होय. कारण, ईस्ट इंडिया कंपनीच्या योगाने भारतीय अर्थकारणाचा जागतिक लोकजीवनाशी सांधा जुळला होता. जगातच व्यापार व्यवहारातील जुने समतोल मोडून टाकण्यासाठी राज्यक्रांत्या होऊ लागल्या होत्या. अमेरिकन आणि भारतीय बाजारपेठा इंग्लंडच्या माध्यमातून परस्परांशी बांधल्या जात होत्या. नाणेक्रांती केवळ भारतातच झाली, असे नव्हे. त्याचवेळी ती सर्व जगभर झाली. संपूर्ण मानव जातीला एकाच वेळी गवसणी घालणारे अर्थप्रवाह निर्माण झाले होते. १८३०–३५ च्या सुमारासच बाष्पयंत्रावर चालणारी यंत्रसामुग्री जीवनाच्या सर्व क्षेत्रात आली होती आणि नौकानयनापासून कापडउत्पादनापर्यंत अनेक क्षेत्रात या यंत्रसामुग्रीने नवे चैतन्य निर्माण केले होते. पैसा उद्योगात गुंतविण्याचे--पैशाचे भांडवलात रूपांतर करण्याचे–नवे अर्थयुग उदयाला येत होते. ईस्ट इंडिया कंपनीमुळे भारतात बाष्पयंत्रावर चालणारी आगगाडी १८५५ सालीच आली. म्हणजे, वैज्ञानिक प्रगतीच्या संदर्भात भारत युरोप--अमेरिकेचा समकालीन ठरला. हा असा पन्नास वर्षांचा ( १८०० ते १८५० ) काळ जिवंतपणे ज्यांच्या मनःचक्षुसमोर उभा होता अशा महात्मा जोतिबा गोविंदराव फुले यांनी आपल्या 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथाच्या प्रस्तावनेतील पहिल्याच वाक्यात या कालखंडाचे यथार्थ दर्शन घडविले आहे. ते म्हणतात, 'विद्येविना मति गेली; मतिविना नीति गेली; नीतिविना गति गेली; गतिविना वित्त गेले; वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.' विद्या

याचा अर्थ दंडविद्याच. एकदा का हा अर्थ समजला की मग संपूर्ण वाक्यातील प्रत्येक पदाचा अर्थ स्पष्ट होतो. हे वाक्य कांही केवळ 'खिळ्यासाठी नाल गेला, नालासाठी घोडा गेला आणि घोड्यासाठी स्वार गेला, इतका अनर्थ एका खिळ्याने केला, या जुन्या म्हणीचा बाज घेऊन आलेले नाही.[२६] या वाक्यात भारतीय समाजाची पूर्वापार चालत आलेली समाजनियमनाची आणि समाज-संवर्धनाची दंडविद्या लुप्त झाल्यामुळे नेमके काय घडले याचे सूत्रबद्ध आणि सुसंबद्ध विवेचन आहे.

## 'अहो, ती अदालत मागे लागली आहे ना !'

भारतीय समाजाची मूळ राजकीय बांधणी इंग्रजी राजवटीतच कां नष्ट झाली, हा महत्वाचा प्रश्न आहे. कारण, यापूर्वी हजारो वर्षे ती बांधणी अबाधित राहिली होती. चक्रवर्ती राजा कोणीही असो, स्वकीय वा परकीय असो, समाजाची राजकीय स्वायत्तता कधीही मोडीत निघाली नव्हती; पण कंपनी सरकारने ती मोडूनच टाकली. आपली स्वायत्तता टिकविता येत नाही ही जाणीव लोकांना तात्काळ झाली होती. पेंढाऱ्यांचे पेव फुटावयास खेड्यातील सत्तेचे उच्चाटनच कारणीभूत झाले होते. बडोद्याचे राजे सयाजीराव यांनी गुजराथमधील दरोडेखोरीमुळे झालेले नुकसान पूर्ण भरून दिले पाहिजे आणि शांततारक्षणासाठी जे जास्तीचे सैन्य उभे करावे लागणार त्याचा पूर्ण खर्च बडोदा राज्यास करावा लागेल, अशी सूचना 'ज्युडिशियल कमिशनर'ने १८३४ साली केला.[२७] त्यास उत्तर देताना सयाजीरावाने म्हटले, 'दरोडयांचे प्रमाण वाढले यास ब्रिटिश न्यायपद्धतीच जबाबदार आहे. पुराव्याचे स्तोम तुमच्या पद्धतीत फार आहे आणि त्यामुळे देरदिरंगाईच अधिक होते. ब्रिटिश कायदेकानूंची माहिती झाल्यामुळेच येथील गुन्हेगारांवर माझ्या सरकारचा वचक राहिलेला नाही. 'ज्या दरोडेखोरांना प्रत्यक्ष दरोडे घालताना पकडले आहे त्यांच्याविरुद्धची प्रकरणे अजूनही ब्रिटिश कोर्टातच पडून आहेत. गुन्ह्यांचे आरोप त्यामुळे खोटे वाटू लागतात आणि चोरीमारीला मोकळे रान मिळते तरीही गुन्ह्यांची खबर मिळताच आमचे अधिकारी लागलीच तपास करतात आणि जरूर तेथे नुकसानभरपाई देतात.' पुरेसा पुरावा नाही, या कारणास्तव गुन्हेगारांची सुटका होते, हे लक्षात येताच खोटे साक्षीदार आणि त्यांना

पोसणारे वकील यांचा सुकाळ झाला. खुनी माणसांना कोर्टाच्या पिंजऱ्यातून सहीसलामत बाहेर काढणारे आणि तेही हुकमीपणाने बाहेर काढणारे वकील समाजात प्रतिष्ठा पावू लागले. ब्रिटिश न्यायदानपद्धतीचा लोकांनी धसकाच घेतला होता. वायव्य सरहद्द प्रांतातील एक गाव ब्रिटिशांनी काबीज केल्या-नंतर त्या गावातील सगळेच्या सगळे लोक पाय घेऊन पळू लागले, असे सांगून माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन एक गोष्ट नेहमी सांगे : त्या पळणाऱ्यांना विचारले तर ते सांगत, 'अहो, ती अदालत मागे लागली आहे ना!' ग्रामपंचायतींचा न्यायदानाचा अधिकार काढून घेताक्षणी संपूर्ण स्थानिक राजकीय व्यवस्थाच कोलमडून पडली. महाराष्ट्रात त्या मानाने हे जरा उशिरा घडले—उशिरा म्हणजे अवघ्या तीस वर्षांनी. बंगाल--बिहारमध्ये जे १७७३ साली घडले ते महाराष्ट्रात १८१७ साली झाले, इतकेच.

## 'छत्रपतींचा एवढा मान प्रथमच राखला जातो आहे'

जे घडले ते कसे घडले, हे सांगायलाच हवे. बडोद्याचे गायकवाड, आणि पुण्याचे पेशवे यांच्यामध्ये एका परगण्याच्या हक्कासंबंधी जुनेच भांडण होते. ते मिटविण्यासाठी बडोद्याच्या गायकवाडांनी गंगाधर शास्त्री नामक ब्राह्मणास पेशवे दरबारी बोलणी करण्यासाठी आपला वकील म्हणून पाठविला त्यास पुण्यात आल्यावर आपल्या जिवास अपाय होऊ शकतो याची कल्पना आली म्हणून त्याने तत्कालीन ब्रिटिश रेसिडेंट माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याचेकडे मदत मागितली. एल्फिन्स्टनने त्यास ब्रिटिश हद्दीत राहावयास जागा दिली आणि संरक्षणही दिले. तरीही १५ सप्टेंबर १८१५ रोजी गंगाधर शास्त्र्यांचा खून झाला. बाजीरावाचा मंत्री त्रिंबकजी डेंगळे यानेच खून केला होता. म्हणून एल्फिन्स्टन याने बाजीरावाकडे डेंगळे याची मागणी केली. बाजीरावाने प्रथम जरी बरेच आढेवेढे घेतले तरी अखेरीस डेंगळेला त्याने इंग्रजांच्या स्वाधीन केले. त्यास ठाण्याच्या किल्ल्यात कैदेत ठेवण्यात आले. एका वर्षाच्या आत तटाला खिंडार पाडून डेंगळे तेथून निसटला, तेव्हा एल्फिन्स्टनने बाजीरावाकडे निर्वाणीचा खलिता पाठविला. त्यात पुरंदर, रायगड, सिंहगड हे किल्ले आणि त्रिंबकजी डेंगळे यास परत मागितले. तेवढ्यात कलकत्त्याहूनही खलिता आला. त्यांत बाजीरावाने आपल्या दरबारात

कोणाचा वकील ठेवू नये आणि कुणाच्या दरबारात आपला वकील पाठवू नये आणि शिवाय, त्रिंबकजी डेंगळेचा गुन्हा मान्य करावा, अशी निकराची मागणी केली होती. हा खलिता १३ जून १८१७ रोजी बाजीरावाला दिला गेला.

पण तेवढ्यात एक निराळाच व्यूह उत्तरेत रचला गेला होता आणि शिंदे-होळकर-भोसले यांचा कायम बंदोबस्त करण्यासाठी सर थॉमस हिस्लॉप यांच्या आधिपत्याखाली सैन्य उभारले गेले. जॉन माल्कम यास हिंदुस्थानातील इंग्रज वकीलांच्या भेटीगाठी घेऊन सल्लामसलत करण्याचे काम देण्यात आले. त्या अधिकारात माल्कम पुण्यात आला. एल्फिन्स्टनशी चर्चा झाल्यावरही बाजीरावाविषयी तो सहानुभूतीनेच विचार करीत राहिला. अर्थात् एल्फिन्स्टनला ते पटत नव्हते पण माल्कम म्हणेल तेच प्रमाण असे ठरले असल्यामुळे त्याने नमते घेतले. माल्कमने बाजीरावास पेंढाऱ्यांचा बंदोबस्त करता यावा यासाठी २५००० घोडदळ उभे करावयास सांगितले आणि जन. स्मिथच्या नेतृत्वाखालील ब्रिटिश फौजेला नागपूरकडे कूच करण्याचे आदेश दिले. तरीही एल्फिन्स्टन गप्पच राहिला. पुढे तीनच महिन्यात बाजीरावावर आपण विश्वास ठेवतो, हे कसे चुकले हे सांगण्यासाठी म्हणून एल्फिन्स्टनने गव्हर्नर जनरलला पत्र पाठविले की, 'सर माल्कम यांनी दिलेल्या आदेशाचेच मी पालन करतो आहे, असे बाजीराव सांगतो, हे खरे. पण माल्कम यांनी सांगितले त्यापेक्षा दुप्पट फौज त्याने गोळा केली आहे. तसेच, पेंढाऱ्यांचा बंदोबस्त करण्याशिवाय इतरही बाबीत लक्ष घातले आहे. साताऱ्च्या छत्रपतींशी त्याने सलोख्याचे संबंध प्रस्थापित केले आहेत. छत्रपतीचा एवढा मान, पेशव्यांची गादी तयार झाल्यानंतर, प्रथमच राखला जातो आहे.'

## 'राजास शाळकरी मुलासारखा आनंद झाला'

यानंतर १९ ऑक्टोबर १८१७ रोजी दसरा होता. त्यादिवशी बाजीराव आणि एल्फिन्स्टन हे दोघेही पुण्यातील उत्सवात उपस्थित होते. बाजीरावाने दहा हजार घोडेस्वारांचे शहरभर सैनिकी संचलन केले—

एल्फिन्स्टनला धाक निर्माण करणे एवढाच उद्देश त्यामागे होता. नंतर दुसऱ्या दिवसापासून हळुहळू पुण्यातील फौजेचो संख्या वाढतच गेली. २८ ऑक्टोबरला सर्व सरदारांनी बाजीरावाच्या मागे लकडा लावला की, ब्रिटिश रेसिडेन्सीवर आजच हल्ला करा. रात्रभर बाजीरावाची खलबतेच झाली—एल्फिन्स्टनने सावध होऊन आपले सैन्य नदीपलिकडे खडकीला हलवले. पण तो स्वतः मात्र रेसिडेन्सीतच राहिला. सहा नोव्हेम्बर रोजी अखेरीस बाजीरावाने निर्वाणीचा खलिता पाठविला की, तुमचे सैन्य परत रेसिडेन्सीत आणा! एल्फिन्स्टनने चक्क नकार दिला. म्हणून बाजीरावाने रेसिडेन्सीवर हल्ला करून ती पेटवून दिली. एल्फिन्स्टन कसाबसा तेथून निसटला. बाजीरावाने त्यास गाठण्याचा प्रयत्न केला. यावेळी बाजीरावाजवळ १८००० घोडेस्वार आणि ८००० पायदळ होते आणि एल्फिन्स्टनजवळ अवघे ३००० स्वार होते. पण खडकीच्या लढाईत बाजीरावच हटला! तो तेथून पुणे सोडून दक्षिणेत पळाला. मात्र या लढाईने इंग्रजांचा धाक पुन्हा एकदा बसला. पुढे आष्टीच्या लढाईत बापू गोखले कामी आला. त्याच्या अंतामुळे पेशवाईचे रक्षण करण्याची कुवत वा करामत कुणातच राहिली नाही. बापू गोखले हा बाजीरावाच्या कुठल्याही दुष्कृत्यात कधीच सामील झालेला नव्हता, म्हणून इंग्रज सेनापती जन स्मिथ यांचे त्याजविषयी फार चांगले मत होते. म्हणून तो हळहळला. पण बापू गोखले याच्या कुटुंबास तर आपला पती धारातीर्थी पतन पावला, हे खरेच वाटेना. ती बाई ही बातमी खोटी म्हणे आणि आपल्या पतीने घरी परत यावे म्हणून तुळशीला ऊन पाणी व उलट्या प्रदक्षिणा घाली. ती सोवळी झाली नाही, असे एका ग्रंथकाराने लिहून ठेविले आहे. या लढाईत आपला बचाव झाला यातच धन्यता मानणारा सातारचा अल्पवयीन राजा प्रतापसिंग जन.स्मिथच्या हाती पडताच त्याने एल्फिन्स्टनला बोलावणे पाठवले. एल्फिन्स्टनला गव्हर्नर जनरलकडून मराठ्यांविषयी सर्वाधिकार मिळालेले होते आणि सातारची गादी सार्वभौम म्हणून कायम ठेवायची की नष्ट करायची हा निर्णय एल्फिन्स्टनच्याच हाती होता. एल्फिन्स्टनने सातारचा किल्ला ताब्यात येताच त्यावर अर्धा घटका युनियन जॅक फडकविला आणि मग तो उतरवून पुन्हा सातारचा ध्वज फडकवला. प्रतापसिंग राजाची स्वारी ज्यावेळी मोठ्या डामडौलाने साताऱ्यात आली तेव्हा

" राजास शाळकरी मुलासारखा आनंद झाला. " पुढे १० एप्रिल १८१८ रोजी एल्फिन्स्टनने प्रतापसिंग महाराजास मोठ्या समारंभाने सिंहासनावर बसविले आणि राज्यकारभार चालविण्याकरिता ग्रँट डफ यास मुखत्यार केले.[२८]

## सगळा प्रताप या सातारच्या जाहीरनाम्याचा ?

या घटनेचा तत्कालीन समाजावर काय परिणाम झाला, याचे सविस्तर वर्णन एल्फिन्स्टनच्या रोजनिशीत आढळते. तो म्हणतो, " शेतीभाती करणाऱ्या एकंदर लोकांच्या मनाचा कल पाहिला तर तो शांतता व्हावं इकडे फार आहे. लढाई सुरू झाली किंवा लुटारू लोकांच्या टोळ्या फिरू लागल्या तर प्रथम त्यांचे नुकसान होत असते. मराठ्यांच्या स्वातंत्र्याचा त्यांना केवढा जरी अभिमान असला तरी पेशवे पुनः गादीवर केव्हा येतील अशी ते मनापासून वाट पाहणार नाहीत. कारण ब्राह्मणी राज्यात त्यांच्यावर काही कृपा नव्हती. खरे म्हणजे ब्राह्मणांचे पालनपोषण करणे हा पेशवे सरकारचा एक मुख्य उद्देशच होता."[२९]

एल्फिन्स्टनने सातारच्या छत्रपतींची गादी राखली पण पुण्याची पेशवाई बुडविली. ब्राह्मण आणि मराठे यांच्या आपसातील संबंधाचे बारकावे लक्षात घेऊन ही पाचर ठोकण्याचे कपट रचण्याचीच एल्फिन्स्टनची बुद्धी होती, यात शंका नाही, अर्थात् या कपटाची भरपाई त्याने सर्व ब्राह्मण वतनदारांची आणि इनामदारांची हक्कराखणी करून नंतर करून दिली. एल्फिन्स्टनचा सातारचा जाहीरनामा हाच महाराष्ट्राच्या आधुनिक कालखंडातील सामाजिक ताणतणावांचे मूळ आहे.[३०] छत्रपतींची गादी राखली आणि गावोगावचे जमीन-दार वतनदार कायम ठेवले; मधली पेशव्यांची सत्ता तेवढी उध्वस्त केली. मध्यप्रांतातील जो मराठी प्रांत (नागपूर) याचवेळी सर माल्कम याने ताब्यात घेतला. तेथे त्याने भोसल्यांचे सार्वभौमत्व नष्ट करून " सब घोडे बारा टके " या न्यायाने भोसल्यांसकट सर्व सरदारदरकदारांना शोभेची वस्त्रे देवविली आणि मालगुजारी प्रथा, बंगालबिहारप्रमाणे, कायम केली. एल्फिन्स्टन याने सर थॉमस मन्रोचे अनुकरण करून रयतवारी पद्धती आणली. संपूर्ण हिंदुस्था-नात मराठी भाषिकांचा प्रदेश हाच एक असा प्रदेश आहे की, माल्कम, मन्रो

आणि एल्फिन्स्टन या वेलस्लीच्या तिन्ही शिष्यांनी लावून दिलेली सारापद्धती येथे आहे. विदर्भ-नागपूरवर माल्कमची छाप, मराठवाड्यावर मन्रोची छाप आणि कोकण-महाराष्ट्रावर एल्फिन्स्टनची छाप महसूलखात्याच्या ध्येयधोरणांवर अजूनही दिसते. दक्षिणेत पेशव्यांचीच सत्ता होती, ती गेली आणि साताऱ्च्या छत्रपतीचा अंमल ५००० चौरस मैलापेक्षा जास्त नव्हता. एल्फिन्स्टन आणि मन्रो यांच्या महसूलव्यवस्थेच्या पोटातच पुढील सामाजिक ताणतणावांची बीजे होती, यात शंका नाही. या दोघांचीही अशी धारणा होती की, येथील प्रत्येक समाज घटकास आपणच पोटाशी धरले पाहिजे. त्यामुळे येथील जातीजमाती आपसातील संतुलन राखण्यासाठी हळुहळू परकीय शक्तीचा आश्रय घेऊ लागल्या. प्रत्येक प्रांतातील अल्पसंख्य जातीजमाती आजमितीस, केंद्र सरकार हेच आपले खरे रक्षणकर्ते होय, अशा भूमिकेतून वावरताना दिसतात. या लोकभावनेचे मूळ ब्रिटिशांनी येथे आणलेल्या नवीन महसूल व्यवस्थेतच आहे. साताऱ्च्या जाहीरनाम्यात, 'जुनी शेती व्यवस्था रद्द करीत आहोत,' असे स्पष्ट शब्द आहेत. या नवीन महसूल व्यवस्थेने तत्कालीन परिस्थितीत शेतकरी वर्गाला पूर्णपणे कंगाल करून टाकले. शेती उत्पन्नाचा तिसरा हिस्सा सारा म्हणून सक्तीने वसूल होऊ लागला. लोकांमधील या असंतोषाची जाणीव एल्फिन्स्टनला चांगलीच असली पाहिजे. कारण, लोकांमध्ये कोठे काही बेदिली उत्पन्न होईल, फंदफितूर होईल तर त्याचा बंदोबस्त करता यावा म्हणून मुलुखभर हेर फिरते ठेवून गुप्तपणे बातमी काढावी, अशी जी वहिवाट मराठशाहीत होती ती एल्फिन्स्टनने मुलुखाचा बंदोबस्त राखण्यासाठी आवश्यक म्हणून कायम ठेवली होती. पूर्वी पेशवाईत हत्यारबंद लोक देशभर फिरत. परंतु आता त्यांना तसे करू देणे हिताचे नाही असे वाटून एल्फिन्स्टनने परवान्याशिवाय हत्यार बाळगता येणार नाही आणि ज्यांच्याजवळ परवाने नसतील त्यांची हत्यारे काढून घ्यावी असे हुकूम काढले. पुढे एका वर्षाने लोकांची ओरड वाढली की मराठ्यांचे निःशस्त्रीकरण सुरू झाले आहे. तेव्हा तसा हेतू नसल्याचे सिद्ध करण्यासाठी पंचवीस हत्यारबंदी विनापरवाना फिरू शकतील, अशी त्याने नियमात सुधारणा केली.[११]

पेशवाई बुडाली तेव्हा पुण्यात दारूचे एकही दुकान नव्हते आणि

पेशवाईच्या क्षेत्रात दारूची दुकाने घालवयास बंदी होती. ते पाहून एल्फिन्स्टन संतोषला होता. तो म्हणतो, "दारूबाजी हे विशेषतः हलक्या लोकांचे व्यसन, हे साऱ्या महाराष्ट्राला माहित नसल्यासारखेच आहे. यामुळे हा देश जुन्या प्रांतांपेक्षा अधिक नीतिमान आहे, ही गोष्ट अगदी निर्विवाद. याचे कारण मादक दारू विकण्याची बंदी हेच होय."[१२]

## स्वराज्याचे पाईक म्हणजे कोण ?

पण एकंदरीत पाहता पेशवाईत लोकांची स्थिती फारशी चांगली नसावी, यास एक पुरावा आहे. बाजीरावाच्या फौजेत चाकरी करीत असलेले शिपाई तिकडून सुटल्याबरोबर लागलीच कंपनीच्या नोकरीस राहात. कित्येक ठिकाणी तर असे झाले की, पेशवा आपला धनी नव्हे, असे ठरल्यापासून आठ प्रहरांच्या आत कंपनीचा दारूगोळा घेऊन ते बाजीरावावर बंदूक झाडण्यास जाऊ लागले. लोकांमधील दैन्याचा, दारिद्र्याचा आणखी स्वतंत्र पुरावा तो काय हवा ? 'अभावे स्वभाव जाय' अशी एक बंगाली म्हण आहे. तिचाच प्रत्यय पेशवाईच्या उत्तरार्धात, इंग्रजांशी अटीतटीची लढाई चालू असताना, येत होता. नवीन महसूल व्यवस्थेने त्यात भरच घातली. एका ठिकाणी एल्फिन्स्टनलाच, तो मुंबईचा गव्हर्नर झाल्यावर, असा अनुभव आला की, गावकऱ्यांनी एका निवेदनात म्हटले, "हे नवे महसूल अधिकारी आपल्याला तात्काळ वरची जागा मिळावी म्हणून मोठ्या जुलुमाने जास्तीत जास्त महसूल गोळा करण्याच्या मागे लागले आहेत आणि म्हणूनच आमचे हाल दिवसेंदिवस वाढत आहेत."

माल्कम, मन्रो, एल्फिन्स्टन या त्रयीने महसुलाची नवीन व्यवस्था लावून दिली खरी, पण ती व्यवस्था येथील मूळ व्यवस्थेशी पूर्णतया विसंगत होती. महाराष्ट्रात काय किंवा ओरिसात काय, कुठेही गेलात तरी जमिनीचे चौदाचौदा एकरांचे क्षेत्र चार जणांना वाटून दिलेले असे, त्यास पाईक म्हणत. त्यापैकी एका तुकड्याचा धनी सदैव सैन्यात दाखल असे (आलटून पालटून) आणि हे सैन्य खडे ठेवण्याची जबाबदारी देशमुखाची असे. मनसब ही अशी खड्या सैन्याच्या संख्येत मोजली जाई. हजारी, पंचहजारी, दस

हजारी अशी नावे मोगलकाळात पडली होती. आसाममध्ये अहोमांचे राज्य होते. तेथेही हीच पद्धत होती, उदा. सायकिया ( शंभर स्वारांचा मुखिया ), हजारिका ( हजारांचा मुखिया ). या व्यवस्थेला – शेती आणि संरक्षण यांच्या एका संयुक्त उत्पादन घटकाला–पाईक म्हणत; म्हणून ती 'पाईकी' धारण करणारेही पाईकच ठरले. 'स्वराज्याचे पाईक' असा शब्दप्रयोग आहे–हे देशमुख म्हणजे 'स्वल्पच परंतु स्वतंत्र देशनायकच आहेत,' असे शिवछत्रपतींचे सांगणे होते. ही शेतीची व्यवस्था एल्फिन्स्टनने नष्ट केली. बारा बलुतेदारांचेही असेच विसर्जन झाले. ब्राह्मण हा या बारांपैकीच एक बलुतेदार होता; पण शेतीची व्यवस्था बदलताच ब्राह्मणापासून महारापर्यंत सर्वांचीच धाबी दणाणली आणि ते अन्य उद्योग व्यवसायांच्या शोधात फिरू लागले.

## लोकभावना साशंक आणि सावध झाली

ज्यांच्याकडे जुन्या मिराशी होत्या, त्यांनाही त्यांचा कारभार चालविणे जड जाऊ लागले. मुख्य कारण हे की, १७९० सालापासून १८१० सालापर्यंत महाराष्ट्रात सारखे दुष्काळच पडत होते. खानदेशमधील १८०६ सालचा दुष्काळ इतका भयाण होता की पुढील दहा वर्षांत तेथील शेतकरी काही त्यावेळच्या कर्जातून बाहेर पडला नाही. ह्या दुष्काळामुळे भिल्लांच्या टोळ्याच्या टोळ्या निर्माण झाल्या आणि त्या राजरोस दरोडे घालून लूटमार करीत. १८१० ते १८६० या पन्नास वर्षांत तंट्या भिल्ल आणि राघू भांगरे असे दोन मोठे दरोडेखोर उभ्या महाराष्ट्रात मोठीच दहशत बसवून गेले. अनेक मिरासदारांचा त्या दोघांना छुपा पाठिंबा होता. आणि लोकांमध्येही त्यांच्याविषयी एकाच वेळी आदराचा आणि भीतीचा भावसंयोग झाला होता. संपत्तीचा कोणीच भरवसा देऊ शकत नसल्यामुळे पाच-दहा वर्षांत जमेल तेवढे कमवायचे आणि लग्नादि समारंभात बारेमाप खर्च करून ते सगळे उडवायचे, अशी रीत पडली, असे एल्फिन्स्टन एके ठिकाणी म्हणतो. या काळात मराठी समाजातील सर्व संपत्तीचा क्षय झाल्यामुळे आणि व्यापारउदीम हा सर्वस्वी मराठेतर समाजाकडेच गेल्यामुळे संपत्तीची लूट करणारा शूरवीर आणि लोकप्रिय ठरत असावा.[११] ज्ञानकोशकार डॉ. केतकर म्हणतात त्याप्रमाणे, "महाराष्ट्रात कुळवंत, कायर, कुडाळ आणि पाटणे यांसारख्या अल्पसंख्यांक

वाणी जाती सोडून दिल्या तर असे दिसून येईल की महाराष्ट्रातील व्यापारी जाती परक्याच आहेत. महाराष्ट्राचे व्यापारी दळणवळण परक्यांमार्फत चाललेले आहे. गुजराती, लिंगायत आणि मारवाडी हाच महाराष्ट्रातील व्यापारी वर्ग बनला आहे. कोकणात स्थानिक वाण्यांचे अस्तित्व आहे पण देशावर जें कुटुंब वाणी होते ते आज मराठे झाले आहेत. यास प्रत्यक्ष तुकारामाच्या वंशाचे उदाहरण आहे. कुणंब वाण्याची जात आज जवळजवळ नष्ट झाली आहे. पुणे जिल्ह्यात, विशेषेकरून सासवड तालुक्यात, जे महाराष्ट्रीय आपणास वाणी म्हणवीत त्यांचेच भाईबंद आज आपणास मराठे म्हणवीत आहेत व काही माळ्यात मोडत आहेत. अशी आपणास हवी तितकी उदाहरणे देता येतील.[३४] पेशवाईत आणि मराठशाहीत निदान या परकी व्यापारी वर्गावर मराठी लोकांच्या सोयीसवलतींचा थोडासा तरी प्रभाव असे; पण कंपनीच्या काळात कंपनीचे अधिकारी सांभाळले की संपले! त्यामुळेही लोकभावना सरकारी अधिकाऱ्यांच्या विषयीं साशंक आणि सावध झाली होती.

## 'जोती म्हणे धाव घेई। दुष्टापासूनी सोडवी'

आणि लोकमनाची अशी नाजूक स्थिती असताना कारभारातील अफाट खर्चाला काट लावण्यासाठी युरोपीय 'कामगारा'च्या जागेवर 'देशी' कामगार नेमण्याचे धोरण कंपनीने स्वीकारले. तसा कायदा ब्रिटिश पार्लमेंटने १८५३ सालीच मंजूर केला होता. पण त्याची अंमलबजावणी होईपर्यंत १८७० साल उजाडले. इंडियन सिव्हिल सर्विसेसच्या श्रेष्ठ पदावर युरोपीयांच्या तुलनेत निम्म्या पगारावर, देशी 'बाबू'ची वर्णी लावायचे ठरले. त्यासरशी प्रथम बंगाली भाषिकांचा फार मोठा लोंढा सरकारातील सर्वोच्च जागांवर लागलीच कब्जा करून बसला. महाराष्ट्रात एल्फिन्स्टनने १८२१ साली 'पूना कॉलेज' काढायला ५००० पौंडाचे दान दिले. वास्तविक, त्याची इच्छा दोन महाविद्यालये काढावीत, अशी होती. पण ते पैशाअभावी जमले नाही. म्हणून त्याने एकच 'कॉलेज' काढले. या कॉलेजात १५ आणे विद्यार्थी ब्राह्मण. कारण, विद्येची परंपरा त्यांच्याकडेच होती. त्यामुळे १८७० साली जेव्हा ज्येष्ठ नोकऱ्यांचे भारतीयीकरण सुरू झाले तेव्हा त्यात भरती

करावयाला महाराष्ट्रात ब्राह्मणाशिवाय कुणी सापडेना. बंगाली किंवा तमीळ-लोकांमध्येही ब्राह्मणच बहुसंख्येने शिकून पुढे येत. त्यामुळे इंग्रजाच्या हातची सत्ता ब्राह्मणांच्या हाती परतून येत आहे, अशी धारणा निर्माण झाली. एकीकडे पाहिले तर १८५० ते ७५ या पंचवीस वर्षात दुष्काळाच्या कहारात ५०.लाख लोक बळी पडले आणि दुसरीकडे पाहिले तर अधिकाराच्या आणि मानाच्या जागा सगळ्याच्या सगळ्या ब्राह्मणवर्गाकडेच गहाण पडताहेत, असे दृश्य लोकांना दिसत होते. पुणे शहरात तर हे चित्र विशेषच ठळक दिसे. कारण, पेशवाईच्या काळात ब्राह्मणांची राज्यकारभारात जी मक्तेदारी निर्माण झाली होती ती पुढे ब्रिटिश राजवटीतही कायमच राहिली. या पुणे शहरातच लहानाचे मोठे झालेले जोतिबा त्यामुळेच कळवळून व्हिक्टोरिया राणीला उद्देशून म्हणाले, "सत्ता तुझी राणीबाई । हिंदुस्थानी जागृत नाही ॥ जिकडे तिकडे ब्राह्मणशाही । डोळे उघडून पाही ॥ चहुकडे भटशाही कुणब्याची दाद नाही ॥ जोती म्हणे धाव घेई । दुष्टापासूनी सोडवी ॥

## कंपनी सरकार 'हिंदुस्थानी' सत्ता होती !

जोतीबांनी हा जो राणीचा धावा केला तो नीट समजून घेतला पाहिजे. कंपनीचे सरकार हिंदुस्थानात १७६५ साली स्थापन झाले आणि लागलीच १७७६ साली ॲडम स्मिथने कंपनीची व्यापारी मक्तेदारी काढून घ्या असा पुकारा केला. हिंदुस्थानच्या कापड-उद्योगाचे कंपनीच्या साहाय्यानेच ज्यांनी दिवाळे काढले होते ते आता कंपनीला दिवाळखोर ठरवीत होते. पण कंपनीनेही मोठ्या निर्धाराने लढा दिला. १७८३ साली ब्रिटिश पंतप्रधान फॉक्स यांनी कंपनीच्या अमर्याद सत्तेवर सांसदीय अंकुश आणण्याचा घाट घालताक्षणी फॉक्स यांचे मंत्रिमंडळच गडगडले.[३५] कंपनीच्या हातात केवळ बिहार-बंगालच नव्हता, तर संपूर्ण ब्रिटिश राजकारण तिने आपल्या मुठीत आणले होते. पण नंतर पिट पंतप्रधान झाला आणि त्याने कंपनीच्या समर्थकांशी हातमिळवणी करून तवयार्ध-मयार्ध करीत ब्रिटिश सत्तेचे वर्चस्व कंपनीच्या कारभारावर लादले. आणि त्याने पुढे जाऊन १७८८ साली वॉरन हेस्टिंगलाच पार्लेटपुढे दोषी ठरविले. पिटने कंपनीवर अशी मात केल्यामुळेच

पुढे वीस वर्षे तोच पंतप्रधान राहिला. पुढे १८१३ साली ईस्ट इंडिया कंपनीची भारतातील मक्तेदारी कायद्यानेच संपविण्यात आली. त्यानंतर ब्रिटिश उद्योगपतींनी पद्धतशीर रीतीने हिंदुस्थानच्या संपत्तीची लूट आणि येथील उत्पादनव्यवस्थेची मौत केली. १८१८ ते १८३६ या अवघ्या १८ वर्षांच्या कालात ब्रिटिश कापडाची हिंदुस्थानातील आयात ५२०० पट झाली. १८१३ साली ९० लक्ष पौंड कापूस निर्यात झाला तर १८४४ साली ८ कोटी ८० लक्ष म्हणजे जवळ जवळ दसपट. लोकरीची निर्यात तर दहाच वर्षात (१८३३ ते १८४४) साडेतीन हजार पौंडावरून पावणेतीन लाख पौंडावर गेली–म्हणजे शंभर पट. मोहरी २१०० पोत्यांवरून २,३७,००० पोत्यांवर गेली. फार काय, याच काळात देशात सारखे दुष्काळ पडत असतानाही अन्नधान्याचीही निर्यात सुमारे साडे आठ लाख पौंडावरून (१८४९) ३८ लाख पौंडावर गेली (१८५८). १८८० सालापर्यंत भारतात शेती शिवाय दुसरा उद्योगच उरला नाही आणि हे सर्व महाभारत कंपनीच्या माध्यमातूनच घडविले जात होते–हिंदुस्थानच्या अर्थव्यवस्थेचा असा पूर्ण घास कंपनीच्या हातून खाल्ल्यानंतर कंपनीचे राज्यच नाहीसे करण्यात आले होते. राणीची द्वही फिरली होती की, सर्वत्र आबादीआबाद करू. पण पहावे तो तिचे राज्य आपल्याच पोळीवर तूप ओढणाऱ्या एका जुन्याच राज्यकर्त्या वर्गाच्या आहारी जाते आहे, असे निखालसपणे दिसते, म्हणून जोतिबांच्या जिवाची लाही लाही होत होती.

## गावठी साहेबांची इंग्रजी अनुकरणे!

इंग्रजी शिक्षणाचा लाभ झालेली, इंडियन सिव्हिल सर्विसमध्ये घाईने शिरू पाहणारी ही 'साहेब' मंडळी कशी होती, याचे मोठे मार्मिक वर्णन 'निबंधमाले'त सापडते. 'गेली पंचवीस तीस वर्षे वरील लोकांनी ज्यांना हिंदुस्थानचे फारसे ज्ञान नाही असे इंग्रज अधिकारी विशेषतः मिशनरींनी, बरेच राज्य भोगले. त्यांनी म्हणावी ती पूर्वदिशा होऊन त्यांच्या पोरकट गोष्टींनी भरलेल्या पवित्र शुभवर्तमानाची बरोच चोहोंकडे भरभर झाली. येशू ख्रिस्ताच्या कळपात जरी महार, मांग वगैरे हीन जातीतले लोकच काय ते



६

शारीर भुकेनेच केवळ प्रेरित होत्साते शिरले, तरी एकंदर सुशिक्षित म्हणविलेल्या लोकांच्या मनात ख्रिस्ती धर्माविषयी बराच प्रभाव होता. त्या धर्माविषयी व तो आचरणाऱ्या सुधारलेल्या इंग्रज लोकांविषयी त्यांच्या ठायी मोठी आदराची बुद्धी वागत असे. इंग्रजी म्हटले की त्यात सर्व गुणांचा समावेश झाला. त्यास इकडील सर्व गोष्टींची मोठी लाज वाटू लागली. इंग्रेजीशिवाय तर पाणीही प्यावयाचे नाही, तितके अनुकूल नसले तर निदान मधून तरी इंग्रजी शब्द बोलण्यात जितके आणवतील तितके आणावयाचे, निदानपक्षी 'ग्यारी', 'घोरा', 'गारव' अशी तरी इंग्रजीची झाक दाखवावयाची; मराठी विसरून गेल्यात मोठी प्रतिष्ठा; गाडीत बसले असता कोचमिळास स्वतःच्या पदवीस चढवून जातीने सारथ्य, पाटलून, बूट वगैरे मिरविण्यात काही विलक्षण थोरपण; किंबहुना याहूनही निंदास्पद व लज्जास्पद दुसरे विलायतेकडून इकडे आलेले ढंग करण्यात मोठे भूषण–इत्यादि प्रकार त्यावेळेस विशेष चालत असत.'[३६] अशा प्रवृत्तीवर लोकहितवादींनी तर स्पष्टच हल्ला चढविला आहे. ते म्हणतात, 'इंग्रज साधारणतः इकडील लोकांपेक्षा अधिक काम करणारे, मेहनती, शहाणे, हुषार, खरे व प्रामाणिक आहेत. इकडील लोक त्याप्रमाणे नाहीत. शंभर इंग्रजात पांच लबाड असतात. परंतु शंभर हिंदु लोकात पाच प्रामाणिक असतात. तेव्हा याजकडे मोठे अधिकार दिले तर लोकांची स्थिति नीट राहाणार नाही. जे गुण राज्यकर्त्यामध्ये असावे ते हिंदु लोकांमध्ये नाहीत. राज्याची पद्धति त्यास ठाऊक नाही. आजपर्यंत ब्राह्मण लोकांनी कधी राज्य केले नाही. पूर्वी क्षत्रिय लोक राज्य करीत होते, ते तर आता नाहीत. तेव्हा राज्यकर्त्यांची शहाणपणे या लोकात आल्याखेरीज काही उपयोग नाही.''[३७]

## 'देवाजीने भटनानाचे बंड मोडविले म्हणून बरे झाले'

याच दरम्यान, १८७६ साली, राणी व्हिक्टोरिया हिला 'हिंदुस्थान देशाची बादशाहीण' असा किताब बहाल करण्यात आला. या कायद्यामुळे या देशातील राजेरजवाड्यांच्या आशाआकांक्षांशी आणि हितागोताशी इंग्लंडचे राजघराणे आता एकजीव झाले आहे, असे उद्गार व्हाइसरॉय लॉर्ड

लिटन यांनी काढताक्षणी हिंदू राजे आणि मुसलमान राजे असे दोन भिन्न तट आपोआपच पडले. एल्फिन्स्टनने १८५८ साली एक इषारा दिला होता की, 'कंपनीचे राज्य बरखास्त झाल्यावर इंग्लंडच्या हिताहून हिंदुस्थानचे हित वेगळे आहे याची जाण आणि आठवण ठेवली पाहिजे; नाहीतर इग्लंडच्या हितासाठीच भारताचा अवतार आहे, अशी भूमिका राज्यकर्ते नक्कीच घेतील आणि तसे झाले तर हिंदुस्थानच्या लोकांचे फार हाल होतील.' एल्फिन्स्टनची ही वाणी खरी ठरली. १८८२ साली लँकेशायरच्या कापड गिरणी मालकांनी मागणी केल्यावरून हिंदुस्थानातील कापडाच्या आयातीवरील सर्व जकात रद्द करण्यात आली. ही जकात पूर्वी येथील स्थानिक कापड उद्योगाला संरक्षण म्हणून लादण्यात आली होती. ती काढून घेऊ नये, असे येथील कापड उत्पादकांचे सांगणे होते. पण इंग्लंडची कापड गिरणी आधी, मग भारतातील, असा भेद करण्यात आला. इंग्लंडच्या हितासाठीच येथील कारभार चालतो, अशी भावना त्यामुळे सामान्य माणसांमध्येही निर्माण झाली. वास्तविक हा नवजात भांडवलशाहीच्या पोटातील हितविरोध होता. पण तो फक्त समाजातील उच्च वर्णीयांपुरताच मर्यादित होता. सर्वसामान्य जनतेला इंग्रजांची राजवट, राणीची आश्वासने आणि रेल्वे किंवा रस्ते यांची वाढती सुखसोय यातच रस वाटत होता. त्याला ही सर्व सुधारणा म्हणजेच महान आश्चर्य वाटत होते. १८५५ साली ठाण्याला रेल्वेचे इंजिन प्रथम आले त्या दिवशी त्या इंजिनदेवीचीच पूजा लोकांनी अगदी षोडषोपचारे, खणानारळाची ओटी भरून केली होती. ब्रिटिश सरकार आपल्या मुलांना कुठेतरी नोकरीवर घेईल, एवढी एकच आशा आणि आकांक्षा प्रत्येक पालकाच्या मनात हळूच दडून बसली होती आणि त्यामुळेच इंग्रजी राजवटीविषयी मनात खुषी नसतानाही १८५८ च्या उठावाला दक्षिणत फारसे उत्तेजन मिळाले नाही. निजाम, भोसले, होळकर आणि गायकवाड यांनी कुणीही नानासाहेब पेशव्यांना कोणतेही मदत केली नाही आणि या मदतीबद्दल इंग्रज सरकारने पार्लमेंटात 'या सर्वांचे आम्ही उतराई आहोत' असे जाहीर केले. महात्मा फुले यांनी तर या उठावास 'भटनानाचे बंड' म्हटले आहे. या बंडानंतर अवघ्या वीस वर्षात निव्वळ भारतीय भांडवलावर आधारलेल्या १५६ कापडगिरण्या सुरू झाल्या आणि १८८० साली कापड

कामगारांची संख्या ४४००० वर गेली. या कापड गिरण्यांना इंग्लंडातील कापडगिरण्यांशी टक्कर घ्यावी लागली. भारतीय कापड उद्योग लँकेशायर कापड उद्योगाच्या हितासाठी दाबून टाकण्यास भारत सरकार प्रवृत्त होताच देशात आधुनिक नागरी राजकारणाचा जन्म झाला. लँकेशायर कापडाच्या आयातीवर असलेले निर्बंध भारत सरकारने उठविल्यानंतर तीनच वर्षात हिंदी राष्ट्रीय सभेची (इंडियन नॅशनल काँग्रेसची) स्थापना झाली. ही सभा ग्रामीण राजकारणाकडे पाठ फिरवूनच जन्माला आली आहे, हे फक्त महात्मा फुले यांच्या ध्यानी आले होते. 'गुलामगिरी' या आपल्या पुस्तकात एके ठिकाणी ते म्हणतात, 'परंतु मी तुला सांगतो की, इंग्रज लोक आज आहेत, उद्या नाहीत, ते आपल्या जन्मास पुरतील म्हणून कोणाच्याने सांगवत नाही. यास्तव त्या लोकांचे राज्य या देशात आहे तोच आपण सर्व शूद्रांनी जलदी करून भटांच्या वडिलोपार्जित दास्यत्वापासून मुक्त व्हावे. यामध्ये मोठा शहाणपणा आहे. देवाजीने एकदा शूद्रांवर दया करून इंग्रज बादशहाच्या हातून भटनानाचे बंड मोडविले म्हणून बरे झाले.'[३८] या ठिकणी भटनाना म्हणजे नानासाहेब पेशवे आणि भटनानाचे बंड म्हणजे १८५७ सालचे शिपायांचे बंड !

## परकीयांना तोंड देण्यासाठीच जातीची तटबंदी

'इंग्रजी राजवटीत जलदी करून भटांच्या वडिलोपार्जित दास्यत्वापासून सर्व शूद्रांची मुक्ति करणे' हेच महात्मा फुले यांचे दृष्टीने खरें राजकारण होते. इंग्रज अखेरीस उपराच; तो काही येथे यावच्चंद्रदिवाकरौ राहाणार नाही, हीच त्यांची धारणा होती. पण जोवर तो येथे राज्य करतो आहे तोवरच शूद्रांना आपल्या या पिढीजात गुलामगिरीतून सुटका करून घेता येईल, याविषयी त्यांची खात्री पटली होती. ब्रिटिशांची राजवट म्हणजे गुलामगिरी असे त्यांना यत्किंचितही वाटत नव्हते. राज्यकर्ता परकीय असणे ही गुलामगिरीची व्याख्याच त्यांना मान्य नव्हती. या अर्थाने पाहता जोतिबा हेच एकोणिसाव्या शतकातील एकमेव 'भारतीय' लोकनेते ठरतात. 'भारतीय' यासाठी म्हणावयाचे की दिल्लीपती कोणीही असो तो स्वकीय असो की

परकीय, तो आपल्याला परतंत्र करूच शकत नाही; आपण स्वायत्त आणि स्वतंत्र आहोत, हीच मूळ भारतीय राजकीय धारणा होय. ही धारणा जोतिबांइतकी अन्य कुणाही नेत्याच्या किंवा विचारवंताच्या मनात एकोणविसाव्या शतकात घट्ट पाय रोवून बसलेली नव्हती.

किंबहुना, जातिव्यवस्था हीच मुळी परकीय आक्रमणांना आणि राजवटींना यशस्वी रीतीने तोंड देता यावे यासाठी रचलेली स्वकीय सत्तेची तटबंदी होय. जात हेच राज्य; जातीला मानणे हाच धर्म; जातीलाच कुणाही माणसाला वाळीत टाकण्याचा अधिकार. जातीवर अधिकार फक्त गावाचा. गाव तरी तो अधिकार कसा वापरणार? तर गावातील सर्व जात प्रमुखांची मिळून गावपंचायत, गावपंचायत सांगेल ते प्रमाण, तर गावात राहाण्याचा अधिकार, असे जाती आणि गाव यांचे मिळून एक संघराज्य होते. हे संघराज्य शिवछत्रपतींनी मोडले–न्यायदानाचा अधिकार त्यांनी अष्टप्रधानांकडे सोपविला. पण प्रत्यक्षात या धोरणाची अंमलबजावणी १६७४ साली होऊ शकली नाही; ती १७७४ साली झाली. १७७३ सालचा स्थानिक न्यायदानाची वेगळी सरकारी यंत्रणा उभी करणारा ब्रिटिश पार्लमेंटचा कायदा हा शिवछत्रपतींच्या राज्यघटनेवरूनच उचललेला असला पाहिजे. शिवछत्रपतींच्या मृत्यूनंतर मराठी राज्यात सर्वत्र अस्थिरताच भरली होती आणि नंतर शाहू छत्रपतीच्या काळात स्थैर्य आल्यावर गावपंचायतीच्या अधिकारांवर बंधने पडलीच होती. पुढे पेशवाईत तर सर्व राज्याची सत्ता, संपदा आणि संस्कृति एका ब्राह्मणजातीभोवतीच केंद्रित झाल्यामुळे जाती आणि गाव यांचे मिळून जे संघराज्य होते ते आधीच तुटले फुटले होते. या सर्व घडामोडींची यथास्थित दखल ईस्ट इंडिया कंपनीचे धुरीण घेतच असले पाहिजेत. बंगाल–बिहार–ओरिसा या भागातही हे जाती आणि गाव यांचे संघराज्य मोडूनच पडलेले होते. तसे नसते तर कलकत्ता येथे वखारीची तटबंदी करण्याची परवानगी औरंगजेब बादशहा-ऐवजी स्थानिक गाव पंचायतीनेच दिली असती. किंबहुना, बादशहाला कलकत्त्यासह तीन खेड्यांचे दान कंपनीला करण्याचा अधिकारच मिळाला नसता. १७७३ साली जो कायदा इंग्लंडला झाला तो भारतातील विद्यमान

स्थितीला मान्यता देऊन पाय पक्के रोवण्याचा उपाय होता. कंपनी सरकारने पुढे, वेलस्लीच्या नेतृत्वाखाली, जी तैनाती फौजेची शक्कल लढविली ती देखील अशीच येथील चौथाईच्या सनदेवरून उचललेली होती. सारांश जाती आणि गाव यांचे एकमुखी संघराज्य मोगल राजवटीतच खिळखिळे झाले होते.

## ऐतिहासिक द्रष्टेपण ते हेच

शिवछत्रपतींनी अष्टप्रधानांची नवी राज्यघटना करून 'राज्यांतील वतनदार देशमुख व देशकुलकर्णी पाटील' यांचे 'आहे ते' वतन चालऊन प्रजेवरी यांची सत्ता असो न द्यावी' याची व्यवस्था केली होती. पण ती व्यवस्था पक्की होण्यापूर्वीच शिवाजी महाराजांचे देहावसान झाले. शिवाजीमहाराजांनी 'साहुकार म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा' असे मानले' 'यातील रहस्य हेच की मराठी समाजाला सरंजामी युगातून काढून त्यापुढील अधिक प्रगत अशा द्रव्यप्रधान व्यापारी युगात नेण्याचा महाराजांचा प्रयत्न होता....शिवप्रभु हे, 'दिक्कालातुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके!' अशा कोटीतले प्रतिभावंत पुरुष होते. त्यांना मराठ्यांचे सुसंपन्न बलिष्ठ राष्ट्रनिर्माण करायचे होते. ते निर्माण करण्याच्या कामात मुख्य अडथळा वतनदारांचा होता. दावे दरवडे पुंडावा हा ज्यांचा सहजस्वभाव अशा वतनदारांची सद्दी जोपर्यंत आहे तोपर्यंत समाजाचे एकसंध राष्ट्र बनणे अशक्य, शेंकडो वर्षे बद्धमूल होऊन बसलेल्या वतनदारांचे एकदम उच्चाटन करणे तर शक्य नाही. पण त्यांना वाढू न देता शक्य तितके खच्ची करायचे आणि रयतेवर त्यांना सत्ता गाजवू द्यायची नाही! असे हे सगळे अनेकसूत्र-संकुल धोरण 'या लोकांचे संरक्षण परम युक्तिजन्य आहे' या अर्थभरीत वाक्याने सूचित केले आहे....पण ऐवढयाने भागण्याजोगे नव्हते. हा अकरणात्मक उपाय झाला. प्रत्यक्ष करणात्मक उपाय योजल्याखेरीज समाजाची उत्क्रांति होणार कशी? महाराजांनी तोही उपाय योजिला. त्यांनी साहुकार म्हणजे भांडवलदार व्यापारी यांना हाताशी धरण्याचे योजिले. देशात व्यापार वाढवावा, भांडवलदार वर्गाला सवलती देऊन त्याला आपल्या राज्यात आकृष्ट

करावे आणि त्यांच्या द्वारा समाजाला समृद्ध बनवावे अशी राजांची कल्पना होती.....समाजधारणेची आणि राज्यशासनाची प्रगतिकारक अभिनव तत्त्वे अमलात आणून द्रव्याधिष्ठित समाजव्यवस्थेच्या आधारावर एकमुखी बलिष्ठ राष्ट्र निर्माण करायचे, ही जी शिवाजी महाराजांची ध्येयदृष्टि ती त्यांच्यापाशीच राहिली. ' हे जे विश्लेषण 'आज्ञापत्रा 'च्या प्रस्तावनेत प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी केलेले आहे, ते मार्मिकच होय.[११] देशकुलकर्णी पाटील यांच्या सत्तेला शह देण्याचे, हे अर्धवट राहिलेले, कार्य लॉर्ड कार्नवॉलिस याच्या गव्हर्नर जनरल पदाच्या कारकीर्दीत पूर्ण झाले आणि द्रव्याधिष्टित समाजव्यवस्था घडविण्याचे कार्य १८१३ नंतर येथील व्यापाराची गंगा विलायतेकडे उलटी वाहू लागल्यामुळे परिस्थितिवशात् घडून आले. तत्पूर्वी जवळजवळ दोनशे वर्षे इकडील व्यापाराचा सर्व नफा इंग्लंडच्याच तिजोरीत किंवा बाजारात भरती होत होता. 'त्यांची बंदरे सधन होती. ती आम्ही भिकेस लावून त्यांचा सर्व व्यापार बुडविला आहे, ' असे मोंगल दरबारातील इंग्रज वकील थॉमस रो. याने १६१८ सालीच निक्षून सांगितले होते. जुनी समाजव्यवस्था अशी राजकीय आणि आर्थिक अशा दोन्ही अंगानी उघडी पडली असतांनाच, 'आपण सर्व शूद्रांनी जलदी करून भटांच्या वडिलोपार्जित दास्यत्वातून मुक्त व्हावे, यामध्ये मोठा शहाणपणा आहे,' असे महात्मा फुले यांनी सांगितले, हेच त्यांचे ऐतिहासिक द्रष्टेपण होय.

## हे सत्य जोतिबांना टॉयन्बींपूर्वी गवसले

ऐतिहासिक द्रष्टेपण म्हणण्याचे कारण केवळ त्यांचे हे विधान नंतर काळाने खरे ठरविले, एवढेच नाही. शूद्र वडिलोपार्जित दास्यत्वातून मुक्त होण्याची परिस्थिति कोणती, हे ओळखण्यात द्रष्टेपण आहेच. पण केवळ मराठी समाजाच्याच नव्हे, तर एकूणच मानवजातीच्या विकासक्रमात दास्यमुक्तीची प्रक्रिया एका विशिष्ट क्रमाने येते, असे आढळते. ती परकीय राजवटीतच शक्य आहे, हे जे महात्मा फुले यांचे निदान ते ऐतिहासिक द्रष्टेपणाचे आहे. इतिहास ही एक अजब किमया आहे. इतिहासाच्या हरएक पदराला नाना रंगाची वलये चढलेली असतात. एक वलय पकडावे तर

दुसरेच वलय दत्त म्हणून समोर उभे ठाकते. परिस्थिती आपले रंग बदलते हे तर आहेच, पण पुराविद्यातज्ञही आपापली ' दर्शने ' सारखी बदलत राहातात. उदाहरणार्थ, आपल्याकडील महाभारतावरील वाद. एक म्हणतात, ' महाभारत घडलेच नाही. तो एक प्रतिभाविलास होय. ' दुसरे म्हणतात, ' हा मानवी इतिहास नसून खगोलशास्त्रीय नाट्य आहे. ' तिसरे म्हणतात, ' रामायण हे महाभारतानंतर घडले. ' चवथे म्हणतात, ' रावणाची लंका नर्मदेच्या दक्षिणेला नाही, सिंधूच्या पश्चिमेला आहे. ' हे सर्व पुराविद्यातज्ञ आहेत. त्यांचेजवळ आपापल्या परीने कमी अधिक विश्वासार्ह पुरावे आहेत. मुद्दा हा की, इतिहासाचे रंगरूप सारखे बदलत असते. ही सर्व आंदोलने, परिवर्तने, काळाच्या ओघामध्ये पचवून ऐतिहासिक घटनांचे सांधे जुळवून दाखवायचे कार्य खरोखरच हिमालयासारखे प्रचंड होय. जगातील एकूण एकतीस लोकसमूहांच्या हजारो वर्षातील वास्तव्याच्या बारीक सारीक तपशिलांचे परिशीलन करून असे ऐतिहासिक विकासक्रमाचे सूत्र शोधण्याचे अपूर्व आणि अघटित कार्य सर अर्नोल्ड टॉयनबी यांनी विसाव्या शतकात इंग्लंडमध्ये केले. त्यांचा एक पाय भूतकाळात, तर दुसरा पाय वर्तमानात, असाच सारखा अनुभव येत गेला. १९१४ पासून १९७२ पर्यंत सतत ५८ वर्षे ते भूतकाळाची बदलती रूपे न्याहाळीत न्याहाळीत इतिहासाचा वेध घेत होते. १९२४ पासून १९५६ पर्यंत सतत ३२ वर्षे ते ' रॉयल सोसायटी ' साठी आंतरराष्ट्रीय राजकारणाचे वार्षिक अहवाल तयार करीत. याच काळात त्यांनी द्वितीय महायुद्धाच्या राजकीय इतिहासाची साधने संग्रहित केली. भूतकाळातील पाय कधी थकला नाही, वर्तमानातील कधी विचलीत झाला नाही. इतिहासाला पाचवा वेद कां म्हणावयाचे याचा प्रत्यय टॉयन्बीच्या इतिहासावरून येतो. जे जे समजावून घेण्याजोगे आणि म्हणून सांगण्याजोगे आहे ते ते सर्व अनुसंधान टेवून आणि सूत्रयुक्त करून त्यांनी लिहून ठेवले. इतिहास कसा तपासावा, कसा वाचावा, कसा रचावा याचेच शास्त्र त्यांनी सांगितले. ख्रिस्ताचा आणि मार्क्सचा, शिकदराचा आणि अकबराचा, ग्रीक रोमनांचा आणि चिनीभारतीयांचा साक्षेपी विचार कसा करावयाचा याचेच प्रमेय त्यांनी मांडले. ते प्रमेय कोणते ! मानवी समाजाच्या सांस्कृतिक विकासक्रमाचे सूत्र हेच ते प्रमेय होय. कोणत्याही

समाजात प्रथम संस्कृतीचे एकत्व आणि राजकारणाचे अनेकत्व आढळते. पुढील पायरीवर, सत्तारूढ अल्पजन हे आपल्या वर्चस्वाच्या सिद्धीसाठी अनुनयाऐवजी दंडशक्तीवर अधिकाधिक अवलंबून राहातात. तिसऱ्या पायरीवर, समाजांतर्गत दलितांची नवधर्म प्रवर्तनाकडे प्रवृत्ति होते. चवथ्या पायरीवर, परकीय अमलाखाली स्वकीय दलित सत्तेचा प्रभाव निर्माण होतो आणि पाचव्या, अंतिम, पायरीवर, समाजातील पुनरुत्थानाचे स्वतंत्र युग अवतरते. इतिहासाचा हा नवाच क्रम त्यांनी लावला.[४०] पण या विकासक्रमातील एक पायरी ही महात्मा फुले यांनी टॉयन्बी यांचेपूर्वी निदान ६० वर्षे आधी हेरली आणि स्वीकारली होती. जोतिबा म्हणाले, ' परंतु मी तुला सांगतो की, इंग्रज लोक आज आहेत, उद्या नाहीत, ते आपल्या जन्मास पुरतील म्हणोन कोणाच्याने सांगवत नाही. यास्तव या लोकांचे राज्य या देशात आहे तोच आपण सर्व शूद्रांनी जलदी करून भटांच्या वडिलोपार्जित दास्यत्वापासून मुक्त व्हावे, यात मोठा शहाणपणा आहे. ' मराठी समाजाच्या विकासक्रमात आपण आत्ता नेमके कुठे उभे आहोत, याचे हे जे अचूक निदान जोतिबांना झाले तेच त्यांचे ऐतिहासिक द्रष्टेपण होय. पण टॉयन्बी यांचेपूर्वी जोतिबांना हे सत्य कसे गवसले ? टॉयन्बींनी आपल्या आयुष्याच्या अखेरीअखेरीस ' मी इतिहास कां लिहितो ? ' या प्रश्नाचे उत्तर लिहून ठेवले. ते म्हणतात, ' मानवी जीवनातील निरर्थक क्रौर्यानेच मला आव्हान दिले. ते आव्हान स्वीकारूनच मी जगावयास सुरूवात केली. ' आपल्या भोवतालच्या मराठी समाजातील निरर्थक क्रौर्याचे आव्हान स्वीकारूनच जोतिबांच्या जीवनाची सुरूवात झाली ! या निरर्थक क्रौर्यावर मात करून दाखवीन, अशी उदंड ऊर्मी अंतरात अमर्याद उचंबळून आली, म्हणूनच त्यांचे ठायी ऐतिहासिक द्रष्टेपण ओथंबून आले.

## एक विलक्षण ऐतिहासिक योगायोग !

महात्मा फुले यांचे हे ऐतिहासिक द्रष्टेपण एकदा का आपणास कळले की त्यांच्या कार्याचे आणि कर्तृत्वाचे आकलन यथार्थपणे होते. इतकेच नव्हे तर आपल्या समकालीनांहून सर्वस्वी भिन्न आणि प्रसंगी परधार्जिणेपणाचा आरोप अंगावर ओढवून घेऊनही जे आपल्या मनात आहे तेच सांगण्याचे

आणि करण्याचे धारिष्ट्य त्यांच्याठायी कोठून आले तेही उमजते. तत्कालीन समाजावर फारसा प्रभाव पडला नसतानाही नंतरच्या शंभर वर्षांत अशी स्थिती आली की, महात्मा फुले यांचे नाव घेतल्याशिवाय आता कोणतेही सामाजिक कार्य उभे होत नाही. ती कां, याही प्रश्नाचे उत्तर जोतिबांच्या या ऐतिहासिक द्रष्टेपणातच सामावलेले आहे. किंबहुना, 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांनी 'महात्मा फुले हेच माझे राजकीय गुरू होत,' असे जाहीर-पणे मुक्त्कंठाने आर्जून कां सांगितले, याचेही रहस्य त्यांच्या या ऐतिहासिक द्रष्टेपणांतच दडलेले आहे. मराठी समाजाच्या पोटात द्रव्याधिष्ठित असा नवा लोकव्यवहार उभा केला पाहिजे अशी जी धारणा शिवछत्रपतींच्या ठायी स्थिरावली होती, तीच महात्मा फुले यांच्या अंतःकरणातही रूजलेली होती. हे जे साम्य या दोन महापुरुषांमध्ये, दोनशे वर्षांचे अंतर कापून, आपणास आढळते, त्याचे कारण जोतिबांचे हे ऐतिहासिक द्रष्टेपण हेच होय.

महात्मा जोतिबा फुले यांचा जन्म होण्यापूर्वी, सत्तर वर्षे आधी, मराठी लोकजीवनाच्या विघटनाला सुरूवात झाली आणि त्यांचा जन्म होईस्तोवर मराठी राज्याचा विध्वंस होऊन गेला. ज्या वर्षी ब्रिटिशांनी पुणे शहरातील, किमान साठ वर्षे तरी जेथून संपूर्ण मराठीशाहीचे राजकारण शिजले आणि हिंदुस्थानचा बरावाईट विचार झाला, तो शनिवारवाडा जाळून टाकला, त्याच वर्षी जोतिबांचा जन्म झाला, हा विलक्षण योगायोगच म्हटला पाहिजे. शनिवारवाडा या नावाभोवती जी परंपरा, प्रथा आणि प्रतिष्ठा होती तीच पुढे जोतिबांनी अव्हेरली आणि ओलांडली. किंबहुना, शनिवारवाडा ब्रिटिशांनी जाळला तरी त्याचा पीळ गेला नव्हता. तो जोतिबांनी नंतर डांगोरा पिटून मोडला.

## 'पुढे काय, मागे काय? जीवनाला फक्त गती आहे'

पानिपतच्या युद्धाने इकडे दक्षिणेत मराठी लोकजीवनाचे असे विघटन पर्व आणले पण तिकडे उत्तरेत सिंधूच्या कुशीत, पंचनद्यांच्या प्रदेशात मात्र नवे संघटनपर्व आले. गुरुनानक यांनी स्थापन केलेला शीख संप्रदाय वाढत वाढत संपूर्ण पंजाबात पसरला होता. गुरु गोविंदसिंगांनी आपल्या निर्याणापूर्वी

'खालसा'ची स्थापना केलेली होती. राजवट कोणा एकाची तख्तनशीन नाही; तख्त फक्त एक गुरूचे अशी पक्की खूणगाठ बांधून शिखांचे संघटन सुरू होते. पानिपतच्या लढाईत मराठ्यांचा पराभव झाला आणि मोंगल बादशाहीचा डोलारा ढासळला. त्यासरशी शिखांच्या सत्तेची आणि संपत्तीची पायाभरणी झाली आणि पुढील चाळीस वर्षातच राजा रणजितसिंगाच्या रुपाने शिखांचे राज्य निर्माण झाले. रणजितसिंगाने ना आपला शेतकऱ्याचा वेश सोडला ना स्वतःला राज्याभिषेक करवून घेतला. त्याने आपल्या राज्याला सरकार 'खालसाजी' असेच नाव दिले आणि शिक्काही गुरु नानकाच्याच नावाने चालविला. 'तख्त श्री अकाल' ही रणजितसिंगाच्या या कर्तृत्वाचीच जिवंत साक्ष आहे. शीख समाजाच्या इतिहासात गुरु गोविंदसिंग यांचे स्थान अद्वितीय आहे. त्यांचा जन्म १६६६ मध्ये झाला आणि १७०८ साली त्यांचा नांदेड मुक्कामी, दगाफटका होऊन, अंत झाला. गुरु गोविंदसिंगांनी जी घडी घालून दिली तीच पुढे रणजितसिंगाने उचलून धरली. सतराव्या शतकातील समाजधारणा सिंधूच्या खोऱ्यात एकोणविसाव्या शतकात स्थिरपद होते आणि कृष्णा–गोदेच्या खोऱ्यात मात्र सतराव्या शतकातील समाजधारणा एकोणविसाव्या शतकात उध्वस्त होते, हे उघडच दिसते. या परस्परविरोधी प्रक्रियांची कारणमीमांसा आपल्याला करावी लागणारच आहे कारण, विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातही 'दल खालसा'च्या नावाने संपूर्ण शीख समाज एकत्र येतो आणि राजकारण करतो; असे आपणास दिसते. आधुनिक कालखंडातही मध्ययुगीन प्रेरणांचा हा जो आढळ होतो तो केवळ धिक्कारून हात झटकून टाकता येत नाहीत. तो आढळ चांगला की वाईट, पुरोगामी की प्रतिगामी हा भाग वेगळा. पण तो आढळ होतो, या वस्तुस्थितीची नोंद तर घ्यायलाच हवी. मागे एकदा म. म. दत्तो वामन पोतदार प्रस्तुत लेखकास म्हणाले होते, "तुम्ही लोक स्वतःला प्रागतिक, पुरोगामी, असे म्हणविता. पण ही प्रगती काय भानगड आहे? पुढे काय मागे काय? मानवी जीवनाला गती आहे, एवढेच खरे." इतिहास म्हणजे मानवी जीवनाचे गतिशास्त्रच होय, यात शंका नाही. या गति-शास्त्राप्रमाणेच सर्व कांही मानवी जीवनात घडते, असे निश्चयपूर्वक सांगता येते.

## विठ्ठलभक्ती ही कांही मराठ्यांचे व्यवच्छेदक लक्षण नव्हती !

प्रत्येक युद्धाबरोबर त्याचे असे स्वतंत्र संहारक शास्त्र जन्माला येत असते. मागील युद्धाची शस्त्रविद्या पुढील युद्धात कुचकामाची ठरते. तद्वतच, विभिन्न लोकसमूह आधुनिक कालखंडात मध्ययुगीन प्रेरणा घेऊनच वावरताना दिसले तर त्यांना 'प्रतिगामी' म्हणण्याचा मोह अनेकांना होतो. पण त्या प्रेरणा आजही त्या समाजाला राजकीय शक्ती किंवा स्थान निर्माण करून देताना दिसतातच. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात मराठा समाजाकडेच किमान आठबाराशे वर्षे स्थानिक राजकीय सत्ता, कोणत्या ना कोणत्या रूपाने, राहिलेली असल्यामुळेच जुनी व्यवस्था मोडल्यानंतर, 'दरडोई एकमत'च्या नवीन राजकीय घटनेतही गावोगाव 'मराठा'च उमेदवार निवडणुकीच्या आखाडयात सर्वात अधिक उतरतात आणि निवडून येतात.[४१] आधुनिक लोकशाही व्यवस्थेच्या पोटात मध्ययुगीन 'क्षत्रिय' जातींच्याच हाती सत्ता एकवटलेली आपणास सर्व भारतभर पहावयास मिळते. तुमची नवी व्यवस्था ही अखेरीस तुमच्या जुन्या व्यवस्थेवरच उभी असते. जातिविरोधाची आंदोलने गेल्या शतकात जेवढी झाली तेवढी पूर्वी कधी झाली नव्हती, असे नाही. श्री चक्रधरस्वामींच्या महानुभाव धर्म, बसेश्वरांचा लिंगायत धर्म किंवा ज्ञानेश्वर नामदेवांचा वारकरी धर्म हे सर्व संप्रदाय जातिनिरपेक्ष भूमिका घेऊनच उभे झाले. पण ते अखेर जातिव्यवस्थेच्या पोटात सामावले गेले. मराठी लोकजीवनाकडे पाहिले तर असे दिसते की शिवाजी महाराजांच्या काळात तुळजाभवानीचे आणि थोरल्या माधवरावाच्या काळात थेऊरच्या गणपतीचे महात्म्य राज्यकर्त्यांना वाटत होते. वारकरी संप्रदायाची विठ्ठल भक्ती ही काही या दोन्ही कालखंडात मराठी समाजाचे व्यवच्छेदक लक्षण बनलेली नव्हती.

## 'बहुजन समाज' शब्दाचा हा सामाजिक प्रवास !

हे खरे की, १८०० ते १८३० या कालखंडातील ऐतिहासिक साधनांच्या आधारे म्हणता येते की पुणे, नाशिक आणि पंढरपूर अशी तीनच मोठी शहरे या प्रदेशात होती. पुण्याची लोकसंख्या त्यावेळी लाखाचे आसपास तर पंढरपूरची पंचवीस हजाराचे आसपास असावी. पण आधुनिक

अर्थाने वारकरीपंथात जी 'वारी 'ची—आळंदी ते पंढरपूर अशा वारीची–प्रथा आहे, ती १८३९ साली हैबतरावदादाने सुरू केली. खंडोबाचे दैवत अधिक सार्वत्रिक होते, म्हणून त्याचा उल्लेख सत्यशोधक समाजाच्या व्यासपीठावरूनही जोतिबा करतात. तो अलीकडील अनेक फुलेभक्तांना खटकत आणि खुपत असला तरी तत्कालीन समाजस्थितीचेच त्यातून दर्शन घडते. फुलेभक्तांचे तीन प्रकार आपल्याकडे आजमितीस आहेत. पहिला प्रकार माळीसमाजाचा. गांवोगांवचे माळीसमाज महात्मा फुले विद्याप्रसारक संस्था चालवीत आणि वाढवीत आहेत. दुसरा प्रकार, आधुनिक भौतिकवादी राजकीय तत्त्वज्ञानांचा वारसा शिरोधार्थ मानणाऱ्या समाजवादी–साम्यवादी मंडळींचा. महात्मापुले हे डाव्या विचारसरणीचे हिंदुस्थानातील आद्य प्रवर्तक म्हणून सांगण्यात या मंडळींना 'आपण मराठी मातीशी इमान राखून आहोत' असे प्रामाणिकपणे वाटते. तिसरा प्रकार, राजकारणी लोकांचा. विघ्नहर्ता म्हणून गणेशाची मूर्ति पुजावी किंवा 'श्री गजानन प्रसन्न' म्हणून लिहावे तसे आता महात्मा फुले यांचे नामस्मरण हे विघ्नहारक आणि सुखदायक होय, असे या सार्वजनिक कार्यकर्त्यांना वाटते. शिवछत्रपतीनंतर असे भाग्य मराठी लोकजीवनात फक्त जोतिबांच्याच वाट्याला आले, हे नमूद करण्यासारखे आहे. शिवछत्रपती आणि महात्मा जोतिबा या दोन नांवामध्ये बहुजनसमाजाच्या मनाची पकड घेण्याचे सामर्थ्य कसे आले, याही प्रश्नाचा आपणास विचार करावा लागणार आहे.

आता, 'बहुजन समाज' हा शब्द अभंग आणि अखंड वाटत असला तरी तसा तो राहिलेला नाही. पूर्वी ब्राह्मण सोडून सर्व समाज या शब्दाने ध्वनित होई, पण अलीकडे दहाएक वर्षात दलित समाज हा शब्द या 'बहुजन समाजाचे' पोट फाडून त्यातून बाहेर पडला आहे. म्हणजे ब्राह्मण आणि दलित सोडून इतर सर्व म्हणजे बहुजन समाज अशी व्याख्या झाली, पण तीही बरोबर नाही. कारण, उरलेल्या समाजातील तेली, कोळी, कोष्टी, माळी, तांबोळी आदि अनेक जमातींचा उल्लेख हल्ली 'बहुजनसमाज' या शब्दाने होत नाही. शहाण्णव कुळी मराठा समाज हा या सर्वांना वगळून 'बहुजन समाज' हा शब्द फक्त आपल्या स्वतःला उद्देशूनच वापरीत असतो.

बहुजनांचे राज्य म्हणजे लोकशाही. मराठा हाच बहुजन समाज. म्हणून महाराष्ट्रात मराठ्यांचे राज्य असणे हीच खरी लोकशाही, अशी भूमिका जाहीरपणे घेतली जाते. बहुजनसमाज या शब्दाची प्रत्यक्ष व्याख्या आणि व्याप्ती अशी सारखी बदलत आणि संकुचित होत गेली आहे. हा बदल आणि संकोच कसा, केव्हा आणि कां झाला, याचाही शोध घ्यावा लागणार आहे. त्यासाठी प्रथम महात्मा फुले हे ज्या काळात जन्मले आणि वाढले त्या काळाची पुरेशी माहिती आपल्याला उपलब्ध झाली पाहिजे. विशेषतः सत्यशोधक समाजाची स्थापना १८७३ साली महाराष्ट्रात आणि तीही पुणे शहरातच कां झाली, या प्रश्नाचा उलगडा आपल्याला करता आला पाहिजे; आणि तो समाज माळी समाजातीलच एका महाभागाचे हातून कां निर्माण व्हावा, याही प्रश्नाचे उत्तर, जमले तर, देता आले पाहिजे.

## डॉ. गोमिश यांची 'ब्राह्मण' नामक कादंबरी

महात्मा फुले ज्या काळात जन्मले आणि वाढले त्याच काळात गोमंतकात सासष्टी तालुक्यात फ्रान्सिस्कु लुईस गोमिश हे जन्माला आले आणि वाढले. गोमिश यांचे वडील प्रसिद्ध डॉक्टर होते. त्यांचा व्यासंग दांडगा होता. त्यामुळे गोमिश यांनी ८ व्या वर्षी पोर्तुगीज आणि १४ व्या वर्षापर्यंत फ्रेंच, लॅटिन, मराठी आणि कोकणी या भाषांवर चांगले प्रभुत्व संपादन केले. पणजी येथील मेडिकल स्कूलमधून त्यांनी वैद्यकीची परीक्षा अवघ्या १७ व्या वर्षी दिली. त्यांनी पुढील दहाबारा वर्षांत लोकांमध्ये आणि सैन्यामध्ये अशी ईमाने इतबारे सेवा केली की ऐन तिशीच्या उंबरठ्यावरच लोकांनी त्यांना पोर्तुगालच्या पार्लमेंटवर बिनविरोध निवडून दिले. आपली पार्लमेंटातील कारकीर्द गोमिश यांनी गोमंतकाच्या हितासाठीच राबविली. विशेषतः गोव्यातील सरकारी नोकरांचा दर्जा पोर्तुगालच्या सरकारी नोकरांइतका त्यांनीच करवून घेतला. ते सर्वार्थाने 'भारतीय'च झाले होते ते एकदा म्हणाले होते. "इंग्लंडने हिंदुस्थान जिंकला नाही. हिंदुस्थान स्वाच्या स्वाधीन झाला. स्वतःच्या स्वातंत्र्याचा तो स्वतःच शत्रू ठरला. जातीजातीतील वैमनस्य, धर्माधर्मातील वैर यासारख्या दोषांनीच त्याला पोखरून टाकले होते." गोमिश यांची

आठवण व्हायचे कारण हे की, त्यानी तत्कालीन परिस्थितीवर एक कादंबरी लिहिली आणि तिचे नाव 'ब्राह्मण' ठेवले. ती पोर्तुगीज भाषेतली कादंबरी त्यावेळी फार गाजली. माग्नोद नावाच्या एका ब्राह्मणाचा रॉबर्त नामक पोर्तुगीजाने अपमान केला म्हणून तो सूडाने पेटला आणि तो ठग झाला, असे कथाबीज त्यात आहे. त्यावेळी ब्राह्मण हा स्वतःस सर्वश्रेष्ठ म्हणवीत असे आणि १८५७ सालच्या बंडाची पार्श्वभूमि घेऊन कथानक रंगवले होते. ब्राह्मणवर्गाची ही हलाखीची स्थिती ब्रिटिश राजवटीने आणली होती आणि आपले अस्तित्व टिकविण्यासाठी ब्राह्मणवर्ग अखेरीस हिंसाचारास प्रवृत्त झाला, असे वर्णन त्यात आहे. सत्तावनच्या बंडात सामील झालेले सैन्य बव्हंशी ब्राह्मण होते, या वस्तुस्थितीचाही या कादंबरीत चांगला उपयोग करून घेण्यात आला आहे. सांगायचा मुद्दा हा की, ब्राह्मणांचे वर्चस्व संपलेले आहे, अशी फ्रान्सिस्कू गोमिश यांच्यासारख्या बहुश्रुत पोर्तुगीज राजनीतीज्ञाची १८६० सालापूर्वीच पूर्ण खात्री पटली होती. पण त्याच्याही हे लक्षात आले नाही की, ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व हे फक्त क्षत्रिय सत्तेच्या संदर्भातच खरे होते; म्हणजे ते सापेक्ष वर्चस्व होते. राजाला निरंकुश सत्ताधीश मानल्यामुळे कायदा करण्याचे कार्य ब्राह्मण वर्गाकडे आले होते. स्मृतींचा अर्थ एवढाच होता. क्षत्रियांची सत्ता हीच हिंदु समाजातील खरी सत्ता होती; ब्राह्मणसत्ता ही केवळ अनुषंगिक सत्ता होती. क्षत्रिय सत्तेचा ऱ्हास झाल्यामुळे ब्राह्मणी सर्वश्रेष्ठत्वाचा आधारच निखळला होता. क्षत्रियांच्या अभावी तेच वर्चस्व गाजवू लागले, असा अनुभव नवीन सत्ता प्रस्थापित होईपर्यंतच्या काळात निदान सामाजिक-धार्मिक दृष्टीने तरी निश्चितच आला. पण हा अनुभव ब्राह्मणांच्या दृष्टीने परंपरेचे पावित्र्य टिकविण्याच्या दृष्टीने पाहून गोमिश यांनी कादंबरीत मांडला, हे खरोखर विशेषच म्हणावे लागेल. आपल्या अंगावर अभक्ष फेकले म्हणून माग्नोदला 'धर्म बुडाला' असे वाटले आणि त्याच्या पत्नीने आत्महत्या केली. हा कर्मठपणाच ब्राह्मणीसंस्कृतीचा कणा होता. ती संस्कृती क्षत्रियांच्या पाठीवर उभी होती. क्षत्रिय नष्ट झाल्याबरोबर ती संस्कृती कोसळली. क्षत्रिय नष्ट होताच वैश्य प्रबळ झाला. ब्रिटिशांचे आगमन हे या वैश्यप्राबल्याला पोषकच ठरले. क्षत्रियांचे श्रेष्ठत्व हेही अखेरीस ते जोवर परकीय आक्रमणे परतवून लावू

शकत होते तोवरच टिकणारे होते. सम्राट हर्षवर्धनानंतर असा कोणी क्षत्रिय झालाच नाही. म्हणून क्षत्रियावाचून आपले, आपल्या कुटुंबाचे आणि आपल्या गावाचे संरक्षण करण्याचा निःशस्त्र मार्ग येथील समाजधुरीणांनी शोधून काढला. जातीला गावाच्या आणि गावाला जातीच्या रज्जूंनी कायमचे बांधून टाकले. आमचा समाज जातिपलीकडे जात नाही आणि देश तर पंचक्रोशीच्या आतच असतो. भारतीयांचे व्यक्तिगत मन कुटुंबाएवढे मोठे पण सामाजिक मन मात्र जातिएवढे लहान असाच प्रकार शतकानुशतके राहिलेला आहे. क्षत्रियांची उणीव भारतीय समाजाने अशी जातिव्यवस्थेच्या मार्फत भरून काढली; त्यामुळेच जात हीच संपत्तीच्या संस्कृतीच्या आणि सत्तेच्या रक्षणाची एकमेव हमी ठरली; आजही तोच अनुभव येतो आहे. मध्यंतरीच्या म्हणजे ब्रिटिश राजवटीच्या काळात नवे तंत्रविज्ञान आणि नवे द्रव्यव्यवहार आमच्या भूमीत रुजल्यानंतरही हा अनुभव कां येतो? या प्रश्नाच्या उत्तरा-ठसी आपल्याला अधिकच खोल पाण्यात उतरावे लागणार आहे.

## जो जातीबाहेरचा तोच 'अखिल भारतीय'!

या प्रश्नाचे उत्तर कोणी शोधीत नाही, असे नाही. पण त्यांची सुरूवातच मुळी जात ही समाजविघातक वस्तु आहे, या प्रमेयाने होते. जात ही समाजविघातक कां?—तर ती अखिल भारतीय वळणांच्या, व्यवहारांच्या आणि व्यापांच्या आड येते. विशेषतः, कुठलाही आणि कोणताही राजकीय प्रवाह येथे एक समयावच्छेदे अखिल भारतीय आकार आणि आशय धारण करीत नाही. येथे अखिल भारतीयत्वाची भूमिका मग घेतो तरी कोण? जो जातीबाहेरचा आहे तोच अखिल भारतीयत्वाची भूमिका घेतो. अलीकडील काळात मुसलमानांनी तीच भूमिका घेतली. औरंगजेब बादशहा दिल्लीचे सर्व वैभव मागे टाकून सतत सत्तावीस वर्षे सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात रानोमाळ भटकत राहिला यास भारतीय भूमी एकत्र आणि एका छत्राखाली बांधून ठेवण्याचीच ईर्ष्या होती; हे अखिल भारतीयत्व शिवाजीला मंजूर नव्हते. नंतर टोपीकर इंग्रज आला. तोही अखिल भारतीयत्वाच्याच गोष्टी सांगू लागला. पहिल्या राज्यकर्त्यांची अखिल भारतीय भाषा फारसी तर दुसऱ्याची इंग्रजी

होती. या दोन्ही भाषा परकीय, तरी त्या अखिल 'भारतीय' ठरल्या. पण येथील स्वकीय पंजाबी, तमीळ, मल्याळी या भाषा काही अखिल भारतीय ठरत नाहीत, पण त्या तशा भारतीयच भाषा होत. जो येथला आहे तो प्रथम मराठी भाषिक, बंगाली भाषिक; मग भारतीय; जो येथला तो प्रथम ब्राह्मण, मराठा, माळी, लिंगायत, शीख; मग भारतीय गोमंतकावर जिवापाड प्रेम करणाऱ्या फ्रान्सिस्कु गोमिशने आपले गुरू लामार्तिन यांना एकदा लिहिले होते, 'महाभारतासारखे काव्य आणि बुद्धिबळासारखा खेळ ज्या ठिकाणी रचले गेले तो भारत हा माझा देश आहे. मी सर्वार्थाने भारतीयच आहे.' तो पोर्तुगीज होता म्हणून त्याने असे लिहिले. पण त्यास आपण 'गोवेकर' म्हणतो; तोही तसेच मानतो. किंबहुना, गोमिश गोवेकर होता म्हणूनच भारतीय आहे. ज्यास येथे मातृभाषेचा हक्क आहे, तो पर्यायाने भारतीय ठरतो. मुळात कुणीच भारतीय नाही. जसे मुळात इंग्रज, फ्रेंच, जर्मन्स ऑस्ट्रियन्स, पोलिश, इटालिटन हे सगळे वेगवेगळे: पण युरोपीय म्हटले की त्या सर्वांचाच समावेश होतो, तसा 'भारतीय' हा शब्द 'युरोपीय' या शब्दासारखा व्यापक स्थलवाचक शब्द आहे. हिंदु हा देखील मुळात स्थलवाचकच शब्द आहे. जसे हिंदु शैव, हिंदु वैष्णव, हिंदु बौद्ध तसे हिंदु-खिस्ती, हिंदु-शीख, हिंदु--मुसलमान, हिंदु-पारशी. हिंदु हा मुळात स्वतंत्र धर्म नाही-- हे जसे धार्मिक बाबतीत तसे सामाजिक बाबतीत जातीचे लोण घेऊन आपण जगतो. येथील सामाजिकता आणि राजकीयता यांचे एकजीवीकरण मातृभाषेच्याच माध्यमातून होते--भाषा हेच राष्ट्रीयत्वाचे गमक आहे. भारतीय राष्ट्रीयत्व हे भाषानुगामी आहे. याचा ढळढळीत पुरावा १९७१ साली पूर्व पाकिस्तान 'सोनार बांगला' 'सोनार बांगला' करीत पाकिस्तानातून फुटले, त्यावेळी सर्व जगालाच मिळाला.[४२] म्हणजे भारतीय राष्ट्रीयत्व हे एकमुखी नसून बहुमुखी आहे—युरोपचे असे बहुमुखी राष्ट्रीयत्व युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटीच्या योगाने आता उभे राहिलेच आहे. जीन मोने या फ्रेंच मुत्सद्याने १९४६ साली कॉमन युरोपियन मार्केटची कल्पना पुढे मांडली आणि अवघ्या तीस वर्षात युरोपचे नवे व्यक्तिमत्व उभे झाले. जीन मोने यास द्रष्टे-पणाचा लाभ झालाच होता. पण 'कॉमन युरोपियन मार्केट व युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटी' या दोन्ही विचारधारा ऐतिहासिक दृष्ट्या नवीन

नाहीत; या दोन्ही विचारधारांच्या आधारेच भारतीय उपखंडाची सांस्कृतिक, राजनैतिक आणि लष्करी एकता प्राचीन काळीच सिद्ध झालेली आहे. अफगाणिस्थानपासून ब्रह्मदेशापर्यंत आणि तिबेटपासून सिलोनपर्यंत अखंड सामायिक बाजारपेठ आणि एकजीव आर्थिक दळणवळण अगदी परवापरवा-पर्यंत होते. ब्रिटिशांची राजवट आल्यामुळे ही बाजारपेठ आणि हा आर्थिक एकजीवपणा गेला, असे वरवर दिसत असले, तरी ते खरे नाही. खरे कारण हे आहे की, खुष्कीचे मार्ग मागे पडून जलमार्गानेच व्यापारी वाहतूक सुरू झाली. भारतीय उपखंडाचे जनजीवन सुमारे दोन हजारवर्षे निर्धोकपणे परस्परावलंबी राहिले, याचे एकमेव कारण लहानमोठया बाजारपेठा एकमेकींशी खुष्कीच्या मार्गाने जोडलेल्या होत्या, हेच होय. जावासुमात्रापासून कॉन्स्टँटिनोपलपर्यंत संपूर्ण आशिया आणि युरोप हा मुख्यतः खुष्कीने जोडलेला होता. आसाम आणि अफगाणिस्थान या दोन्ही प्रांतांत त्यामुळे बाजारपेठांची मुख्य ठाणी होती.[४१]

## भारत हे राष्ट्र नव्हे; तर राष्ट्रसंघ !

हुंडीचा व्यवहार शिकारपूरसारख्या ठिकाणी प्रथम जन्माला येतो, हे लक्षात घेतले पाहिजे. शिकारपुरी हुंडीच्या भरवशावरच आंतरदेशीय व्यापारी उलाढाली होत. हे शिकारपूर सिंध–बलुचिस्थान यांच्या सीमेवर आहे. आधुनिक बँकिंग व्यवसायाचे जनकत्व इंग्लंड आणि हॉलंड यांच्याकडे असले तरी मुळात हुंडी हा बँकेचा मूळ आधार खुष्कीच्या मार्गावर, दोनतृतीयांश अंतराएवढ्या मार्गावर पसरलेल्या, भारतीय उपखंडातील हरहुन्नरी सिंधी लोकांनीच उभा केला. ही खुष्कीच्या मार्गाची साखळी प्रथम वॉस्को द गामाने पश्चिम भारतीय किनाऱ्याचा शोध लावल्यामुळे आणि नंतर बाष्प-यंत्राचा उपयोग करून मोठी जहाजे बांधण्याची विद्या युरोपियन लोकांनी वाढविल्यामुळे कायमची तुटली. भारतीय उपखंडाच्या सामायिक बाजारपेठेचा धुव्वा उडविण्याचेच कार्य पोर्तुगीज, डच, फ्रेंच आणि इंग्लिश या व्यापारी कंपन्यांनी केले—जलमार्गाने वाफेच्या इंजिनावर चालणाऱ्या जहाजांमार्फत आंतरदेशीय व्यापार सुरू होताच जुने रस्ते मागे पडले आणि जुन्या

बाजारपेठा ओस पडल्या. जलमार्गाने पूर्वी वाहतूक होतच नव्हती, असे नाही. पण ती खुष्कीच्या व्यापाराला पूरक अशीच होती. ओरिसाचा मध्ययुगीन सम्राट गजपति कपिलेंद्रदेव याने जलमार्गावरील व्यापाराची वाढ व्हावी यासाठी पंधराव्या शतकात नेटाने प्रयत्न केले होते, हे मात्र खरे. जावासुमात्रा, चीन आणि जपान यांच्याशी तर त्याने जलमार्गाने व्यापारी संबंध प्रस्थापित केलेच; पण रोमपर्यंत त्याची जहाजे जात असत. कपिलेंद्र-देवाच्या कारकीर्दीत जहाजबांधणीच्या उद्योगाला उत्तेजन मिळाले. बंगालच्या उपसागरातील जलवाहतूक कपिलेंद्रदेवाने आपल्या अमलाखाली आणली होती आणि नंतर शंभर वर्षे तरी ती ओरिसाच्या राजांच्याच धाकात होती. सुवर्णरेखेवरील ताम्रलिप्ति हे बंदर सोळाव्या आणि सतराव्या शतकात फार प्रसिद्धीस आले होते. डच, फ्रेंच आणि इंग्रज व्यापारी कंपन्यांना जावा-सुमात्राशी थेट जलमार्गानेच संबंध जोडण्यात यश मिळाल्यामुळे आणि बाष्पयंत्रावर चालणाऱ्या जहाजांच्या तुलनेत जुनी शिडांची जहाजे मागे पडल्यामुळे बंगालच्या उपसागरावरील ओरिसाचे प्रभुत्व लोप पावले—प्रथम फ्रेंच आणि मग इंग्रज व्यापारी कंपन्यांनी आपला जम इकडे बसविला. पण कपिलेंद्रदेवाचे वैशिष्ट्य हे की, एका हाती तराजू आणि दुसऱ्या हाती तलवार अशी नीती त्याने स्वीकारली होती. पुढे जवळ जवळ दोनशे वर्षांनी ही नीती इंग्रजांनी अंगिकारली. भारतीय उपखंडाची सामायिक बाजारपेठ अशा रीतीने खुष्कीच्या मार्गाचे महत्व घटल्यामुळे आणि सागरी व्यापारावरील भारतीयांची पकड गेल्यामुळे दोन्हीकडून उध्वस्त झाली. सारांश, भारत हे एक राष्ट्र नसून राष्ट्रसंघ आहे. हा राष्ट्रसंघ आर्थिक आणि व्यापारी संबंधांनी पूर्वापार घट्ट बांधला गेलेला आहे. पण जलमार्गावरील व्यापार वृद्धीमुळे या राष्ट्रसंघाची आंतरिक घडी पूर्ण विस्कटून गेली. आपला हा राष्ट्रसंघ मोडून पडला आहे, हे औरंगजेबास कळले नव्हते. म्हणूनच तो या राष्ट्रसंघाच्या रक्षणार्थ दक्षिणेतच ठाण मांडून बसला. मराठी लोकजीवनाची द्रव्याधिष्ठित घडी बसविण्यास निघालेल्या शिवछत्रपतींना मात्र या बदलत्या आर्थिक संदर्भांची पूर्ण जाण आलेली असावी. म्हणूनच त्यांनी 'आरमार म्हणजे स्वतंत्र राज्यांगच आहे. जैसे ज्यास अश्वबळ त्याची पृथ्वी प्रजा आहे, तद्वतच ज्याजवळ आरमार त्याचा समुद्र.' असे स्पष्टपणे 'आज्ञापत्रा' त लिहून ठेवले आहे.[४४]

## संपूर्ण देशालाच 'वसाहत' कोणी ठरविले ?

जात ही ज्या 'अखिल भारतीय'त्वाला आडवी जाते, ते 'भारतीय'त्वच या देशात नवखे व उपरे आहे. हे न जाणल्यामुळेच मार्क्सवादी विचारवंत संपूर्ण भारतीय समाज हाच एक सलग समाजिक घटक मानून सैद्धान्तिक विश्लेषण करतात. मराठी समाज आणि मारवाडी समाज यांचा इतिहास, संस्कृति, जीवन सर्व काही एकच मानून ते इतिहासाचा अर्थ लावू पाहतात. बंगाली आणि तमीळ लोकांचे एकच राष्ट्र आहे, असे समजून जर कोणी त्याची स्थिती तपासून जाईल तर त्याच्या पदरी निराशाच येईल. मार्क्सवादात अभिप्रेत असलेले भौतिक गतिशास्त्र भारतीय समाजाला लावावयाचे असेल, तर ते वेगवेगळ्या भाषिक गटांना वेगवेगळे लावून पाहिले पाहिजे. मराठी लोकांचे राजकारण, समाजकारण धर्मकारण हे ढोबळपणे 'भारतीय' धर्तीचे असले तरी ते अन्य भारतीय समाजांहून भिन्न आहे. सर्व मराठी भाषिकांचे मिळून एकच राज्य असावे यासाठी महाराष्ट्रभर जो प्रचंड राजकीय उठाव झाला तो या वेगळेपणाचाच पुरावा होय. मराठी लोकजीवन हे अन्य भाषिक समुहांप्रमाणेच एक भारतांतर्गत राष्ट आहे, अशी जी वस्तुस्थिति आहे, ती मान्य केल्याखेरीज सत्यशोधक समाजाच्या स्थापनेमागचा हेतू किंवा महात्मा फुले यांचे कार्य यांचा उलगडा होऊ शकणार नाही. उदाहरणार्थ, महात्मा फुले यांच्या जीवनकार्याचा अभ्यास करतांना 'एका वसाहतीतील सांस्कृतिक बंड' अशी भूमिका घेऊन विश्लेषण केले जाते.[४५] मराठी लोकजीवन हे कधीही ब्रिटिशांची वसाहत या रुपात उतरले नव्हते. उलट ब्रिटिश राजवटीत ते अत्यंत मुक्त लोकजीवन होते. ब्रिटिशांच्या साक्षीने मराठी समाजाने आपली सर्व अंतर्गत भांडणे वेशीवर टांगली. या भांडणाचा लाभ ब्रिटिशांनी उठविला; पण ज्या अर्थाने दक्षिण आफ्रिकेत गोऱ्या लोकांची 'वसाहत' आहे, तिकडे जो वसाहतवाद आहे, तशी वसाहत इकडे कधीच नव्हती.

किंबहुना, महात्मा फुले यांचे वैशिष्टय हे की, ब्रिटिश सत्तेचाच उपयोग करून घेण्याचे नवे तंत्र त्यांनी शोधले. परकीय सत्तेच्या आहारी न जाता तिलाच आपल्या हितासाठी कशी राबवावयची याचेच दिग्दर्शन त्यांनी केले. १८५८ सालचा राणीचा जाहीरनामा म्हणजे ब्रिटिश साम्राज्यांतर्गत भारतीय

स्वायत्तताच घोषित करणारा संदेश होता. महात्मा फुले यांचे कार्य कुठल्याही दृष्टीने 'वसाहतीतील सांस्कृतिक उठाव' म्हणता येत नाही. मुख्य म्हणजे, ब्रिटिशांची राजवट आली म्हणून आपण गुलाम झालो, ही महात्मा फुले यांची भूमिकाच नाही. 'गुलामगिरी'ची त्यांची व्याख्या ब्रिटिशसत्तेशी सापेक्ष अशी नव्हतीच; ती सर्वस्वी आंतरिक समाजबंधनांशी सापेक्ष होती. ब्रिटिशांची राजवट कायम राहावी, असे त्यांना वाटत नव्हते; पण तात्काळ जावी, असेही वाटत नव्हते. त्यांच्या मनावर ब्रिटिशांच्या सत्तेचा कुठलाच दाब नव्हता. ते स्वतःला स्वतंत्रच समजत होते–ब्राह्मणशाही उलथून फेकून देण्याइतके ते स्वतःला समर्थ मानीत होते.

## एकूण घराचे वासेच फिरले !

महात्मा फुले ज्या काळात जन्मले आणि वाढले तो काळ महाराष्ट्रातील आर्थिक संक्रमणाचा काळ होता.[४५] हे संक्रमण एका बाजूने पेशवाईतील सावकारी घराण्याचा ऱ्हास आणि दुसऱ्या बाजूने ब्रिटिश राजवटीतील व्यापारी घराण्यांचा उदय असे दोन प्रकारचे होते. पेशव्यांची राजधानी पुण्यात असल्यामुळे तिथे चैनीच्या आणि भारी किमतीच्या वस्तू घेऊन सर्व देशातून व्यापारी येत असत. पेशवाई नष्ट झाल्यामुळे हा व्यापार एकदम थंडावला. पेशवे दरबारच्या खाजगी आणि लष्करी खर्चासाठी जो पैसा सावकारांकडून आगाऊ उचलला जाई तोही व्यवहार पेशवाईच्या अस्तानंतर बंद पडला. पेशवाईतील शेतसारा वसूल करणारे पाटील देशमुख सावकारांकडून कर्ज घेऊन साऱ्याचा भरणा सरकारी खजिन्यात करीत असत. याही व्यवहाराला पेशवाई गेल्यामुळे खंड पडला. अशा रीतीने सावकारी व्यवहारांत खेळणारा पैसा कमी कमी होत गेला. हातमागाच्या व्यवसायात जो पैसा गुंतलेला होता तो ब्रिटिश सरकारने त्यावरील कराचा बोजा एकदम पांच-सहा पटीने वाढविल्यामुळे एकदमच बुडाला. विशेषत, कोष्टाऊ मालाला पूर्वी राजदरबारी किंवा सरदारदरकदारांच्या घरी जी मोठ्या प्रमाणावर मागणी असे तीच नाहीशी झाली. पूर्वी जी मंडळी उंची वस्त्रे वापरावयाची ती आता जाडेभरडे वस्त्र लेवू लागली. जडजवाहिरे आणि रेशमी वस्त्रे यांचा व्यापार जवळजवळ

बुडालाच. पुण्यातील रेशीम उद्योग पैठणच्या खालोखाल मानला जाई, तोही बसला. पूर्वी पेशवाईत मोठ मोठ्या हुद्यांवर ब्राह्मणांची वर्णी लागावयाची. ते हुद्देच निकालात निघाले. पण ह्या ब्राह्मण वर्गाने नवीन ब्रिटिश राजवटीशी तात्काळ जुळवून घेतले. सरकार दरबारी दुय्यम दर्जाची कामे पत्करून त्यांनी आपली रोजीरोटीची चिंता मिटविली; त्यामानाने कुणबी मराठ्यांचे बरेच नुकसान झाले. त्यांचा पेशा ब्राह्मणांप्रमाणे कारकुनी नव्हता. लष्करी हुद्यांवरच त्यांचा भरणा असे, परंतु ब्रिटीश राजवट येताच या लष्करी हुद्यांवर त्यांची नेमणूक होण्याचे सर्व मार्ग बंद झाले. त्यामुळे बिगरसरकारी उद्योग व्यवसायात शिरून अंगमेहनत करण्याशिवाय त्यांना दुसरा मार्ग उरला नाही. या जातीतील पाटील देशमुखांचा वर्ग पेशवाई बुडाल्यामुळे एकदमच उघडा पडला.

## तिहेरी जाचामुळे दारिद्र्याची खाई

सामान्यतः ज्याच्याजवळ चाळीसपन्नास एकर जमीन होती असा मोठा शेतकरी वर्षाकाठी शेसव्वाशे रुपयांचे उत्पन्न कसेबसे मिळवू शके. त्यात त्याने उस लावून गुऱ्हाळ चालवले तर आणखी दोनेकशे रुपयांची भर त्याच्या उत्पन्नात पडे. असा शेतकरी आपल्याकडे जास्तीत जास्त दोन किंवा तीन औत आणि त्यांना लागणाऱ्या बैल जोड्या ठेवी. पण ह्या सर्व उत्पादनाचा पसारा तो कोणातरी सावकाराकडून पिकाच्या तारणावर कर्जाऊ रक्कम घेऊन उभा करीत असे. त्यापोटी त्यास जवळजवळ वीस ते पंचवीस टक्के व्याज द्यावे लागे. कर्ज-फेडीनंतर एकूण उत्पादनाच्या अवघी वीस टक्के मिळकत शेतकऱ्याच्या पदरी पडे. म्हणजे खाजगी उद्योगावर कराचा बोजा, शेतीवर सावकाराचा तगादा आणि तलवार गाजवण्याला सरकारी मनाई अशा तिहेरी जाचामुळे नागपूरपासून बागलकोटपर्यंतचा मराठी माणूस दारिद्र्याच्या खाईत लोटला गेला होता. अशा परिस्थितीत कारकुनी पेशाच्या ब्राह्मणी व्यवसा-यालाच मोठी बरकत आली होती. पेशवाईच्या उत्तर काळात रोज चाळीस पन्नास हजार ब्राह्मणांची पंगत पुण्यात उठत असे. त्यावर दरवर्षी पन्नास हजार रुपयांचा खर्च होई. तेवढी रक्कम 'एल्फिस्टन' साहेबांने कृपावंत होऊन दक्षिणा फंडासाठी राखून ठेवली. त्यामुळे ब्राह्मण वर्गाचे दिवस निदान पुण्यात

तरी पुष्कळच बरे होते. पण त्यामुळेच पुणे शहरात ब्राह्मण वर्गाविषयी अन्य जातींमध्ये मत्सराची आणि वैमनस्याची भावना रूजली. अर्थात् या वैमनस्याला शिंदे, होळकर आणि पेशवे यांच्या आपसातील अटीतटीच्या लढायांची पार्श्वभूमी होतीच. तेलीतांबोळी, सुतार आणि न्हावी याचे व्यवसाय तसे फारसे बुडाले नाहीत. त्यामुळे त्यांची ब्राह्मणवर्गाकडे पाहण्याची दृष्टी पुष्कळच आपुलकीची होती. बागायतीची शेती करणारा माळी आणि शेतीची अवजारे पुरवणारा लोहार हाही दिवाळखोरीच्या संकटातून वाचला होता. कुंभार आणि चांभार यांचे व्यवसाय हरघडीचे म्हणून टिकून होते. पण एकूणच आर्थिक जीवन घसरगुंडीला लागलेले असल्यामुळे त्यांना मोठी बरकत होती असे म्हणता येत नाही. याचे एक कारण हेही होते की शेतकऱ्यांकडून या मंडळींना बलुत्याच्या रूपाने धान्य मिळत असे. पण शेतीबाहेरच्या अवजारांची आणि आयुधांची मागणी घटल्यामुळे लोहार, सुतार, चांभार यांच्या व्यवसायात मंदी आलीच होती. सर्वसामान्यपणे कुठल्याही व्यवसायात वर्षाकाठी तीस ते पस्तीस रुपये रोजंदारीवर काम करणाऱ्याला मिळत. रोजीचा दर दोन पै होता. नागपूर वऱ्हाडकडे दहावीस औतांची शेती असणारे बरेच शेतकरी होते. त्यामुळे या भागात शेतीचा व्यवसाय तेजीत होता.

## मुंबईकडे ओढा लागला

नागपूरची लोकसंख्या १८२० च्या सुमारास चाळीस हजार होती. तेथे कोष्टी आणि तेली यांचीच संख्या सर्वात अधिक होती. त्यावेळी नागपुरात सुमारे चार हजार माग आणि पंधराशे तेलघाण्या होत्या. वैनगंगेच्या खोऱ्यात सुमारे चार हजार मण गुळाचे उत्पादन दरवर्षी होई. पण हा गुळ नागपूर वऱ्हाडच्या बाहेर जाई असा पुरावा नाही. पण नागपूरचे कापड-मात्र मोठ्या प्रमाणावर पुणे, औरंगाबाद किंवा इंदोर, ग्वाल्हेरकडे जाई. पेशवाई असतांना दरवर्षी बारा ते पंधरा लाखाचा कोष्टाऊ माल पुण्याच्या बाजारात येई. पेशवाई बुडाल्यानंतर तो दरवर्षी अवघा तीन लाखांवर आला.

भोसल्यांचे राज्य जाताच मराठा समाजातील सरदार आणि सावकार मागे पडले. त्याची जागा नंतरच्या पंधरावीस वर्षात

मारवाडी व्यापारी आणि सावकार यांनी घेतली. नागपुरातून दरवर्षी किमान पन्नास लाखांचा हुंडीचा व्यवहार होई. त्यातील निम्मा बनारसशी आणि उरलेला पुणे, औरंगाबाद, इंदोर यांच्याशी चाले. खाली दक्षिणेत कोल्हापूरकडे वळलो तर असे दिसते की तेथेही शेतीपासून कागद उद्योगापर्यंत सर्व व्यवसाय सावकाराच्याच तावडीत सापडले होते. अवघे पाच टक्के व्यावसायिक कर्जमुक्त असतील. बाकी सावकाराचे घर भरण्यासाठीच रात्रंदिवस राबत होते. कोल्हापूर संस्थानचे उत्पन्न वीस लाखांचे आसपास होते. कोल्हापूर संस्थानातील एकूण संपत्तीचा आढावा घेतला तर शेतजमिनीची किंमत धरून दोन कोटीचे जवळपास संपत्ती होती असे म्हणता येते. ही संपत्ती कुठल्याही प्रकारे पैशात रूपांतरित झाली नव्हती. त्यामुळे व्यापारात खेळत्या भांडवलाचा सदैव तुटवडाच भासत असे. साहजिकच कोष्टयापासून शेतकऱ्यापर्यंत सर्वजण कर्जबाजारीच होते. या कालखंडात खानदेशात आणि मराठवाड्यात वारंवार दुष्काळ पडल्यामुळे भिल्लांच्या दरवडेखोरीला ऊत आलेला होता. पैठणचा रेशमाचा उद्योग याच कालखंडात डबघाईस आला. तंट्या भिल्लासारख्या एखाद्या दरवडेखोराला हाताशी धरून जुनी पाटील देशमुख मंडळी नवीन ब्रिटिश राजवटीला कोलदांडा घालीत होती. बडोद्याचे गायकवाड आणि कंपनी सरकार यामध्ये या भिल्लांच्या प्रकरणी मोठाच वाद झाला आणि तो जवळजवळ वीस वर्षे टिकला.[४७] खानदेशात दरवडे घालणाऱ्या भिल्लांना गायकवाड आश्रय देतात असा ब्रिटिशांचा त्यांच्यावर आरोप होता.

## लावजी आणि वीरजी हेच मुंबईचे खरे जनक

कोकणात महाड, राजापूर, दाभोळ या बंदरांवरील वाहतूक रोडावली होती. कारण या बंदरांतून इराणच्या आखाताशी चालणारा व्यापार ब्रिटिशांनी अरब व्यापाऱ्यांची नाकेबंदी केल्यामुळे जवळ जवळ थांबला होता. कोकणचा राबता पुण्याकडे आणि कोल्हापूरकडे होता, तो १७५० नंतर मुंबईकडे होऊ लागला. मुंबई बेट १६६८ साली ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात आले. त्यावेळी या बेटावरचे वातावरण मनुष्यवस्तीला फारसे सोयीचे नव्हते. तरीही आपल्या संरक्षणाच्या दृष्टीने ते सोयीचे ठिकाण आहे हे लक्षात घेऊन अवघ्या

बीस वर्षांनीच कंपनीने सुरतेची वखार मुंबईला हलवली. पूर्वी सुरतेला असतांना ज्या गुजराथी आणि पारशी लोकांचा संबंध कंपनीशी आला त्यापैकी काही प्रमुख मंडळी कंपनीबरोबर मुंबईला येऊन पोचली. या गुजराथी आणि पारशी लोकांचा मुख्य व्यवसाय आयात निर्यात व्यापार हाच होता. हीच मंडळी चीनला कापूस आणि अफू पाठवीत असत. त्याचबरोबर सुरतेचा जहाज बांधणीचा उद्योगही हळूहळू मुंबईकडेच वळला. मुंबई बंदर सुरवातीस या जहाजबांधणीच्या उद्योगामुळेच एकदम पुढे आले. मुंबईतील पारशी समाजाचे ज्यांना मूळ पुरुषच म्हणता येईल असे लावजी नसरवानजी हे सूरतेहून १७३५ साली कंपनीच्या गोदी कारखान्याचे प्रमुख म्हणून मुंबईला आले. या गोदी कारखान्यातून पुढे सव्वाशे वर्षे उत्तमोत्तम जहाजे बांधण्यात आली. १८१० साली तर ८४ तोफांचे लढाऊ जहाज बांधण्यात आले. या शे-सव्वाशे वर्षात मुख्यतः जहाज बांधणीचा धंदा आणि परदेश व्यापार या दोन व्यवसायांच्या जोरावर पारशी समाजाने अमाप संपत्ती कमावली. याच बरोबर वीरजी होरा नांवाचे एक गुजराथी सावकार सुरतेलाच कंपनीच्या संबंधात आले होते. होरा हे सुरतेमधील सर्वात श्रीमंत व्यापारी होते. त्यावेळी जगातील सर्वात श्रीमंत माणूस म्हणून कंपनीच्या परिसरात त्यांचा गवगवा होता. कंपनीचे मुख्य ठिकाण मुंबईला आल्यानंतर कंपनीला वेळोवेळी साथ देणारे अनेक गुजराथी व्यापारी व सावकार मुंबईला येऊन पोचले. कंपनीच्या नोकरांना खाजगी व्यापार करण्यासाठी ही गुजराथी मंडळी अमर्याद पैसा कर्ज रूपाने पुरवीत. या गुजराथी मंडळीमध्ये हिंदूबरोबरच बोहरा आणि होजा या दोन इस्माइली जमातीच्या व्यापाऱ्यांचाही समावेश होता. पारशी, गुजराथी आणि बहाई लोक व्यापाराकरता सुरतेहून पैसा घेऊनच येथे आले. अंग-मेहनतीचे काम करण्यासाटी कल्याण आणि वसई भागातील कोळी मुंबई बेटातील कोळ्यांबरोबर अगदी गुलामासारखेच उपलब्ध होते. कोळी लोक आपले गुलामच आहेत अशी ब्रिटिशांची ठाम समजूत होती आणि त्यांनी इतरांच्यापेक्षा कमी रोजगारावर काम करावे असा त्यांचा हट्ट असे. १७४० नंतर त्यांना पहिल्यांदा दरमहा आठ आणे वेतन मिळू लागले. हे कामगार मुख्यतः गोदीतच काम करीत. त्यामुळे जहाजे बांधण्याचा खर्च इंग्लंडातील जहाज बांधणीपेक्षा पंचवीस टक्क्यांनी कमी येई. येथील कारागिरी उत्तम दर्जाची

असल्यामुळे मुंबई गोदीतील जहाजांना इंग्लंडातही चांगली मागणी होती. विशेषतः कंपनीची व्यापारी वाहतुक मुंबईत बांधलेल्या आपल्या जहाजांमधूनच होई. त्यामुळे इंग्लंडातील गोदी कारखाने बंद पडतील की काय अशी भीती १८३०–३५ नंतर निर्माण झाली. पुढे १८५८ साली कंपनीच बुडाली. इंग्लंडातील गोदी कारखानदारांचे दडपण आल्यामुळे ब्रिटिश सरकारने मुंबईतील गोदीनंतर बंदच करून टाकली."[४४]

## हे द्वैत आणि हे द्वंद्व केव्हा जन्मास आले ?

हा जहाज उद्योग सुरू झाला तेव्हांच मुंबईत :हातमागाच्या धंद्यालाही कंपनीने हात दिला होता. सुरतेहून आलेली गुजराथी मंडळी कंपनीला उंची तलम वस्त्रांचा पुरवठा करण्याचा ठेका घेत आणि विणकरांना सूत पुरवून कापड विणून घेत. मुंबईतील हातमाग व्यवसाय अशा रीतीने परदेशव्यापाराच्या निमित्ताने सुरू झाला तरी नंतर कंपनीच्या आरमाराला आणि पायदळाला कपडा पुरवण्याचा ठेकाही गुजराथी व्यापाऱ्यांना मिळत गेला. १८१३ पासून १८३३ या वीस वर्षांच्या काळात हिंदुस्थानचा कापडउद्योग रसातळाला गेला. १८१३ मध्ये जवळजवळ ५३ लाखाचे कापड निर्यात झाले होते आणि एक लाखाच्या जवळपास किंमतीचे कापड आयात झाले होते. १८३३ मध्ये कापडाची निर्यात ८०–८२ हजारांवर आणि आयात ४३ लाखांवर गेली. १८२५ पर्यंत सुताची आयात या देशाला माहीतच नव्हती. पण १८३३ साली चाळीस लाखांहून अधिक किमतीचे सूत हिंदुस्थानात आले. या वीस वर्षांतील उलाढालीमुळे बंगाल बिहारचा कोष्टी समाज धुळीला मिळाला पण मुंबईतला वाचला. इतकेच नव्हे, तर पुढे तो वाढला. कारण ही जी सुताची आयात सुरू झाली त्यातून मुंबईतील विणकरांकडून तलम वस्त्र विणून घेऊन गुजराथी व्यापारी ते परत विलायतेला पाठवू लागले. आणि त्यातूनच पुढे कापडाच्या गिरण्यांचेही नवे युग मुंबईत अवतरले.

मुंबईतील हातमागाच्या वाढणाऱ्या धंद्यात काम मिळते म्हणून कोकण-किनाऱ्यावरील थेट सावंतवाडीपासून गरजू लोकांची मुंबईकडे रीघ लागली.

१८१८ साली पेशवाई पूर्ण बुडाल्यानंतर कोकणातील खोत मंडळींचा व्यापार व्यवहार थंडावलाच होता. त्यामुळे त्यांच्याकडे पूर्वी कामास राहणारी माणसे बेकार होऊन रोजगार धुंडाळतच होती. त्यांना मुंबई हे जणु मधाचे पोळेच वाटले. महाराष्ट्रात इतरत्र आर्थिक हलाखीचा काळ असतांना मुंबईत मात्र नवनव्या आर्थिक उलाढालींचे तेजीचे युग आले होते. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व जातीजमातींच्या लोकांचा ओढा मुंबईकडे झाला. महाराष्ट्रात दारिद्र्य आणि मुंबईत समृद्धी असे जे द्वैत आपणास विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात दिसते ते तसेच मुळात १८२५ ते १८५० या पंचवीस वर्षात जन्माला आले. १८३५ साली कंपनीने आपले स्वतःचेच नाणे भारतीय बाजारपेठेत आणले. त्यामुळे जगतशेठ, नगरशेठ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मोठ्या हुंडेकऱ्यांचा धंदा एकदमच बसला. या हुंडेकऱ्यांचे मुख्य काम निरनिराळी नाणी घेऊन ज्याला जे पाहिजे ते नाणे पुरवणे हा होता. तसेच जे नाणे लोकांमध्ये भरोशाचे राहिले नाही ते वितळून टाकण्यासाठी टांकसाळीकडे पाठविणे हाही त्यांचा एक उद्योग होताच. या दोन्हीं उद्योगांमध्ये जी दलाली मिळे ती प्रचंडच होती. कधीकधी मूळ नाण्याच्या पन्नास टक्के देखील त्यातून मिळत. कारण कोणते नाणे खरे आणि कोणते खोटे हे ठरविण्याचा सर्वाधिकार या नगरशेठांकडेच होता. कंपनीचे स्वतःचे नाणे आल्याबरोबर देशातील खाजगी टांकसाळी बंद पडल्या. खुद्द मुंबई बंदरात कंपनीचीच टांकसाळ होती. ती पूर्वी सुरती रुपयाच काढीत असे. पण तरीही मुंबईत नाण्यांची देवघेव करणारे सावकार होतेच. त्यांचा धंदा बसल्यामुळे कंपनीने त्यांना सुताच्या व्यापारात फार मोठी सवलत दिली. अशा रीतीने मुंबईतील कामकरी मराठी आणि धनिक गुजराथी, पारशी असे द्वंद्व १८२५ ते १८५० या पंचवीस वर्षांच्या काळातच निर्माण झाले.

## मार्क्स हाही मेकॉलेचाच शिष्य !

युरोपमध्ये याच कालखंडात औद्योगीकरणाची नवी लाट आली आणि स्थिरावली. इतकेच नव्हे तर १८४८ साली जगातील सर्व कामगारांनी एकत्र येऊन भांडवलशाहीचा निचरा करावा अशी भूमिका घेऊन कार्ल मार्क्स

जगापुढे आला. हा साम्यवादी जाहीरनामा म्हणजे जगाची विभागणी आहेरे आणि नाहीरे या दोन वर्गात झाली असल्याचा डिंडिमच होता. पण ही जी क्रांतीची लाट आली असे वाटले होते तो केवळ भास ठरला. ही लाट आभास कां ठरली याचे विश्लेषण करीत असतांना कार्ल मार्क्स यास, भांडवलशाहीला आपल्या विस्तारासाठी युरोपच्या बाहेर आशिया खंडात जे मोकळे रान मिळाले होते, ते दिसले. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने हिंदुस्थानात निर्माण केलेले साम्राज्य हिंदुस्थानच्या इतिहासात अभूतपूर्व होय, असे सांगतांना कार्ल मार्क्स म्हणतो, "इंग्लंडने हिंदुस्थानातील लोकजीवनाची एकूण चौकटच उध्वस्त करून टाकली. पण नवी समाजघटना कशी असेल याचे काहीच चिन्ह अद्याप दिसत नाही. ब्रिटिशांच्या राजवटीतील हिंदुस्थान हा आपल्या संस्कृतीपासून आणि इतिहासापासून पूर्णपणे तोडला गेलेला आहे. असे जरी असले तरी आशियातील सामाजिक जीवनात मूलभूत परिवर्तन केल्याशिवाय मानवजातीला आपले भवितव्य हस्तगत करता येईल काय? म्हणून इंग्लंडचे हिंदुस्थानातील क्रौर्य कितीही घोर असले तरी इंग्लंडच हिंदुस्थानातील सामाजिक क्रान्तीचे नकळत वाहन बनलेले आहे. इंग्लंडला हिंदुस्थानात दुहेरी कार्य करावयाचे आहे. जुनी आशियाई समाजव्यवस्था नष्ट करावयाची आहे आणि तिथे पाश्चात्य समाजाच्या संस्कृतीची पायाभरणी करावयाची आहे. पहिले कार्य विघातक असले तरी दुसरे विधायक आहे." हे विश्लेषण पाहता कार्ल मार्क्स याच्यावरही लॉर्ड मेकॉले याचा प्रभाव होता असे म्हणतायेईल.[४९] मार्क्सने पुढे इंग्लंडच्या या विधायक कार्याची काही लक्षणे नमूद केली आहेत. ती अशी : "(१) राजकीय ऐक्य—मोगल साम्राज्यापेक्षाही अधिक पक्के आणि विस्ताराने मोठे असे हे ऐक्य आहे. हे राजकीय ऐक्य विजेच्या तारायंत्रामुळे अधिकच बळकट आणि टिकाऊ ठरणार आहे. (२) देशी फौज—१८५७ नंतर एकूण सैन्याच्या एकतृतीयांश फौज ब्रिटिश लोकांची झाली तरी खडे सैन्य एवढ्या मोठ्या प्रमाणावर पहिल्यांदाच उभे झाले आहे. (३) स्वतंत्र वृत्तपत्रसंस्था—आशियाई समाजात पत्रकारितेचा उदय असा पहिल्यांदाच झाला. (४) जमिनीमध्ये खासगी मालकीचे युग आले. (५) नाखुशीने कां होईना पण हिंदुस्थानात सरकारी कारभाराच्या गरजा पूर्ण करणारा आणि युरोपीय विज्ञानाने भारून गेलेला नवा सुशिक्षित

वर्ग तयार केला. (६) युरोपशी नियमित आणि जलद दळणवळण."[५०] एवढे सांगितल्यावर मार्क्सने आणखी एका विधायक कार्याचा उल्लेख केला आहे. मार्क्स म्हणतो, "आपल्या इंग्लंडातील कापडगिरण्यांसाठी कापूस स्वस्त दरात उपलब्ध व्हावा म्हणून हे गिरणीमालक हिंदुस्थानात रेल्वेचे जाळे टाकीत आहेत हे मी जाणतो. पण तुम्ही एकदा कां वाहतुकीच्या साधनांचे यांत्रिकीकरण केले की त्या देशात लोखंड आणि कोळसा यांचा मुबलक साठा असल्यामुळे ते स्वतःच आपली यंत्रे बनविल्याशिवाय राहणार नाहीत. एवढे मोठे रेल्वेचे जाळे बांधल्यानंतर रेल्वे वाहतुकीला आवश्यक असलेली यांत्रिकी विद्या तेथे नेल्यावाचून तुम्हाला गतीच नाही. ही यांत्रिकी विद्या तेथील लोक आपोआपच जीवनाच्या अन्य क्षेत्रात नेतील. रेल्वे हीच हिंदुस्थानात औद्योगिकरणाची अग्रदूत ठरेल. तो जो आधुनिक उद्योग तिथे सुरू होईल तोच तेथील आनुवंशिक जातीव्यवस्थेची पाळेमुळे खणून काढील. ही जातीव्यवस्थाच हिंदुस्थानच्या प्रगतीची आणि सत्तेची वाट अडवून बसली आहे. परंतु जोवर इंग्लंडात कामगार सत्ता येत नाही किंवा हिंदू लोकच ब्रिटिशांचे जोखड आपल्या मानेवरून फेकून देत नाहीत तोवर या औद्योगीकरणाचे फळ हिंदुस्थानला चाखता येणार नाही."

## मार्क्सचे हे अज्ञान डाव्या विचारसरणीत घुसले

मार्क्सने हिंदुस्थानातील जातीव्यवस्थेला रेल्वेमुळे शह बसेल असे म्हटले आहे. रेल्वेतील प्रवासात जातीबंधने सहजगत्याच शिथिल होत गेली हे खरेच. पण त्याचबरोबर आणखीही एका ब्रिटिश अहेरामुळे जातीबंधने शिथिल झाली. हा अहेर म्हणजे १८३५ साली हिंदुस्थानात करण्यात आलेली चहाची लागवड. पुढे विसाव्या शतकाच्या सुरवातीस हिंदुस्थानात चहा लोकप्रिय करण्यासाठी तो घरोघर काही काळ फुकट वाटण्यात आला. चहाने जी क्रांती केली त्याचा पोवाडा माझ्या आईनेच, सौ. सीताबाई राजाराम जोशी यांनी, रचला होता. तो मेळ्यांमध्ये १९३० च्या सुमारास गायिलाही गेला; पण तो अजूनही अप्रकाशितच आहे." तो असा :

" कलियुगी चमत्कार एक झाला चहानी वेडं केलं सर्वांना ॥

काय वर्णू त्याचे गुण, एक घर नाही सुनं,
घराघरात शिरून हा बसला ॥ १ ॥

सोपा करण्यालाही फार, पिण्यालाही लज्जतदार,
नव्या दमाचा उल्हास हा गमला ॥ २ ॥

सर्व हिंदू मुसलमान, कुठे भेद नाही जाण,
बसविले लोक एक रांगेला ॥ ३ ॥

आई आका आणि ताई, माई काकू सूनबाई,
कडकडीत हा सोवळ्यात शिरला ॥ ५ ॥

असा शुद्ध झाला बाळ, नाही कोठेही विटाळ,
मायबहिणींना भारीच प्यार झाला ॥ ६ ॥

कुठे महाराचे पोर, कुठे शास्त्रीबुवा थोर,
आणविले दोघे एका पंक्तीला ॥ ७ ॥

दहिदूधलोणी चोर, चहुकडे कीर्ति थोर,
त्या कृष्णाच्या कपाळी हा आला ॥ ८ ॥

जरी अन्नाचीही वाण, तरी चहाचा सन्मान,
करीतसे रोज दोन वेळेला ॥ ९ ॥

कलियुगी चमत्कार एक झाला, चहानी वेडं केलं सर्वांना ॥

ही चहाची क्रांती खरोखर ब्रिटिशांचीच देण होय. पण मुळात हा चहा ब्रिटिशांनी चिनी चहाशी जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करता यावी म्हणून आसामच्या डोंगरांवर लागवड करण्यासाठी आणला. ही लागवड सुरळीत व्हावी म्हणून तेथील जमिनीवरचा आसामी लोकांचा मूळ हक्कच त्यांनी काढून घेतला. आसामी लोकांना आसाममध्ये जमीन खरेदी करण्यास पूर्ण बंदी करण्यात आली. हिंदी लोकांनी काढलेली पहिली जॉइंट स्टॉक कंपनी १८३९ साली बंगालमध्ये चहाचे मळे लावण्यासाठी स्थापन झाली. आसामात जसे सर्व जमिनीचे भांडवलीकरण झाले, तसे तत्पूर्वी हिन्दुस्थानात

अन्यत्र कुठेही झाले नव्हते. या दृष्टीने हिंदुस्थानातील भांडवलशाहीचा उगम आसामच्या चहाच्या मळ्यात आढळतो. हे त्यावेळी मार्क्सच्या लक्षात येणे कठीण होते. कारण चहाचा जगभर एवढा प्रसार होईल अशी मार्क्सच्या हयातीत कुणालाच कल्पना येण्याजोगी नव्हती. आसाममध्ये सर्व जमिनीचे असे परकीकरण झाले, तसे काही महाराष्ट्रात कधीच घडले नव्हते. त्यामुळे महाराष्ट्राला वसाहतीचे स्वरूप कधीच आले नाही., आसाम मात्र पूर्णपणे ब्रिटिशांची वसाहत करण्यात आला होता."[१] त्यामुळेच तेथे बंगाली भाषिकां-व्यतिरिक्त अन्य भारतीय लोकांना प्रवेशास मुक्त मुभा नव्हती. इतकेच काय तेथील लोकांची भाषा जी आसामी ती देखील स्वतंत्र भाषा नसून बंगालीची केवळ एक बोली आहे अशी जबरदस्ती करण्यात आली होती. असा कोणताही अत्याचार महाराष्ट्रात झाला नसल्यामुळे कोणत्याही अर्थाने महाराष्ट्र ब्रिटिशांची वसाहत ठरत नाही. मात्र महात्मा फुले यांच्या कार्याचे विश्लेषण करीत असतांना डाव्या विचारसरणीच्या लेखकांकडून महाराष्ट्राला ब्रिटिशांची वसाहत मानून मीमांसा करण्याची चूक वारंवार होत आली आहे. आसाम आणि महाराष्ट्र यामधाल जमीन महसूलाची व्यवस्था तौलनिक दृष्टीने एकत्र अभ्यासल्याशिवाय ही चूक त्यांची त्यांना कळणार नाही. पण मुळात मार्क्सने किंवा एंजल्सने भारतातील महसूल पद्धतीचा आणि त्यात ब्रिटिशांनी केलेल्या बदलाचा प्रांतवार विचार केलेला नसल्यामुळे आसामच्या जमिनीचे भांडवली-करण कसे झाले हे त्या दोघांनीही कुठेच सांगून ठेवले नाही. त्यामुळेच डाव्या विचारसरणीच्या अभ्यासकांकडून ब्रिटिशांची राजवट म्हणजेच ब्रिटिशांची वसाहत असे समीकरण नकळत होत असावे. हा फरक न कळल्यामुळे महात्मा फुले यांचे कार्य नेमके कोणते याचा उलगडा त्यांना होऊ शकला नाही.

## ईस्ट इंडिया कंपनीला एकराष्ट्रवाद अमान्य होता

मार्क्स ज्या राजकीय ऐक्याचा विधायक ब्रिटिश कार्यात समावेश करतो ते राजकीय ऐक्य वरवर दिसणारे होते. ब्रिटिशांनी संपूर्ण भारतीय उपखंडाची संरक्षण नीती एकमुखी केली. हे ब्रिटिशांचे खरे विधायक कार्य आहे. हिंदुस्थानला ब्रिटिशांच्या रूपाने सम्राट अशोकासारखी एकछत्री चक्रवर्ती सत्ता पुनः एकदा मिळाली. पण राजा अशोकाने

ज्याप्रमाणे हिन्दुस्थानातील लहान राजांना केवळ मांडलिक करून मोकळे ठेवले तसेच ब्रिटिशांनीही केले. सहाशे संस्थाने अशी मांडलिकच होती. आणि जो भाग खुद्द ब्रिटिश अमलाखाली होता तोदेखील प्रथम बंगाल, मद्रास आणि मुंबई अशा तीन प्रांतात विभागलेला होता. या तिन्ही प्रांतांना स्वतंत्र आणि स्वायत्त शासनयंत्रणा होती. या तिन्ही शासन यंत्रणांचे एकीकरण करावे अशी भूमिका १८२०–२५ च्या सुमारासच इंग्लंडमध्ये उफाळून वर आली होती. बंगाल-बिहार, गुजरात-महाराष्ट्र, आन्ध्र-कर्नाटक, पंजाब-राजस्थान या निरनिराळ्या भागात ईस्ट इण्डिया कंपनीने तेथील परिस्थितीनुसार भिन्न भिन्न धोरणे राज्यकारभाराच्या सोयीसाठी स्वीकारली होती. या धोरणांमुळे कंपनीची राजवट पक्की व्हावयास मदत झाली हे खरे. पण त्यामुळे अशी भिन्नभिन्न व्यवस्था करणे ही साम्राज्य नीती ठरत नाही, असा आक्षेप ब्रिटिश पार्लमेंटात घेण्यात आला. पण तेव्हा मार्क्सने राजकीय ऐक्याविषयीचा जो विचार मांडला तो ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाला सर्वस्वी अमान्य होता. १८३३ साली ईस्ट इण्डिया कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचे एक सभासद जेन्किन्स यांनी अत्यंत सूत्रबद्ध अशा शब्दात ही भूमिका मांडलेली आहे.[१] तत्कालीन ब्रिटिश मंत्रिमंडळाशी या प्रश्नावर वाटाघाटी करतांना ते म्हणाले, "हिन्दुस्थानातील भिन्नभिन्न प्रांतातील लोक हे रूढी, राहणी, भावना, संघटना आणि भाषा या दृष्टीने पाहिले तर युरोपखण्डातील भिन्न भिन्न राज्यांइतके वेगवेगळे आहेत. आणि म्हणून त्यांना आज जी आपले विधीविधान करण्याची सवलत आहे ती कायम ठेवली तरच त्यांना आपण न्याय दिला असे होईल. त्यांना सर्वांना एकाच दावणीला बांधण्यात आपल्याकडून अन्यायच होईल. आपल्या प्रजाजनांमध्ये जे राष्ट्रीय भेद आहेत ते नष्ट करणे हे मला शहाणपणाचे वाटत नाही आणि त्यांची ही राष्ट्रीय वैशिष्टये आपण आजवर सांभाळून ठेवल्यामुळे त्यांना आपल्या राजवटीत आनंद आणि समाधान वाटत आहे. त्यामुळे आपली सत्ता बळकटच झाली आहे. आता आपण जे समान कायद्याचे लोण हिन्दुस्थानात नेऊ पाहत आहोत तो समान कायदा अंमलात आणण्यासाठी आजवर जपलेल्या या त्यांच्या विभिन्न राष्ट्रीयत्वांवरच घाला घातला जाईल.

तसे केल्याने आपणास एक दिवसही हिन्दुस्थान आपल्या ताब्यात राखता येणार नाही."

## राष्ट्रीयत्वाचा अहंकार दुखावला नव्हता

केन्द्र आणि राज्य यांच्यामध्ये संघर्ष आज उभा झालेला दिसतो त्याचे मूळ इतके जुने आहे. सर्व शासनयंत्रणांचे एकीकरण करा ही मागणी मूलत: हिंदुस्थानात एक केन्द्रीय सत्ता निर्माण करा अशी मागणी होती. कारण हिंदुस्थानचा गव्हर्नर-जनरल हा केवळ सल्ला देण्यापलीकडे या तिन्ही प्रांताच्या गव्हर्नरांवर कुठलीच सत्ता गाजवू शकत नव्हता. हा गव्हर्नर जनरल सर्वसत्ताधीश असावा अशी भूमिका पार्लमेंटमध्ये आली होती. या भूमिकेला विरोध करतांना जेन्किन्स यांनी भारत हे एक युरोप-सारखे महाखंड आहे असा वस्तुनिष्ठ दाखला चपलखपणे दिला होता. महाराष्ट्रातील ब्राह्मण, मराठा, धनगर या तीन प्रमुख जाती राज्यकर्त्या जाती म्हणून एलफिन्स्टनने मानाने वागविल्या. त्याचा परिणाम होऊन आपले राज्य गेले तरी मान राखला जातो आहे अशी भावना लोक मानसात होती. इंग्रजांचे राज्य मुंबईमध्ये नवी कारखानदारी आणते आहे, लोहमार्ग बांधते आहे, हातमागाला उत्तेजन देते आहे अशीच सर्वसाधारण भावना सर्व मराठी समाजामध्ये रूजली होती. स्थानिक शासनाला आपले धोरण ठरविण्याचे स्वातंत्र्य ईस्ट इंडिया कंपनीने बहाल केलेले असल्यामुळेच हे शक्य झाले. फार काय सांगावे, खुद्द छत्रपतींचे राज्य कायम ठेवायचे की बरखास्त करायचे याचा निर्णय कंपनीने एल्फिन्स्टन साहेबावरच सोपवला होता. आणि प्राप्त परिस्थितीत त्याने जो निर्णय घेतला तोच कंपनीने अखेरपर्यंत टिकविला. ज्यावेळी सातारचे राज्य डलहौसीने खालसा केले त्यावेळी एल्फिन्स्टन इंग्लंडमध्ये, "हा विश्वासघात होय" असा आरोप करूनच उभा राहिला. त्याला ज्यावेळेला हिंदुस्थानचा पहिला व्हाईसरॉय म्हणून बोलावणे आले यावेळी त्याने ते नाकारले. त्याला तीन वेळा असे बोलावले गेले. शेवटी तिसऱ्या वेळी तो म्हणाला, "मला हिंदुस्थानात जे करावयाचे होते ते गव्हर्नर म्हणून मी केले. त्याहून अधिक काही व्हाईसरॉय म्हणून मला करता येणार नाही." ही १८५९ सालची गोष्ट. सांगायचा मुद्दा हा की महाराष्ट्रातील

ब्रिटिश राजवट येथील लोकांना सुखावह वाटली याचे कारण त्यांचा राष्ट्रीयत्वाचा अहंकार दुखवायचा नाही अशीच नीती एल्फिन्स्टनने ठरवून दिली होती. गव्हर्नरांचे हे स्वातंत्र्य नष्ट करणे शहाणपणाचे नाही असे जेन्‌किन्स म्हणाला. १८३३ सालचे त्याचे हे उद्‌गार १८५० च्या सुमारास मार्क्सला एकतर माहीत नसावेत किंवा त्याने त्याकडे दुर्लक्ष तरी केले असावे. पण मार्क्स हाही मेकॉले प्रमाणेच भारतीयांच्या पश्चिमीकरणाचाच पुरस्कर्ता असल्यामुळे त्याने जेन्‌किन्सच्या उद्‌गारांकडे दुर्लक्षच केले असावे. अलीकडील मार्क्सवादी इतिहासकार जेन्‌किन्सच्या ह्या उद्‌गारांचा अर्थ केवळ साम्राज्य टिकविण्यासाठीच ब्रिटिशांनी ही विभिन्न राष्ट्रीयत्वे जतन करून ठेवली असा लावतात."[५४] पण जेन्‌किन्स हा एल्फिन्स्टनच्या, मन्‌रोच्या आणि माल्कमच्या अनुभवाच्या आधारे बोलत होता. जनरल वेलस्ली याला हिंदुस्थानातील राजकीय विविधता आणि सांस्कृतिक एकता यांचे मर्म कळले होते. त्याचे पूर्वी लॉर्ड कॉर्नवॉलिस यालाही हिंदुस्थानची परिस्थिती साकल्याने समजली होती. या दोघांनी मिळून हिंदुस्थानातील भिन्न भिन्न राष्ट्रांना एकत्र बांधले होते. ही सर्व हकीगत जेन्‌किन्सच्या डोळ्यासमोर घडलेली होती. त्यामुळेच त्याच्या विधानात रेखीवपणाबरोबरच ठाशीवपणाही आलेला होता. ब्रिटिश सरकारने जेन्‌किन्स-चेच म्हणणे उचलून धरले. आणि पुढे या तीन प्रांताचे आठदहा प्रांत झाले तरी प्रांतांची स्वायत्तता अबाधित राखण्यात आली.

## हा बहुमुखी राष्ट्रवाद मार्क्सला कळलाच नाही

मार्क्सला पश्चिमीकरणाचा टप्पा हिंदुस्थानच्या प्रगतीचा निदर्शक वाटत असल्यामुळे त्यांस भारतीयांचा बहुमुखी राष्ट्रवाद कळला नाही, जाणवला नाही आणि दिसला नाही. या संदर्भात युगोस्लाव्हियाचे एक साम्यवादी विचारवंत मिलोवन जिलास यांनी मार्शल स्टॅलिन यांच्याशी ' राष्ट्र ' या संकल्पनेविषयी जी चर्चा केली होती ती सांगण्यासारखी आहे. मिलोवन जिलास आपल्या ' स्टॅलिनशी झालेली संभाषणे ' या पुस्तकात म्हणतात, " बरीच वर्षे मी मनातल्या मनात दोन प्रश्नांचा शोध घेत होतो. त्या प्रश्नांवर स्टॅलिनचा विचार घ्यावा असे माझ्या मनात होते. एक प्रश्न सैद्धांतिक होता.

लोक आणि राष्ट्र या दोन मधील फरक नेमकेपणाने मला मार्क्सवादी वाङ्मयात किंवा अन्यत्र कुठेही सापडला नव्हता. स्टॅलिन हा साम्यवादी जगतात राष्ट्रीयतेच्या प्रश्नावरील अधिकारी पुरुष मानला जाई. म्हणून त्याचे मत जाणून घ्यावयास मी उत्सुक होतो. स्टॅलिनच्या ' मार्क्सिझम ॲण्ड द नॅशनल ॲण्ड कलोनियल क्वेश्चन ' या पुस्तकाचे प्रकाशन पहिल्या महा-युद्धापूर्वीच झालेले होते आणि त्यातील दृष्टीकोन हाच रशियन साम्यवादी पक्षाचा अधिकृत दृष्टीकोन म्हणून मानला जाई. आपल्या या पुस्तकात आपण राष्ट्र आणि लोक यामधील फरक स्पष्ट केलेला नाही, असे मी स्टॅलिन यांना म्हणालो. माझा प्रश्न ऐकताच मोलोटॉव्ह म्हणाला, ' लोक आणि राष्ट्र हे एकच आहेत. ' पण स्टॅलिनने त्यावर नापसंती व्यक्त केली. तो म्हणाला, ' छे छे ! ! ते वेगळेच आहेत. ' आणि मग तो सहज म्हणाला, ' राष्ट्र ? ते तुम्हाला माहीतच आहे. भांडवलशाहीचे ते विशिष्ट लक्षणांसह पुढे येणारे अपत्य होय.—आणि लोक म्हणजे कोणत्याही राष्ट्रातील एकाच भाषेचे, संस्कृतीचे आणि रीतीरिवाजांचे कामगार होत. ' त्याच्या स्वतःच्या पुस्तका-विषयी तो एवढेच म्हणाला, ' तो इलिचचा— लेनिनचा दृष्टिकोन होय. त्या पुस्तकाचे संपादन इलिचनेच केले होते. ' माझा दुसरा प्रश्न डोस्टोवस्की विषयी होता. डोस्टोवस्की हा माझ्या दृष्टीने महान लेखक होता. आणि त्यांच्यावरील मार्क्सवादी हल्ले मला पटत नव्हते. स्टॅलिन त्यावर म्हणाला, ' हो. तो मोठा लेखक होता. पण तेवढाच प्रतिगामीही होता. तरुणांवर त्याचा अनिष्ट परिणाम होतो म्हणून त्याचे लिखाण आम्ही छापत नाही. पण तो मोठा लेखक होता यात शंका नाही. ' स्टॅलिनचे आणि माझे बोलणे परस्परांना समजतच नव्हते, असे माझ्या लक्षात आले. '[५७]

हिंदुस्थानच्या संदर्भात राष्ट्र आणि लोक यांची अशी मूलभूत चिकित्सा करावयाची झाली तर मराठी समाज हा ' राष्ट्र ' आहे आणि तो भारतीय ' लोक ' आहे. ' लोकां 'मध्ये अनेक ' राष्ट्रे ' सामावलेली आहेत. राष्ट्र हे भांडवलशाहीचे अपत्य नसून भूमीचे व भाषेचे अपत्य होय. एकच राष्ट्र सरंजामशाही, भांडवलशाही आणि कामगारशाही अशा तिन्ही अवस्थां-मधून संक्रमण करू शकेल. उत्पादनसाधनांची गती आणि मालकी बदलली

तरी ' राष्ट्र ' बदलत नाही. हिंदुस्थानात तर ' राष्ट्र ' ही संकल्पना महाभारत काळातही आढळते."[६] आज जसा राष्ट्रवाद आढळतो तसा तो त्यावेळी कदाचित् नसेल पण राष्ट्र म्हणूनच निरनिराळे लोकसमूह आपापले प्रशासन भिन्नभिन्नपणे चालवीत होते. अखिल भारतीय लोकांचे मिळून एक राष्ट्र ही कल्पना मात्र आधुनिक आहे. पण ती इतिहासाशी सर्वस्वी विसंगत होय. भारतीय संविधानांत असा एक-राष्ट्रवादाचा हट्ट नाही. पण तिथे एककेंद्री अखिल भारतीय शासनाचा ताम्रपटच लिहिला गेला आहे. हा ताम्रपट ब्रिटिशांनी आपल्या राजवटीत लिहिण्याचे टाळले होते. त्यांनी वेळप्रसंगी शासनाचे सर्वाधिकार केंद्राकडे घेतले असले तरी ते घेतांना घटना खुंटीवर टांगून मग घेतले. घटना अशी खुंटीवर टांगण्याची तरतूद त्यांनी करून ठेवली होती. पण भारतीय संविधानाने शासनयंत्रणा एकट्यां भारत सरकारच्या खुंटीलाच कायमची बांधून टाकली आहे."[७] भारतीय संविधान लिहिले जात असतांना जेन्किन्ससारखा कोणीही प्रगल्भ बुद्धीचा प्रवक्ता भारतीय लोकांच्या पाठीशी उभा नव्हता, ही दुर्दैवाचीच बाब म्हटली पाहिजे. भारतातील विभिन्न राष्ट्रे नष्ट करण्यामुळे असंतोषाचा आगडोंब उसळेल असे जेन्किन्सला वाटले होते. ते खरे ठरले आहे.' भारतीय संविधानात या राष्ट्रांची शासकीय गळचेपी होताच भारतभर असंतोषाची ठिणगी पडली. वर्तमानकाळ हा भूतकाळाच्याच मातीचा सर्वात वरचा थर होय, असे जे आपण पूर्वी म्हटले, त्याचाच हा एक ताजा आणि जिवंत पुरावा होय.

## दादोबा पांडुरंगानी राजकारणच केले

१८०० ते १८३० या तीस वर्षात जी नवी पिढी जन्माला आली ती या संक्रमणाची साक्षीदार होती. जुनी राज्य व्यवस्था जाऊन नवी आल्यामुळे नेमके काय घडले, हे या पिढीला डोळ्यांनी पहावयास आणि कानांनी ऐकावयास मिळाले. जगन्नाथ शंकरशेठ १८०३ साली जन्माला आले; दादोबा पांडुरंग तर्खडकर १८१४ साली, दादाभाई नवरोजी १८२५ साली, धाकजी दादाजी १७९६ साली, रामचंद्र बाळकृष्ण जयकर १८२६ साली, डॉ. भाऊ दाजी लाड १८२२ साली, बाळशास्त्री जांभेकर १८२४ साली, लोकहितवादी १८२३ साली, नवनीतकार परशुराम तात्या गोडबोले

१७९९ साली, सार्वजनिक काका (गणेश वासुदेव जोशी) १८२८ साली, ॲलन ऑक्टेव्हिन ह्यूम १८२९ साली, रावबहादूर मंडलिक १८३३ साली आणि महात्मा जोतिबा फुले १८२७ साली. अशी ही सर्व मंडळी एकमेकांच्या आगेमागेच जन्माला आली. १८१९ साली मुंबईत एल्फिन्स्टन हायस्कूल स्थापन झाले आणि नवीन पश्चिमी ज्ञानाचा झरा महाराष्ट्रात फुटला. पैकी जगन्नाथ शंकरशेठ आणि धाकजी दादाजी यांचा 'बॉंबे नेटिव्ह स्कूल अँड बुक सोसायटी'मध्ये १८२६ च्या सुमारास चांगलाच कलह झाला— या संस्थेत 'खालच्या जातीच्या' विद्यार्थ्यांना संस्थेत प्रवेश देण्यात येऊ नये, असा हट्ट धरण्यात आला. धाकजी दादाजी यांचे मत असे होते की, खालच्या जातीतील मुले शिकून सवरून पुढे आली तर उच्च वर्णीयांना सरकार दरबारी ज्या नोकऱ्या मिळतात त्यामध्ये तेही स्पर्धा करू लागतील. धाकजी दादाजीने असा पवित्रा घेतला की, अशी बंदी आणली नाही तर प्रभू जातीची सर्व मुले शाळेतून काढून घेऊ. अखेर जगन्नाथ शंकरशेठ यांनी माघार घेतली. त्यामुळे कोळी, कुणबी आणि भंडारी जातीच्या मुलांना शाळेतून काढून टाकण्यात आले. दादोबा पांडुरंग हे यावेळी तेथेच शिकत होते. त्यांच्या मनावर या वादंगाचा ठसा उमटला आणि पुढे जातिव्यवस्थेच्या या दुष्ट चक्रातून बाहेर पडल्याशिवाय आपल्या समाजाची सुधारणा होणार नाही, अशी त्यांची खात्री पटली. नोकरी निमित्ताने त्यांना सुरतेला जावे लागले तेव्हा तिकडे एक नवीच चालना त्यांच्या या विचाराला मिळाली. तेथे त्यांच्याच नॉर्मल स्कूलमध्ये दुर्गाराम मंछाराम नावाचे शिक्षक होते. ते इंग्रजीचे जाणकार नव्हते; पण त्यांनाही जातिभेदामुळेच आपल्या समाजाची अवनती झाली, असे वाटत होते. १८४४ साली दादोबा आणि दुर्गाराम यांनी मिळून मानवधर्म सभेची स्थापना केली. जातिबंधने तोडायची, अशी स्पष्ट भूमिका या सभेची होती. पण अन्य राजकीय प्रश्नांचेही या सभेला वावडे नव्हते. या काळात म्हणजे जवळ जवळ १८५३ सालापर्यंत सुरत हेच राष्ट्रीय आणि सामाजिक प्रश्नावर आघाडीवरचे गाव होते. सुरतेची वखार मुंबईला गेली असली तरी मुंबईला स्वतःची प्रथा, परंपरा आणि प्रतिष्ठा निर्माण झालेली नव्हती; अजूनही सुरतेलाच लोकजीवनात प्राधान्य होते. त्यामुळेच जेव्हा मिठावरील कर दर मणाला आठ आण्यांवरून रुपयांवर

नेण्यात आला, १८४४ च्या ऑगस्ट महिन्यातील गोष्ट, तेव्हा फक्त सुरतेलाच उठाव झाला."[१८] सगळी बाजारपेठ बंद ठेवण्यात आली आणि कलेक्टरच्या कचेरीवर हजारो लोकांचा मोर्चा गेला. २० ऑगस्टला हा प्रकार झाला. लागली दोन दिवसात कलकत्त्यापर्यंत वार्ता पोचली आणि सप्टेम्बरच्या १२ तारखेला रुपयाऐवजी बारा आणे कर घेतला जाईल, अशी घोषणाही होऊन गेली. मानवधर्म सभेत हा प्रश्न निघाला असता, दादोबांनी या उठावाचे समर्थन केले आणि आपल्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेण्यासाठी असा उठाव करण्याचा प्रजेला हक्कच आहे, असेही तत्व प्रतिपादन केले. पुढे १८४६ साली दादोबांची मुंबईला बदली झाली. बाळशास्त्री जांभेकरांच्या मृत्यूमुळे रिकामी झालेली जागा भरण्याचे निमित्त दाखविण्यात आले असले तरी मानव धर्म सभेच्या कार्याला चाप लावण्यासाठीच दादोबांना मुंबईत हलविण्यात आले असावे. कारण, त्यांनी मुंबईत येताच 'परमहंस सभे'ची स्थापना केली. पण सभेचे कामकाज 'गुप्त' ठेवण्याविषयी कटाक्ष पाळण्यात आला. तसेच या सभेच्या कामकाजात ते स्वतः सामील होत नसत; बाहेरच एका खोलीत वेगळे बसून राहात. परमहंस सभेच्या या गौप्यरक्षणाच्या या भूमिकेमुळेच तिच्याविषयी गैरसमज गोंधळ आणि गैरविश्वास निर्माण झाला. पुढे १८६० सालापर्यंत ही सभा टिकली. रामचंद्र बाळकृष्ण जयकर हे या सभेचे अध्यक्ष होते आणि परदेशगमनावरील बंदी मोडायची याच एका कारणास्तव ते इंग्लंडला जाऊन आले केवळ जातिभेदाचा विध्वंस एवढाच उद्देश मुख्य असला तरी गुप्तता राखण्यात येत होती. यास सुरत येथील पहिल्याच ब्रिटिश-विरोधी लोकउठावाला दादोबांनी जो पाठिंबा दिला तो राज्यकर्त्यांना खटकला असावा आणि तो त्यांनी दादोबांना हस्तेपरहस्ते कळविलाही असावा, अशी पार्श्वभूमी असू शकते. ही दटावणी कोणीच कुठे लिहून ठेवली नसावी. अशी काहीतरी परिस्थिती असल्याशिवाय परमहंस सभेच्या कामकाजातील कडक गौप्यरक्षणाचा अर्थच लागत नाही. महात्मा फुले यांची पहिली रचना, शिवाजी महाराजांवरील पोवाडा, या परमहंस सभेच्या अध्यक्षांच्या, रामचंद्र बाळकृष्ण जयकर यांच्या, स्मृतीलाच १८६९ साली अर्पण केलेली आहे. रामजी बाळकृष्ण हे १८६६ साली अचानक वारले. त्यानंतर प्रार्थना समाज १८६७ साली स्थापन झाला. हा समाजही जाति-

भेदाचे विरुद्धच होता. पण तोही केवळ आपल्या सभासदांच्या पुरताच व्यवहार आणि व्याप ठेवणारा होता. मात्र समाजामध्ये जाहीर रीतीने बालविवाह, मुलींचे शिक्षण, विधवाविवाह आदि प्रश्नांवर चर्चा या प्रार्थना समाजाचे सभासद निष्ठेने करीत.

## शंकराचार्यांची त्रेधातिरपीट

विधवाविवाहाच्या प्रश्नावर जी जागृती झाली ती सुधारकांपेक्षा सनातनी मंडळींच्या योगानेच झाली, असेच इतिहासात दिसते. न्या. रानडे यांचे चरित्रात प्रा. न. र. फाटक यांनी यावर चांगला प्रकाश टाकला आहे. ते लिहितात, "महाराष्ट्रात विधवा विवाहासंबंधी विचार जागृतीचा उगम शोधू लागल्यास तो १८३७ व १८४० सालात सापडतो. विधवाविवाहाला शास्त्राधार आहेत, असा निर्णय या सालच्या एका पुस्तकात प्रसिद्ध झाला. बालविवाहाच्या चालीमुळे बालविधवा घरोघरी होत्या, असे म्हटल्यास अत्युक्तीचा दोष पदरी येऊ नये. विधवांनी केलेल्या गर्भपाताची व बालहत्येची उदाहरणे वृत्तपत्रातून उजेडामध्ये येत होती. विधवेचे वपन हे एक मोठे पुण्यकर्म आहे, अशी समाजाची समजूत असल्याने वपनाचा जुलूम त्यांना सोसावा लागे. वपनावाचून राहिलेल्या विधवेचा छळ मरणानंतरसुद्धा चुकत नसे. १८५९ साली सोलापूर जवळच्या माढे गावात एका गृहस्थाचे घर अतिवृष्टीमुळे पडले. त्याखाली त्या गृहस्थाची एक विधवा बहीण सापडली आणि प्राणास मुकली. तिचे वपन झाले नव्हते. अर्थात तिच्या प्रेताला स्पर्श केल्यास ब्राह्मणांना जातिभ्रष्ट व्हावे लागले असते. प्रेताच्या वपनाला न्हावी तयार होईनात. अखेरीस शूद्रांच्या हस्ते तिला अग्निसंस्कार मिळाला. १८५४ सालात शंकराचार्यांची स्वारी नगरास गेली होती. तेथे त्यांच्यासमोर व्यभिचाराबद्दल स्त्रियांविरुद्ध फिर्यादी गुदरण्यात आल्या. एका व्यभिचारिणी बालविधवेच्या पित्याचा शंकराचार्यांनी गोमूत्रगोमयासह स्वपादोदकाचे तीर्थ पाजून व १९ रुपये दंड उपटून उद्धार केला. पण त्याने आपल्या मुलीला शुद्धता प्राप्त व्हावी, अशी इच्छा प्रदर्शित केली, तेव्हा जगद्गुरूंनी फर्माविलेले प्रायश्चित मोठे मासलेवाईक आहे. त्यांनी सांगितले की, आंब्याच्या झाडाचा बुंधा कोरून एक ढोली करावी. तिच्यात त्या मुलीला बसवावे,

बाहेरून गवत पाचोळा पेटवावा आणि बरीच धग लागल्यावर तिला बाहेर काढावे, नंतर तिचे वपन करावे आणि शेवटी सहस्र ब्राह्मणांना जेवण घालावे म्हणजे मुलगी शुद्ध होईल. या मुलीच्या पातकाचा पत्ता सरकारास लागला, तेव्हा शहरच्या पोलीस अंमलदारांनी अब्रूसाठी पोर मारून गुन्हा न करण्याचा तिला सल्ला दिला होता. तिने सल्ला ऐकल्यामुळे हे प्रकरण सरकारापुरते मिटले, परंतु शंकराचार्यांनी समंजसपणा दाखविला नाही. ही मुलगी व हिचा बाप सालस असल्याने शंकराचार्यांना इंग्रजी राज्यात कालान्तराने बायाबापड्यांच्या अंगी संचारलेल्या स्वतंत्रतेच्या बाण्याचा अनुभव आला नाही, तो अनुभव दुसऱ्या बायकांनी आणून दिला. या बायकाही विधवा होत्या. त्यांच्यावर ब्रह्मवृंदाने व्यभिचाराचा आरोप ठेवला होता. शंकराचार्यांनी त्यास वपनाची आज्ञा दिली. आपण ही आज्ञा जुमानीत नाही, असा खडखडीत जबाब त्यांनी आचार्यांच्या तोंडावर दिला. शंकराचार्यच ते. त्यांच्या परिवारात न्हाव्यांची तूट नव्हती. त्यातल्या काही जणांना बोलावून आवेशाने 'या बायांच्या मुसक्या बांधून त्यांचा केशभार उतरून टाका, अशी पुन्हा आज्ञा केली. बाया गांगरल्या नाहीत. त्यांनी जबाब दिला की, 'ही मोगलाई नाही, जुलूम जबरदस्ती कराल तर आताच्या आता फौजदाराकडे अर्ज देऊन आपणास धडपणे नगरातून जाता येणार नाही, अशी व्यवस्था होईल,' हा अनपेक्षित व सडेसोट जबाब ऐकताच शंकराचार्य जागच्या जागीच थिजले आणि फिर्यादी ब्रह्मवृंदाच्या तोंडाला खीळ बसली. शेवटी धर्मरक्षणाच्या गादीचा मान राहण्याकरिता या बायकांशी कोणीही अन्नपानादि व्यवहार ठेवू नये, असा हुकूम सोडून शंकराचार्यांनी आपला बोज कसाबसा राखला. धर्माच्या व्यवहारात शंकराचार्यांची हुकमत ऐकायला त्यावेळचा समाज तयार असला, तरी पुष्कळदा ब्राह्मणांनीच त्यांची अवज्ञा केली व जगद्गुरुंची गादी म्हणजे सत्ताशून्य संस्था, असे निदर्शनास आणले. नगरानजीकच्या भिंगार गावात एका ब्राह्मणावर अगम्यगमन केल्याचा आरोप होता. सदर अपराध उघडकीस आल्याबरोबर त्याने बराच पैसा खर्च करून गावात आपली मानमान्यता कायम ठेवली. काही ब्राह्मण त्याच्याविरुद्ध होते, त्यांनी या ब्राह्मणावरला बहिष्कार बंद पडू दिला नाही. अखेरीस शंकराचार्यांना पाचारून त्यांच्याकडे न्याय मागितला. शंकराचार्यांची स्थिती

विचित्र झाली. न्याय द्यावा तर जितके ब्राह्मण बहिष्कृताला पावन समजणारे होते, त्यांना वाळीत टाकावे लागणार; न्याय न द्यावा तर पापाचाराला पुष्टी मिळेल, असा पेंच त्यांच्यापुढे येऊन पडला. अखेरीस 'मला या भानगडीत लक्ष घालता येत नाही, गावकऱ्यांनीच आपापसात तडजोड काढावी,' असे सांगून शंकराचार्यांनी आपली सुटका करून घेतली. ज्यांना न्याय मिळत नाही त्यांची साहाजिकच जगद्गुरुवर इतराजी झाली. ब्राह्मणांच्या मर्जीवर धर्मव्यवस्था अवलंबून होती. ब्राह्मण म्हणतील ती पूर्वदिशा, असा जरी काहीसा प्रकार असला तरी, तरी त्यांच्यावर ग्रामण्याचे शस्त्र चालविण्याची बुद्धी काही जातीत उत्पन्न झाली होती. पुण्यात १८६० च्या सुमारास एका न्हाव्याने लहानसे टुमदार घर बांधले. वास्तुशांतीला ब्राह्मण बोलावले. हे मंगलकार्य कांही ब्राह्मणांनी केले, पण इतरांचा त्यावर रोष होऊन त्यांनी न्हाव्याचा वास्तुशांती करणारामागे ग्रामण्याचा ससेमिरा लावला. न्हाव्यांना याबद्दल अतिशय राग आला व त्यांनी ग्रामण्यास्त्रावर उलट 'न्हावण्या'स्त्राचा प्रयोग केला. ग्रामण्य माजविणाऱ्या ब्राह्मणांच्या हजामती करावयाच्या नाहीत, असा त्यांनी ठराव केला. या ठरावाच्या अंमलबजावणीला ग्रामण्याच्या तोडीसतोड म्हणून 'न्हावण्य' तत्कालीन वृत्तपत्रांनी दिले आहे. सारांश, भिंगारच्या काही ब्राह्मणांनी शंकराचार्यांची जशी स्थिती केली, तशीच पुण्याच्या नापितांनी तेथील ब्राह्मणांची केली.''[१५] शंकराचार्यांच्या सत्तेला आणि ब्राह्मणांच्या वर्चस्वाला नवीन इंग्रजी कायद्यानेच खो दिला होता. गुन्हा कशाला म्हणावयाचे आणि त्याची शहानिशा कोणी करावयाची याचे विधि-नियमच बदलले असे नव्हे, तर त्याचे तत्त्वज्ञानही बदलले. राज्यकर्ते हिंदूचे किंवा मुसलमानांचे धर्मशास्त्र मानीत असले तरी त्यांचे समाजशास्त्र नाकारीत होते. राज्यसत्ता ही सार्वजनिक जीवनात नीती आणि कायदा असा फरक करू लागली. भिंगारच्या त्या बालविधवेच्या प्रकरणी भ्रूणहत्या हा गुन्हा, व्यभिचार ही अनीती, असा पवित्रा सरकारी यंत्रणेने घेतल्यामुळे शंकराचार्यांचे 'प्रायश्चित्त' लटके पडले.

## जोतिबांनी नेमके मर्मांवरच बोट ठेवले

असा हा इंग्रजी राज्याचा प्रभाव ब्राह्मणांतर्गत: आचारविचारावर

पडला, तर ब्राह्मण-ब्राह्मणेतरांच्या परस्पर संबंधात तो किती पडला असेल याची कल्पनाच केलेली बरी. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर: यांच्या श्रुति स्मृति पुराणोक्त संबंधांचा ब्रिटिश राजसत्तेच्या काळात पूर्ण संदर्भच बदलून गेला. जातिव्यवस्था ही ब्राह्मणांना पोषक व ब्राह्मणेतरांना शोषक असे वळण लागून ब्राह्मणेतरांच्या रोषास पात्र झाली होती. गुलामगिरी ह्या आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत महात्मा फुले यानी याच मर्मावर नेमके बोट ठेवले. ते लिहितात, ' या ग्रंथाचा मुख्य उद्देश असा आहे की आज शेकडो वर्षे शूद्रादि अतिशूद्र, ब्राह्मण लोकांचे राज्य झाल्यापासून सतत दुःखे सोशीत आहेत व नाना-प्रकारच्या यातनेत आणि संकटात दिवस काढीत आहेत, तर ह्या गोष्टीकडेच सर्वांचे लक्ष लागून त्यांनी तिजविषयी नीट विचार करणे व येथून पुढे भटब्राह्मण लोकांचे अन्यायी जुलमापासून आपली सुटका कशी करून घेणे हाच काय तो आहे. या देशात भट लोकांचे राज्य होऊन सुमारे ३००० वर्षांपासून अधिक काळ लोटून गेला असावा असे अनुमान होते. ते लोक परदेशातून येऊन या देशातील मूळचे राहणारे लोकास जिंकून त्या सर्वांस त्यांनी आपले दास केले व त्यांस अनेकतऱ्हेची क्रूर शासने दिली. त्यांनी त्यांच्यावर वर्चस्व मिळवून त्यांस अक्षय आपले ताब्यात ठेवण्याकरता केवळ स्वहितास अनुलक्षून पुष्कळ बनावट ग्रंथ करून ते आपणा सर्वांस ईश्वरापासून प्राप्त झाले असे त्यावेळचे अज्ञानी लोकांस सांगून त्यांचे मन सर्वस्वी वळविले. त्या ग्रंथांत त्यांनी असे लिहिले की शूद्रास ईश्वराचा उत्पन्न करण्याचा हेतू इतकाच आहे की त्यांनी सदासर्वदा भट लोकांच्या सेवेत तत्पर असावे व जेणेकरून त्यांची मर्जी खुष राहील असे करावे; म्हणजे ते ईश्वराला पावन होऊन त्यांचे देहाचे व जन्मास येण्याचे सार्थक झाले. एखादे वेळेस कोणी शूद्र नदी कांठावर आपली वस्त्रे धूत असता त्या स्थळी जर एखादा भट आला तर त्या शूद्रास आपली सर्व वस्त्रे गोळा करून बऱ्याच दूर अंतरावर जेथून भटाच्या अंगावर पाण्याचा शिंतोडा येण्याचा संभव नसेल अशा स्थळी जाऊन आपली वस्त्रे धुवावी लागत असे. तेथून जर भटाच्या अंगावर पाण्याचा शिंतोडा आला अथवा आला असा खोटा भास झाला तर त्या भटाने अग्निसारखे रागाने तप्त होऊन जवळचे धोंडे त्याचे मस्तक रोखून मोठे त्वेषाने मारावे. त्याजमुळे त्याचे मस्तक रक्तबोंबाळ होऊन मूर्च्छित होत्साता जमिनीवर धाडकन

पडावे, पुढे काही वेळाने शुद्धीवर येऊन आपली रक्ताने भरलेली वस्त्रे घेऊन निमूटपणे घरी जावे, सरकारास जर कळवावे तर सर्व भटशाई पडली. उलटी त्यासच सजा देणार. हर हर ! परमेश्वरा केवढा हा अन्याय ! असो. एक दुःख आहे म्हणून सांगावे ? अशी व ह्यापेक्षा अधिक व दुसरी पुष्कळ दुःखे शूद्रातिशूद्रास सोसावी लागत असत. याप्रमाणे अनेक संकटे भोगिता भोगिता ते फार त्रासून गेले व केव्हा यापासून सुटका होईल याची वाट, जसा एकदा फार दिवस तुरूंगात टाकलेला कैदी आपले इष्टमित्रास, मुलांबाळांस व भावबंधास भेटण्याविषयी अथवा स्वतंत्रतेने इकडे तिकडे फिरण्याविषयी मोठे उत्सुकतेने सुटकेचे दिवसाची वाट पाहतो, त्याप्रमाणे पहात आहेत, इतक्यात दैववशात ईश्वरास त्यांची करुणा येऊन या देशात इंग्रज लोकांचे राज्य झाले व त्यांच्याकडून ते भट लोकांचे कायिक दास्यत्वापासून मुक्त झाले. ते इंग्रज सरकारचे त्याजबद्दल फार फार आभार मानतात व सर्वस्वी त्यांचे ते ऋणी आहेत. त्यांचे उपकार ते कधी विसरणार नाहीत. त्यांनी त्यांस आज शेकडो वर्षांचे भटलोकांचे कैदखान्यातून मुक्त करून त्यांचे मुलाबाळांस सुखाचे दिवस दाखवले. ते नसते तर भटलोकांनी त्यांस केव्हाच धुळीस मिळविले असते. शूद्र अतिशूद्र भटाच्या कायिक दास्यत्वापासून मुक्त झाले खरे परंतु आम्हास सांगण्यास मोठे दुःख वाटते की अद्यापि आमचे दयाळू सरकारचे शूद्रादि अतिशूद्राना विद्या देण्याविषयी दुर्लक्ष असल्यामुळे ते अज्ञानी राहून भटलोकांचे बनावट ग्रंथांच्या संबंधाने त्यांचे मानसिक दास झालेले आहेत. व त्यांस सरकाराजवळ दाद मागण्याचे ऋण राहिले नाही. सत्ता तुझी राणी बाई। हिंदुस्थानी जागृत नाही ॥ १ ॥ जिकडेतिकडे ब्राह्मणशाई । डोळे उघडूनी पाही ॥ २ ॥ खेडेगांवी कुळकर्णी । आहे लेखणीचा धणी ॥ ३ ॥ महालामध्ये महालकरी । जसा अष्ट अधिकारी ॥ ४ ॥ यमवत मामलेदार । शूद्रा शिक्षा अनिवार ॥ ५ ॥ धूर्त चिटणिसांचे पुढे । काय कलक्टर बापुडे ॥ ६ ॥ रेव्हिन्युची दप्तरदारी । ब्राह्मण किती अधिकारी ॥ ७ ॥ चहुंकडे भटभाई । कुणब्याचो दाद नाही ॥ ८ ॥ जोती म्हणे धाव घेई । दुष्टापासूनी सोडवी ॥ ९ ॥ [१६]

### इंग्रजांची कुटिल नीती नडली

१८३३ साली हिंदी लोकांना राज्ययंत्रणेच्या सर्व स्तरांवर स्थान दिलें पाहिजे असा जो कायदा ब्रिटिश पार्लमेंटने केला होता त्याची अंमलबजावणी होऊन तळातल्या दोन स्तरांवर उच्च वर्णीयांची धडाधड वर्णी नंतरच्या तीस वर्षांत लागली होती. हे दुय्यम दर्जाचे अधिकारी आपल्या युरोपीय वरिष्ठ अधिकाऱ्यांना खोटेनाटे सांगून मूळ पुराव्याचा उलटा अर्थ इंग्रजीत लिहून आणि कधीकधी तर आपल्या वरिष्ठाने दिलेल्या निर्णयाच्या अगदी विरुद्ध निर्णय मराठीत लिहून पण त्यास त्याचे मूळ निकालपत्र खडान्‌खडा वाचून दाखवून आपल्या वरिष्ठांची सही घेत असत. त्यामुळे महात्मा फुले यांनी एकदा असे सुचवले की, "सरकाराने फक्त ज्या ज्या युरोपियन कलेक्टरास महाराष्ट्र भाषा स्वच्छ बोलता येत असेल त्या सर्वास तहातभर पेनशनी देऊन त्यांस येथेच सर्व खेड्यापाड्यातून अज्ञान भेकड बाहुल्या शूद्रांत मिसळून राहते करून त्यांजकडून एकंदर सर्व भट कुळकर्णी वगैरे कामगारांच्या कसबांवर चांगली बारीक नजर ठेववावी आणि त्यांजकडून हमेशा तेथील एकंदर सर्व कच्च्या हकीगतीवर रिपोर्ट मागवावे."[६१] अशा रीतीने इंग्रजी राजवटीने आपली सुटका झाली असे वाटते न वाटते तोच पुन: एकदा भट ब्राह्मणांच्याच नव्या गुलामगिरीच्या खाईत आपण लोटले जात आहे अशी भावना समाजात बळावली. आय. सी. एस.मधील भारतीय लोकांची संख्या सोडून बिनकरारी नोकरवर्गामध्ये तीन चार हजार रुपये पगार खाणारे सुमारे आठशे पन्नास युरोपियन व अँग्लो इंडियन होते. चारशे ऐंशी रुपयांहून अधिक पगार मिळविणारे अवघे सहाशे एतद्देशीय नोकर होते. त्यापैकी साडेतीनशे लोकांना सहाशे रुपयांच्या आतच खितपत पडावे लागे. सोळाशे रुपये पगार मिळविणारे नेटिव्ह तर एकाच हाताच्या बोटांवर मोजण्याइतके होते.[६२] हा प्रश्न १८५९ साली एकदम जोर करून पुढे आला. कारण त्यावर्षी आय. सी. एस्. परीक्षेसाठी संस्कृत आणि अरबी या भाषांचे जे 'पेपर्स' होते ते रद्द करण्याचा विचार सुरू झाला. या परीक्षेस एकूण दहा हजार मार्कस असत. हिन्दी विद्यार्थ्यांच्या सोयीच्या अशा या दोन भाषा काढल्या तर आपोआपच त्यांचे यशाचे प्रमाण कमी होईल अशी कुटिल नीती यामागे होती. यास दादाभाई नवरोजी यांनी खुद्द इंग्लंडात जाऊन विरोध केला. सुशिक्षित हिन्दी

लोकांचा इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्ये प्रवेश झालाच पाहिजे यासाठी दादाभाईंनी आपले सर्व बुद्धिकौशल्य पणाला लावले. त्यांचे म्हणणे असे, "हा प्रश्न हिंदुस्थानातला मूठभर सुशिक्षित लोकांच्या आकांक्षेचा नसून हिन्दुस्थानच्या जीवनाचा व पोटापाण्याचा आहे. हिन्दुस्थानावर इंग्रजांचे राज्य शंभर वर्षे असूनही तो देश दरिद्री व मागासलेला कां आहे याचा उलगडा यात आहे. इंग्रज अधिकाऱ्यांच्या खिशात दरवर्षी जाणारे वीस कोटी रुपये थांबवा. म्हणजे हिन्दुस्थानची सम्पन्नता वाढेल. आश्वासनांची व जाहीरनाम्यांची लाज धरा आणि हिन्दुस्थानातील राज्याचे सामर्थ्य तोफांच्या गोळ्यात किंवा समशेरीच्या धारेत नसून लोकांच्या संतोषात आहे हे विसरू नका." दादाभाईंच्या प्रयत्नामुळे संस्कृत आणि अरबी भाषा आय. सी. एस. च्या परीक्षेत कायम राहिल्या.

## दोन परस्परविरोधी प्रवक्ते

महात्मा जोतीबा फुले आणि दादाभाई नवरोजी हे अशारीतीने भारतीय समाजातील दोन परस्पर विरोधी शक्तींचे प्रवक्ते म्हणून दंड थोपटून उभे होते. संपूर्ण आय. सी. एस. चे हिन्दीकरण होणे हीच भारतीय लोकांच्या अस्मितेची आणि अधिकाराची चरमसीमा होय, असे दादाभाईंचे प्रमाण, तर हिन्दीकरणाची ही सवलत पुनः एकदा ब्राह्मणशाहीचाच पगडा आपल्यावर निर्माण करते आहे ही महात्मा फुले यांची खंत. दादाभाई केवळ इंग्रजी सत्तेच्या संदर्भात भारतीय स्वायत्ततेचा विचार करीत होते, तर महात्मा फुले जातीय स्वायत्ततेच्या संदर्भात इंग्रजी सत्तेचा विचार करीत होते. ब्रिटिश सत्तेच्या आगमनामुळे ब्राह्मणक्षत्रियांचे राज्य गेले आणि ब्राह्मण–वैश्येतरांचे दास्य गेले. या ज्या दोन भिन्न प्रक्रिया अठराशे पासून अठराशे पन्नासपर्यंतच्या काळात स्पष्ट झाल्या त्याच दादाभाई आणि महात्मा फुले यांना भिन्न भिन्न प्रेरणा देत होत्या. फुले यांचे म्हणणे मान्य करणे म्हणजे हिन्दीकरणाचा वेग कमी करणे असे समीकरण तत्कालीन उच्च वर्णीय नेत्यांच्या डोक्यात घट्ट बसले होते. त्यांच्या दृष्टीने ब्रिटिशांच्या संदर्भात भारतीय समाज एकजीव होता पण ब्राह्मणेतरांच्या मनात हा एकजीवपणा यत्किंचितही नव्हता. या संदर्भात जोतीबा फुले यांच्या एकूण कार्याविषयी बडोद्याचे सयाजीराव

महाराज यांचे मन कलुषित करण्यासाठी पुण्यातील काही मंडळींनी प्रयत्न केला होता त्याचा ओझरता उल्लेख 'इशारा' या आपल्या छोट्या पुस्तिकेत महात्मा फुले यांनी उपोद्घातात केला आहे. ते म्हणतात, "आर्य ब्राह्मणातील पहिला दिवाभीत. गृहस्थाचा डौल घालून पुण्याचा रहिवासी असता विद्वान श्रीमान महाराज गायकवाड सरकारास पोकळ ज्ञान शिकवतो की, 'जातिभेद असला म्हणून आपल्या इष्ट हेतूस तो (जातिभेद) बिलकुल (या देशाचे उन्नतीस) आडवा येत नाही. इंग्लिश अम्मल होताच सहजच एकंदर सर्व सरकारी खात्यांनी मोठमोठ्या महत्त्वाच्या जागा आर्य ब्राह्मणास मिळून ते सर्वोपरि शेतकऱ्यास लुबाडून खाऊ लागले व आर्यभट इंग्रज वगैरे एकंदर सर्व युरोपियन लोकांस जरी मांगा महाराजासारखे नीच मानीत आहेत तथापि त्यांच्या महाधूर्त पूर्वजांनी महापवित्र मानलेले वेद, ज्यांची शेपटेसुद्धा शूद्र शेतकऱ्यांच्या दृष्टीस पडू देत नाहीत, ते सोवळे बुरख्यातील वेद, हल्ली त्यांच्यातील मोठमोठाले जाडे विद्वान काखेत मारून गोऱ्या म्लेंछ लोकांच्या दारोदार जाऊन त्यांस शिकवित फिरतात. परंतु हे भटब्राह्मण खेडयापाडयांनी सरकारी शाळांत शूद्रशेतकऱ्यांच्या अज्ञानी मुलांस साधारण विद्या शिकवितांना थोडी कां आवडनिवड करतात? ब्राह्मणांपैकी बहुतेक विद्वान गायकवाड वगैरे शूद्र संस्थानिकांकडून हजारो रुपयांची वर्षासने व नित्यशः खिचडया उपटीत असल्याबद्दल उपकार मनी स्मरून ब्राह्मण संस्थानिकांपैकी एकानेही एखाद्या शेतकऱ्याच्या मुलास अन्नवस्त्र पुरवून त्यास विद्वान करवले नाही. यावरून शेतकऱ्यांबरोबर आर्य ब्राह्मणाची एकी कशी होऊ शकेल? नाहीतर आर्यभट ब्राह्मणांची कामापुरती एकी आणि काम सरल्यावर तू तिकडे आणि मी इकडे. कारण 'ये गे कोयी तुझी डोयी भाजून खायी आणि माझी डोयी ब्याला ठेवी.' या जगप्रसिद्ध म्हणीप्रमाणे भट ब्राह्मणांचे अघळपघळ कल्याण होणार आहे. परंतु आर्य विद्वज्जनास जर खरोखर या देशातील सर्व लोकांची एकी करून या देशाची उन्नती करणे आहे तर त्यांनी प्रथम आपल्या विजयी व पराजितांमधील चातत असलेल्या दुष्ट धर्मास जलसमाधि देऊन त्या जुलमी धर्माने नीच केलेल्या शूद्रादि अतिशूद्र लोकांसमक्ष उघडरीतीने आपल्या वेदान्त मतासह जातिभेदाचे उरावर थयथया नाचून कोणाशी भेदभाव न ठेविता त्यांच्याशी कृत्रिम करण्याचे सोडून

निर्मळपणे वागू लागल्याशिवाय सर्वांची खरी एकी होऊन देशाची उन्नती होणे नाही. कदाचित् आर्यभटांनी आपल्या वडिलोपार्जित धुर्ताईने शूद्रातील शेपन्नास अर्ध्याकच्च्या विद्वानास हाती धरून या देशातील एकंदर सर्व लोकांत कामापुरती एकी करून देशाची क्षणिक उन्नती केल्यास ती त्यांची फार दिवस राहणार नाही ''[६१]

महात्मा फुले यांचे हे विचार शांतपणे ऐकून घेण्यास त्यावेळी कुणालाच सवड नव्हती. जो तो हिन्दीकरणाच्या ध्येयानेच वेडा झाला होता. त्यामुळेच सरकारी यंत्रणेचे हिन्दीकरण झाले; पण समाजात मात्र ब्राह्मण ब्राह्मणेतरांचे वाद फोफावले. या हिन्दी करणाच्या प्रक्रियेला पूर्ण गती येताच हिन्दुस्थानातील धार्मिक आणि जातीय भेद उफाळून आले. मुसलमानांना वाटले सर्व सत्ता हिंदूंच्या हाती केन्द्रित होत आहे. आणि ब्राह्मणेतरांना वाटले सर्वसत्ता ब्राह्मणांच्या हाती केन्द्रित होत आहे. कारण सुरवातीस या हिन्दी-करणाचा लाभ बंगालमधील भद्रलोक यांनाच प्रामुख्याने घेता आला. त्यांच्या-तील ब्राह्मणत्वाचा दिमाख इंग्रजी शिक्षणानेही गेलेला नव्हता. इतर प्रातांतही शिक्षणाची आणि ज्ञानाची परम्परा असलेल्या ब्राह्मण, कायस्थ आणि सारस्वत ब्राह्मण याच जातींना हिन्दीकरणाचा लाभ मिळाला. हिन्दू समाजाने आपसातील जातिभेदांचा समान शिक्षणाच्या सूतशेखराच्या मात्रेने निचरा करण्यापूर्वी सरकारी यंत्रणेचे हिन्दीकरण झाल्यामुळे शासन आणि समाज सामाजिक रज्जूंनी एकत्र बांधले गेले नाहीत. राज्य सरकारऐवजी केन्द्रसरकार हेच आपल्याला न्याय देईल अशी भावना भारतातील सर्व प्रान्तात सर्वच जातींमध्ये निर्माण झाली यास हा शासन आणि समाज यामधील दुरावाच कारणीभूत आहे. जसजशा सर्व जाती शिक्षित होऊन त्यांचे सरकारी यंत्रणेतील प्रमाण वाढत गेले तसतशा केन्द्राविषयीच्या आपलेपणाच्या भावना ओसरत गेल्या. आणि आता तर सर्वच प्रान्तांमध्ये स्वयत्ततेची मागणी मूळ धरून बसली आहे. ज्या ज्या वेळी एखाद्या भाषिक गटाचा केन्द्र सरकारशी कोणत्या ना कोणत्या कारणामुळे संघर्ष होतो त्या त्या वेळी सर्व जातीजमातींचे प्रान्तवार ऐक्य उभे होते. भाषावार प्रान्त रचनेच्या वेळी तेलगू आणि मराठी लोकांमध्ये या सर्व जातीय ऐक्याचा अविष्कार मोठ्या प्रमाणावर झाला. सध्या

आसाम आणि पंजाब या दोन प्रांतांत केन्द्रसरकारच्या विरोधात अशा प्रान्तीय जातीय ऐक्याला बळकटी आलेली आहे. हे सर्व पाहिले म्हणजे हिन्दीकरणाचा आग्रह आणि ब्राह्मणशाहीचा धोका हे जे दोन परस्परविरोधी दृष्टीकोन दादाभाई आणि महात्मा फुले यांच्या रूपाने उभे झाले ते तत्कालीन परिस्थितीत अटळच म्हणावे लागतील. कारण भारतीय समाजाचा भूतकाळ पाहता फुले यांना वाटणारा धोका रास्तच होता पण भविष्यकाळ पाहता दादाभाईंचा आग्रह तेवढाच रास्त होता. हिन्दुस्थानातील एकूण सर्व कच्च्या मालाचा रतीब इंग्लंडच्याच कारखानदारीकडे वर्षानुवर्षे वळला होता. तो अडवून येथेच भारतीय संपत्तीचा नवा झरा खोदावयाचा होता. भारतसरकार हे सर्वस्वी इंग्रज नोकरशहांच्या हाती असल्यामुळे त्यांनी मुंबईचा गोदी कारखाना कसा रातोरात कल्याणच्या खाडीत बुडवला हे आपण पूर्वीच पाहिले आहे.

## तो विळखा अजूनही कायम आहे

म्हणून सरकारची यंत्रणा आपल्या मुठीत आणण्यासाठी येथील उच्चवर्णीयांचा आटापिटा होता. आता हेच दोन दृष्टीकोन केन्द्र आणि राज्य यांच्या रूपाने भारतीय समाजात वावरत आहेत. हिन्दीकरणाचा आग्रह आता सत्तेच्या केन्द्रीकरणाच्या रूपात आणि ब्राह्मणशाहीचा विरोध सत्तेच्या विकेन्द्री—करणाच्या रूपात परिणत झाला आहे. लॉर्ड मेकॉले यांना अभिप्रेत असलेल्या भारतीय समाजाच्या पश्चिमी करण्याच्या क्रांतीची धुरा दादाभाईंनी, तेलघाणीच्या बैलासारखी, आपल्या खांद्यांवर सतत बावनवर्षे, डोळ्यांना झापडे लावून, निष्ठेने वाहिली. या पश्चिमीकरणातूनच देशी उद्योगाला वाव देणारी नोकरशाही हिन्दुस्थानात उभी राहिली. या नोकरशाहीचे आणि उद्योगधंद्यांचे हितसंबंध असे पहिल्यापासून एकत्र घट्ट गुम्फले गेले आहेत. भारतीय नोकरशाहीला हा जो नागरी हितसंबंधांचा विळखा १८६५ साली पडला तो अजूनही तसाच कायम आहे. महात्मा फुले यांना नागरी हितसंबंधांची भारतीय शासनावर पडलेली ही मगरमिठी स्पष्टपणे दिसली होती. म्हणून मराठी ग्रंथकार सभेस न्यायमूर्ती म. गो. रानडे यांच्या मार्फत त्यांनी जे एक पत्र पाठविले होते ते महत्वाचे ठरते. "विनंती विशेष. ता. १३ माहे मजकूरचे कृपापत्रासोबतचे विनंतीपत्र पावले. त्यावरून मोठा परमानंद झाला. परंतु

माझ्या धाकमोठ्या दादा ज्या गृहस्थाकडून एकंदर सर्व मनुष्याच्या मानवी हक्काविषयी वास्तविक विचार केला जाऊन ज्यांचे त्यास ते हक्क त्यांच्याने खुषीने व उघडपणे देववत नाहीत, व चालू वर्तमानावरून अनुमान केले असता पुढेही देववणार नाहीत, तसल्या लोकांनी उपस्थित केलेल्या सभांनी व त्यांनी केलेल्या पुस्तकातील भावार्थांशी आमच्या सभांचा व पुस्तकांचा मेळ मिळत नाही. कारण त्याच्या पूर्वजांनी आम्हांवर सूड उगवण्याच्या इराद्याने, आम्हास दास केल्याचे प्रकर्ण त्यांनी आपल्या बनावट धर्मपुस्तकात कृत्रीमाने दडपले. याविषयी त्यांच्यातील जुनाट खल्लड ग्रंथ साक्ष देत आहे. यावरून आम्हां शूद्रादि अति शूद्रांस काय काय विपत्ती व त्रास सोसावे लागतात, हे त्यांच्यातील उंटावरून शेळ्या वळणाऱ्या ग्रंथकारास व मोठमोठ्या सभास्थानी आगान्तूक भाषण करणारास कोठून कळणार ? हे सर्व त्यांच्या सार्वजनिक सभेच्या उत्पादकास जरी पक्के माहीत होते, तरी त्यांनी फक्त त्यांच्या व आपल्या मुलाबाळांच्या क्षणिक हिताकरीता डोळ्यांवर कातडे ओढून त्याला इंग्रज सरकारातून पेन्शन मिळताच तो पुन्हा अट्टल जात्याभिमानी, अट्टल मूर्तिपूजक, अट्टल सोवळा बनून आपल्या शूद्रादि अतिशूद्रास नीच मानू लागला; व आपल्या पेन्शनदात्या सरकारने बनविलेल्या कागदाच्या नोटीससुद्धा सोवळ्याने बोट लावण्याचा विटाळ मानू लागला. अशीच कां शेवटी ते आर्यब्राह्मण या हतभाग्य देशाची उन्नती करणार ! असो. आता यापुढे आम्ही शूद्रलोक, आम्हास फसवून खाणाऱ्या लोकांच्या थापांवर भुलणार नाहीत.''[५८] महात्मा फुले यांनी १५ जानेवारी १८८५ रोजी हा जो निर्वाणीचा इशारा दृढनिश्चयाने दिला तो आजही महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात घुमतो आहे. आजच्या परिभाषेत बोलावयाचे झाले तर महात्मा फुले हेच मराठी लोकांच्या राष्ट्रीयत्वाचे जनक आहेत. सत्यशोधक समाजोक्त पूजाविधी या पुस्तकातील शेवटच्या विनंतीचा आपण विचार केला तर आपणासही हे विधान पटण्यासारखेच आहे.

## हा खंडोबाच सर्व मराठ्यांचा देव

महात्मा फुले म्हणतात, 'ह्या पुस्तकात जो विवाह विधी दाखविला आहे त्यापैकी मंगलाष्टके व पूजा करण्याचे मंत्र हे महाराष्ट्र देशातील कोणत्याही जातीतील लोकांस मोठयाच उपयोगाचे आहे. करीता ते सर्व कायम ठेवून

देशाचारा व कुळाचाराप्रमाणे विवाहात कित्येक प्रकार करावे लागतात ते बिनहरकत करावे. हल्ली धर्मविधी करतांना नामधारी ब्राह्मण जे मंत्र किंवा मंगलाष्टके म्हणतात त्याचा संबंध प्रस्तुतचे विवाहास किंवा वेळासही नसून, त्या मंगलाष्टकांचा किंवा मंत्राचा काय अर्थ हेही आमचे लोकांस समजत नसल्यामुळे केवळ अंधळयांचे व बहिऱ्यांचे बाजाराप्रमाणे होत आहे, म्हणून सत्यशोधक समाजाकडून विवाह व इतर कार्यांसंबंधीचे धर्मविधी चालविण्यास कोणासही अडचण पडू नये, म्हणून ते प्राकृत व सोपे असे तयार केले आहेत, यास्तव याचा लाभ सर्वांनी घ्यावा अशी आमची विनंतीपूर्वक सूचना आहे. बळी राजा हाच महाराष्ट्राचा राजा. बळी राजाने महाराष्ट्राची नऊ खण्डे केली होती. आणि प्रत्येक खण्डाच्या अधिकाऱ्याचे नाव खण्डोबा. हा खण्डोबाच सर्व मराठयांचा देव. त्यामध्येच जेजुरीचा एक. सर्व मराठयांनी बहिरोबास, जोतीबास व खंडोबास देववत् मानले व ते त्यांची नावे सामील करून तळी उचलू लागले, 'हरहर महादेव. बहिरोबाचा अथवा जोतीबाचा चांगभला.''[९९] खण्डोबाचे हे दैवत खास मराठी दैवत आहे आणि ते देशस्थ ब्राह्मणांपासून महारामांगापर्यंत सर्वांचे दैवत आहे.

## अखिल भारतीयत्वाची ही पाचर अमान्य

महात्मा फुले यांनी हा जो महाराष्ट्रातील सर्व जाती जमातींचा समान देव घट्ट धरून ठेवला तो त्यांच्या समाजशास्त्रीय सूक्ष्म बुद्धीचाच पुरावा होय. त्यांनी मराठी कोकणस्थ ब्राह्मण आणि देशस्थ ब्राह्मण असा सूक्ष्म फरक करून म्हटले आहे, " हल्ली ज्यास कोकणस्थ ब्राह्मण म्हणतात ते फार पूर्वी इराणातून बलीस्थानात येतेवेळी आपल्या बरोबर देशस्थ ब्राह्मणास घेऊन आले नाहीत. कारण हे मूळचे बलीस्थानातील क्षेत्रस्थ असावेत, म्हणून कित्येक गोष्टींवरून सिद्ध करता येते, आर्यांनी जेव्हा या बलिस्थानावर स्वाऱ्या केल्या, तेव्हा त्यांनी मूळच्या देशस्थास ( ख्रिस्ती मुसलमानांसारखे आपल्या आर्यधर्मात सरते करून त्यास ) देशस्थ नाव दिले असे अनुमान निघते. आर्यांनी देशस्थ ब्राह्मणास आपल्या धर्मात सरते

करून घेतल्यानंतर त्यास यजुर्वेद वाचून पाहण्यास अधिकार दिला असावा असा अदमास करता येतो. कारण आर्यब्राह्मण आणि देशस्थ ब्राह्मण या उभयतांमध्ये काळच्या पेशवाईपावेतो मुळीच पंक्तीस उघड बसून अन्नव्यवहार करण्याची जर वहिवाट नव्हती, तर त्यांच्यामध्ये बेटी व्यवहार कोठून असणार ? कारण आर्य उर्फ कोंकणस्थ ब्राह्मणांचा वर्ण इराणी व काबुली लोकाशी मिळतो; व देशस्थ ब्राह्मणांचा वर्ण येथील मूळच्या शूद्रादि अतिशूद्रांशी मिळतो याशिवाय बहुत करून शूद्रादि अतिशूद्रांचे कुलस्वामी, देवक्के, डाका, गोंधळ, भराड वगैरे देशस्थांशी मिळतात. आर्यांनी येथल्या मूळच्या क्षत्रियांस (जबरीने, अथवा गोडीगुलाबीने म्हणा) आपल्या धर्मात सरते करून त्यांस गावोगांव वतनदार कुळकर्णी केले; तसेच मागाहून मुसलमानांनी येथील मूळच्या क्षत्रियांस येथील धर्मात सरते करून त्यास वतनदार मुल्ला केले. उदाहरणार्थ : आमचे स्नेही रे. नारायणराव शेषाद्रि. हे पूर्वी आर्यधर्मानुयायी असतां त्यांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करून इंदापुरास वतनदारी मिळवून तेथे देऊळ बांधून ख्रिस्ती धर्माचा उपदेश केला.'' वस्तुतः कोकणस्थ आणि देशस्थ हा भेद आहेच, पण तो म. फुले म्हणतात त्याप्रमाणे निर्माण झाला, असे निखालसपणे मानले जात नाही.[७०] यजुर्वेदी ब्राह्मणांचे मूळ याज्ञवल्क्यापाशी जाऊन पोंचते आणि कोकणस्थ स्वतःस चित्तपावन म्हणवून घेऊन परशुरामाचे महात्म्य गातात. क्षत्रिय आणि ब्राह्मण यांच्यातील दीर्घकालीन संघर्षाचा संदर्भ मराठी लोकजीवनात दडलेला आहेच. पण कोकणस्थ हे मूळचे इराणी, इकडे येऊन ब्राह्मण झाले, असेही एक मत प्रचलित आहे. यामधील नेमका प्रकार कोणता हा मुद्दा इथे बाजूला ठेवला तर मराठी लोकजीवनात देशस्थ ब्राह्मण ब्राह्मणेतरांच्या वर्णाचे असून त्यांची कुलदैवते एकच आहेत हे जोतिबांचे विधान विद्यमान मराठी लोकजीवनातही पूर्वीइतकेच ढळढळीतपणे खरे आहे. हा जो मराठी राष्ट्राच्या एकतेचा, समानतेचा आणि दृढतेचा धागा जोतिबांनी घट्ट पकडलेला आहे तो त्यांच्याकाळी अन्य कोणीही विचारात घेतलेला नव्हता. त्यांच्या विचाराचे आणखी एक वैशिष्ट्य हे की आपले हे मराठीपण ते एकदम अखिल मानव जातीत मिसळून टाकतात. मराठीपण आणि मानवता यामध्ये 'अखिल भारतीयत्वा'ची पाचर काही ते ठोकीत नाहीत.

## 'खऱ्या जात्याभिमान्याची डाळच शिजू देत नाहीत'

शेतकरी म्हणजे कुणबी, माळी व धनगर होत असे सांगून हे पूर्वी एकाच जातीचे असावेत असा जोतिबांचा तर्क आहे. शूद्रांचे कुलस्वामी जेजुरीचे खंडेराव यांनी कुणबी कुळातील म्हाळसाई व धनगरातील बानाबाई अशा दोन स्त्रिया केल्या होत्या असे सांगून या तिन्ही जातींचा आपसात बेटीव्यवहार असावा अशी सूचना जोतिबांनी केलेली आहे. 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनी आपल्या मनातील सर्व खंत त्वेषाने व्यक्त केली आहे. ते म्हणतात, 'आता जे संस्थानिक आहेत त्यांस जरी कर्जवाम नाही तरी त्यांचे आसपासचे लोक व ब्राह्मण कारभारी इतके मतलबी, धूर्त, धोरणी असतात की ते आमच्या राजेरजवाड्यास विद्येची व सद्गुणांची अभिरुची लागू देत नाहीत. यामुळे आपल्या खऱ्या वैभवाचे स्वरूप न ओळखून आपल्या पूर्वजांनी केवळ आमच्या चैनीकरताच राज्य संपादन केले असे मानून धर्माचे योगाने अंध जहालेले, राज्यकारभार स्वतंत्र-रीतीने पाहण्याचे अंगी सामर्थ्य नसल्याने केवळ दैवावर भार टाकून ब्राह्मण कारभाऱ्यांच्या ओंजळीने पाणी पिऊन दिवसा गोप्रदाने व रात्री प्रजोत्पादन करीत स्वस्थ बसतात. अशा राजे रजवाडयांच्या हातून आपल्या शूद्र जात बांधवाचे कल्याण होण्याचा संभव विशेष, परंतु त्यांच्या मनात जो विचार कधीही आला नाही व जोपर्यंत 'ब्राह्मणो मम दैवतम्' हे वेड त्यांच्या डोक्यातून निघाले नाही, तोपर्यंत कितीही कपाळकूट केला तरी ती व्यर्थच जाणार व इतकेही करून तसे करण्यास कोणी प्रवृत्त झाल्यास बाळपणापासून मनावर जाहलेल्या दृढ संस्कारांमुळे या मतलबी धर्माचे विरुद्ध चार गोष्टी ऐकून त्यांचा विचार करणे त्यास कोठून रुचणार ? व जवळचे कारभारी अगोदर अशा निःस्पृह व खऱ्या जात्याभिमान्याची डाळच शिजू देणार नाहीत, तशातून धैर्य धरून एखाद्याने मला तशी सवड दिल्यास मोठ्या आनंदाने मी यथामती आपले विचार त्यांचेपुढे सादर करीन.'[७१]

## सातवळेकर आणि आंबेडकर

त्यांच्या ठायी जातिबांधवांचा अभिमानच आहे इतकेच नव्हे तर उत्तर

पेशवाईत नानासाहेब पेशवे यांच्या मृत्युनंतर देशस्थ आणि कोकणस्थ ब्राह्मणांमध्ये मराठी राज्याची सूत्रे हाती ठेवण्यासाठी जी जीवघेणी स्पर्धा झाली तीही त्यांना पूर्णपणे माहीत आहे. देशस्थ ब्राह्मण हे ब्राह्मणेतर जाती-जमातींच्या समवेत कोकणस्थांशी उघड उघड दोन हात करावयास पुढे आले होते. पेशवाईच्या राजकारणात कोकणस्थांचा जय झाल्यामुळे पुणे शहराला ब्राह्मणांच्या एकांगी संस्कृतीचे वळण मिळाले. नागपूर, कोल्हापूर किंवा ग्वाल्हेर आणि इंदोर या ठिकाणी अशी ब्राह्मणी सत्ता न फोफावल्यामुळे तिथे ब्राह्मण ब्राह्मणेतरांचे वैषम्य विकोपाला गेले नव्हते. बडोदे संस्थानात सयाजीराव महाराजांच्यामुळे केवळ सर्व मराठी भाषीच नव्हे तर गुजराथी आणि मराठी भाषी असेही ऐक्य त्यांनी आपल्या जातिसमन्वयाच्या धोरणाने निर्माण केले. अर्थात महात्मा फुले यांच्याही अंतःकरणात जातिसमन्वयाची प्रेरणा अखंड तेवत होती. पण या जातिसमन्वयासाठी ब्राह्मणांनी आपल्या कपट-नीतीचा त्याग केला पाहिजे आणि वेदादि सर्व मूळ ग्रंथांचा अधिकार सर्व ब्राह्मणेतर जातींनादेखील बहाल केला पाहिजे असा त्यांचा कट्टर आग्रह होता. जोतिबांच्या पश्चात् अवघ्या पंचवीस वर्षात पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यांनी वेदांचे मराठी आणि हिन्दी भाषान्तर करण्याचे अवाढव्य कार्य हाती घेतले आणि त्यास सयाजीराव महाराजांकडून मोठया प्रमाणावर आर्थिक सहाय्यही मिळाले. आणि त्याच सुमारास डॉ. आंबेडकर यांनी महाड येथे महात्मा फुले यांच्या आदेशानुसार जाहीर रीतीने मनुस्मृतीची होळी केली. एका बाजूने पं. सातवळेकरांनी आणि दुसऱ्या बाजूने डॉ. आंबेडकरांनी महात्मा फुले यांचेच ईप्सित पूर्ण केले. ब्राह्मणवर्गाने मनुस्मृतीचा कुठलाही गंडा आता आपल्या मनगटाला बांधलेला नाही किंवा आपल्या गळ्याभोवती गुंडाळलेला नाही. मनुस्मृतीच्या धाकातून, जाचातून आणि कैदेतून एकूण मराठी ब्राह्मण-वर्गाचीच फुले यांनी सुटका केलेली आहे. किंबहुना जोतिबांच्या जहाल आणि बोचऱ्या हल्लयांचा विषाद न मानता इतर कोणत्याही जातीपूर्वी ब्राह्मण जातीनेच म. फुले यांच्या विचारसरणीचा योग्य बोध घेऊन आपल्या आचाराविचारास काळानुरूप लोकसन्मुख वळण दिले. पण हे सर्व घडत असतांना रागाचे, लोभाचे, संघर्षाचे अनेक प्रसंग येऊन गेले. त्यांचा सविस्तर विचार पुढे करावयाचाच आहे. पण १९३९ साली सर्व मराठी भाषिकांचे एक संयुक्त राज्य

प्रस्थापित व्हावे, असा जो विचार वेगाने पुढे आला, तो, महात्मा फुले यांच्यापासून मराठी समाजाला एकीचा जो महामंत्र मिळाला होता, त्या मंत्रातूनच उद्‌भवला."[७२]

## जोतिबांनी सत्यशोधकी परशु सपासप चालविला

फुले यांच्या पूर्वीचा महाराष्ट्र आणि फुले यांच्यानंतरचा महाराष्ट्र असे स्पष्ट दोन विभागच आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात पडतात. फुले यांच्या पूर्वीच्या मराठी लोकजीवनाचा आढावा घेण्याचाच आपण येथवर प्रयत्न केला आहे. शिवछत्रपतींच्या योगाने एकत्र आलेले आणि आद्य शाहू-छत्रपतींनी टिकवून धरलेले मराठी राष्ट्र पानिपतच्या युद्धानंतर विलयास गेले आणि पुण्यातील केंद्रवर्ती सत्ता ब्राह्मणशाहीत रूपांतर पावली. ही ब्राह्मणशाही आपसातील यादवीने धुळीला मिळाली. त्यामुळे मराठी राष्ट्राचा मागमूसही पुण्यात उरला नव्हता. ब्रिटिश सत्तेने प्रत्येक जातिजमातीच्या मुखंडांशी आपले सलोख्याचे संबंध धाक दाखवून किंवा सख्य करून जोडले होते. अशा-वेळी ज्याला मराठी समाज म्हणता येईल असा समाज पार विस्कळीत होऊन गेला होता. म. फुले यांच्या कार्याने हा समाज एकत्र येण्याचा मार्ग मोकळा झाला. जोतिबांनी ब्राह्मण्यावर हल्ला करावयास फार उशीरा सुरुवात केली आणि तीही अशा रीतीने की तो हल्ला ब्राह्मणांवरचाच वाटावा. जोतिबांनी स्त्रीशिक्ष-णाची किंवा समाजसुधारणेची पावले १८५१ च्या आसपास टाकली. पण त्यांचा ब्राह्मणवर्चस्वावरील पहिला हल्ला १८६९ सालचा आहे. म्हणजे त्यांच्या कार्याची सुरुवात आणि त्यांच्या ब्राह्मणवर्गावरील हल्ल्याची सुरुवात यामध्ये जवळजवळ वीस वर्षांचे अंतर आहे. ऐन तारुण्यात ते एकही जहाल शब्द न बोलता, आपल्या अंगावर धावून येणाऱ्या सर्व कर्मठ ब्राह्मणांना किंवा ब्राह्मणेतरांना एका अवाक्षरानेही न दुखावता हाती घेतलेले काम तडीस नेण्याच्या उद्योगात राहिले आणि चाळीशी उलटल्यानंतर मात्र ते सर्व ब्राह्मणवर्गावर झंझावातासारखे तुटून पडले. या मधल्या वीस वर्षांत असे काय घडले की, ज्यामुळे ते असे भावनेचा आगडोंबच ब्राह्मणांविरूद्ध उभे करते झाले. जातीची बंधने तोडून समाजात नवचैतन्य आणू पाहणाऱ्या परमहंस सभेला आणि त्या सभेच्या कार्यकर्त्यांना जी वागणूक एकूणच

ब्राह्मणवर्गाकडून मिळाली ती त्यांना विस्मयजनकच वाटली. तसे पाहिले तर विधवाविवाह किंवा केशवपनविरोध या ब्राह्मणवर्गातीलच सुधारणा होत्या. तरीही या सुधारणांसाठी सभा घेणे किंवा प्रचार करणे हे जोखमीचे काम होऊन बसले होते. आपल्या जिवावर उदार होऊनच या सुधारणांचा कैवार घेता येत असे. ज्या कोणाचे हाती एखादा सुधारक लागे तो त्यास चांगला बडवूनच काढी. महात्मा फुले हे तसे लहूजी मांगाच्या तालमीत तयार झालेले पहिलवान. पण त्यांनी लाठीकाठी घेऊन एखादी सुधारणावादी टोळी उभी करण्याचे काही मनावर घेतले नाही. उलट साठ–सत्तर लोकांनिशी सत्यशोधक समाजासारखी ध्येयवादी संघटना उभी करण्याचा हव्यास केला. जोतिबांनी ब्राह्मण जातीवर ओढलेले कोरडे केवळ क्रोधाने किंवा द्वेषाने ओढलेले नाहीत. त्यांनी संपूर्ण मराठी समाजाच्या विद्यमान लोकजीवनाचा आणि पूर्वकालीन इतिहासाचा साद्यन्त अभ्यास करून आपल्या टीकेचा दांडपट्टा चौफेर चालविला. जोतिबांनी शब्दाचा उपयोग जाणूनबुजून, हेतुपूर्वक आणि अगदी योजनापूर्वक शस्त्रासारखा केला आहे. हाच मराठी लोकजीवनातील नवा व्यवहार होता. जोतिबांपूर्वी लोकहितवादी यांनी शब्दांचा उपयोग, बागेतील झाडे कापावयाच्या कात्री सारखा केला होता. परंतु जोतिबा यांच्या हिशेबी सुऱ्या–कात्र्यांसारखी लहान आयुधे नगण्यच होती. त्यांना आपल्या हाती परशु किंवा तलवारच हवी होती. त्याशिवाय शेकडो वर्षांच्या जुनाट रूढींचे उच्चाटन आपल्याच हयातीत करण्याचा त्यांचा ध्यास पुरा होणार नव्हता. आपल्या समाजाच्या अंतरंगात, हरेक जातीच्या पोटात दर पिढीगणिक जे अविश्वासाचे, असंतोषाचे आणि अपसमजाचे वारेमाप पीक उभारून येत असे ते समूळ छाटून टाकण्यासाठी महात्मा फुले यांच्या अंतःकरणाला ओढ लागलेली होती. हा असा प्रपंच करण्याचा विचार मराठी भूमीत आधुनिक काळात सर्वस्वी नवीन होता. परशुरामाने जशी 'शापादपि शरादपि' अशी टोकाची भूमिका घेतली तशीच टोकाची भूमिका घेऊन महात्मा फुले मराठी भूमीत उभे ठाकले. त्यांनी परशुरामाला 'तू चिरंजीव आहेस तर माझ्यापुढे येऊन उभा हो' असे आव्हान केले होते. आणि जणू काही परशुराम साक्षात आपल्यापुढे जिवंतपणे उभा आहे असे समजूनच त्यांनी एकूण ब्राह्मणी संस्कृतीवर आपला

सत्यशोधकी परशु सपासप चालवला.[७३]

## त्यांच्या कमरेच्या त्या किल्ल्या निखळून पडल्या!

याच सुमारास पंजाबात आर्यसमाजाची स्थापना दयानंद सरस्वतींनी केली. एकीकडे वेदप्रामाण्य नाकारणाऱ्या महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाची आणि दुसरीकडे वेदप्रामाण्यच शिरोधार्य मानणाऱ्या आर्यसमाजाची विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमालेच्या ४८ व्या अंकात एकच दखल घेतली होती. ते लिहितात, "मि. फुले यांच्या मतांवर टीका केली किंवा गुलामगिरीचा उपहास केला, म्हणजे शूद्रमंडळींवर आम्ही हत्यार धरलेसे जर होते, तर दयानंदजींच्या संबंधाने मजकूर लिहिल्याने आम्ही साऱ्या ब्रह्मवृन्दास दुखविले असेही पण म्हणायाला पाहिजे; परंतु या दोन्हीही गोष्टी खोट्या आहेत हे कोणालाही सांगायला पाहिजे असे नाही. लक्षावधी ब्राह्मण देवपूजेच्या संथळ्या झुगारून देऊन नित्य प्रातःकाळी हवा शुद्धर्थ होमहवन करू लागले आहेत, शेकडो ब्राह्मण राजांनी आर्यसमाजाच्या पटात आपली नांवे घालून दिली आहेत, व पंढरपूर, जगन्नाथ इत्यादि क्षेत्रांकडे आता कुणी ढुंकूनही पहात नाही हा प्रकार अद्याप जसा कोठेही आढळू लागला नाही; त्याप्रमाणेच शिंदे, होळकर, पवार वगैरे शूद्र अधीपति हे बडे बडे सत्यशोधक बनले आहेत आळंदी, देहू, जेजुरी वगैरे ओस पडून तुकारामप्रभृती संतमंडळींचे महात्म्य पार नाहीसे झाले आहे, असलेही प्रकार कोठेही दृष्टीस पडत नाहीत. मि. फुले यांस सूचना अशी की जर त्यास आपल्या ज्ञातिबंधूंची सुधारणा कर्तव्य असेल तर ती गुलामगिरीच्या सारखे ग्रंथ तयार केल्याने व जे आपणाहून सर्व प्रकारे श्रेष्ठ त्यांस नुसत्या शिव्या दिल्याने ती होणार आहे असे मुळीच नाही. ब्राह्मण कितीही लबाड असले व कितीही दुष्ट असले तरी एक गोष्ट निर्विवाद आहे, की ज्ञानभांडाराच्या किल्ल्या त्यांच्या कमरेला आहेत. त्यांच्या साह्याशिवाय इतर ज्ञातीस ज्ञानाचा लाभ होण्याचा मुळीच मार्ग नाही. पाद्रीसाहेब हजारो रुपये खर्च करून बळीच्या राज्यातून किंवा चंद्रलोकांवरून इकडे येवोत व शूद्रांस विद्या पटविण्याविषयी पाहिजे तितकी खटपट करोत पण भटांनी कामात पडल्यावांचून ते बिलकूल सिद्धीस जावयाचे नाही."[७४] निबंधमालेतील या उद्गारांनंतर अवघ्या पंचवीस वर्षांतच ब्राह्मणी

वर्चस्वाच्या सर्वतोपरि ठिकऱ्या उडाल्या आणि त्यांच्या कमरेच्या ज्ञानभांडाराच्या किल्ल्या निखळून पडल्या.

## आर्यभूमीचा अभिमान हाच एकमेव निकष

महात्मा फुले यांच्या काळात मराठी संस्कृतीचे जुने वस्त्र फाटून गेले. नवे वस्त्र त्यांनीच विणावयास घेतले होते. त्याची वीण कशी होत गेली, हे पाहण्यासाठी खुद्द जोतीबांचे कार्य आणि कर्तृत्व समजावून घ्यावे लागणार आहे. पण जोतिबा मूळ ब्राह्मणी संस्कृतीवर हल्ला करतात म्हणजे ते अखिल भारतीयत्वाच्या संकल्पनेवर आणि श्रद्धेवर हल्ला करीत आहेत, हे अन्य कुणाच्या आजवर लक्षात आलेले नसले तरी खुद्द विष्णुशास्त्र्यांना मात्र 'मि. फुले' यांच्या विचारसरणीतील या गर्भितार्थाचा उमज आला होता. म्हणूनच त्यांनी पुढे असे लिहून ठेविले आहे की, "जोतिबांच्या शिष्यवर्गासही आमचे असे सांगणे आहे कीं, 'गुलामगिरी' सारख्या ग्रंथावरून ब्राह्मणांविषयी जे दुष्ट ग्रह काहीकांच्या मनात बिंबले असतील ते त्यांनी सोडून द्यावे. त्यांनी अंमल डोळे उघडून वास्तविक स्थिती कशी आहे ती जर पाहिली, तर ब्राह्मणांच्या मनात त्यांच्याविषयी अत्यंत वैर जळत आहे व त्यांचे जेवढे वाईट होईल तेवढे करण्याविषयी ते निरंतर तत्पर असतात वगैरे कल्पना किती कुत्सित आहेत, हे त्याच्या तेव्हांच लक्षात आल्यावाचून राहाणार नाही; आता हे खरे आहे की, ब्राह्मण म्हणजे सर्वच अत्यंत सुजन आहेत व त्यात दोष म्हणून सापडावयाचाच नाही, किंवा शूद्रांचे दुःखाक्रोश सर्व व्यर्थ असून त्यांच्या स्थितीत सुधारणा करण्याची बिलकुल गरज नाही, असे आमचे मुळीच म्हणणे नाही. आमच्या ज्ञातीचे जे काही वास्तविक दोष असतील ते सर्व आम्हास कबूल आहेत; त्यावर पांघरूण घालण्याची किंवा ते नाहीत असे म्हणण्याची आमची बिलकुल इच्छा नाही. त्याप्रमाणेच आमच्या शूद्र देशबंधूंवर जातिभेदाच्या संबंधाने वगैरे जी दुःखे खरोखर येत असतील ती हलकी करणे किंवा होतील तितकी नाहीशी करणे हे प्रत्येक देशहितेच्छूचे कर्तव्य होय हेही आम्हास मान्य आहे; व आमची पक्की खात्री आहे की या कामास आमच्या ज्ञातिबांधवांची विमुखता दृष्टीस पडणार नाही. इतकेच नव्हे तर पुष्कळ मोठ्या

उत्साहाने त्यास साहाय करतील. तर असे काही सुविचार मनात आणून आमचे सत्यसमाजवाले देशबंधु त्याप्रमाणे जर चालतील, व या आर्यभूमीचा आजपर्यंत साऱ्या जातींनी जसा अभिमान बाळगला तसाच पुढेही बाळगून आपसाआपसात वितुष्ट वाढू न देण्याविषयी जर तजवीज ठेवतील, तर अजूनही आमची स्थिति सुधारेल व हल्लीच्या राज्यापासून होणारे विद्यादिक अमूल्य लाभ ते सर्वांस होऊन सर्वांचे कल्याण होईल, यांत शंका नाही.''[७५] यामध्ये 'आर्यभूमीचा अभिमान पुढेही बाळगून' एवढी एकच अट शास्त्रीबुवांनी घातलेली आहे.

## खरे क्रांतिकरत्व या नवीन धारणेत

जोतिबांच्या विचारातील 'आर्यभूमीच्या अभिमानाचा अभाव' हा जो शास्त्रीबुवांना जाणवला आणि नंतरच्या कोणासही तो जाणवलानाही, हे कसे काय घडले? किंबहुना, शास्त्रीबुवांना महात्मा फुले यांच्या विचारांचे मर्म गवसले आहे, हे देखील नंतरच्या पिढ्यांच्या ध्यानात आले नाही. असा एकूणच ज्ञानाचा सावळगोंधळ कां झाला? यास एकमेव कारण हे आहे की, ब्राह्मणी संस्कृतीनेच आर्यभूमीचा अभिमान जन्मास घातला आणि जोपासला हे महात्मा फुले यांचेप्रमाणेच शास्त्रीबुवांनाही माहित होते. नंतरच्या पिढयांनी आर्यभूमीचा अभिमान हा हजारो वर्षांची परंपरा समजून स्वाभाविक म्हणून स्वीकारला. तत्कालीन पिढीत शास्त्रीबुवांखेरीज अन्य कोणास हे उमजले नाही, यास कारण हे की, नोकरवर्गाच्या हिंदीकरणाच्या ध्येयापोटी आर्यभूमीचा अभिमान त्यांनाही स्वाभाविक वाटत होता. म्हणून तेही चकले. शिवाय, महात्मा फुले यांची टीका ही ब्राह्मणवर्गावरील टीका म्हणूनच त्यांनी ध्यानात घेतली. शास्त्रीबुवांनी मात्र 'गुलामगिरी'चे चांगलेच पारायण केले असावे. त्याशिवाय, मराठी माणूस एकदम मानवजातीशीच जोडून टाकण्याची त्या ग्रंथातील किमया त्यांच्या ध्यानी आली नसती. भारतीयत्वाचे वेगळे असे नाते 'गुलामगिरी'त कुठेच दाखविलेले किंवा मान्य केलेले नाही. ते जर त्यांनी मान्य केले असते तर त्यांचा ब्राह्मणी संस्कृतीवरील सर्वच हल्ला निरर्थक ठरला असता. महात्मा फुले यांची दृष्टी ही सर्वस्वी 'मराठी' दृष्टी होती; सर्वार्थाने स्वायत्त आणि स्वतंत्र समाजजीवनाची दृष्टी होती आणि कुठल्याही

अर्थाने ती 'भारतीयत्वा'च्या अभिमानाने प्रेरित झालेली नव्हती. या दृष्टीला 'मराठी'पणानंतर एकदम 'मानव' जात आठवत होती आणि म्हसोबा, बहिरोबा, जोतीबा आणि खंडोबा ही स्थानिक दैवतेच त्या दृष्टीला पूजनीय वाटत होती. महात्मा फुले यांच्या या विचाराचे वैशिष्ट्य हे की, त्यांचेपूर्वी ही दृष्टी कोणाही आधुनिक समाजधुरीणाने आपल्या आचारविचारात ठेवलेली नव्हती. परंतु इंग्रजांचा जय होण्यापूर्वी येथील प्रत्येकच प्रांतात तेथील रहिवाशांचा वेगवेगळा राज्यकारभार होता. माळवा आणि महाराष्ट्र या दोन्ही प्रांतात मराठ्यांचेच राज्य असले तरी माळव्याचे राजकारण आणि समाजकारण भिन्न होते; महाराष्ट्राचे भिन्न होते. बंगाली, बिहारी, तामिळी, शिखी, गुजराथी आणि कर्नाटकी राजघराणी आपापल्या 'देशां'चा वेगवेगळा राज्यकारभार चालवीत होती आणि ती सर्वप्रकारे परस्पराहून भिन्न आणि स्वतंत्र समाजघटक या नात्यानेच भरतभूमीवर वावरत होती. भोसले, शिंदे, होळकर, गायकवाड हे पेशव्यांशी एकनिष्ठ राहिले नाहीत यास कारण त्यांमध्ये राष्ट्रीयत्वाचा अभाव होता, हे नसून ते ज्या ज्या प्रांताचे राज्यकर्ते होते त्या त्या प्रांतांची राष्ट्रीयत्वे ते उराशी बाळगून होते, हे आहे. महात्मा फुले यांना हा सर्व व्यवहार आपल्या संस्कारक्षम वयातच पाहावयास मिळाल्यामुळे आणि वेळोवेळी तत्संबंधी म्हाताऱ्या माणसांकडून अशीच 'देशां'च्या भिन्नत्वासंबंधीची माहिती ऐकावयास मिळाल्यामुळे महाराष्ट्र हाच आपला देश याविषयी त्यांची स्वानुभवाने खात्री पटत गेली व तीच त्यांच्या विचारांना वेगळेपणा द्यावयास कारणीभूत ठरली. ग्रामीण संस्कृतीची मूळ बैठक मान्य करून ब्राह्मणी संस्कृतीला सर्वांगीण विरोध करावयाचे त्यांनी ठरविले, यातच त्यांचे विभूतिमत्त्व साठविलेले आहे.

## शास्त्रीबुवांना मात्र हे सर्व कळले होते

भारतीयांमध्ये खरोखर 'राष्ट्रीय' भावनेचा पूर्णपणे अभाव आहे, असेच इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज येथे आल्यापासून म्हणत गेले. पण तो विपर्यास होता. वस्तुस्थिती अशी होती की, येथे 'राष्ट्रीय' भावनांचा सुकाळ होता! भारतात अठराव्या शतकात किमान पंचवीस 'राष्ट्रे' वावरत होती;

महाभारतकाली १५६ 'राष्ट्रां'चा उल्लेख आढळतो!'* महात्मा फुले यांनी या वास्तवाचा आपल्या विचारसरणीत निर्भयपणे स्वीकार केला, हे त्यांचे खरे द्रष्टेपण आहे. व्यापार, व्यवहार आणि इतिहास या सर्वांची साक्ष अशा बहुपदरी राष्ट्रवादाच्याच बाजूने होती. लोकमानसातील आठवणींच्या, आग्रहांच्या साहाय्याने जोतिबांनी ती साक्ष पहिल्यांदा शब्दबद्ध केली, हे त्यांचे खरे क्रांतिकारकत्व आहे. खंडोबा हाही शिवाचाच अवतार आहे, असा 'समज' निर्माण करणे अखिल भारतीय संस्कृतीच्या उभारणीसाठी ब्राह्मणांना भागच होते. ब्राह्मणी संस्कृतीच्या विस्तारापोटीच ही स्थानिक देवदैवतांच्या समन्वयाची दृष्टी होती. पण त्यामुळे खंडोबा हा गौण आणि शिव हा प्रधान देव ठरत होता. महात्मा फुले यांनी खंडोबाला प्राधान्य देताच शिवाचा म्हणजेच आर्यभूमीच्या अभिमानाचा धागाच उसवतो, हे विष्णुशास्त्रांच्या बारीक नजरेने नेमके हेरले, यात शंकाच नाही. हा आर्यभूचाच संदर्भ, संबंध आणि संघ 'मि. फुले' यांच्या 'गुलामगिरी'तील तत्त्वज्ञानामुळे समूळ उध्वस्त होतो, हे त्यांच्या नजरेस आल्यामुळेच त्या ग्रंथातील विवेचनावर ते त्वेषाने तुटून पडले. महात्मा फुले आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यातील वैचारिक संघर्षाचा आपल्याला पुढे सविस्तर विचार करावाच लागणार आहे. पण तत्पूर्वी इंग्रजी राजवटीमुळे देशकालमानात कसा आणि कोणता पालट होत होता, याचा प्रपंच केला पाहिजे.

## तिकडे राजेशाही जाऊन लोकशाही आली होती

टोपीकर इकडे येऊन राज्यकर्त्यांची वस्त्रे आपल्या अंगावर चढवीपर्यंत युरोपातील देशकालमानात दोन परिवर्तने होऊन गेली होती. पहिले परिवर्तन इंग्लंडात आणि दुसरे जर्मनीत झाले. ज्यावेळी मुंबई बंदरात कंपनीच्या वखारीचे ठाणे आले त्यावेळीच पहिले परिवर्तन पूर्ण झाले होते. किंबहुना असे म्हणता येईल की, वास्को ड गामा १४९८ साली पश्चिम किनारी येऊन पोहचला तेथपासून संभाजीराजाचा वध होईपर्यंतच्या दोनशे वर्षांच्या कालखंडात राजेशाही जाऊन लोकशाहीचा अंमल इंग्लंडात सुरू झाला.

वस्तुतः ट्यूडर आणि स्टुअर्ट या दोन राजघराण्यातील पिढीजात कलहांचीच पार्श्वभूमी या काळातील परिवर्तनाला होती. ट्यूडर वंशाने इंग्रज लोकांचे धुळीस मिळालेले राष्ट्र पुन्हा कसे उदयोन्मुख केले आणि या नवजागृत राष्ट्राने स्टुअर्ट वंशाला कसे आपल्या लोकमताच्या मुठीत दाबून आपल्या राज्यकारभारावर आपली पकड कशी बसविली, हे सांगण्याची ही जागा नव्हे. पण या दोनशे वर्षांतील घडामोडींमुळे इंग्रज लोकांच्या स्वभावात आणि व्यवहारात नवनवीन ईर्ष्या उत्पन्न होत गेल्या. विशेषतः १६४० साली निवडून आलेल्या पार्लमेंटने ३० जानेवारी १६४९ साली राजा चार्लस यास देहान्ताची शिक्षा ठोठावली. 'राजावर खटला चालवायचा अधिकार कोणत्याच कोर्टाला नाही' असा दावा त्याने केला; पण तो कोणीच जुमानला नाही. उलट, चार्लसच्या देहान्तानंतर राजघराणे आणि हाऊस ऑफ लॉर्डस यांना केवळ नाममात्र ठेऊन सर्व सत्ता हाऊस ऑफ कॉमन्सच्या हाती केन्द्रित करण्यात आली. पण त्यावेळी पार्लमेंटमध्ये जे सभासद होते ते श्रीमंत वर्गाचेच प्रतिनिधी होते आणि त्यांचे पुढे सरसेनापती क्रॉम्वेल याचेशी सुधारणेच्या प्रश्नावरून वाजले आणि अखेरीस सैन्यातील सुधारणावाद्यांचे समाधान करण्यासाठी क्रॉम्वेलने वेस्टमिनिस्टर प्रासादात घुसून सर्व सत्ताच आपल्या हाती घेतली. धूर्त श्रीमंतच्या हाती गेलेली सत्ता काढून घेऊन लोकांच्या हाती खरी सत्ता द्यावी या उद्देशानेच हे बंड झाले; पण प्रत्यक्षात क्रॉम्वेलची हुकूमशाही निर्माण झाली. क्रॉम्वेलच्या मृत्यूनंतर पुन्हा राजेशाही आली, पण राजा आपल्या काबूत राहिला पाहिजे, अशी भूमिका प्रबळ झाली. क्रॉम्वेलच्याच काळात इंग्लंडचे चर्च स्थापन झाले होते. पण पुढे १६७८ साली राजा चार्लस याचा खून करण्याचा प्रयत्न कांही जेसुइटांनी केल्याचे वर्तमान आल्यामुळे ब्रिटिश पार्लमेंटने आपल्या दोन्ही सभागृहात रोमन कॅथॉलिकांना सभासद होण्यास मनाई केली. पण जेम्सने राज्यावर येताच ही मनाई पायाखाली तुडवून लष्करातील अधिकाऱ्यांच्या जागा, प्रिव्ही कौन्सिलच्या जागा, विद्यापीठातील जागा रोमन कॅथॉलिकांना देण्याचा सपाटा सुरू केला. पोपचे दूत राजदरबारात दिमाखाने हिंडू फिरू लागले. कॅथॉलिक पंथाला लंडनमध्ये पुन्हा उजाळा मिळाला. पोपचे जुने 'सर्वाधिकारी' पुन्हा एकदा प्रबळ झाले. त्यामुळे लंडन शहरात जेव्हा असंतोष उद्भवला तेव्हा जेम्सने

१६००० फौजेचा खडा पहारा शहरावर ठेवला. पण यामुळे टोरी आणि व्हिग हे दोन्ही पक्ष राजाविरुद्ध एकवटले. त्यामुळे जेम्सवर फ्रान्सला पळून जाण्याचा प्रसंग आला. 'पळून जाण्याचा अर्थ राज्यत्यागच होय' असा ठराव करून पार्लमेंटने एक 'जाहीरनामा' काढला. कोणताही कायदा राजाला तहकूब करता येणार नाही, पार्लमेंट नियमितपणेच बोलावले गेले पाहिजे आणि पार्लमेंटची संमति आणि मंजुरी घेतल्याशिवाय राजाला सैन्य ठेवता येणार नाही, असे आपले हक्क जाहीर केले." हा हक्कनामा मान्य केल्या-नंतरच विल्यम आणि मेरी यांना राजा आणि राणी म्हणून पार्लमेंटने मान्यता दिली. धार्मिक स्वातंत्र्याचा म्हणजे प्रॉटेस्टंट पंथाच्या प्रसाराचा आणि प्रचाराचा अधिकार लोकांना मिळाला. त्यांचेवर जरी सरकारी नोकरीसंबंधात निर्बंध होते, तरी प्रत्यक्षात ते निर्बंध शिथिल होऊन कॅथॉलिकांचे बरोबरीने ते सर्वत्र दिसू लागले.

## ह्या जर्मनीतील धर्मक्रांतीचा प्रभाव

ह्या जो प्रोटेस्टंट पंथाच्या संबंधातला वाद इंग्लडात झाला तो जर्मनीत उदयास आला होता. १५१७ साली रोमचा पोप, दहावा लिओ, याने सेंट पिटरचे नवे कॅथेड्रल बांधावयास काढले होते आणि त्याचे शिल्प मायकेल एंजेलोने रेखाटलेले होते. ते सर्वांगसुंदर आणि अप्रतिम व्हावे, अशी पोपची इच्छा होती. जगांतील सर्वात सुंदर वास्तू म्हणून तिची उभारणी व्हावयाची होती. त्यासाठी अमाप पैसा हवा होता आणि तो कसा उभारावयाचा एवढाच खरा प्रश्न होता. क्षमापत्रांचा आणि सूटपावत्यांचा पाऊस पाडून तो मिळविण्याचा घाट घालण्यात आला. खुनातून, शिंदळकीतून, दरोड्यातून क्षमा; अवैध गोष्टींपासून सूट, नात्यात लग्नास सूट, उपवासाचे दिवशी मांसाहारास सूट! या क्षमापत्रांची आणि सूटपावत्यांची जेव्हा अखंड वर्षा सुरू झाली तेव्हा मार्टिन ल्यूथर नामक पाद्री त्याविरुद्ध बंड करून उठला. जर्मनीचा राजा फ्रेडरिक अणि पोप दहावा लिओ यामध्ये मार्टिन ल्यूथर प्रकरणी पुष्कळच वाद निर्माण झाला आणि फ्रेडरिक त्यात पुष्कळच टिकून राहिला. याचवेळी डिसायडेरस इरॅस्मस नामक विद्वान रोमन चर्चमधील भ्रष्टाचाराविषयी, अनीती-विषयी वारंवार लिहित होता. फ्रेडरिकला या इरॅस्मसची फार मदत झाली. इरॅस्मस

हा चर्चच्या जाचातून ख्रिश्चनांना मुक्त करू पाहात होता. धार्मिक स्वातंत्र्याचा तो भोक्ता होता. मार्टिन ल्यूथरची भूमिका न्याय्य आहे, असेच तो म्हणत असे. पण पोपविरुद्ध बंड करावयास तो मार्टिन ल्यूथरबरोबर पुढे आला नाही. कारण, ल्यूथर हा कडवा ख्रिस्ताभिमानी होता! ल्यूथर यानेच बायबलचे जर्मन भाषेत भाषांतर करून जर्मन भाषेला रंगरूप दिले. ल्यूथर हा एक निसर्गाचाच उद्रेक होता—त्याच्याठायी यत्किंचितही दंभ नव्हता. निसर्ग जसा शांत असला म्हणजे मोहक पण खवळला म्हणजे भयावह वाटतो, तसा ल्यूथर होता. इरॅस्मस हा स्वच्छंदी–गुलजार वृत्तीचा माणूस. इरॅस्मसने रोमन चर्चमधील भ्रष्टाचाराविरुद्ध लेखणी परजली होती. इतकेच नव्हे तर पोप दहावा लिओ हा त्याचा परम मित्र असताना त्याने मुद्दाम पाचारण केल्यावरही, तो त्यास भेटावयास रोमला गेला नाही किंवा त्याचे मन राखण्यासाठी त्याने ल्यूथरवर टीकेची झोडही उठविली नाही. इरॅस्मस आणि ल्यूथर यांनी मिळून युरोपखंडात पोपशाहीविरुद्ध बंडच पुकारले होते. पण इरॅस्मस हा केवळ वाचिवीर होता-ल्यूथर कृतिवीर होता. या संदर्भात जेम्स अँथनी फ्राऊड नामक विचारवंताने म्हटले आहे की, "भौतिक प्रगतीत तत्त्वज्ञ हे पुढारीपण करीत असतात—तो जे सांगेल ते आपण मान्य करीत असतो. पण मानवजातीच्या आध्यात्मिक प्रगतीचे चक्र उलटे आहे. प्रत्येक पुढचे पाऊल सामान्य लोकच आधी उचलतात आणि विद्वानांना सर्वात शेवटी त्याची जाण येते. ल्यूथरने जर विद्वानांसाठीच लिहिले असते तर त्याची पुस्तके ग्रंथालयात धूळ खात पडली असती; त्याच्या शब्दामुळे युरोपचा जो मोहराच बदलला तो काही बदलला नसता."[७८]

## सार्वजनिक जीवनाला प्रामाण्य आणि प्राधान्य

अशा प्रकारे जी दोन परिवर्तने युरोपात या काळात झाली ती इंग्लंडात लोकशाहीच्या प्रस्थापनेला आणि युरोपात औद्योगिक क्रांतीला प्रेरक ठरली. ल्यूथरने तर जर्मन राष्ट्राचीच उभारणी केली. १८६० साली जेव्हा राणीचे राज्य येथे पक्के झाले तेव्हा या दोन परिवर्तनामुळे ही नवी राज्यकर्ते मंडळी रोमच्या कॅथॉलिकपंथीय पोपचा धर्मप्रसार करण्याच्या मनस्थितीतच नव्हती. धर्मप्रचार किंवा धर्मप्रसार हे ब्रिटिश राजनीतीचे मुख्य अंग

नव्हतेच. पण त्याव्यतिरिक्त धर्मगुरू आणि राजघराणी याजविषयी त्यांची भावना आदराची असली तरी श्रद्धेची राहिलेली नव्हती. सार्वजनिक सहजीवनाला राजा किंवा धर्मगुरू याहून वेगळे अधिष्ठान आहे; आणि ते पार्लमेंटच्या रूपाने उभे आहे, अशी त्यांची प्रामाणिक धारणा होती. या राज्यकर्त्यांच्या संपर्कामुळे भारतीय लोकजीवनाच्या धुरीणांमध्येही अशा सार्वजनिक सहजीवनाच्या परंपरा उभ्या करण्याच्या आकांक्षेचा प्रादुर्भाव झाला. १८५२ साली मुंबई येथे स्थापन झालेली वेस्टर्न इंडिया असोसिएशन ही अशीच एक अशा आकांक्षेपोटी जन्माला आलेली संस्था होती. १८८५ साली इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना झाली ती असे नवीन सार्वजनिक सहजीवन उभे करण्याच्या आकांक्षेपोटीच. महात्मा फुले यांनी 'सत्यशोधक समाज' स्थापन केला त्याकाळी अशा रीतीने 'सार्वजनिक' जीवनालाच प्रामाण्य आणि प्राधान्य प्राप्त झाले होते.

## सत्यशोधक शब्दाची संभाव्य कूळकथा

महात्मा फुले यांच्या तोंडी सत्यशोधक समाज आणि मानवधर्म असे दोन शब्दप्रयोग आढळतात. पैकी 'सत्यशोधक' हा शब्द बाबा पद्मनजी यांचेकडून आणि 'मानवधर्म' हा शब्द दादोबा पांडुरंग यांचेकडून आलेला दिसतो. बाबा पदमनजी यांनी तो कोठून उचलला; ते सांगता येत नाही. पण भारतीय लोक सत्याची फारशी तमा बाळगीत नाहीत, असा युरोपियन लोकांनी आपला समज करून घेतला होता, हे लक्षात घ्यावयास हवे. १८३१ साली लॉर्ड क्लेअर मुंबईचा गव्हर्नर म्हणून आला. बडोद्याच्या गायकवाडांशी जो तहनामा पूर्वी झाला होता तोच वादग्रस्त ठरला होता आणि त्याविषयीचा निकाल लावण्याचे काम क्लेअरसाहेबांकडे आले होते. या संदर्भात १८०२ साली जून महिन्यात जो तह झाला तो मूळ करार होता. या कराराचे ५ वे कलम इंग्रजीत एक आणि मराठीत एक असे आढळते. मराठी प्रतीत ब्रिटिश गायकवाडांना 'संरक्षण व सल्ला' देतील, असा कुठेच उल्लेख नाही, इंग्रजी प्रतीत मात्र आढळतो. तरीही बोर्ड ऑफ डायरेक्टर्सना लिहिलेल्या एका पत्रात क्लेअरच गायकवाडांना उद्देशून 'हे भारतीय लोक सत्याची फारशी पर्वा

करीत नाहीत, असं विधान १८३२ साली करतो.[७९] भारतीयांविषयी असा अपप्रचार होत असताना 'सत्यशोधक' हा शब्दप्रयोग आकर्षक आणि प्रतिष्ठित वाटला असल्यास नवल नाही. दादोबा पांडुरंग यांनी १८४४ साली सुरत येथे मानवधर्म सभेचो स्थापना केली होती. पुढे याच दादोबा पांडुरंगांनी १८६७ साली मुंबई येथे प्रार्थनासमाजाची स्थापना केलो. पण महात्मा फुले यांनी प्रार्थनासमाजाशी कधीच संबंध जोडला नाही; त्या समाजावर त्यांचा विश्वास नव्हता. दादोबांचा 'मानवधर्म' हा शब्दप्रयोग मात्र त्यांनी उचलला.

## नहुष आणि युधिष्ठिर यांचे ते अर्थपूर्ण संभाषण

'मानवधर्म' हा शब्दप्रयोग आधुनिक अर्थाने खुद्द महाभारतात आलेल आहे. अगस्तीने शाप दिल्यामुळे राजा नहुष सर्प योनीत जाऊन पडला होता. 'साप झालेल्या नहुषाचा युधिष्ठिराशी जो संवाद वनपर्वात दिला आहे, तो अतिशय महत्त्वाचा आहे.[८०] नहुष म्हणतो, 'धर्मा, माझ्या प्रश्नाचा योग्य जबाब देशील तर मी तुझ्या बंधूस सोडतो.' नहुषाने यावेळी भीमास धरले होते. युधिष्ठिराने जबाब दिला, 'हे सर्पा, विचार. मी माझ्या शक्तीप्रमाणे उत्तर देईन.' नहुषाने विचारले, 'ब्राह्मण कोणास म्हणावे?' युधिष्ठिराने ब्राह्मण स्त्रीपासून ब्राह्मणास झालेला तो ब्राह्मण, असा जबाब न देता चमत्कारिक जबाब दिला. तो आपण मोरोपंतांच्या शब्दांनी देऊ :

तोचि ब्राह्मण जेथे शांति दया, दान, सत्य, तप, धर्म। अर्थात् ब्राह्मणाचे लक्षण त्याच्या उच्च स्वभावाप्रमाणे युधिष्ठिराने सांगितले, पण येथे वाद संपला नाही, नहुषाने याजवर प्रश्न केला,

> चातुर्वर्ण्यं प्रमाणं च सत्यंचेद् ब्रह्मचैवहि ।
> शूद्रेष्वपि सत्यं स्याद् दानमक्रोध एवच ॥

म्हणजे चातुर्वर्ण्याची व्यवस्था प्रमाण मानली पाहिजे आणि सत्य हेच जर ब्रह्म अथवा ब्राह्मण्य असेल तर शूद्राच्याही ठिकाणी सत्य, दान, शांती इत्यादी दिसतात (त्याची वाट काय?) ह्याचे उत्तर युधिष्ठिराने असे दिले की, 'जर शूद्रात हे लक्षण असेल आणि ब्राह्मणात हे लक्षण नसेल, तर तो



१०\ H-25

शूद्रही नाही आणि तो ब्राह्मणही नाही. ज्या ठिकाणी हे वर्तन नसेल तो शूद्र समजावा.' नहुषाने यावर प्रश्न केला, 'जर वृत्तावरून तुझ्या मताने ब्राह्मण ठरतो, तर जाती ही व्यर्थ आहे, जोवर कृती असणार नाही.' यावर युधिष्ठिराने उत्तर दिले, [ व. अ. १८० ] :

जातिस्त्र महासर्प मनुष्यत्वे महामते ।
संकरात्सर्ववर्णांना दुष्परीक्ष्येति मे मतिः ॥
सर्वे सर्वास्वपत्यानि जनयन्ति सदा नराः ।
वाङ्मैथुनमथो जन्ममरणंच समं नृणाम् ।
इदमार्षं प्रमाणं च ये यजामह इत्यपि ।
तस्माच्छीलं प्रधानेष्टं विदुर्ये तत्त्वदर्शिनः ॥
कृतकृत्याः पुनर्वर्णा यदि वृत्त नं विद्यते ।
संकरस्तत्र राजेन्द्र बलवान प्रसमीक्षितः ॥

युधिष्ठिराने म्हटले, 'हे सर्पा, मुख्य जाती हल्ली मनुष्यत्व ही आहे. कारण सर्व वर्णांचा संकर झाल्यामुळे निरनिराळ्या जातींची परीक्षा करता येत नाही, असे मला वाटते. ह्याशिवाय, 'ये यजामहे' हे आर्ष प्रमाण वेदांमधले आहे. त्याजवरून तत्त्वदर्शी लोक शीलाला प्रधान मानतात. जर वृत्त चांगले नसेल तर वर्ण असून फुकट. कारण, हल्ली बळवान संकर दिसतो.'[८१] 'जातिस्त्र महासर्प मनुष्यत्वे महामते' असा जो निर्वाळा युधिष्ठिराने दिला तोच निर्वाळा महात्मा फुले देत आहेत. 'सत्य हेच ब्रह्म' असे या नहुष-युधिष्ठिर संवादात मानण्यात आलेच आहे. सत्य धर्माची स्थापना महात्मा फुले करावयास निघनात याचा अर्थ हा असा अडीचतीन हजार वर्षांच्या संदर्भातच शोधला पाहिजे, यात शंका नाही. ब्राह्मणी संस्कृतीने येथील मूळ संस्कृतीवर जी पुटे चढविली ती सर्व रगडून काढून जेवढ शिल्लक उरले आणि हाती लागले, तेवढेच जोनाबा सत्य म्हणून स्वीकारतात. म्हणून बळी राजा हा महाराष्ट्री लोकांचा राजा ठरतो; म्हणून खंडोबा हे मराठी समाजाचे 'सार्वजनिक' दैवत ठरते. हे लक्षात घेता, 'सत्यशोधक' या शब्दाचा बाबा पदमनजी यांचा अर्थ आणि 'मानवधर्म' चा दादोबा पांडुरंगाचा अर्थ हे जोतीबांच्या दृष्टीने तोकडे पडतात; जोतीबांनी या दोन्हा शब्दांना नवीन अन्वयार्थ

पुरविला, असेच म्हणावे लागते. 'सत्या'ला ते कोणताही पर्यायी शब्द योजीत नाहीत; सत्य हेच ब्रह्म असे ते म्हणत नाहीत; उलट, ब्रह्म ही कल्पनाच ते बाजूला फेकतात, हे खरोखर अलौकिक म्हणावे लागेल. कारण, उपनिषदे किंवा भगवद्गीता यांचा यत्किंचितही प्रभाव नसलेली मनोभूमिका जोतीबांनी आपलीशी केली आहे. स्वतःचे स्वतंत्र असे 'व्युत्पत्तिशास्त्र' सामाजिक ग्रह–पूर्वग्रहांच्या सहाय्याने ते घडवितात, हा तर धारिष्ट्याचा आणि प्रतिभेचा असा संयुक्त खेळ आहे. जोतीबांच्या मनावर ना आपल्या जातीचे ना ब्राह्मण जातीचे, ना आपल्या परंपरागत ज्ञानाचे ना अर्वाचीन इंग्रजी ज्ञानाचे असे कुठलेच दडपण नाही.[८२] मुलींची शाळा किंवा अस्पृश्यांसाठी शाळा किंवा विधवाविवाहास उत्तेजन यांसारख्या कामांची सुरुवात करून देऊन नंतर त्यांनी त्या कामांमधून आपले अंग काढून घेतलेले दिसते. ते सर्वथैव मुक्त-पणेच आपला विचार समाजापुढे ठेवीत होते.

## हे राष्ट्र घडविण्याचेच कार्य

मराठी समाजात जे समज, अपसमज, ग्रह-पूर्वग्रह, ठोकताळे–आडाखे आणि रागलोभ पूर्वापार चालत आलेले आहेत, तोच काय तो एकमेव आधार घेऊन ते उभे आहेत. ब्रिटिश राजवटीत निर्माण झालेल्या 'एकछत्री'पणा-विरुद्धचेच हे बंड होते. ब्रिटिशपूर्वकाळाशी आपले नाते जोडण्याचीच ती ऊर्मी होती. शाहू छत्रपतीच्या नंतर विस्कळीत झालेला मराठी समाज एकत्र करावयाचा झाला तर कोठे वार केला असता तो खडबडून जागा होईल आणि आपले ऐक्य करण्याच्या दिशेने धाव घेईल, याचा पूर्ण साधकबाधक विचार करून त्यांनी ब्राह्मण संस्कृती हेच आपले 'लक्ष्य' ठरविले. मराठी समाजातील ब्राह्मणाविषयीची अढी पूर्वीच्या सत्तरऐंशी वर्षांत एवढी वाढली होती की तिची दाहकता जाणवू लागली होती. या अढीतच मराठी समाजाची अणुशक्ती साठविलेली होती. तिचा स्फोट जोतीबांनी पद्धतशीर रीतीने घडविला. या अर्थाने पोपशाहीविरुद्ध बंड करणाऱ्या मार्टिन ल्यूथरसारखेच भटशाहीविरुद्ध बंड पुकारण्याचे कार्य जोतीबांनी केले; आणि 'लोकहितवादी' गोपाळराव देशमुख यांचेकडून 'इरॅस्मस' सारखे कार्य झाले, असे म्हणण्याचा

मोह होतो. पण तो मोह टाळला पाहिजे. कारण, हिंदु समाजातील शंकराचार्यांची पीठे त्यांच्यामागील सत्तेचे पाठबळ. नष्ट होताच दुर्बल आणि निष्क्रिय होऊन गेली होती; ही त्यांची अवनती सोळाव्या शतकाचे प्रारंभीच झाली होती. भक्तिपंथाला जो वाव आणि जे ठाण लोकांच्या अंतःकरणात मिळाले तेच मुळी जगद्गुरूंच्या स्थानाचे माहात्म्य आणि कर्तृत्व लोकजीवनातून लुप्त झाल्यानंतर एका बाबतीत मात्र ल्यूथर आणि जोतीबा यांची तुलना होऊ शकते आणि ती बाब म्हणजे राष्ट्रजागृतीची आणि राष्ट्रबांधणीची. संपूर्ण मराठी समाज खडबडून जागा करून त्यास एकमुखी राजकीय वळण देण्याचेच कार्य महात्मा जोतीबा यांचे हातून घडलेले आहे; आणि हे कार्य मार्टिन ल्यूथर याने जसे जर्मन ' राष्ट्र ' घडविले तसे मराठी ' राष्ट्र ' घडविण्याचेच कार्य आहे. रायगडावरील शिवछत्रपतींच्या समाधीची जागा जोतीबांनीच प्रथम शोधली.

## रायगडावरील तो निर्णायक क्षण

शिवछत्रपतीवरील आपला पोवाडा कसा स्फुरला याची माहिती देताना ते स्वतःच सांगतात, ' मी पुण्यास आलो व शिवछत्रपतींच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी रायगडी जाण्यास निघालो. समाधीची जागा शोधण्यात दोन–तीन दिवस गेले. घाणेरी व इतर जंगली झुडपे कुऱ्हाडीने तोडीत रस्ता काढावा लागला....शिवजन्म उत्सव साजरा करावा म्हणून, समाधीवरील सर्व कचरा धुऊन काढून त्यावर फुले वाहिली. ' ही सर्व हकीगत तेथील ग्रामभटास कळताच तो वर आला.

" कुणबट शिवाजीच्या थडग्याचा देव केला. मी ग्रामजोशी असता दक्षिणा, शिधा देण्याचे बाजूला राहिले. केवढा माझा अपमान. " असे म्हणून त्याने लाथेने समाधीवरील फुले उधळून दिली.

' अरे कुणबटा ! तुझा शिवाजी काय देव होता, म्हणून त्याची पूजा केलीत ? तो शूद्रांचा राजा. त्याची मुंजसुद्धा झाली नव्हती.'

मी रागाने वेडा झालो. ज्यांच्या जिवावर पेशव्यांना राज्य मिळाले त्या शिवप्रभूंची पूजासामग्री ह्या भटाभिक्षुकांनी पायातील पादत्राणाने लाथाडावी

काय ? मी संतापवायूने वेडा होऊन गेलो. त्यांचे स्मारक म्हणून मी अल्प-काव्य केले आहे. ते त्यांना समर्पण करतो.'[१] शिवस्मारकाची मूळ कल्पना आणि संकल्प हा अशा रीतीने महात्मा फुले यांचाच. जोतीबांच्या वाङ्मयीन कार्याचा आरंभ १८६९ साली शिवाजी महाराजांवरील पोवाडयापासून कां व कसा झाला याची कहाणी ही अशी आहे. शिवसमाधीला ग्रामजोशाने जी लाथ मारली ती लक्षात घेऊन जोतीबांनी एकूण ब्राह्मणी संस्कृतीलाच सुरुंग लावला.

## कृतघ्नतेचा मोठा आरोप त्यांच्यावर येईल

फुले यांच्या या सर्व भूमिकेचा जसा विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी विचार केलेला होता, तसाच त्याच काळात राजारामशास्त्री भागवत यांनीही केला. मराठी समाजाचा उगम आणि विकास कसा झाला याविषयी त्यांनी स्वतंत्रपणे संशोधन केले होते. ' सर्व प्राकृत भाषांपेक्षा जुनाट व त्यांच्या मातृस्थानाचा मान भोगणारी प्राचीन मऱ्हाठी ही संस्कृतनिरपेक्ष भाषा समजण्याचा कात्यायन प्रभृतींचा संप्रदाय वावगा नाही, ' असे सांगून ' एव्हाची मऱ्हाठी शुद्ध संस्कृताची कन्या समजण्याचा कित्येक नावाजलेल्या लोकोंचा आग्रह दिसतो, पण ही मोठी चूक आहे, ' असे त्यांनी निक्षून सांगितले. ब्राह्मणी संस्कृती-विरुद्ध महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या चळवळीचा त्यांनी जवळून अभ्यास केला होता. जोतीबांनी ब्राह्मणी संस्कृतीवरील केलेला हल्ला तपासून पाहताना मुळात मराठी भाषा आणि मराठी जमात ही ब्राह्मणांची संस्कृती आणि त्यांची भाषा यांच्यापासून भिन्न आहे, असे ते आग्रहाने प्रतिपादतात. ब्राह्मण महाराष्ट्रात येण्यापूर्वी जैन येथे आले आणि ब्राह्मणी संस्कृतीच्यानंतर येथील जैन संस्कृतीशी संघर्ष झाला; व त्यातून आजची संमिश्र अशी मऱ्हाठी संस्कृती निर्माण झाली, असा त्यांचा दृष्टिकोन आहे. ते म्हणतात, ' जर एखादा धर्म-संबंधी महासिद्धान्त मऱ्हाठ्यास अगदी सुलभ करून देण्याची इच्छा असली, तर जसे खिस्ती लोक बैबलाच्या वचनाच्या आधारे बोलतात, त्याप्रमाणे आम्हां मऱ्हाठ्यास ज्ञानेश्वराच्या किंवा तुकारामबोवांच्या वचनांचा आधार धरून काम केले पाहिजे. आम्हा मऱ्हाठ्यांस काशोची गरज नाही व गयेचीही गरज नाही. थोडाबहुत काही कर्मठ ब्राह्मणांचा काशीयात्रेकडेस ओढा असतो. पण

मऱ्हाठ्यांची सार्वजनिक तिरस्थळीयात्रा म्हटली म्हणजे पंढरपूर, आळंदी व देहू. सारांश, आम्हां मऱ्हाठ्यांचा आगम खरोखरच मऱ्हाठीत आहे, संस्कृतात नाही. जसा आम्हां मऱ्हाठी मऱ्हाठ्यांचा आगम मऱ्हाठीत आहे, तसा कानडी मऱ्हाठ्यांचा म्हणजे जंगमांचा आगम कानडीत आहे.' एवढे सांगून ते पुढे म्हणतात, 'महाराष्ट्र क्षत्रियांची उन्नती करू पाहणारा 'सत्यशोधक समाज' व 'दीनबन्धु' या दोहोंसही आमची हात जोडून सविनय विनंती आहे की, उगीच ब्रह्मद्वेष करणे व ब्राह्मणांच्या विरुद्ध क्षुल्लक व कुत्सित मनोच्या पुरुषांनी लिहिलेल्या कचऱ्याच्या पेटीत टाकण्यासारख्या लेखास एकसारखी सतत जागा देऊन एकमेकांमधील द्वेष माजविणे यात बिलकूल शहाणपण नाही. ज्या एकनाथस्वामींनी अतिशूद्रांचाही उद्धार व्हावा या हेतूने सर्वधर्म तत्त्व मऱ्हाठीत उतरविले व श्राद्धाचे ब्राह्मण जेवण्याच्या पूर्वी अतिशूद्रांस जेवू घातले ते जातीचे ब्राह्मणच होते. ज्या अनंतभट्टाने चोख्यासारख्या अतिशूद्राचे प्रासादिक अभंग लिहून ठेवण्याचे पत्करले तोही जातीचा ब्राह्मण. तेव्हा दरोबस्त ब्राह्मणांवर जेव्हा तेव्हा उतरता ही तुम्ही मोठीच चूक करिता. जसे एकट्या ब्राह्मण जातीच्या हातून महाराष्ट्र मंडळाचे गाडे चालणे नाही तसेच एकट्या क्षत्रिय जातीच्या हातूनही चालणे नाही. शिवाजी महाराजांसारखे अवतारी क्षत्रिय झाले ते काही ब्रह्मद्वेष करणारे नव्हते. जर त्यांनी ब्रह्मद्वेष केला असता तर त्यांच्या हातून मराठेशाहीची प्राणप्रतिष्ठा निःसंशय झाली नसती. जर शिवाजी महाराजांची पावले तुम्हांस वंद्य असली तर त्यांच्याप्रमाणे जितके लवकर तुमचे वर्तन होईल तितके सुंदर होईल. प्रह्लादपंतासारखा ब्राह्मण प्रतिनिधी कानडी महाराष्ट्रात हुजूर होता व रामचंद्रपंतासारखा अमात्य ब्राह्मण आपल्या मऱ्हाठी महाराष्ट्रात एकसारखा खपत होता. म्हणून राजाराम महाराजांचे वेळी मराठेशाही जीव धरून राहिली व दिल्लीपतीस अकृतार्थच या अशाश्वत लोकाचा त्याग करणे भाग पडले. धर्मप्रकरणी व राज्यप्रकरणी ब्राह्मणांचे अशेष महाराष्ट्र मंडळावर झालेले उपकार जर आज महाराष्ट्रातील क्षत्रिय अजिबात विसरून जातील तर त्यांच्या पूर्वजावर आजपर्यंत न आलेला कृतघ्न-तेचा मोठा आरोप त्यांच्यावर येईल व महाराष्ट्र मंडळाचे अतिशय नुकसान केल्याचा बट्टा त्यांच्या नावास लागेल. जे ब्राह्मण तुम्हास कुळंबट किंवा शूद्र म्हणतील व तुमच्या वित्तादिकांचा अभिलाष करतील त्यांच्याबरोबर तुम्ही

वाद खुशाल चालवावा. पण महाराष्ट्रातील दरोबस्त ब्राह्मण जातीवर कृपा करून उतरू नये.

## 'महाराष्ट्रपणाचा अभिमान रावबाजीच्या ठायी असता तर....'

'भटांशिवाय लग्न लावण्याची चाल पाहून तुम्ही अतिप्राचीन काळच्या आपल्या पूर्वजांचा कित्ता वळविता हे पाहून आम्हांस फार संतोष होतो. पण तुम्ही एक चूक करीत आहा. ती जर लवकरच दुरुस्त कराल तर बरे. लग्न लावण्यासाठी भटांच्या ऐवजी लहानशी जात उत्पन्न करण्याकडेस तुमच्या मनाचा ओघ वळलेला दिसतो. अशा रीतीने जर भिक्षुकांची नवीन जात तुमच्यामध्ये उत्पन्न कराल तर केवळ आगीतून निघून फोफाट्यात गेल्यासारखे होईल, याचा नीट शांतपणाने आजच विचार कराल तर बरे. नाहीपेक्षा पुढे निःसंशय पस्तावावे लागेल. तुमच्या पूर्वजांचा अतिप्राचीनकाळी भिक्षुकवर्ग म्हणून निराळा नव्हता....महाराष्ट्र मंडळात शूद्र नावाने नर्मदेच्या उत्तरेस नावाजलेला वर्ग बिलकुल नाही. मऱ्हाठा मात्र—मग तो कोकणातला असो की देशावरचा असो—मूळचा म्हणून एक. महाराष्ट्र क्षत्रिय सर्व एकमेकांचे बंधू—जसे तंजोरकर व मुधोळकर तसे ग्वाल्हेरकर व वाडीकर. जातिभेद महाराष्ट्र मंडळात पूर्वीच्या काळी नव्हता. तो ब्राह्मणांनी आपणाबरोबर शालिवाहन वंशाची समाप्ती झाल्यानंतर आणिला. जर पूर्वीचे दिवस पुनः यावे अशी तुमची नाभिकमळापासून इच्छा असली तर जशी त्यावेळी तुमच्या पूर्वजांची जातीच्या संबंधाने सर्वत्र अभेद बुद्धी होती, तशी हल्लीच्या काळी—जर तुम्ही त्या पूज्य पूर्वजांचे वंशज खरे तर—तुम्हांस राखिली पाहिजे. इतके काम तुम्ही केलेत म्हणजे महाराष्ट्र मंडळ यावच्चंद्रदिवाकर अकुतो भय झाले.' राजारामशास्त्री भागवतांनी या सर्व विवेचनानंतर म्हटले आहे, 'दयाळू इंग्रज सरकारचे राज्य झाल्यापासून आमच्या हिंदुस्थानची हवा, हिमालयापासून तो कुमारीपर्यंत अगदी पालटून गेली आहे.' पण महात्मा फुले यांना हे आवाहन करण्यापूर्वी त्यांनी, 'आपणास ब्राह्मणत्वापेक्षा सत्याचा व महाराष्ट्रपणाचा अभिमान अधिक आहे,' असे निःसंकोचपणे सांगून म्हटले आहे, 'महाराष्ट्रपणाचा अभिमान अधिक होता म्हणून एकनाथ प्रभृती

ब्राह्मण मंडळी महाराष्ट्रातील ब्राह्मणेतरासही वंद्य व पूज्य झाली; व त्यांच्या संप्रदायास अनुसरून रामचंद्रपंत, प्रह्लादपंत वगैरे ब्राह्मण मंडळी राजारामाचे वेळी चालली म्हणून अवरंगझेबासारख्या कावेबाज व श्रीमंत दिल्लीपतीस बुडविणे शक्य झाले. हा महाराष्ट्रपणाचा अभिमान जर जात्यभिमानात नाहीसा होऊन जाता तर वरील ब्राह्मण मंडळीच्या व मुरारबाजी, बाजीप्रभू, खंडोबल्लाळ यांच्यासारख्या कायस्थ मंडळींच्या हातून जी श्लाघनीय व स्मरणीय कृत्ये घडून आली ती निःसंशय घडून आली नसती. हा महाराष्ट्रपणाचा अभिमान विशेष होता म्हणून शिवाजीमहाराजांनी प्रत्येक किल्ल्यावर सबनीस ब्राह्मण, कारखाननीस परबु व क्षत्रिय किल्लेदार नेमण्याचा नियम जारीने चालवून, महारासारख्या अतिशूद्राचीही न विसरता गडावरच्या खात्यात नेमणूक करून ठेवली. पुढे ज्यास शाहू छत्रपतीने पेशवाई दिली त्यांच्यामध्ये हा महाराष्ट्रपणाचा अभिमान थोडाबहुत होता खरा. पण तो दुर्दैवाने पहिल्याने स्वार्थपरतेत व पुढे जात्यभिमानात नाहीसा झाला व त्यामुळे स्वामिद्रोहाचे महापातक करण्यास पाठीपुढे न पाहता, अतिशूद्राच्या थुंकीने पुण्यपत्तनास विटाळ होऊ नये म्हणून त्याच्याच गळ्यात थुंकण्यासाठी पिकदाणीप्रमाणे मडकी बांधण्याचा हुकूम फर्माविला. जर महाराष्ट्रपणाचा अभिमान पहिल्या रावबाजीच्या अंगी विशेष असता तर निःसंशय महाराष्ट्र मंडळ व स्वराज्य एकवटण्याचा जो श्रीपतरावाचा स्तुत्य व शहाणपणाचा बेत होता, त्याच्या आड तो कधीही आला नसता. पण आता झाले ते झाले. गतगोष्टीचा शोक करून फायदा नाही हे खरे आहे. तरी पूर्वी झालेल्या कमी शहाणपणाच्या गोष्टी लक्षात ठेवून तशा पुनः न घडू देण्याविषयी यत्न करणे हे आपले कर्तव्य होय.'

## हिमालयापासून कुमारीपर्यंत हवापालट

राजारामशास्त्री भागवतांनी पेशव्यांच्या एकूण वर्तनाविषयी अतिशय कडक लिखाण केलेले आहे. ते म्हणतात, 'क्षत्रिय गादीची सगळी सत्ता बळकावून गादीच्या मालकास कस्पटासारखे लेखण्याचा पाया पेशव्यासारख्या आमच्या जातीबंधूंनी महाराष्ट्र मंडळात पहिल्याने घातला हे कबूल करण्यास आमच्या लेखणीस फार कष्ट होत आहेत....तेव्हा पानिपतची लढाई

महाराष्ट्रातील क्षत्रियांनी बेवकूफाई किंवा नामर्दाई करून घालविलेली नव्हे; व त्यांच्या अविंध नोकराचाही काही दोष नव्हता. या लढाईच्या संबंधाने सर्व अपयश पेशव्यांवर व त्यांच्या जातीवर अर्थात दरोबस्त महाराष्ट्र ब्राह्मणावर येते. ते टाळण्याचा सयुक्तिक व वाजवी व सरळ मार्ग निदान आम्हांस दिसत नाही....यावेळी देखील मराठयांचे व्यक्तिविषयक अवसान काही कमी झाले होते असे नाही. पण मूळची गादी जवळ जवळ बुडाली. व पेशव्यांनी एक ब्राह्मण जातीच्या हातात सर्व सत्तेची किल्ली ठेवण्याविषयी भगीरथ यत्न केले. म्हणून मऱ्हाठयांचा व त्यांच्या प्रिय देशाचा घात झाला.'[८४]

सारांश, महात्मा फुले यांच्या भूमिकेचा तत्कालीन समाजात आदर्शपूर्वक विचार झाला होता हे स्पष्टच आहे. पण राजारामशास्त्रींनी म्हटल्याप्रमाणे दयाळू इंग्रज सरकारचे राज्य झाल्यापासून हिंदुस्थानची हवा हिमालयापासून कुमारीपर्यंत अगदी पालटून गेली होती.

## जुनी वतनदारी बुडाली !

पहिला पालट हा झाला की येथील जुन्या अर्थाने वतनदारी संपली. इंग्रजांनी उत्तरेत कॉर्नवालिसची भूमिका प्रमाण मानून वतनदारी कायम ठेवली. पण ते वतनदार स्वतःला सरकार म्हणून आपला शिक्का कारभारात चालवू शकत नसत. त्यांनाही अन्य प्रजाजनांप्रमाणे कलेक्टरच्या पुढे नतमस्तक व्हावे लागे. सरकार फक्त कंपनीचेच. दक्षिणेतही कॉर्नवालिसचीच पद्धती आणावी असा आग्रह काही मंडळींनी धरला होता. पण तो डावलून दक्षिणेत रयतवारी पद्धती अंमलात आली. या रयतवारी पद्धतीचा जनक सर थॉमस मनरो हा होता. महाराष्ट्र या कालखंडात तीन ठिकाणी विभागला होता. एक भाग मुंबई प्रान्तात. एक भाग निजामीत आणि एक भाग मध्यप्रान्तात. मुंबई प्रान्तात रयतवारी आली. निजामीत जुनीच वतनदारी कायम राहिली आणि मध्य प्रान्तात मालगुजारी स्थापन झाली. १८२७ साली एल्फिन्स्टनने मुंबई प्रान्तात जमीन महसुलाची सरकारी नियमावली तयार केली. या नवीन नियमावलीचे मुख्य सूत्र हे होते की वार्षिक पिकाची दखल न घेता तीस वर्षांसाठी जमिनीच्या क्षेत्रानुसार आणि

जमिनीच्या प्रतीनुसार साऱ्याचा आकार ठरविण्यात येई. तसेच प्रत्येक शेतमालकाच्या क्षेत्राची मोजणी करून देण्यात आली. आणि या मोजणी-नुसार झालेल्या बांधबंदिस्तीचे रक्षण करण्याची जबाबदारी गावपाटलावर टाकण्यात आली. ही जमीन महसुलाची व्यवस्था अंमलात आणताना सरकारच्या लक्षात आले की अनेक ठिकाणी गावेच्या गावे वतन म्हणून महसुलाच्या क्षेत्रात बसतच नाहीत आणि म्हणून १८४१ साली मुंबई सरकारने इनामांची चौकशी करण्यासाठी अधिकारी नेमला. त्यातूनच पुढे इनाम कमिशनची स्थापना झाली.[८५] या कमिशनचे काम जवळजवळ तीस वर्षे चालले. संपूर्ण मुंबई प्रान्तास १७ कलेक्टोरेटस् होत्या आणि त्यात एकूण रुपये ८७ लाख ७५ हजार ३१९ एवढया रकमेचा सारा असलेल्या जमिनी इनामात आहेत असा दावा करण्यात आला होता. यापैकी ३७ लक्ष १७ हजार १२१ रुपयांची वतने रद्द करण्यात आली आणि उरलेल्या ५० लक्ष २० हजार ७१० रुपयांची साऱ्यापैकी एकूण ३३ लक्ष १२ हजार ७१५ रुपयांची वतने असल्याचा दावा करण्यात आला होता. त्यापैकी १२ लक्ष ९६ हजार ८१५ रुपयांची वतने रद्द करण्यात आली आणि १९ लक्ष ६६ हजार ७१३ रुपयांची वतने कायम करण्यात आली. ही सर्व वतने खरी की खोटी हे ठरविण्यासाठी पेशवे दप्तराचा फार उपयोग झाला. सामान्यतः ज्याच्याजवळ वतनाची जमीन आहे तो वतनाचा अधिकारी असे मानले जाई. त्याच्या विरुद्ध पुरावा सादर करण्याची जबाबदारी इतरांची होती. सुमारे तीन पिढया जमीन ज्याच्याकडे असेल त्याचे वतन कायम करण्यात येई. परंतु याचा पडताळा पेशवे दप्तरातून मिळतो का हे पाहण्यासाठी पेशवे दप्तराचा आधार घेण्यात येई. या दप्तरातून कोणी नकला करून घेऊ नये म्हणून कोणाही एतद्देशीयाला दप्तर पाहण्याची मनाई होती. या दप्तरात फक्त युरोपियन अधिकाऱ्याच्या समक्षच एतद्देशीयाला पाऊल ठेवता येत असे. इनाम कमिशनचे काम दीर्घकाळ चालले, पण त्या कामाने सर्वत्र समाधान झाले, असे नाही. ज्यांची वतने कायम राहिली त्यांचे अर्थातच समाधान झाले.

### पण सरकार मात्र सावकारजमा झाले!

पण जमीन महसुलाची नवीन व्यवस्था अंमलात येत असतानाच

जमिनीच्या संदर्भात एक नवा कायदा अंमलात आला. हा कायदा म्हणजे कर्जाची वसुली करून घेण्यासाठी तारण जमीन लिलावात काढण्याचा अधिकार न्यायालयांना देण्यात आला. हा कायदा सर्वार्थाने या देशात नवीन होता. आपल्या प्राचीन परंपरेनुसार कर्जासाठी जे तारण असावयाचे ते दोन प्रकारचे असे. एक गोप्य आणि दुसरे भोग्य. तसेच ते स्थावर असे किंवा जंगम असे. पैकी स्थावराचा आणि गोप्याचा कर्जवसुलीसाठी लिलाव करण्याचा कुणालाच अधिकार नव्हता. कर्ज वसूल होईपर्यंत भोग्य तारणाचा ताबा सावकाराला मिळे. पण त्या तारणावरील मालकी कर्जदाराचीच राही. जमिनीची मालकी कर्जापोटी बदलण्यास येथील परंपरेचा सक्त निषेध होता. राजरोस विक्री करावयास मात्र पूर्ण मुभा होती. पण कर्ज फेडायचे म्हणून घरदार, जमीनजुमला विकण्याचे एकही उदाहरण ब्रिटिश राजवट येण्यापूर्वी या देशात आढळत नाही. हा कायदा आल्यामुळे सर्व देशभर हाहाकार उडाला. पण पुणे, सोलापूर, नगर आणि धारवाड या चार जिल्ह्यांत रयतेने बंडच पुकारले. सावकारांची घरे लुटली गेली. त्यांना मारहाण केली गेली. आणि कुठेही शासनाची पकड राहिली नाही. भिल्लांनी जागोजाग दरोडे घातले. आणि वासुदेव बळवंत यांचे बंडही मुळात सावकारांनी रयतेची जी नागवणूक केली त्यातूनच उद्भवले. या प्रकरणी पुढे डेक्कन रॉयटस् कमिशन या नावाने एक चौकशी कमिशन नेमले गेले. या कमिशनने या सर्व उठावांची सविस्तर पाहणी केली. या कमिशनपुढे आलेला पुरावा अत्यंत खळबळजनक होता.[९] त्यातील येरवडा जेलमधील ७४ कैद्यांच्या जबान्या नमूद आहेत. सुप्याच्या तात्या साळू कुंभाराच्या बापाच्या बापाने तीस रुपये कर्जाऊ घेतले होते. त्याचे दीडशे रुपये झाले. तेव्हा त्याच्यावर खटला भरला गेला आणि त्याची जमीन काढून घेण्यात आली. धलेवाडीचा कुणबी बाबाजी नाना याने १० वर्षांपूर्वी कोणा एका जेठाकडून २५ रु. कर्जाऊ घेतले होते. घराची दुरुस्ती करावयासाठी. बाबाजीने जेठाला दरवर्षी १० ते १५ रु. दिले. ६ वर्षांनी तो बॉंड ५० रु.चा झाला. ८ व्या वर्षी १०० रु.चा झाला. एकाने बानू मुरलीकडून ५० रुपयांचे कर्ज ५ वर्षांपूर्वी घेतले होते. तिने दरवर्षी फिटलेल्या पैशाची रसीदच दिली नाही. त्याची १७ रु. साऱ्याची जमीन तिच्याकडे गहाण पडली होती. तीन वर्षांनंतर तिने तळेगाव कोर्टात

खटला भरला. कोर्टाने आरोपीच्या गैरहजेरीतच निकाल दिला गेला. कोर्टाने जमीन व घर दोन्ही लिलावात काढले. ते घर बानूनेच ६ रु. ना विकत घेतले. पुढे कर्जदाराने मार्तंड गुरवाच्या मार्फत बानूला रु. १४२ दिले आणि घर व जमीन सोडवून घेतली. पण त्याला शेवटपर्यंत आपण कर्ज कोणत्या अटींवर घेतले याची माहिती नव्हती. कर्ज फेडले, त्यात मध्यस्थाने किती कमाई केली हेही त्याला माहीत नव्हते. पण रयतेच्या उठावात भाग घेतला म्हणून त्याच्यावर खटला भरण्यात आला आणि माझा या दंगलीशी काही संबंध नाही असे तो वारंवार सांगत असताना त्याला सहा महिन्यांची कैद झाली. येरवडा जेलमधील ७४ कैद्यांपैकी प्रत्येकाने मी दंगलीत भाग घेतला नाही; असेच सांगितले. पण त्या प्रत्येकाला ६–८ महिन्यांची शिक्षा कोर्टाने ठोठावली. ब्रिटिश येण्यापूर्वी कर्जाचे खटले पंचायतीसमोर जात. संपूर्ण गावाची पंचायत बसे. कर्जदार खरोखरच अडचणीत असेल तर सावकाराला व्याजाची संपूर्ण सूट देण्यास सांगितले जाई. कर्जदार बऱ्या स्थितीतला असला पण व्याज मुद्दलाच्या बरोबरीचे झाले असेल तर कर्ज हप्त्याने फेडले जाईल असे ठरविण्यात येई. मुद्दलाच्या दुपटीहून अधिक व्याज झाले असेल तर ते वाढलेले व्याज माफ करण्यात येई. १८५० सालचा कायदा येण्यापूर्वी कोर्टामध्ये १२ टक्क्याहून अधिक व्याज अमान्य केले जाई; पण कायदा आल्यानंतर सर्रास ३६ टक्के व्याज मान्य होऊ लागले.

## "जसा कायदा तसा न्याय"

या कायद्याचा परिणाम होऊन अवघ्या वीस पंचवीस वर्षांत खेडया-खेडयातील जमीन शेतकऱ्यांकडून सावकारांच्या घरात जाऊ लागली.[८७] हे सावकार मुख्यतः 'मारवाडीच होते. आणि त्यामुळे रयतेच्या उठावात मारवाडयांच्या घरांवरच जास्तीत जास्त दरोडे पडले. पण तरीही कायद्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतजमिनी सावकारांच्या मालकीच्या होऊनच गेल्या. वायव्य सरहद्द प्रान्तात या कायद्यामुळे तर कहरच माजला होता. गावेच्या गावे सावकाराच्या मालकीची होऊन गेली. आणि हा कायदाच बदलून टाकावा अशी मोठ्या प्रमाणावर मागणी करण्यात आली, पण तरीही वायव्य सरहद्द

प्रान्ताच्या सरकारने पुढील उताऱ्यात नमूद केल्याप्रमाणे आदेश काढला : ' कर्जवसुलीसाठी जमिनीची सक्तीची विक्री करण्याची दीर्घकालीन व्यवस्था आणि या प्रथेमुळे निर्माण झालेले हितसंबंध आणि आशाआकांक्षा तसेच अशा प्रकारचे हस्तांतर करण्यात बाधा आली तर मालमत्तेच्या मूल्यात होणारी घट हे सर्व लक्षात घेता कर्जवसुलीसाठी वंशपरंपरागत मालमत्तेची विक्री करण्यास बंदी घालणे सद्यःस्थितीत इष्ट ठरणार नाही असे लेफ्टनंट गव्हर्नर साहेबांनी ठरविले आहे. ' मुंबई प्रान्तात गव्हर्नरसाहेबांनी कोर्टांचे निर्णय असे कसे होतात याची चौकशी करण्यासाठी खास अधिकारी नेमला. आणि त्यास सर्व प्रकारची मदत करावी असे पत्र मुंबई हायकोर्टाच्या न्यायाधीशाला पाठविले. त्यावर मुंबई हायकोर्टाच्या सर्व न्यायाधीशांनी २६ जुलै १८७५ रोजी गव्हर्नरसाहेबांना उद्देशून उत्तर पाठविले. 'आपल्या म्हणण्याप्रमाणे जे. बी. रिची यांना त्यांच्या चौकशीत सर्वतोप्रकारे मदत करण्याचे आदेश आम्ही जिल्हा न्यायाधीशांना पाठविले आहेत, ' असे प्रथम नमूद करून पुढे म्हटले आहे, 'अशाप्रकारे आपण आदेशिलेल्या चौकशीला आवश्यक ती सर्व मदत आनंदाने दिल्यानंतर या प्रान्तातील न्यायसंस्थेचे नियंत्रण करणारे अधिकारी या नात्याने या चौकशीच्या संबंधात आपण सेक्रेटरी ऑफ स्टेटला २१ जूनच्या खलित्यात जे म्हटले आहे त्याकडे आपले लक्ष वेधण्याची आम्हांस मोकळीक आहे असे आम्ही समजतो. आपण लिहिले आहे, "नुकतेच जे प्रकार घडले त्यांच्या मुळाशी आपल्या न्यायालयांनी दिलेले निवाडेच बहुतांशी कारणीभूत झाले आहेत, असा अनुभवी जिल्हाधिकाऱ्यांचा समज झालेला आहे. मध्यंतरी झालेल्या असंतोषाला आणि उठावाला हे निवाडेच मुख्यतः कारणीभूत आहेत असे आपण म्हणता. याशिवाय आपण तिसऱ्या परिच्छेदात बारेमाप खर्चाची लोकांची संवय आणि आपले राज्य या देशावर आल्यापासून निर्माण झालेली भरमसाट व्याजाची प्रवृत्ती अशी एकदोन वरवरची कारणे नमूद केली आहेत....अस्तित्वात असलेल्या कायद्यांचे ज्ञान असल्याशिवाय न्यायालयांनी केलेल्या कारवाईचा कोणालाच पडताळा पाहता येणार नाही. हे ध्यानात घेतले नाही तर ही चौकशी केवळ न्यायालयांच्या कामकाजाची चौकशी न राहता कायदेमंडळांवरचीच टीकाटिप्पणी होईल....आम्हाला अर्थातच याविषयी शंका नाही की होऊ

घातलेल्या सूक्ष्म आणि सखोल चौकशीत नुकत्याच झालेल्या उठावांच्या कारणांची मूलभूत पाहणी होऊन कायदेमंडळाचे धोरण आणि निवाड्यांची दिशा यांची तुलना करून खालच्या कोर्टातील निकालांचे परिशीलन केले जाईल. त्यामुळेच आम्ही आपणांस मोकळेपणाने असे सुचवू इच्छितो की, आपण नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याच्या जोडीस विद्यमान कायदे आणि त्यांची अंमलबजावणी यांची जवळून माहिती असणाऱ्या एखाद्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी आणि हा अधिकारी न्यायालयीन सेवेतलाच असावा.... कृपा करून आपण जेव्हा आम्हाला पाठविलेले २१ जूनचे पत्र भारत-मंत्र्याकडे पाठवाल तेव्हा आमचे हे पत्रही त्यास जोडावे.'' या पत्रावर एम्. आर. वेस्ट्रॉप, एल. एम्. बेले, सी. जी. केम्बाल, जे. फिलिप ग्रीन, रॉबर्ट पिन्हे, नानाभाई हरिदास, जॉन मेरियट आणि दि एच लार्पे अशा आठ न्यायाधीशांच्या सह्या होत्या.[८८]

## थेट लंडनपर्यंत वाद गेला

न्यायालयांनी निवाडे दिले ते खालच्या कोर्टातील असल्याने त्यांच्याकडूनच चुका होत आहेत; पूर्वी कर्जवसुलीचे खटले जिल्हा न्यायाधीशांकडेच असत, त्यामुळे अन्याय टळत असे, अशी भूमिका राज्यकर्ते घेत होते. पण डेक्कन रॉयटस् कमिशनने अनेक अनुभवी अधिकाऱ्यांच्या साक्षी काढल्या आणि अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांची याविषयीची टिपणे मागविली होती. कारण भारतमंत्र्यानेच अशी भूमिका घेतली होती की, 'अशाप्रकारे घाईघाईने कर्जवसुलीसाठी जमीनविक्रीचे आदेश काढणे हेच खालच्या कोर्टांचे धोरण राहिले असेल तर त्यात आश्चर्य नाही. कारण, त्यामुळे कोर्ट आणि सावकार या दोघांचीही डोकेदुखी तात्काळ नाहीशी होते. म्हणून मुन्सिफांच्या कोर्टांची फेररचना करून वरिष्ठांच्या सम्मतीशिवाय जमिनीचा लिलाव करण्याचा अंतिम आदेश त्यांना देता येणार नाही अशी काही तरतूद करता येईल काय हे पाहिले पाहिजे.' किंबहुना हा प्रश्न याहीपूर्वी १८५९ सालीच लेजिस्लेटिव्ह कौन्सिलपुढे आला होता. ५ मार्च १८५९ रोजी कौन्सिलच्या अहवालात पुढील नोंद आहे, 'मि. रिकेटस् यांनी असे प्रतिपादन केले की, कौन्सिलने

आपल्या सचिवामार्फत सर्व सरकारांना पुढील प्रश्न पाठवावेत. ( १ ) कोर्टाने दिलेल्या निवाडयाच्या अंमलबजावणीत जमिनीची विक्री होणार नाही, असे जाहीर करणे इष्ट ठरेल काय? ( २ ) हा नियम सर्व जमिनींना लागू करावा की ज्या जमिनीवर सरकारला सारा मिळतो त्यांना लागू करावा? ( ३ ) केवळ जी जमीन तारण दिली आहे त्याच जमिनीला हा नियम लागू करावा काय? ( ४ ) अशी विक्री होऊ दिली नाही तर तारण जमीन ताब्यात घेऊन तिच्या उत्पन्नातून कर्ज फेडण्याचे अधिकार कोर्टाला द्यावेत काय? की कर्जापोटी जमीनजुमला लिलावात काढता येणार नाही असाच नियम करावा काय?'

पण याच दिवशी कौन्सिलच्या बैठकीत उपाध्यक्षांनी असा विचार मांडला की, आज येथे वायव्य सरहद्द प्रांतातील आणि अन्य सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना धरून एक ठरावच मांडण्यात यावा. या ठरावाचा उपोद्घात पुढीलप्रमाणे असावा, 'बंगाल आर्मीच्या शिपायांनी बंड केल्यामुळे हिन्दुस्थानातील कोणत्याही भागात जमीन ही विक्रीलायक वस्तू मानण्यात येऊ नये.'[८९] या दोन नोंदीवरून हे उघड आहे की, १८५७ सालचा सैनिकांचा उठाव हा मुख्यतः या जमिनीच्या लिलाव प्रकरणातूनच उद्भवला होता अशी तत्कालीन अधिकाऱ्यांची समजूत होती. त्यांची अशी समजूत होण्यास एक महत्त्वाचे कारण होते. ते म्हणजे, प्रत्येक शेतकऱ्याचा बाप, भाऊ अथवा मुलगा सैन्यात नोकरीला होता आणि त्याला त्याच्याकडून शेतीत गुंतविण्यासाठी पैशाची कुमक मिळे. आपले घरदारच उध्वस्त होत आहे असे दिसल्यावर त्यांच्या मनात असंतोषाचा उद्रेक होणार नाही तर काय होईल? हे कारण उत्तरेतच खरे होते. कारण, १८२० सालानंतर सैन्यातील भरती जास्तीत जास्त उत्तरेतून होत असे. या संबंधात, 'रत्नागिरीत बेकार लोकांची संख्या फार वाढते आहे. कारण सैन्यात नोकरी करण्याचा त्यांचा पिढीजात धंदा त्यांना आता उपलब्ध राहिलेला नाही. आणि म्हणून त्यांना खानदेशात योजनाबद्ध रीतीने हालवून नोकऱ्या देता येतील की काय याची पाहणी करावी,' अशी सूचना मुंबई सरकारला रत्नागिरीच्या कलेक्टरनेच केली होती. त्यामुळे लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या उपाध्यक्षाने जरी उपहासगर्भ रीतीने याविषयाची वासलात लावली असली तरी जमिनीच्या लिलावांमुळे सैन्यात बेदिली माजली होती, असे स्पष्टपणे म्हणता येते.

## शेतकरी सर्व बाजूंनी नागवला गेला

हा जो जमिनीचा लिलाव करण्याचा कायदा आहे तो श्रीमंतांच्या बाजूचाच आहे आणि त्यामुळे उत्तरोत्तर जमिनींचे हस्तांतर सावकारांच्याकडे होऊ लागले आहे, असे कलेक्टरमागून कलेक्टर आपल्या वरिष्ठांना कळवीत होते. पण या कायद्याची मूळ मेख जे. एफ. डी. इंग्लिस यांनी १६ जुलै १८७२ रोजी आपल्या निवेदनात नमूद करून ठेवली आहे. इंग्लिस हे वायव्य सरहद्द प्रान्ताचे अधिकारी होते. ते म्हणतात, 'जमीन महसुलाची थकबाकी वसूल करण्यासाठी जमिनीचा लिलाव करण्यास मी बंदी घालीन. कारण सारावसुलीसाठी असा लिलाव सहसा होत नाही. आणि तसे करणे अनावश्यक आहे अशी माझी खात्री पटली आहे. सारा थकबाकीसाठी केलेला लिलाव आणि कोर्टाच्या निवाड्यामुळे झालेला लिलाव या दोन्हींची जात एकच आहे. लोकांची भावना दोन्ही प्रकारांविषयी सारखीच तीव्र आहे. एका बाबतीत तसे करणे सरकारला योग्य आणि आवश्यक वाटत असेल तर दुसऱ्याही बाबतीत ते तसेच योग्य आणि आवश्यक आहे. मुख्य म्हणजे, सक्तीची विक्री करून आपले येणे वसूल करण्याचा आपला अधिकार सरकार सोडणार नसेल तर खाजगी सावकारास तो सोडावयाचे काहीच कारण नाही.[१०]' अशा प्रकारे वायव्य सरहद्द प्रान्तापुरता हा मुद्दा निकालात काढण्यात आला. पण मि. इंग्लिस यांनी, '१८५७–५८ साली झालेल्या बंडाळीत सरकारला मदत केली म्हणून ज्यांना जमिनी देण्यात आल्या त्यांची मात्र अशी सक्तीची विक्री होऊ नये.' अशी सूचना आग्रहाने केली होती. जवळ जवळ २५ वर्षे हा विषय सारखा चर्चिला जात होता. या प्रकरणी मि. रेमण्ड वेस्ट यांनी हिंदुस्थानातील जमीन आणि कायदा याविषयी मूलभूत विचार केलेला होता. कमिशनपुढे दिलेल्या साक्षीत ते म्हणतात, 'देशातील बहुतेक भागात अवाच्या सवा चक्रवाढ व्याजाने लोकांची सगळी साधनसंपत्ती उपरे आसामी खाऊन टाकीत आहेत. श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत आणि गरीब अधिक कंगाल होऊ लागले आहेत. रोम आणि स्पार्टा येथील शेतकरी जेव्हा अशाच परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडले तेव्हा त्यांनी क्रांतीचा आणि जमीन परत मिळविण्याचा मार्ग पत्करला होता.

चक्रवाढ व्याज मुळातच बंद केले पाहिजे. कर्जदार कर्जाच्या आणि व्याजाच्या भाराखाली बुडून जाईल इतक्या काळपर्यंत कर्ज वळतेच न करण्याचे सावकाराचे स्वातंत्र्य त्याशिवाय हिरावून घेता येणार नाही.'[१०] धुळे येथील न्यायाधीशाने कमिशनला कळवले की, 'सावकार हवा तो दर लावून कर्ज व्याजाने देतात; त्यावर उपाय योजण्याचे सामर्थ्य राजकारणापायी विधिमंडळाचे ठायी उरलेले नाही.' असा सर्व बाजूंनी शेतकरीवर्ग नागवला जात होता आणि सावकाराचे घर भरण्यापलिकडे त्यांचे हाती काहीच उरले नव्हते. इंग्रजी कायद्याने केलेला हा पहिला कायापालट होता!

## वॉरन हेस्टिंग्जने असे कोणते पाप केले?

दुसरा कायापालट झाला तो 'सरकार' या संस्थेत. १७८४ साली ब्रिटिश पार्लमेंटमध्ये पहिला 'भारत कायदा' मंजूर झाला. तत्पूर्वी १७७३ साली कंपनीच्या कारभाराचे नियमन करणारा कायदा ब्रिटिश पार्लमेंटने मंजूर केला होता. या कायद्यामुळे मतदानासाठी आवश्यक असलेल्या भाग भांडवलाची रक्कम ५०० पौंडांवरून १००० पौंडांवर गेली; कंपनीच्या संचालकांची मुदत १ वर्षावरून ४ वर्षांवर नेण्यात आली; आणि गव्हर्नर जनरल ऑफ फोर्ट विल्यम इन बेंगॉल पाचपाच वर्षांसाठी नेमण्यात येऊन त्याची सत्ता मद्रास आणि मुंबई प्रान्तांवर लागू करण्यात आली. याच वेळी या कायद्याने सुप्रीम कोर्टाची स्थापना केली. पण १७८४ सालचा कायदा हा खऱ्या अर्थाने भारताविषयीचा पहिला कायदा आहे. कारण या कायद्यात, 'इंग्लंडच्या राजाला भारताच्या राजकारणाला योग्य ते वळण देण्याचा अधिकार' देण्यात आला. या कायद्यामुळे भारताला युरोपियन मालक निर्माण झाला. यापुढे गव्हर्नर जनरल, गव्हर्नर, तिन्ही प्रान्तांचे सेनाप्रमुख या सर्वांची नेमणूक प्रत्यक्षात ब्रिटिश मंत्रिमंडळाच्या हाती गेली. 'ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालक मंडळाकडून आपल्याला हवे ते धोरण मंजूर करवून घेण्यासाठी बोर्ड ऑफ कंट्रोल स्थापन करण्यात आले. वस्तुतः लॉर्ड क्लाइव्ह यानेच १७६५ साली कंपनीच्या मुलखाचा राजकीय ताबा ब्रिटिश सरकारने तात्काळ आपल्याकडे घ्यावा अशी सूचना केली होती. पण ती

त्यावेळी कोणाला पटली नाही. पुढे १७८३ मध्ये हेन्री डंडास यान कंपनीचा कारभारच पार्लमेंटच्या हाती घेण्याचा प्रयत्न केला. पण तसा प्रयत्न करताच तशी भूमिका घेणाऱ्या मंत्रिमंडळाचा ईस्ट इंडिया कंपनीच्या विरोधामुळे पराभव झाला. म्हणून पंतप्रधान पिट याने मध्यम मार्ग म्हणून संचालक मंडळ आणि नियामक मंडळ अशी दोन मंडळे उभी केली.[11] हळूहळू संचालक मंडळाचा प्रभाव कमी होऊन नियामक मंडळाचा प्रभाव वाढत गेला. या प्रकरणी पुढाकार जरी पिटचा असला तरी खरा सूत्रधार हेन्री डंडास हाच होता.

ईस्ट इंडिया कंपनीच्या भागीदारांमध्ये हिंदुस्थानात गेलेल्या कंपनीच्या नोकरांचा आणि व्यापाऱ्यांचा तसेच इंग्लंडातील जहाज कंपन्यांचा समावेश होता. हिंदुस्थानातील कंपनीचे नोकर आणि जहाज कंपन्या यांचे दोन स्वतंत्र गट तयार झाले होते. कंपनीच्या नोकरांना हिंदुस्थानातील परदेश व्यापाराची मक्तेदारी कंपनीकडेच हवी होती. आणि जहाज कंपन्यांना हिन्दुस्थानचा परदेश—व्यापार सर्वांसाठी खुला व्हावयास हवा होता. हेन्री डंडास याने या अंतर्विरोधाचा पुरेपूर फायदा घेतला. १७८४ साली स्थापन झालेल्या नियामक मंडळाचा पहिला अध्यक्ष म्हणून डंडास याची नेमणूक झाली. आणि तो १७ वर्षे त्या पदावर कायम राहिला. या काळात तो इंग्लंडचा गृहमंत्री व युद्धमंत्री झाल्यावरही हे अध्यक्षपद त्याने सोडले नाही. त्याने जो प्रथा पाडली तीच १८५८ साली कंपनीचे हातून राज्यकारभार काढून घेतला जाईपर्यंत कायम होती. डंडास याने तीन दंडक घालून दिले : १) हिन्दुस्थानातील सर्व कारभाराचे गव्हर्नर जनरलच्या ठायी केन्द्रिकरण झाले पाहिजे, २) सर्व सारावसुली ही केन्द्रिकृत झाली पाहिजे आणि ३) हिन्दुस्थानातील कंपनीचे सरकार हे सदैव ब्रिटिश पार्लमेंटच्या कह्यात राहिले पाहिजे. वॉरन हेस्टिंग्जवरील इंपीचमेंटचा राजकीय अन्वयार्थ फार वेगळा आहे. वरून दिसावयास वॉरन हेस्टिंग्जने केलेल्या अफरा-तफरीचा आणि अपव्यवहारांचा निषेध त्यात दिसतो. पण खरी स्थिती वेगळीच होती.

## उलट, लोकांमध्ये त्याचेच वजन होते

ब्रिटिश पार्लमेंटने लॉर्ड क्लाइव्ह याच्यावरही 'इंपीचमेंट' आणण्याचा प्रयत्न केला होता.[१२] पण तो फसला. तरीही त्या मनस्तापाने क्लाइव्हने आत्महत्या केली. पुढे १७८० सालापासूनच वॉरन हेस्टिंग्ज यास परत बोलवावे असा लकडा ब्रिटिश मंत्रिमंडळने कंपनीच्या पाठीमागे लावला. पण त्यास न जुमानता कंपनीचे संचालक मंडळ वॉरन हेस्टिंग्जलाच पाठिंबा देत राहिले. कंपनी श्रेष्ठ की मंत्रिमंडळ श्रेष्ठ असा कलह सुरू झाला आणि दोन्ही पक्ष इरेला पेटले. कंपनीने वॉरन हेस्टिंग्जची पूर्ण तरफदारी केल्याने वॉरन हेस्टिंग्जचा पाणउतारा करण्याचा विडा पंतप्रधान पिट याने उचलला. त्यावेळी बंगाल आणि मद्रास या दोन प्रांतांतील कारभार स्वतंत्र होता. त्यामुळे त्यांचे भिन्न भिन्न हितसंबंध तयार झाले होते. गव्हर्नर जनरल या नात्याने हेस्टिंग्जने, अर्काटच्या राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती ठेवण्याचा मद्रास सरकारचा निर्णय, नबाबाला आपली कर्जे फेडण्यास सोईचे व्हावे म्हणून, फिरविला. हा निर्णय फिरवत असताना वॉरन हेस्टिंग्जने मराठ्यांशी अकारण युद्ध पुकारले. आणि त्यामुळे हैदरअलीने अर्काटवर स्वारी केली आणि म्हणून अर्काटचा कारभार मद्रास सरकारच्या हाती गेला; असा ठपका वॉरन हेस्टिंग्जवर ठेवून हेस्टिंग्जच्या निर्णयाविरुद्ध मद्रासच्या गव्हर्नरने लंडनला कंपनीकडे अपील केले.[१३]

या सर्व प्रकारच्या मुळाशी अर्काटच्या नबाबाचा सावकार पॉल बेनफिल्ड याची आपला पैसा परत मिळविण्याची घिसाडघाईच होती. त्याचा इंग्लंडमधील एजंट ॲटकिन्सन याने अर्काटच्या नबाबाचा इंग्लंडमधील एजंट जॉन मॅकफर्सन याच्याशी संगनमत करून ईस्ट इंडिया कंपनीचा पाठिंबा, संचालक मंडळात आपले बहुमत घडवून, पिटच्या बाजूला आणला. १७८४ च्या ब्रिटिश पार्लमेंटच्या निवडणुकीत अर्काटच्या नबाबाचे चौदा सावकार निवडून आले. त्यातील अकरा जणांचा पिटला पाठिंबा होता. या अर्काट हितसंबंधियांनी पिटच्या पक्षाला राजकीय पाठिंबा दिल्यामुळेच डंडास याने अर्काटच्या नबाबाला देण्यात आलेल्या कर्जाची शहानिशा न करता ते

फेडण्याचे वचन दिले होते. अशा रीतीने सत्तेवर आल्यावर हेस्टिंग्जचा आणि कंपनीचा वरचष्मा चालू न देण्याचा निर्णय क्रमप्राप्तच होता. हेस्टिंग्जने भारतात कंपनीचा राज्यकारभार आणि राज्यविस्तार चांगला केल्यामुळे त्याचे लोकांमध्ये वजन वाढले होते. ते वजन कमी करणे पिट प्रभृतींना आणि विशेषतः अर्काटच्या सावकारांना आवश्यक वाटत होते. त्याच्याच जोडीला जहाज कंपन्यांचा आग्रह हिंदुस्थानचा व्यापार खुला करण्याकडे होता. हेस्टिंग्जला तसे करणे धोक्याचे वाटत होते. म्हणून त्याचा, व्यापारात कंपनीची मक्तेदारी कायम राहावी असा हट्ट होता. या हट्टापोटी संचालक मंडळातील जहाज कंपन्यांच्या प्रतिनिधींचा हेस्टिंग्जला विरोध होता. अशा अंतर्गत कारणांमुळे कंपनीच्या चोवीस संचालकांपैकी फक्त सहाच संचालक हेस्टिंग्जचे पक्के पाठीराखे राहिले होते. या सहांचा पुढारी सलिव्हन हा संपूर्ण संचालक मंडळात हेस्टिंग्जच्या बाजूने बहुमत घडवीत असे.

## सरकार सर्वस्वी ‘ लोकमुक्त ’ झाले !

डंडासने या सर्व प्रकारावर मात करण्याचा निश्चय फार पूर्वीच केला होता.[१४] वॉरन हेस्टिंग्जचा कारभार म्हणजे, ‘ इंग्लंडच्या परंपरेशी सर्वस्वी विसंगत आणि इंग्लंडच्या प्रतिष्ठेला सर्वस्वी मारक ’ असा झाला असल्याचे त्यानेच, पार्लमेंटच्या उपसमितीचा अध्यक्ष ह्या नात्याने पार्लमेंटला सादर केलेल्या अहवालात सर्वांत आधी म्हटले होते. ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारावर खरी सत्ता पार्लमेंटचीच आहे, हे सिद्ध करण्यासाठी त्याने वॉरन हेस्टिंग्जच्या ‘ इंपीचमेंट ’ला प्रथम छुपा आणि नंतर उघड दुजोरा दिला. वॉरन हेस्टिंग्जवरील सर्व आरोप संदिग्ध होते. वॉरन हेस्टिंग्जने भारतात उचललेले प्रत्येक पाऊल एकतर संचालक मंडळाच्या परवानगीने उचलले होते किंवा नंतर त्यावर संचालक मंडळाचे शिक्कामोर्तब झालेले होते. त्यामुळे पुढे हाऊस ऑफ लॉर्डस्मध्ये जो सविस्तर खटला झाला त्यात त्याच्यावरचा दोषारोप टिकू शकला नाही आणि त्याची निर्दोष म्हणून सुटका झाली. पण या दोषारोपाने पार्लमेंट हेच कंपनीपेक्षा श्रेष्ठ आहे आणि पार्लमेंटची मर्जी राखणे हेही आपले कर्तव्यच होय, अशी भावना ईस्ट इंडिया कंपनीच्या वरिष्ठ

नोकरवर्गात निर्माण झाली. म्हणजे, कंपनीचे भारतातील सरकार इंग्लंडच्या पार्लमेंटला जबाबदार झाले. पुढे १८१३ साली कंपनीची व्यापारी मक्तेदारी संपली. आणि १८३३ साली कंपनीच्या हातून व्यापार काढूनच घेतला गेला, १८३४ सालापासून गव्हर्नर जनरलचे अधिकार सर्व ब्रिटिश हिंदुस्थानसाठी निर्वेध करण्यात आले; त्यास पूर्वी बंगालचा गव्हर्नर-जनरल असा जो किताब होता त्या ऐवजी भारताचा गव्हर्नर-जनरल असा किताब मिळाला. पुढे १८५८ साली त्यास व्हाइसरॉय अशी आणखी उपाधी मिळून तो भारताचा सर्वोच्च शासक बनला. या अधिकारात तो फक्त स्वतःलाच जबाबदार होता. म्हणजे त्याची सत्ता निरंकुश झाली.[५५] अशी निरंकुश सत्ता भारताच्या इतिहासात कधीच नव्हती. मोगल कितीही सर्वसत्ताधीश झाले तरी अखेरीस ते येथील लोकांना सांभाळून राज्यकारभार करीत. हे अकबर बादशहाच्या उदाहरणावरून स्पष्ट होते. पण ब्रिटिश व्हाइसरॉयला स्थानिक लोकांचा अनुनय करण्याची कुठलीच गरज उरली नाही.

## शासन लोकांचे, राजाची फक्त संमती!

भारत सरकारचे हे नवे स्वरूप प्रत्यक्षात लोकांना दोन प्रकारांनी दिसले. पूर्वी सारा वसुलीचे काम स्थानिक पातळीवर सर्वाधिकार देऊन वतनदाराकडून करवून घेतले जाई. आणि गुन्हेगारीचा बंदोबस्त सुभेदाराकडून होई. अशाप्रकारे महसुलाची व्यवस्था आणि कारभाराची जबाबदारी यांची सांगड स्थानिक पातळीवरच घातली जाई. पण सत्तेचे अधिष्ठान देशाबाहेर गेल्याबरोबर महसुलाची व्यवस्था आणि कारभाराची यंत्रणा यांचे एकदम केन्द्रिकरण झाले. बंगाल प्रान्तात १७ जिल्हे, मुंबईत प्रांतात १७ जिल्हे आणि मद्रास प्रान्तात १२ जिल्हे असे एकूण ४६ जिल्हे पाडून त्यावर एकेक कलेक्टर व एकेक डी. एस. पी. नेमून त्यांच्यामार्फत महसुलाची व्यवस्था आणि गुन्हेगारीचा बंदोबस्त करण्यात आला. ज्या ठिकाणी वतनदार कायम राहिले त्या ठिकाणी साऱ्याची मर्यादा आणि वतनदाराचा अधिकार निर्धारित करण्यात आला. त्यांना कलेक्टर समोर दुय्यम स्थान देण्यात आले. मात्र गुन्हेगारीच्या संबंधात धरपकड करण्याचा किंवा न्याय करण्याचा कुठलाही

अधिकार त्यांना दिला गेला नाही. इतकेच काय, पण तिन्ही प्रान्तांतील सर्व जमीनमहसूल हा भारत सरकारच्याच तिजोरीत जमा झाला पाहिजे, असा नवीन दंडक घालून देण्यात आला. यामुळे आर्थिक सत्तेचे केन्द्रिकरण तात्काळ होऊन गेले. राज्यकारभाराचा हा स्थानिक संबंध आणि संदर्भ मुळातच नष्ट झाल्यामुळे येथील लोकांचा राज्यकारभाराशी असलेला प्रत्यक्ष संपर्क एकदम तुटला. जमिनीची व्यवस्था हीच कोणत्याही समाजाच्या सार्वभौमत्वाची एकमेव कसोटी होय. या व्यवस्थेचा स्थानिक संदर्भ तुटताच या देशातील लोकांचे सार्वभौमत्व लयास गेले. पूर्वी गावाची सभा भरली की वारशाच्या भांडणापासून सावकाराच्या तगाद्यापर्यंत आणि सारामाफीपासून गुन्हेगारांना शासन करण्यापर्यंत सर्व सामाजिक, राजकीय बाबींचा निवाडा 'मजहर' लिहून होत असे. हा 'मजहर' बांबूच्या नळीत बंद करून जपून ठेवला जाई. त्याची एक प्रत वतनदाराकडे, सुभेदाराकडे किंवा राजाकडे पाठविली जाई. आणि त्यांच्याकडून त्या मजहराची अंमलबजावणी होई. म्हणजे शासन गावातल्या गावातच होई आणि त्यास राजमान्यता मिळे. राजाचे शासन नव्हतेच. राजाची फक्त सम्मती असे. ब्रिटिश पार्लमेंटने ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार आपल्याकडे घेताच एक चमत्कार घडला. तो म्हणजे, 'इंग्लंडातील सरकार हे केन्द्र सरकार ठरले' आणि 'कंपनीचे सरकार हे स्थानिक सरकार ठरले.' त्यामुळे संपूर्ण हिन्दुस्थान हेच आपले वतन असे समजून गव्हर्नर-जनरल हा एखादा स्थानिक वतनदारासारखा शासक ठरला. पूर्वीची सारा विभागणी नष्ट होऊन वतनदारांना जो सरकारचा दर्जा होता तो नष्ट झाला. सरकारांची बहुविधता नष्ट होऊन त्यात एकवर्तिपणा आला. जमीन-महसुलाच्या केन्द्रिभूत व्यवस्थेमुळे हा जसा एकवर्तिपणा आला, तसाच संरक्षणाच्या एकवर्तिपणामुळे संपूर्ण देशाला एकछत्रीपणा आला. हा एकछत्री-पणा कसा आला ते पाहण्याजोगे आहे.

## अखिल भारतीय नोकरशाहीचा जन्म

१७९५ साली खर्डा येथे मराठ्यांनी निजामाचा पराभव केला. पण हैद्राबादेत मराठी सैन्य स्थायिक होण्याऐवजी कंपनीची फौज तळ मांडून

बसली. याचे कारण वेलस्ली याने निजामाला मराठ्यांपासून संरक्षण देण्याच्या मोबदल्यात सर्व परराज्यांशी राजनैतिक संबन्ध कंपनीमार्फतच ठेवण्याची अट घातली. त्यामुळे निजामाचे स्वायत्त अस्तित्व संपुष्टात आले. पुढे जेव्हा पुण्याच्या बारभाईंनी बाजीरावाला पुण्यातून हुसकावून लावून त्याचा भाऊ अमृतराव यांस पेशवेपदावर बसविले तेव्हा बाजीराव वसईला पळून गेला. तेथे मुंबईच्या गव्हर्नरने त्याच्याशी १८०२ साली तह केला. त्या तहानुसार असे ठरले की, कंपनीने बाजीरावाला परत पेशव्यांची गादी मिळवून द्यावयाची आणि त्या मोबदल्यात त्याने अन्य राजवटींशी कंपनीच्या मार्फतच संबंध ठेवावयाचे. या करारानुसार बाजीराव पेशवा झाला आणि मराठेशाहीचे स्वतंत्र अस्तित्व लयास गेले. म्हणूनच, जेव्हा नरसिंह चिंतामण केळकर यांनी १८१८ साली पेशवाई बुडाली, असे लिहिले. तेव्हा वासुदेवशास्त्री खरे यांनी ते खोडून काढून, त्याऐवजी १८०२ सालीच पेशवाई बुडाली असे निक्षून सांगितले. हा जो येथील राजवटींचा बाह्य संबंध नियंत्रित करण्याचा चतुर डाव वेलस्लीने टाकला त्यामुळे या राजवटींचे खऱ्याखुऱ्या अर्थाने राजनैतिक अस्तित्व अंतर्धान पावले. संरक्षणाच्या दृष्टीने काबूलपासून मंडालेपर्यंत आणि ल्हासा-पासून लंकेपर्यंत संपूर्ण भरतखंडाला त्यामुळेच एकछत्रीपणा आला. आंतरिक एकवर्तिपणा आणि बाह्यांतरी एकछत्रीपणा निर्माण झाल्यामुळे शासनाचा एकसंधीपणा कसा राखावयाचा असा प्रश्न पुढे आला. या प्रश्नाचे उत्तर प्रथम कॉर्नवालिसने शोधले. वेलस्लीने ते उत्तर अंमलात आणून दाखविले. हा एकसंधीपणा यावयाचा म्हणजे कारभाराचा एकसूत्रीपणा हवा. एकसूत्रीपणा हवा तर समान कार्यसंहिता हवी. समान कार्यसंहिता हवी तर समान कार्यक्षेत्र हवे. आणि समान कार्यक्षेत्र हवे तर किमान कार्यसंरक्षण हवे. या न्यायाने कंपनीच्या सेवकांना सर्वप्रकारची साधने आणि संरक्षणे उपलब्ध करून देण्याची भूमिका लॉर्ड कॉर्नवालिस याने प्रथम घेतली.

## फार मोठे मोल मोजावे लागले !

कंपनीच्या नोकरवर्गाची भरती आणि नोकरवर्गाची वेतनश्रेणी यांची व्यवस्था पूर्वी अजब होती.[१३] कंपनी ज्यास रायटर म्हणून नोकरीवर घेई

त्याचा पगार वर्षाला ५ पौंड होता. पण जो संचालक त्याच्या नावाची शिफारस करी त्याला शिफारशीसाठी ५ हजार पौंड मिळत! दरवर्षी कंपनीच्या प्रत्येक संचालकाला अशा पाचसहा जागा भरण्याची संधी मिळे. कंपनीच्या सैन्यात भरती होणाऱ्या प्रत्येक सैनिकामागे संचालकाला २५०, ३०० पौंड मिळत. रायटर किंवा कॅडेट म्हणून आलेल्या माणसाने इकडे जसा आणि जेवढा पैसा मिळवता येईल तसा आणि तेवढा त्याने मिळवावा; त्यास कंपनीची कुठलीही हरकत नव्हती. पुढे याचा परिणाम असा झाला की, एजंट म्हणून ज्यांची नेमणूक होई त्यास २ हजार पौंड वार्षिक तनखा; पण त्याचे कमिशन मात्र वर्षाला ४० हजार पौंड अशी स्थिती आली. जे कलेक्टर नेमले गेले त्यांनाही एकूण महसूल वसुलीच्या एक टक्का कमिशन देण्याची प्रथा होती. त्यामुळे पगाराच्या हजारपट कमिशन जाई. त्यामुळे उत्पन्न वाढावे म्हणून सारावसुलीत सक्ती आणि जुलुमजबरदस्ती सारखी वाढतच गेली. १७९३ साली कॉर्नवालिस कोड या नावाने कंपनीच्या कर्मचाऱ्यांसाठी एक कार्यसंहिता तयार झाली. आणि त्यानुसार कंपनीचा व्यापार हा कंपनीच्या महसूल व्यवस्थेपासून कायमचा तोडण्यात आला. भारतामध्ये पूर्वी तोडरमल, मलिकंबर यांनी, ओरिसाचा राजा कपिलेन्द्रदेव याच्या महसूल व्यवस्थेचे अनुकरण करून, स्थानिक महसूल व्यवस्था लावून दिली होती. पण खेड्या-पासून थेट मध्यवर्ती केन्द्रापर्यंत सलग अशी महसूल यंत्रणा प्रथम कॉर्नवालि-सनेच निर्माण केली. पगारी नोकर नेमून सर्व देशातील महसूल एकत्र करण्याची यंत्रणा उभी राहताच देशांतर्गत एकवर्तिपणा आणि बाह्यांतरी एकछत्रीपणा सांभाळून ठेवण्यासाठी जो शासकीय एकसंधीपणा हवा होता तो उपलब्ध झाला. या एकसंधीपणाचे मोल इंग्लंडच्या राजाने आणि त्याच्या भारतीय प्रजेने मोठ्या प्रमाणावर मोजले. कंपनीच्या वरिष्ठ सेवेत म्हणजे कंपनीशी करार करून जो सेवेत आला त्याला तीस वर्षे सेवेत ठेवण्याची हमी इंग्लंडच्या राजाने घेतली आणि त्याविरुद्ध ब्र जरी काढला तरी तो चालू देणार नाही अशी ग्वाही भारतात फिरविली. या करारांकित सेवेतील अधिकाऱ्यांचीच वार्षिक ५०० पौंडांहून अधिक वेतन असलेल्या पदावर नेमणूक करण्यात येईल, असे ठरविण्यात आले. त्यामुळे जवळ जवळ ७० वर्षे कुठल्याही अव्वल दर्जाच्या अधिकारपदावर भारतीय माणसाला स्थान मिळाले नाही. राज्य-

कारभारात भारतीय लोकांचे स्थान फक्त दुय्यम दर्जावरच राहिले. या विघटनामुळे भारतीय लोकांचे जे मानसिक अधःपतन, जी आर्थिक कुचंबणा आणि जो राजकीय ऱ्हास झाला त्याला भारताच्याच काय, पण जगाच्या इतिहासातही तोड नाही. भारतीय समाज अशा रीतीने सर्वार्थाने परावलंबी आणि परधार्जिणा होत असताना त्यातून मराठी समाजाची सुटका होणे शक्यच नव्हते. पण मराठी समाजावर हे संकट बंगाल, बिहारपेक्षा ५० वर्षे उशिरा आले, इतकेच !

## स्थानिक नेतृत्वाचे समूळ उच्चाटण

महात्मा फुले यांचे तत्कालीन परिस्थितीत अन्य भारतीय विचारवंतांहून वेगळेपण हे की, ही जी नवी 'नोकरशाई' भारताच्या भूमीवर अवतरली होती तिचे यथार्थ असे ज्ञान त्यांना अंतःस्फूर्तीनेच झाले. ही 'नोकरशाई' आणि आपला समाज यामध्ये मुळातच अहिनकुलवत् स्वाभाविक वैर आहे असे जोतीबांच्या मनाने घेतले होते. हे किती खरे होते याचा एक फार जुना पण महात्मा फुले यांना माहीत नसलेला पुरावा आता उपलब्ध झाला आहे. १० फेब्रुवारी १७७७ रोजी सर गिल्बर्ट इलियट यांस लिहिलेल्या पत्रात वॉरन हेस्टिंग्जने म्हटले आहे की, "कंपनीच्या गरजा आणि तिच्या अंमलाखालील लोकांचे हित यामध्येच स्वाभाविक असा अंतर्विरोध आहे. आणि भारतातील ब्रिटिश राजवटीला जडलेला तो दाहक आणि चिवट रोगच होय." हा जो नवा कलह समाजात उत्पन्न होत होता त्याचा मागोवा घेऊन त्यावर मर्मभेदक प्रहार करण्याचे कार्य एकट्या जोतीबांनीच केले. अन्य सर्व विचारवंत या नोकरशाहीने निर्माण केलेल्या नवीन संधी आणि सवलती यांच्या मोहाला नकळत बळी पडले होते. भारतीय समाजात शासकीय केन्द्रिकरण कधीच झालेले नव्हते. या केन्द्रिकरणाच्या योगाने स्थानिक कर्तृत्व, भ्रातृत्व आणि नेतृत्व यांचे समूळ उच्चाटन झालेले आहे, हे सत्य फक्त जोतीबांच्याच नजरेला अचूकपणे दिसले. एकोणीसाव्या शतकातील रिचर्ड स्ट्रॅची नावाच्या ग्रंथकाराने म्हटले आहे, "भारतासारख्या अवाढव्य देशातील सर्व महसूल एकच निधी असल्याचे समजून त्यातून उचल करण्याचा अधिकार

फक्त गव्हर्नर-जनरल-इन-कौन्सिललाच देणे म्हणजे अनर्थाला आवाहन करणेच होते. त्यामुळे सार्वजनिक उत्पन्नाच्या वाटपात सावळागोंधळ निर्माण होऊन जो आक्रमक असेल त्याचा लाभ आणि जो समंजस असेल त्याच्याकडे दुर्लक्ष असा प्रकार होत जातो. स्थानिक पातळीवर काटकसर केली तरी त्यातून कुठलाच लभ्यांश नसल्यामुळे उधळमाधळ थांबवण्याची बुद्धीच कमी होते आणि स्थानिक उत्पन्न वाढले तरी स्थानिक सुधारणेची साधने उपलब्ध होत नसल्यामुळे स्थानिक पातळीवरील सार्वजनिक उत्पन्नाची साधने वाढविण्याची दृष्टी खुरटीच राहते. ''

खरोखरच असे घडले आहे. ब्रिटिश राजवटीमुळे येथील समाजजीवनाचा जो मूळ ढाचा होता तोच नष्ट झाला. कोणत्या नदीला कोठे बंधारा घालावयाचा, त्याचा कालवा कुठून न्यावयाचा, किती जमिनीला पाणी पुरवावयाचे; किंवा लोखंडाचा किंवा खताचा कारखाना कोठे काढावयाचा; लोहमार्गाची बांधणी कशी आणि कुठे करावयाची; रस्तेबांधणीसाठी किती खर्च करावयाचा, वीजउत्पादन केंद्र काढावयाचे की नाही; शिक्षणावर किती खर्च करावयाचा; आरोग्याच्या सोयी कुठे, कशा आणि किती करावयाच्या, नवीन नोकर किती आणि केव्हा नेमावयाचे; प्रथम श्रेणीच्या किती जागा असाव्यात; अशा प्रत्येक बाबतीत भारत सरकारची आधी अनुमती घेऊन मगच ती अंमलात आणण्याची प्रथा या देशात पडली. गव्हर्नर जनरलच्या परवानगीशिवाय इकडची काडी तिकडे करणे कठिण झाले. ज्याला कोणाला जे पाहिजे असेल ते त्याने भारत सरकारकडे मागितल्याशिवाय तरणोपाय राहिला नाही. अशा रीतीने आपणहून काही करण्याचे स्थानिक शहाणपण मोडीत निघाले.

## हेस्टिंग्ज स्वतंत्र होणार असल्याची वंदता

महात्मा फुले यांना हे दारुण चित्र दिसले होते. इ. स. १७७५ ते १८५० या ७५ वर्षांच्या कालखंडात स्थानिक पातळीवरील रोजंदारीचे दर जवळ जवळ एकच कायम राहिले. त्यांच्यामध्ये म्हणावा तसा बदल झाला नाही. याचा एक अर्थ देशांतर्गत संपत्तीचा ओघ आटला असा करावा लागतो. १८५७ साली शिपायांचे जे बंड झाले त्यास आर्थिक ऱ्हासाचीही खदखदणारी

पार्श्वभूमी कारणीभूत झाली यात शंकाच नाही. जुने स्थानिक उद्योगधंदे बुडाले आणि नवीन उद्योगधंदे आलेले नव्हते. अशा कैचीत संपूर्ण भारतीय समाज सापडला होता. अर्थात ही स्थिती लक्षात घेऊन ब्रिटिश सरकारने १८६० सालानंतर लोकजीवनातील ही पोकळी भरून काढण्यासाठी भारतात आधुनिक उद्योगांचे जाळे विणावयास सुरवात केली हे खरे. १८४८ सालीच न्यु अर्लिअन्स कापसाची जात येथे आणून शेतीची सुधारणा करण्याचा प्रयत्न सरकारने सुरू केला होता. त्यास यश येऊन कापूस लागवड वाढली होती. त्यामुळे कापूस पिंजण्याच्या यांत्रिक जिन फॅक्टऱ्या वाढू लागल्या होत्या. १८५२ साली असे साठसत्तर जिन अस्तित्वात आले होते. पण या नव्या प्रयत्नातून उद्योगधंद्याचे केन्द्रिकरणच पुढे व्हावयाचे होते. म्हणजे ब्रिटिश राजवटीने केवळ शासकीय यंत्रणाच केन्द्रिकृत केली असे नव्हे, तर एकूण लोकजीवनातील सर्व क्षेत्रांत हरएक अंगाने केन्द्रिकरणाची प्रवृत्ती, प्रक्रिया आणि प्रतिष्ठा निर्माण केली. या केन्द्रिकरणाचा योजक आणि संयोजक हेन्री डंडास हाच होय. ईस्ट इंडिया कंपनीवर मंत्रिमंडळाचे वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या हट्टापायी डंडास याने, कंपनीचे भारतातील सरकार आपल्या संमतीशिवाय चालताच कामा नये, असा निश्चय केला होता. विशेषतः वॉरन हेस्टिंग्जला परत बोलावल्याशिवाय आपले काहीच चालणार नाही, अशी त्याची खात्री पटली होती. त्यावेळी इंग्लंडात अशी वदंता उठली होती की, वॉरन हेस्टिंग्ज जर स्वतःला स्वतंत्र सरकार म्हणून घोषित करणार असेल तर सैन्याची कुमक पुरविण्याची तयारी फ्रेंच सरकारने दर्शविली होती.

## केन्द्रीय सत्तेची निरंकुश मेढ

ही वदंता खरी की खोटी याची कोणी शहानिशा केल्याचा पुरावा उपलब्ध नाही, परंतु बर्कने डंडासला या संबंधात लिहिलेले एक पत्र उपलब्ध आहे. या पत्रात बर्क म्हणतो, “ आपल्या समान गुन्ह्यामुळे आणि त्यातून उद्भवणाऱ्या समान भयामुळे काही माणसे इथे एकत्र आली आहेत आणि त्यांच्यापाशी तुम्हास अजून कल्पनाही आलेली नाही एवढया मोठ्या प्रमाणावर पैसा आणि प्रतिष्ठा जमा झाली आहे. या गटाजवळ लोकांना आपल्या

दावणीस बांधण्याइतका प्रभाव आहे. या गटाला सध्या वॉरन हेस्टिंग्ज हा भारतीय पुढारी म्हणून लाभलेला आहे आणि त्याच्या इतकाच हुन्नरी आणि प्रभावी इंग्लिश पुढारी ते लवकरच उभा करतील. या गटाचा आज विजय झाला तर तुमच्या मंत्रिमंडळाचा त्याच्यापुढे निभाव लागणार नाही." कंपनीची हिन्दुस्थानातील स्थिती आणि गती कोणत्याही क्षणी एकतर आपल्याला डोईजड होईल किंवा आपल्या काबूबाहेर निघून जाईल, अशी अव्यक्त भीती इंग्लंडमधील सर्वच राजकीय पक्षांच्या प्रमुखांना भेडसावत होती, हे बर्कच्या वरील उद्गारांवरून स्पष्टच होते. त्यामुळे भारतातील कंपनीचा व्यापार आणि राज्यविस्तार आपल्या नियंत्रणाखाली आणण्यासाठी हेन्री डंडास याने सर्व सत्ता मंत्रिमंडळाच्याच हाती केन्द्रित करण्याचा पवित्रा घेतला. वॉरन हेस्टिंग्ज याची 'इंपीचमेंट' हे या निरंकुश सत्तेचेच उघडे नागडे प्रदर्शन होते.[७]

डंडास याने केन्द्रीय सत्तेची ही निरंकुश अशी मेढ जी रोवली तीच दोनशे वर्षे होऊन गेली तरी भारतात अखंड उभी आहे. ही मेढ अशी खोलवर ठोकून बसविण्याचे कार्य लॉर्ड मेकॉले याने केले. आपण थोडे मागे जाऊन पाहिले तर असे दिसते की, वॉरन हेस्टिंग्ज याने बनारसच्या पाठशाळेला आणि कलकत्त्याच्या मदरशाला वार्षिक अनुदान देण्याची प्रथा सुरू केली होती. हिंदु आणि मुसलमान अशा दोन्ही समाजांच्या परंपरागत शिक्षण संस्था टिकविण्याची आणि वाढविण्याची ही नीती हेस्टिंग्जने आपल्या आधीच्या मोगल राजनीतीतून उचलली होती. वॉरन हेस्टिंग्जने अकबर बादशहाचे धर्मसहिष्णुतेचे धोरण कंपनी सरकारच्या गळी उतरविले होते. या धोरणाला ख्रिश्चन मिशनऱ्यांचा आणि इंग्लिश व्यापाऱ्यांचा तीव्र विरोध होता. हेस्टिंग्जला जो अनेक बाजूंनी विरोध झाला त्यातील हा एक प्रमुख विरोध होता. १७९३ सालीच कंपनीने ख्रिश्चन मिशनरी वर्गाला भारतात सर्वतोपरी पाठिंबा देऊन ख्रिश्चन धर्मप्रसाराचा वसा उचलावा असा प्रयत्न झाला. पण त्यास यश आले नाही. पुढे १८१३ साली मात्र ख्रिश्चन मिशन्सना वाव देण्याचे धोरण कंपनीने चार्लस ग्राण्ट याच्या हट्टापायी स्वीकारले. पण कंपनीने ख्रिश्चन धर्मप्रसाराचे कार्य काही आपल्या शिरावर

घेतले नाही. पुढे १८३३ सालापर्यंत या प्रश्नाला नकारात्मक वळण देण्यात आले. नकारात्मक म्हणजे असे की, खिश्चन धर्माचा प्रसार जर कंपनी करणार नसेल तर हिंदू आणि मुस्लिम धर्माचा आदर करून त्यांच्या शिक्षणसंस्था जगविण्याचे कंपनीला कारण नाही, अशी भूमिका घेण्यात आली.

## पौर्वात्य ज्ञानविज्ञान वाळीत टाकले

या भूमिकेचा प्रवर्तक 'लॉर्ड मेकॉले' हा होता. तो १८३२ साली कंपनीच्या नियामक मंडळाचा (बोर्ड ऑफ कंट्रोलचा) सेक्रेटरी झाला. आणि नंतर १८३३ सालच्या कायद्याने जेव्हा गव्हर्नर-जनरलचे सल्लागार मंडळ चार जणांचे करण्यात येऊन कंपनीच्या नोकरीत नसलेल्या त्रयस्थ सभासदाची एक जागा निर्माण झाली, तेव्हा त्या जागेवर पहिला स्वतंत्र सल्लागार म्हणून, लॉर्ड बेंटिंक याच्या सल्लागार मंडळात त्याची नेमणूक इंग्लंडच्या राजाने केली. यावेळेपर्यंत भारतात ज्या संस्थेला सरकारी अनुदान मिळते त्या संस्थेत इंग्रजी शिकविले गेले पाहिजे, असा नियम करण्यापर्यंत मजल गेली होती. कलकत्त्याच्या अरेबिक कॉलेजने सतत सात-आठ वर्षे या तरतुदीची अंमलबजावणी निग्रहाने टाळली होती. मेकॉले आपली नवी अधिकारवस्त्रे धारण करून जेव्हा भारतात अवतरला तेव्हा त्याने या राईचा पर्वत केला. त्याने भारत सरकारचा सल्लागार या नात्याने कंपनीच्या राजवटी-तील सर्व शिक्षण हे इंग्रजी माध्यमातून आणि पाश्चिमात्य ज्ञान–विज्ञानाच्या द्वारेच झाले पाहिजे, असा स्पष्ट निर्वाळा दिला. त्यानुसार लॉर्ड बेंटिंक याने ७ मार्च १८३५ रोजी सल्लागार मंडळात असा निर्णय केला की, 'युरोपियन वाङ्मय आणि शास्त्र यांचा या देशात प्रसार करणे हेच कंपनी सरकारचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे.' आणि त्यानुसार त्याने असा आदेश काढला की "हिंदुस्थानातील सरकारजवळ शिक्षणासाठी उपलब्ध असलेला संपूर्ण निधी इंग्लिश भाषेच्या माध्यमातून इंग्रजी ज्ञान–विज्ञानाचा बोध एतद्देशीय लोकांना करून देण्यासाठीच करण्यात यावा.' या निर्णयामुळे पौर्वात्य ज्ञानविज्ञान वाळीत टाकले गेले.[८]

हा बहिष्कार १८४० साली लॉर्ड ऑकलंड याने उठवला. पण शिक्षणाचे मूळ उद्दिष्ट पश्चिमात्य विद्या शिकवणे हे जे एकदा ठरले ते कायमचेच. लॉर्ड बेंटिंक याचे हे धोरण औरंगजेबाच्या जिझिया करापेक्षाही दुष्ट होते. ' जिझिया ' कराचा खरा अर्थ एवढाच होता की, तुम्हांस जर हिन्दू धर्माचाच आश्रय कायम ठेवावयास हवा असेल तर त्यासाठी तुम्ही सरकारी तिजोरीत जास्तीचा कर भरला पाहिजे; तेवढा कर भरला की तुमच्या रक्षणाची जबाबदारी सरकार घेईल. याचे कारण औरंगजेब हा हिंदू धर्म-विरुद्ध असला तरी धर्मनिष्ठ होता. कोणत्याही सार्वजनिक व्यवस्थेचा कणा धर्माचा आधार हाच होय, हे तो जाणत होता. राज्यकर्ता या नात्याने समाजातील संपत्तीचे, वारशाचे, गुन्हेगारीचे आणि आपसातील तंटेबखेड्यांचे नियम धर्मशास्त्रानुसार करण्याचे वचन प्रजेला देण्यास आपण बांधलेले आहोत, असे तो प्रामाणिकपणे मानीत होता. अकबरात आणि त्याच्यात फरक एवढाच की हिंदूंना धर्मस्वातंत्र्य हवे असेल तर त्यांनी जकात दिली पाहिजे, असा त्याचा आग्रह होता. पण लॉर्ड बेंटिंक याने, मेकॉलेचा सल्ला प्रमाण मानून, भारतातील सार्वजनिक व्यवस्थेचा लोकसंमत असा धार्मिक आधार उध्वस्त केला. बेंटिंक याने, " धर्माचा आधार कायम ठेवण्याचे वचन ब्रिटिश सरकार देत नाही, " असेच जाहीर केले. वास्तविक दृष्टीने पाहिले तर प्रत्येक राज्यकर्ता आपल्या प्रजेला धर्माचा आधार रक्षण करण्याचे वचन देत असे. ही भारतीय परंपरा होती. लॉर्ड बेंटिंक याने हे मूळ परंपरागत सरकारकर्तव्य ठोकरून लावले. त्यास येथील राज्यकारभारासाठी ख्रिश्चन धर्माचा उघडउघड आधार घेता येत नव्हता म्हणून त्याने मागील दाराने लॉर्ड मेकॉलेचे घोडे भारतात घुसवले. इंडियन पीनल कोड, इंडियन सिव्हिल कोड आणि एव्हिडन्स ॲक्ट हे तीन कायदे लॉर्ड मेकॉलेने तयार केले. त्यामध्ये ख्रिश्चन परंपरा आणि भारतीय लोकव्यवहार यांची सांगड घालण्यात आली. म्हणजे भारतातील सार्वजनिक व्यवस्थेला हिंदू, मुस्लिम धर्मांचा जो संयुक्त आधार होता तो नाहीसा करून त्या जागी पाश्चात्य संस्कृतीचा टेकू देण्यात आला. येथील शासनाचा आणि धर्मजीवनाचा जो

एकजीव असा स्वाभाविक अनुबंध होता तोच या तीन कायद्यांनी तोडून टाकला. भूतकाळाचा वर्तमानाशी असलेला सांधाच लॉर्ड मेकॉले याने अशा रीतीने उखडून टाकला.

## बेंटिंक हा औरंगजेबाचा इंग्रजी अवतार !

'सरकार' या संस्थेचा शतकानुशतके चालत आलेला आणि सर्वमान्य असलेला 'स्थानिक' संघ, संदर्भ आणि संबंध अशा रीतीने लोप पावला. आणि त्या जागी अवघ्या पाऊणशे वर्षात, 'सरकार' या संस्थेचा 'सार्वदेशिक' संघ, संदर्भ आणि संबंध उदयास आला. 'स्थानिक' विरुद्ध 'सार्वदेशिक' असा आंतरिक हितविरोध उफाळून वर येण्यास लॉर्ड मेकॉलेची नवी शिक्षणव्यवस्थाच, अवघ्या वीस वर्षात कारणीभूत ठरली. १८५७ च्या बंडानंतर राणीने जाहीरनामा काढून येथील हिंदू, मुस्लिम संस्कृतींचे संरक्षण करण्याचे वचन दिल्यामुळेच ब्रिटिश सत्ता येथे स्थिर होऊ शकली. आणि त्यासाठी कंपनीची राजवट समूळ उपटून फेकावी लागली, एवढा प्रचंड लोकविरोध लॉर्ड बेंटिंक याच्या कृपेने निर्माण झाला. दैवदुर्विलास हा की, जे औरंगजेबाला दूषण देतात आणि दुष्ट म्हणतात तेच बेंटिंकचा गौरव करतात आणि त्यास भारताचा उपकारकर्ता म्हणतात ! शुद्ध ऐतिहासिक दृष्टीने पाहिले तर वॉरन हेस्टिंग्ज हा अकबराचा आणि बेंटिंक हा औरंगजेबाचा सांस्कृतिक वारस ठरतो.[११] फरक इतकाच की बेंटिंकने केवळ हिंदू संस्कृतीच नव्हे, तर तिच्याबरोबर मुस्लिम संस्कृतीही राज्यकारभारापुरती वाळीत टाकली. भारतात १८५७ च्या बंडानंतर जे नवीन सामाजिक आणि सांस्कृतिक प्रवाह दृष्टीस पडतात, त्याचे मूळ कारण सार्वजनिक व्यवस्थेच्या बुडाशी असलेला धर्मविवेक, लॉर्ड मेकॉले आणि लॉर्ड बेंटिंक या जोडगोळीने विखरून टाकला, हेच होय.

## मेकॉलेशी दोन हात जोतीबांनीच केले

समाज आणि शासन यांचा सांधा निखळल्यानंतर सार्वजनिक जीवन आणि धर्म यांची सांगड पुन्हा कशी जुळवावयाची, असा प्रश्न भारताच्या

इतिहासात काही प्रथमच उद्‌भवला नव्हता. मोगलांच्या काळी औरंगजेबाने तर कहर उडविला होता. पण त्याचे पूर्वीच समाज धर्माधिष्ठित ठेवावयास शासन उपयुक्त किंवा अनुकूल नाही, अशी भावना मोगलांच्या संबंधात दृढमूल झाली होती. त्या वातावरणात ज्ञानेश्वर, तुलसी, कबीर आदींनी भक्तिपंथाची कास धरून समाज एकत्रित ठेवला. शिवछत्रपतींचा उदय हा या प्रक्रियेचाच अटळ आणि अपेक्षित असा परिपाक होय. शासन आणि समाज यांचा सांधा मेकॉलेच्या करणीने निखळून पडल्याने पुनः तशीच वेळ आली होती. शिंद्यांच्या दरबारी आपल्या कर्तृत्वाने पुढे आलेले हैबतराव-बाबा, १८३६ नंतर, आता शिंद्यांचे कार्य संपले असे जाणून आळंदीला येतात आणि १८३९ साली माऊलीच्या पादुका डोक्यावरून नेण्याऐवजी, घोडा पुढे चालवून, पालखीतून न्यावयास सुरुवात करतात आणि महात्मा फुले हे १८७३ साली ब्राह्मण्य झुगारून देऊन 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना करतात. ३४ वर्षांच्या अंतराने घडणाऱ्या परस्परांशी यत्किंचितही संबंध न दिसणाऱ्या या दोन घटनांमागे एकच समान सूत्र होते. ते म्हणजे, सार्वजनिक जीवनाला धर्माचा आधार मिळवून देणे. हैबतरावबाबा मूळ परंपरेकडे धावले; तर जोतीबांनी आधुनिक वळण घेतले.

जोतीबांच्या बाबतीत तर 'सार्वदेशिक' विरुद्ध 'स्थानिक' या संघर्षाची परमावधीच झाली. त्यांनी स्थानिकपणाच्या प्रेमापोटी सार्वदेशिकपणाच मुळात नाकारला. त्यांनी खंडोबाची पूजा सांगितली, मराठीत लग्नाचे मंत्र तयार केले. स्थानिक संस्कृती जपण्याचा आणि जगवण्याचा जोतीबांच्या ठायी हा जो विलक्षण आवेग आणि आवेश आपणांस दिसतो तो काही उद्रेकाच्या किंवा उद्वेगाच्या सदरात कोंबता येणार नाही. हा आवेश आणि आवेग उद्‌बोधाचाच म्हणावा लागतो. येथील समाजातील सर्व परंपरा अशास्त्रीय म्हणून त्याज्य आहेत अशा मेकॉलेप्रणीत विचाराची वावटळ उठली असताना, 'माझा मऱ्हाठी आचारविचार हाच खरा आचार होय,' असे जीव तोडून सांगावयास फार मोठे धारिष्ट्य हवे होते, ते जोतीबांनी दाखविले. सार्वदेशिकपणाच्या नव्या हव्यासापोटी मऱ्हाठी समाजाचे कदापि भले व्हावयाचे नाही अशी त्यांनी आपल्या मनाशी खूणगाठ बांधली होती. मेकॉलेप्रणीत सार्वदेशिकपणाचा

पहिला तात्त्विक आणि व्यावहारिक विरोध जोतीबांनीच केला. त्यांची समाजसुधारणेची बुद्धी राजा राममोहन रॉय यांच्या बुद्धीशी जुळणारी दिसत असली तरी हे साम्य वरवरचे आहे.

## इंग्रज लोक उपरे आणि परके कां राहिले ?

राजा राममोहन रॉय यांनी मेकॉलेचे आणि बेंटिकचे कार्य सुकर केले; जोतीबांनी ते कार्य महाराष्ट्रापुरते हाणून पाडले. पण केवळ महाराष्ट्रात विरोध केल्याने मेकॉलेचा सार्वदेशिकपणा उखडता येणार नव्हता. आजच्या विसाव्या शतकातील हिंदी माणसाची मूस लॉर्ड मेकॉलेनेच घडविली आणि आजचे सर्व प्रश्न म्हणजे मेकॉलेने घडविलेल्या हिंदी माणसाचेच प्रश्न आहेत. महात्मा फुले यांच्या कार्याचे यथार्थ ज्ञान आजतागायत होऊ शकले नाही यास ही मेकॉलेप्रणीत हिंदी माणसाची घडणच कारणीभूत आहे. लॉर्ड मेकॉले याने इंग्रजी भाषेला शिक्षणाचे माध्यम केल्यामुळे आणि इंग्रजी भाषा हीच राज्यकारभाराची जिल्हापातळीवरील भाषा झाल्यामुळे इंग्रजीचा प्रचार आणि प्रसार सारखा वाढतच गेला. १८८४ साली झालेल्या पहिल्या खानेसुमारीत इंग्रजी हीच आपली मातृभाषा आहे, असे नमूद करणाऱ्यांची संख्या या देशात दोन लाखांचे वर गेली. त्यापैकी दीड लाख ब्रिटनमध्ये जन्मलेले आणि उरलेले पन्नास हजार भारतातच जन्मलेले होते. वरील दीड लाख मुळात युरोपियन, पण उरलेले पन्नास हजार भारतीयच होते. या संख्येवरून असा निष्कर्ष काढता येतो की ख्रिस्तीकरण झालेल्या काही भारतीयांनी आपली मातृभाषाच बदलून टाकली. असाच प्रकार मोगलाईत जेव्हा येथील लोकांनी मुसलमानी धर्माचा स्वीकार केला तेव्हा धर्मांतरितांनी आपल्या मातृभाषेचा त्याग करून फारसी हीच आपली मातृभाषा असे ठरवून टाकले. ब्रिटिश राजवटीत हीच प्रक्रिया सुरुवातीच्या साठ वर्षांत सुरू झाली होती, असे १८८४ च्या खानेसुमारीवरून दिसते. पण ही प्रक्रिया नंतर खंडित झाली. ती कां ? या प्रश्नाचे उत्तर शोधू जाता हे लक्षात येते की, लॉर्ड मेकॉले आणि लॉर्ड बेंटिंक यांनी शासनव्यवस्थेच्या पायाखालून धर्माचा आधार काढून घेतल्यामुळे येथील लोकांशी ब्रिटिश राज्यकर्त्यांचा समान राजकीय–सामाजिक पातळीवर कधीही खांद्याला खांदा लावून संपर्कच आला नाही. कंपनीचे सरकार आणि नंतर

ब्रिटिश सरकार हे या देशात उपरे आणि परके राहिले. मुसलमान राज्यकर्ता हा येथील हिंदूधर्मियांशी समोरासमोर झगडला किंवा हातात हात घालून जगला. त्यामुळे हिन्दु आणि मुस्लिम धर्माचा आणि संस्कृतीचा संघर्षातून समन्वयाकडे संयुक्त प्रवास झाला. या समन्वयातून एकीकडे सूफी पंथ आणि दुसरीकडे उर्दू भाषा यांचा याच भूमीत जन्म झाला आणि त्यांना भारतीयांनी आपलेपणाने स्वीकारले. गावोगाव सूफी संतांच्या पादुका हिन्दू-मुसलमान सारख्याच श्रद्धेने वंदू लागले. आणि उर्दू भाषा ही अखिल भारताची काही काळ तरी व्यवहार-भाषा होऊन गेली. संत कबीराने आपल्या रोखठोक वाणीने 'सधुक्कडी' भाषा ही अखिल भारताची लोकभाषा करूनच टाकली होती. त्यातूनच पुढे 'खडी बोली'चा जन्म झाला.

## हा टाहो कोणी ऐकलाच नाही !

वॉरन हेस्टिंग्ज याने घालून दिलेले धोरण पुढे लॉर्ड मेकॉले याने बदलले नसते तर कंपनीचा कारभारही कदाचित् खडीबोलीतच झाला असता. किंबहुना, इंग्रजी शासक येथील भूमीचे व्हावयास आणि त्यांना स्वकीय म्हणून मान्यता मिळावयास अशा एतद्देशीय लोकभाषेच्या आसऱ्याची गरज होती. पण एतद्देशीय भाषांचा धिक्कार करून केवळ इंग्रजी भाषेचा उदोउदो लॉर्ड मेकॉलेने केल्यामुळे ब्रिटिश राजवट ही सदैव उपरी आणि परकी राहिली. खिस्ती धर्म आणि हिन्दू धर्म किंवा खिस्ती धर्म, मुस्लिम धर्म आणि हिन्दू धर्म यांच्या समन्वयाचा येथे प्रयत्नच झाला नाही. महाराष्ट्रात रेव्हरण्ड नारायण वामन टिळक आणि चित्रकार विनायकराव मसोजी यांनी आपल्या प्रतिभेने खिस्तीधर्माचे मराठी संस्कृतीशी कलम केले होते. पण ते ब्रिटिश राज्यकर्त्यांना काय किंवा खिस्ती मिशनऱ्यांना काय सहन झाले नाही, मानवले नाही आणि पचलेही नाही. अशा स्थितीत मेकॉलेने घडविलेला हिन्दी माणूस केवळ हिन्दू, मुस्लिम धर्मांविषयीच नव्हे तर एकूण धर्मसंस्थेविषयीच साशंक आणि उदासीन झाला. त्यास सरकारी नोकरी हाच देव वाटू लागला. नोकरशाहीचा असा सांस्कृतिक पाया मजबूत करणे हेच लॉर्ड मेकॉले याचे एकमेव उद्दिष्ट होते. जोतीबांच्या नजरेला हे उरफाटे वळण त्याचवेळी दिसले होते. आणि म्हणून ते 'शेअर खरेदी करा आणि संपत्तीची साठवण करा' असा उपदेश लोकांना

आर्ततेने करताना आढळतात. पण त्यावेळी त्यांचे कोणी ऐकले नाही आणि सर्वजण मेकॉलेने टाकलेल्या जाळ्यात अडकले. सत्तेच्या केन्द्रिकरणामुळे आणि त्या केन्द्रिकरणाचा निभाव लागावा म्हणून निर्माण झालेल्या शिक्षण पद्धतीमुळे संपूर्ण देशात एकच एक राजकीय केन्द्र प्रस्थापित झाले. या देशात असा एककेन्द्री राजकारणाचा व्यवहार पूर्वी कधीच नव्हता. या मूलभूत बदलामुळे येथील परंपरागत सामाजिक जीवनाचा गुरुत्वमध्य कोसळून पडला. साहजिकच येथील हिंदु-मुस्लिम समाजाच्या जुन्या व्यवस्था कोलमडून पडल्या. चातुर्वर्ण्याचे जोखड फेकून देण्याची वेळ हीच आहे, असे जे जोतीबांना प्रतीत झाले ते या वस्तुस्थितीचा त्यांना बोध झाला म्हणूनच. शूद्रांना ब्राह्मणांच्या दास्यत्वातून आपली सुटका करून घेण्याची संधी आणि सवड ब्रिटिश राजवटीच्या छायेखालीच मिळेल अशी त्यांची धारणा झाली होती. जोतीबा एके ठिकाणी म्हणतात, "शिवाजी राजाने मुसलमानी राज्य हाणून पाडले व नवीन हिन्दू राज्य स्थापिले याची काही गरज नव्हती; मुसलमानी राज्य काही वाईट नव्हते. मुसलमानी राज्यात जातीभेदाचे प्रस्थ कमी होत चालले होते. जातीनिष्ठ पक्षपात नाहीसा होत चालला होता." या विधानांचा अर्थ हा की उत्तर मोगलाईत हिंदू-मुस्लिम समन्वयाचा जो कालप्रवाह आला होता तो ऐतिहासिक दृष्ट्या जोतीबांना शूद्रविमोचक वाटत होता. आणि नवीन परिस्थितीत केन्द्रिभूत सत्तेमुळे नोकरशाहीचे संकट आलेले असले तरी त्या शासनाच्या धर्मशून्यतेमुळे शूद्रांचे विमोचन करण्याची शक्यता निर्माण झाली आहे, असे त्यांना तीव्रतेने जाणवले होते. केन्द्रिभूत सत्ता ही स्थानिक धर्मसत्तांना मोजीत नसल्यामुळे तीच शूद्रांची कैवारी ठरेल असा त्यांचा समज झाला होता. म्हणून नोकरशाहीच्या जुलमी आणि भ्रष्ट कारभारावर कोरडे ओढीत असतानाच ते इंग्रज राजवटीच्या काळातच शूद्रांचे विमोचन घडवून आणण्याच्या उद्योगास प्रवृत्त झाले.

## "प्रजा म्हणजे शूद्रातिशूद्र लोक"

ब्रिटिश राजवट येण्यापूर्वी आणि ती येथे स्थिरावण्यापूर्वी महात्माफुले यांच्यासारखा ब्राह्मण्यनिर्दालक पुढारी कोणीच कां झाला नाही, याचे उत्तर मेकॉलेप्रणीत धर्मशून्य शासननीतीतच मिळते. लॉर्ड मेकॉले याने एकूण

भारतीय इतिहासालाच अपूर्व, अदृष्ट आणि अतर्क्य असे वळण लावले. लॉर्ड मेकॉले हा या अर्थाने भारतावर प्रभाव टाकणारा सर्वश्रेष्ठ ब्रिटिश मुत्सद्दी ठरतो. आजचा हिन्दी माणूस जी सर्व धडपड करतो आहे ती मेकॉलेच्या मगरमिठीतून आपली सुटका करून घेण्यासाठीच. आजमितीस भारतात केन्द्र विरुद्ध राज्य असा स्वायत्ततेचा जो संघर्ष सुरू झाला आहे तो मुळात मेकॉले-प्रणीत एकवर्ती केन्द्रीय सत्तेचा पगडा झुगारून देण्यासाठीच होय. पण ही केन्द्रवर्ती सत्ता त्यावेळी सामान्य जनांना खरोखरच आपली कैवारी वाटली. त्याचे कारण महात्मा फुले यांच्या लिखाणात सापडते. ते म्हणतात, "या हिन्दुस्थान देशाच्या स्थितीविषयी साधारणपणे थोडासा विचार करू गेल्यास आपले सहज असे लक्षात येईल की या देशावर प्राचीन कालापासून ज्या ज्या लोकांनी स्वाऱ्या केल्या त्यापैकी बहुतेकांचे हातून या देशातील मूळचे राहणारे शूद्रातिशूद्र प्रजेस सौख्यकारक व दिवसानुदिवस तिचे सुधारणुकीस कारणीभूत असून देशाचे ऐश्वर्यवर्धक अशा क्वचित्‌च गोष्टी घडून आल्या. प्रथमतः इराणी लोक म्हणजे जे हल्ली सर्व हिन्दुस्थानभर आर्य अथवा ब्राह्मण या नावाने प्रसिद्ध आहेत त्या लोकांनी या देशावर स्वाऱ्या करून आपली सत्ता स्थापन केली. याविषयी परशुरामाचे कारकोर्दीचे उदाहरण बस आहे.

"पुढे त्यांनी मन मानेल तसे सर्वथैव स्वहितास उद्देशून मनुसंहितेसारखे कायदे करून त्यास विशेष वजनदारी आणण्याकरिता धर्माचे पूट देऊन त्यावेळचे अज्ञानांधःकाराच्या महार्णवात गटांगळ्या खाणाऱ्या शूद्रादि अतिशूद्र जनात प्रसार करण्यामध्ये जय मिळविला. पुढे काही काळानंतर मुसलमान लोकांनी (अफगाण, मोगल वगैरे) या देशावर स्वाऱ्या केल्या. त्याचप्रमाणे अलिकडे युरोपातील डच, पोर्तुगीज, फ्रेंच इत्यादी लोकांनी स्वाऱ्या केल्या, परंतु त्या स्वाऱ्या काही विशेष म्हणण्यासारख्या नव्हेत. कारण त्या लोकांची सत्ता या देशात फारच थोडे ठिकाणी असून अल्पकाळातच नाहीशी झाली. त्यापासून प्रजेस विशेष सुख प्राप्त झाले नाही व विशेष दुःखही प्राप्त झाले नाही. वर जे लोक सांगितले त्यापैकी पहिले दोन म्हणजे आर्य ब्राह्मण व मुसलमान यापासून प्रजेस (येथे व पुढे प्रजा शब्दाचा अर्थ शूद्रादि अतिशूद्र लोक समजावा.) फारच त्रास उत्पन्न झाला. ते स्वतः कपट, मत्सर,

क्रूरता, आपल्पोटेपणा वगैरे अवगुणांचे केवळ मूर्तिमंत पुतळेच होते यात काही संशय नाही. त्यांनी आपले अविचाराचे हेतू सिद्धीस जावे म्हणून हातामध्ये अम्मलरूपी अतितीव्र कोरडा घेऊन या देशातील हस्तगत झालेले दीन प्रजेच्या अंगावर फडाफड उडवीत गेले. त्या वेळेस ते प्रजेस ज्या हितकारक व सौख्यकारक गोष्टी त्याजमध्ये सुधारणा न करता तिचा कसा छळ करावा त्याजमध्ये मोठे प्रवीण होते.

## दुष्टपणाचा कहर झाला होता

" इतिहासावरून पाहिले असता असे समजते की, कित्येकांनी एखाद्या मिथ्या व क्षुल्लक कारणाकरिता प्रजेपैकी शेकडो मनुष्यांस त्रस्त करून शेवटी त्यास मोठे दुष्ट रीतीने जिवानिशी मारावे, कित्येकांनी आपल्या दुष्ट वासना तृप्त करण्याकरिता कुलीन, पतिव्रता आणि सुंदर अशा दुसऱ्यांच्या स्त्रियांचा जुलमाने अभिलाष धरावा आणि लहानसहान अपराधाकरिता मनुष्याचे हालहाल करून त्यास देहान्त शिक्षा द्यावी. या वेळेस मनुष्यास शिक्षा देण्याचाही मार्ग मोठा भयंकर व विलक्षण होता. त्याजविषयी केवळ ऐकिले असता हल्लीच्या कालातला कसाही मनुष्य असला तथापि त्याचे अंतःकरण कळवळून येऊन भयाने सर्वांगास कंप आल्याशिवाय राहाणार नाही. पहा, सुळावर देणे हे किती घोर कृत्य आहे ! त्याचे सुईसारखे अणकुचीदार अग्रावर मनुष्यास बसवून ते अग्र त्या मनुष्याचे मस्तक फोडून बाहेर निघेपर्यंत त्यास खाली ओढणे म्हणजे निर्दयतेची पराकाष्ठा झाली. तसेच मनुष्याचे अंग चाबुकाने अथवा झाडाच्या फोकाने फोडून, सर्वांगातून रक्त वाहावे तोपर्यंत मारून त्यावर मिठाचे अथवा चिंचेचे पाणी वरून शिंपडावे आणि त्यापासून त्यास अत्यंत व्यथा प्राप्त होऊन तो तडफडून तडफडून कसा तळमळत आहे हे पाहावे अथवा त्याची मोट बांधून कडेलोट करणे अथवा हत्तीस मस्त करून त्याचे पायास मनुष्यास बांधून त्या हत्तीस खडकाळ रस्त्यावरून फिरविणे ( प्रख्यात व पराक्रमी विठोजीराव होळकरसारख्या वीराची निमकहराम पेशव्यांनी कशी दुर्दशा केली याची आठवण करा. ) अथवा मनुष्याचे तोंडात तेल, शेंदूर अथवा शिसे पागळवून ओतणे वगैरे शिक्षा केवळ द्वेषामुळे अथवा यत्किंचित् अपराधामुळे प्रजेस सोसाव्या लागत.

## प्रजेच्या अकल्याणात राज्यकर्ते संतोष मानीत

" थोडकेच दिवसांमागे म्हणजे आर्य पेशवे यांचे शेवटील कुलदीपक पुरुष रावबाजीचे कारकिर्दीचा अस्त होईतोपर्यंत शेतकरी लोक शेतसारा देण्यास थोडेसे चुकले तर त्यास उन्हामध्ये ओणवे करून पाठीवर एक मोठा दगड द्यावा अथवा त्या शेतकऱ्याच्या बायकोस त्याच्या पाठीवर बसवावे आणि खाली त्यास मिरच्यांचा धूर द्यावा. तात्पर्य, त्यावेळेस प्रजेस दुःख देण्याच्या कामात जी काही सुधारणूक झाली होती ती अन्य देशांतील प्रजेच्या दुःखाशी तुलना करून पाहिली असता हटकून पहिले बक्षीस हिजला मिळायचेच. व यांचे जातीचे लोक प्रजेस कोणते रीतीने छळावे, तिजला कोणते रीतीने अधिक दुःख प्राप्त होईल, कोणता उपाय योजला असता तिचे अकल्याण होईल वगैरे शास्त्रांचा रात्रंदिवस एकभावाने, एकनिश्चयाने जसे काही अभ्यासच करीत होते की काय, असे वाटते. प्रजेस दुःख देणे म्हणजे तिला मारणे, तोडणे, लुटणे किंवा त्रस्त करणे असा अर्थ समजत असत. प्रजेच्या अकल्याणात त्यास मोठा संतोष वाटावा. ते प्रजा याचा अर्थ काडी, कस्पट, ढेकूण अथवा काही एक प्रकारची जनावरे समजत. त्यांचा उपयोग म्हटला म्हणजे त्यांनी राजे व त्यांचे जातीचे लोकांकरिता, त्यांचे स्त्रियांकरिता व मुलाबाळांकरिता धान्य उत्पन्न करावे व वस्त्रे विणावी. त्यांच्याकरिता उन्हातान्हात खपावे आणि त्यास ज्या ऐषारामाच्या गोष्टी लागतात त्या सर्व पुरवाव्यात, ह्या शिवाय काही नाही. असो. अशा प्रकारे मदांध होऊन प्रजेशी क्रूर रीतीने वागणारे जे राजे लोक व त्यांचे जातीचे लोक यांची सत्ता सर्व शक्तिमान जो परमेश्वर याने हरण करून त्यास त्यांचे अपराधानुरूप शासन दिले. आणि कनवाळू होऊन आपले दुःखांनी पीडित अशा शूद्रादि अतिशूद्र प्रजेस परमन्यायी, हितावह, सौख्यकारक, सदाचारी आणि शांत असे राज्य इंग्रज सरकारच्या अंमलाखाली प्राप्त करून दिले.

" सबब ती त्या प्रभूची फार फार ऋणी आहे व त्यास रात्रंदिवस अशी प्रार्थना करीत आहे की, ' हे प्रभो अम्हास हे राज्य चिरकाल असू दे. ' कारण हे राज्य झाल्यामुळे प्रजेस पूर्वीच्या राज्यात

[ भटशाहीमध्ये ] जे काही द्वेषामुळे, धर्मसंबंधाने, नीतीसंबंधाने, राज्यसंबंधाने आणि दुसऱ्या अनेक गोष्टीच्या संबंधाने जुल्म होत असत त्या सर्वांतून ती एकदाची सुटली. हल्ली कोणत्याही प्रकारे दुसऱ्याचे अनहित न होता ज्या हितावह गोष्टी आहेत त्या तिचे मनोदयानुरूप करण्यास तिजला उत्तेजन प्राप्त झाले आहे. पूर्वी प्रजेने मिळविलेली मालमत्ता केवळ लुटारू लोकांपासून असुरक्षित होती, एवढेच नव्हे परंतु तिजला मोठमोठ्या अधिकारी व राजेलोकांच्या पेंढारी लोकांपासूनही अक्षय भीती असे. आणि अर्थात् लोकांस स्वकष्टार्जित पैशाचा उपभोग घेण्यास किंवा त्याचा संचय करून ठेवण्यास अनेक अडचणी असल्यामुळे दिवसानुदिवस त्यांची उमेद खचत जाऊन ते आळशी, निरोद्योगी, दारिद्र्याने त्रस्त होत चालले होते. तसेच हल्ली स्वमेहनतीने संपादन केलेल्या पैशास अगदी धोका नाही म्हणून लोकांस आपले पैशाचा यथेच्छ रीतीने उपभोग घेता येतो, त्याचा संचय करता येतो, त्याची मनास वाटेल त्याप्रमाणे व्यवस्था करता येते.

## ईश्वरकृपेने यातून सुटका व्हावी

" सारांश, त्याजवर त्यांची सर्वस्वी मालकी असते. या कारणामुळे त्यांनी आपला सर्व आळस टाकून पैसा मिळविण्याकरिता अनेक खटपटी करण्याचे चालविले आहे. जिकडे पहावे तिकडे सरकारने प्रजेच्या कल्याणाकरिता अनंत खटपटी करून अनेक सुधारणा केल्या आहेत. आणि दररोज तिचे सुखा-करिता नानाप्रकारच्या गोष्टींची योजना चालविली आहे. पूर्वी प्रवास करणे म्हणजे लोकांस मोठे संकट वाटत असे. कारण त्या वेळेस प्रवासाचे कामात अनेक अडचणी असत. हल्ली सरकारने सडका वगैरे नीट बांधून, नीट बंदोबस्त केल्यामुळे त्या दूर झाल्या. आणि लोकांस प्रवास करण्याविषयी आनंद वाटू लागला. त्याचप्रमाणे सरकारने प्रजेचे कल्याणाकरिता पूल बांधले. मोठमोठाली विद्यालये स्थापन केली, दवाखाने बांधिले. सर्व जातींचे गरीबगुरीब लोकांसाठी धर्मशाळा बांधिल्या-वगैरे शेकडो कृत्ये केली; परंतु त्या सर्वांमध्ये हल्ली जे काही कृत्य प्रजेकरिता सरकारने हातात घेतले आहे ते फारच उत्तम असून मोठे स्तुत्य व सरकारास चिरकाळ भूषणास्पद आहे. त्या कृत्याचे महत्त्व फार काय विशेष सांगावे, परंतु ते कृत्य सरकारने आरंभिल्यामुळे

आज फार दिवसांपासून दारिद्याने गांजलेल्या प्रजेला ऊर्जित काळच प्राप्त झाला आहे, ते कोणते म्हणाल तर जागोजाग डोंगराच्या आसपास खिंडी बुजवून मोठमोठाले विस्तीर्ण पाण्याचे तलाव केले आहेत. त्या स्थळांपासून अनेक सुंदर कनाल काढून सरकार जागोजागी त्याचे पाणी सर्व आसपासचे गरीबगुरीब शेतकरी लोकांस अक्षय शेतकीचे काम चालावे व ज्या ठिकाणी मनुष्यास पाणी पिण्यास देखील मिळण्याची पंचाईत ती दूर व्हावी अशा कृत्याची फार दिवसापासून गरज होती, ती ईश्वरकृपेने लवकरच वहून आली." [१००]

## चार शहरांची वेगवान वाढ

इंग्रजी राजवटीमुळे हा जो हवापालट झाला होता त्याचे दृश्यरूप लोकांना मुंबई, कलकत्ता, मद्रास, अहमदाबाद, कानपूर आणि नागपूर या शहरांच्या वेगाने होणाऱ्या वाढीत दृष्टोत्पत्तीस येत होते. १८५० ते १८८० या तीस वर्षांच्या कालात कापड उद्योगात ४७,८५५ आणि ज्यूट उद्योगात ४९,२२२ असे कामगार कामास लागले होते. १९०० च्या सुमारास देशातील कारखान्यांची संख्या १२०७ आणि कामगारांची संख्या ४, ६८, ९५६ एवढी होती. १८९२ साली ही संख्या अवघी अनुक्रमे ६५३ आणि ३,१६,७१५ एवढी होती. दहादहा वर्षांनी औद्योगीकरणाचा वेग वाढतच होता. मुंबई शहराची लोकसंख्या १८७१ साली ६,४४,४०५ होती. ती १९०१ साली ७,७६.००६ झाली. कलकत्त्याची ६,२३,००९ होती ती ८,४७,७९६ झाली. अहमदाबादची १,२८,५०५ होती ती १,९९,६०९ झाली. मद्रासची ३,९७,५५२ होती ती ५,०९,३४६ झाली. अर्थात् या सर्व शहरांमध्ये रोजगाराचे दर कमीच होते. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत काम करावे लागे. कारखान्यात नको त्या स्थितीत काम करावे लागे. निवासाची व्यवस्था रोगराईला निमंत्रण देणारी होती. आणि साथीचे रोग आल्यामुळे हजारो कामगार मृत्युमुखी पडत होते. विशेषतः १८८७ साली प्लेगची साथ आली; त्यामुळे हजारो कामगार मृत्युमुखी पडून काही काळ कामगारांचीच टंचाई निर्माण झाली होती. कामगार आपल्या उत्पन्नात वाढ व्हावी म्हणून मागण्या करू लागलेच होते. भारतातील रोजगारवाढीसाठी

केलेला पहिला संप नागपूर येथील एम्प्रेस मिलमध्ये झाला. अशा रीतीने ब्रिटिश राजवटीने आणलेल्या हवापालटाची नवनवीन रूपे लोकजीवनात उलगडू लागली होती. समाजातील शूद्रादि अतिशूद्र लोकांना आगीतून निघून फोफाटयात पडल्यासारखेच वातावरण हळूहळू निर्माण होऊ लागले होते. परंतु त्याचे उग्र रूप प्रत्यक्षात दिसावयास आणखी ५० वर्षांचा काळ लोटावा लागणार होता.

अशा रीतीने १७६० ते १८६० या शंभर वर्षांचा आढावा घेताना आपल्या नजरेसमोर तीन कालप्रवाह स्पष्टपणे उभे राहतात. हे तिन्ही प्रवाह परस्परांच्या अंगाला भिडून चाललेले दिसतात. पहिला प्रवाह मराठशाहीच्या आणि मोगलाईच्या ऱ्हासाचा; दुसरा प्रवाह ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापार-वृद्धीचा आणि राज्यप्राप्तीचा आणि तिसरा प्रवाह जागतिक बाजारपेठेचा. काही काळ म्हणजे १८०० सालापर्यंत असे दिसेल की उत्तरेत दिल्लीचा बादशहा, दक्षिणेत पेशवा आणि पूर्वेला ईस्ट इंडिया कंपनीचे सरकार अशी तीन सत्ताकेन्द्रे स्थिरावत आहेत. पण नंतरच्या घटनांनी हा भास केवळ आभास होता, असे सिद्ध केले. १७९५ ते १८३५ या कालखंडात पेशवाईचा आणि मोगलाईचा पूर्ण ऱ्हास होऊन कंपनीचे सरकार हे भारतातील क्षेत्र-फळाच्या, महसुलाच्या आणि लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ सरकार ठरले. कंपनीच्या पगारदार नोकरांनी आपल्या शहाणपणाने, शौर्याने आणि शहामतीने अवघ्या ४० वर्षांत हिन्दुस्थानची संपूर्ण किनारपट्टी आपल्या अंमलाखाली आणली. त्या द्वारे आफ्रिकेच्या किनाऱ्यापासून ऑस्ट्रेलियाच्या किनाऱ्यापर्यंत संपूर्ण हिंदी महासागरावर ब्रिटिश आरमाराचे प्रभुत्व प्रस्थापित झाले. सागरी बाजूने अशी पूर्ण सुरक्षितता लाभल्यामुळे कंपनी सरकारचे सर्व लक्ष अफगाणिस्थानपासून ब्रह्मदेशापर्यंत संपूर्ण उत्तरसीमा निर्धोक करण्यावर केन्द्रित झाले. या ठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की, १७६१ च्या जानेवारी महिन्यातील पानिपत येथील मराठ्यांचा पराभव हा केवळ मराठ्यांचा पराभव नव्हता. तो संपूर्ण भारतीय समाजाचा पराभव होता. आजवर केवळ जो मराठयांचा पराभव होय या दृष्टीने त्या प्रसंगाकडे पाहिल्यामुळे १९ च्या शतकातील राजनीतीचे आणि लोकव्यवहाराचे यथार्थ दर्शन इतिहास-

कारांनाही होऊ शकलेले नाही. अफगाणिस्थानचा सुलतान अहमदशहा अब्दाली हा १७५२ पासून हिंदुस्थानवर हल्ले करू लागला. आणि त्याने १७५५ मध्ये दिल्लीच्या तख्तावर आपल्याला पाहिजे तो बादशहा बसवून त्याचा सर्व कारभार आपला प्रतिनिधी नजीबउद्दौला याचे हाती दिला. अब्दालीने केलेली ही ढवळाढवळ दिल्लीतील परंपरानिष्ठ राज्यकर्त्यावर्गाला खुपली आणि म्हणून मराठ्यांना बादशाहीचे रक्षण करण्यासाठी म्हणजेच आधुनिक अर्थाने हिंदुस्थानचे स्वातंत्र्यरक्षण करण्यासाठी पाचारण करण्यात आले. सदाशिवरावभाऊ होती नव्हती तेवढी सर्व मराठ्यांची फौज एकत्रित करून अब्दालीशी लढायला उभा राहिला. एक वर्षभर अब्दालीची सेना आणि मराठ्यांची सेना दिल्लीच्या परिसरात ठाण मांडून होत्या. त्या सुमारे दोनएक लाख सैनिकांच्या पालनपोषणात दोन्ही बाजूंचा सर्व खजिना फस्त झाला. सैन्याला खायला मिळेना म्हणून सदाशिवरावभाऊंचा पराभव झाला आणि अब्दालीचा जय होऊनही आपल्या सैन्याला तनखा देता येईना म्हणून त्यास दिल्लीकडे पाठ फिरवून काबुलास पळून जावे लागले. म्हणजे पानिपतच्या लढाईने जसे मराठ्यांचे कंबरडे मोडले तसेच अब्दालीचेही मोडले. यानंतर कोणीही अफगाण सुलतान दिल्लीच्या तख्ताचा हव्यास बाळगू शकला नाही. खरे म्हणजे, १७४० साली नादिरशहाने मयूरसिंहासन आपल्याबरोबर इराणात नेऊन दिल्लीच्या तख्ताची इभ्रत यमुनेच्या पाण्यात बुडवलीच होती, तेव्हापासूनच भारताचे सत्ताकेन्द्र दक्षिणेत पुण्याकडे सरकले. पण तेही दुबळे होते. आपण या दृष्टीने जर पाहिले तर १७६० सालापासूनच पूर्वेला कलकत्त्यात कंपनीचे सरकार हळूहळू बाळसे धरू लागले होते; आणि १८०० सालापर्यंत या सरकारला भारताच्या पश्चिम-पूर्व किनाऱ्यावर आणि दक्षिण-उत्तर भूभागावर राज्यकर्ता या नात्याने लोकमान्यता प्राप्त झालेली होती.

## कंपनीचे सरकार अखेर बुडालेच!

याच सुमारास इंग्लंडात कंपनीचे सरकार भारतात काय करीत आहे, याविषयी तत्कालीन राजकारणी लोकांमध्ये कुतूहलाची आणि मत्सराची संयुक्त अशी लाटच उफाळली होती. कंपनीच्या सरकारने व्यापार तेवढा करावा, राज्य वाढवू नये, अशी पहिली प्रतिक्रिया झाली. नंतर व्यापाराची

मक्तेदारी कंपनीकडून काढून घेतली पाहिजे आणि कंपनीने फक्त राज्य-कारभार सांभाळावा अशी समजूत करून घेण्यात आली आणि अखेरीस कंपनीकडे व्यापारही नको आणि राज्यकारभारही नको अशी भूमिका प्रबळ झाली. १७६३ साली पॅरिस येथे फ्रान्स आणि इंग्लंड यांचा तह होत असताना भारतातील प्रदेशासंबंधी सर्व वाटाघाटी कंपनीनेच केल्या आणि युरोपातील तडजोडीपोटी मद्रास शहराची मालकी कंपनीने मिळवली. त्याच दिवशी कंपनीचे स्वतंत्र सरकार येथे निर्माण झाले, त्या दिवसापासून केवळ आपले राज्य वाढविण्याचे नव्हे, तर ते वाचविण्याचे म्हणजे आपल्या ताब्यातील भूमीचे रक्षण करण्याचे धोरण कंपनीच्या सेवकांनी स्वीकारले होते. इंग्लंड-मधील राजकारणी लोकांची धारणा अशी होती की, युरोपात जर फ्रेंचांशी लढाई सुरू झाली तर कंपनीने ते लढाईचे लोण भारतात नेले पाहिजे. पण भारतात आपल्या प्रदेशाच्या रक्षणासाठी मराठ्यांशी, टिपूशी किंवा अयोध्येच्या नबाबाशी कंपनीने लढाई पुकारली तर ब्रिटिश सरकार कंपनीची बाजू इंग्लंडात घ्यायला काही बांधलेले नाही. पण कंपनीच्या सेवकांची आणि सेनानींची शर्थ ही की आपल्या मायदेशातील सरकारचा पाठिंबा नसताना आणि बहुतेक वेळा तीव्र विरोध असताना त्यांनी आपल्या ताब्यातील भरतभूमीचे रक्षण करण्याची जबाबदारी कधीही टाळली नाही, त्यामुळेच वॉरन हेस्टिंग्जपासून डलहौसीपर्यंत सर्व गव्हर्नर जनरलांनी पानिपतच्या पराभवाचा अर्थ हा मराठ्यांचा पराभव असा न लावता, हिन्दुस्थानचा पराभव असाच लावला होता. म्हणून ज्यावेळी म्हणजे १८३९ साली संपूर्ण हिन्दु-स्थानातील प्रजेचे आणि भूमीचे बाह्य संबंध निर्धारित करण्याचे कार्य, तैनाती फौजेच्या माध्यमातून, कंपनी सरकारकडे आले. त्यावेळी पानिपतच्या पराभवाचा वचपा काढण्याची भूमिका सहजगतीने कंपनीसरकारने घेतली. कंपनीसरकार हेच मराठ्यांच्या सत्तेचे म्हणजेच हिंदुस्थानातील केन्द्रवर्ती सत्तेचे वारसदार आहे, ही भूमिका अफगाणिस्थानवर स्वारी करूनच जगाला सांगता येण्याजोगी होती, पण कंपनीने भारतभूमीचे रक्षण करण्याचे हे इतिहासदत्त कार्य शिरावर घेताच इंग्लंडात राजकारणी लोकांनी कंपनीच्या परराष्ट्रनीतीविषयी गदारोळ उठविला. त्या गदारोळातच कंपनीचे सरकार अखेर बुडाले आणि राणीचे सरकार अवतीर्ण झाले.

## डलहौसीने मराठ्यांच्या पराभवाचा वचपा काढला!

कंपनी सरकारचा उदय आणि अस्त या शंभर वर्षांत होऊन गेला. या काळात कंपनीने प्रथम जमिनीची मालकी स्थानिक राजघराण्यांच्या घशातून काढून सामान्य माणसांच्या हाती टाकली; संपूर्ण देशाची एकच एक अशी महसूलयंत्रणा निर्माण करून तिच्या आधारे एकच एक शासनव्यवस्था मार्गी लावली, भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच संपूर्ण देशाचे एकच असे लष्कर उभे केले; आणि देशातील गुन्हेगारीचा बंदोबस्त करण्याचे कार्य लष्कराकडून काढून घेऊन ते स्वतंत्रपणे पोलीस दलाकडे दिले. ही भारताला कॉर्नवालिसची देणगी होय. वेलस्ली आणि बेंटिंक यांनी या व्यवस्थेत पुढे आपल्या परीने भर घातली; पण मूळ व्यवस्था कॉर्नवालिस याने जशी लावून दिली तशीच आजतागायत चालू आहे. ही व्यवस्था भारतीयांनी आपली म्हणून स्वीकारली. कारण ती व्यवस्था भारतीयांचे हितसंबंध जपणारी आहे अशी आपली समजूत पटली होती. पण कंपनी सरकारने जी परराष्ट्रनीती अवलंबिली ती काही भारतीयांना कधीही आपली अशी वाटली नाही. वास्तविक कंपनीचे सरकार हे सार्वदेशिक सरकार या नात्याने या भूमीच्याच रक्षणासाठी ब्रह्मदेशात आणि अफगाणिस्थानात लढाया करीत होते. आणि रशिया आणि चीन या दोन्ही देशांचे हात भारताच्या सरहद्दीपर्यंत पोचू नयेत म्हणून तिबेटची पाठराखण करीत होते. परंतु भारतीयांना मात्र यात कंपनीचा विस्तारवाद दिसला. वास्तविक पाहता कंपनीच्या भारतातील राजकीय जबाबदाऱ्या नाकारण्याचे इंग्लंडातील ब्रिटिश राजकीय पक्षांचे जे अवसानघातकी धोरण होते, ते आपमतलबीपणाचे आहे हे आम्हांस कधीच समजले नाही आणि कंपनीचा विस्तारवाद हा जणू काही अंतराळातला हावभाव होता असे समजून आम्ही त्याकडे पाहिले. भारतीयांचे जागतिक राजकारणात हितरक्षण करण्यासाठी अफगाणिस्थान, तिबेट आणि ब्रह्मदेश यात कंपनी दखल घेते आहे आणि कंपनीने तसे करणे हेच भारतातील केन्द्रवर्ती सत्ता या नात्याने तिचे आद्य कर्तव्य होय हे आम्हांस समजलेच नाही—पण आम्हांस जे उमजत नव्हते ते वेलस्ली आणि डलहौसी यांच्यासारख्या राज्यकर्त्यांनी जाणून घेऊन कुणाचीही पर्वा

न करता त्यावर अंमल केला. वेलस्लीने १९ व्या शतकाच्या पहिल्याच दशकात एलफिन्स्टनसारख्या आपल्या एका बुद्धिमान सहायकाला मुद्दाम काबूलमध्ये पाठवले आणि डलहौसीने संपूर्ण ब्रिटिश मंत्रिमंडळाचा विरोध पत्करून १८४८ साली अफगाणीस्थानला कंपनी सरकारच्या प्रभावाखाली आणले. अंतर्गत व्यवस्थेत कॉर्नवालिस आणि जागतिक राजकारणात डलहौसी याने अखिल भरतवर्षाच्या ऐक्याची आणि स्थैर्याची भूमिका अकबर अथवा औरंजेब यांनी घ्यावी तशी घेतली. सारांश हा की, पानिपतच्या पराभवाचा वचपा डलहौसीने नव्वद वर्षांनी घेतला.[१०१] आणि भारतात पुनः एकदा केन्द्रवर्ती सत्ता प्रस्थापित झाल्याचे घोषित केले.

## जागतिक बाजारपेठेत नवे स्थान

या शंभर वर्षांतील तिसरा प्रवाह म्हणजे जागतिक बाजारपेठेचा. भारत पूर्वी जागतिक बाजारपेठेचा भाग नव्हता असे नव्हे. किंबहुना बाजारपेठ ही सदैव जागतिकच राहिलेली आहे. फरक इतकाच की, १८ व्या शतकापर्यंत भारत हाच जागतिक बाजारपेठेचा नियंता होता. हे नियंतेपण १८ व्या शतकाच्या मध्यातच इतिहासजमा झाले होते. कारण युरोपात औद्योगिक क्रांती आली आणि जगात जलमार्गांची चलती झाली. पानिपतच्या लढाईच्या वेळी दोन लाख सैन्याला पोसण्याइतकीसुद्धा संपत्ती यमुनेच्या परिसरात उरली नव्हती. हा जागतिक बाजारपेठेत भारताचा ऱ्हास सुरू झाल्याचाच पुरावा होता. बंगालमधून दिल्लीकडे येणारा पैशाचा ओघ १७०७ सालापासूनच आटला होता. आणि दख्खनचा पैसा नर्मदेअलिकडे येण्याचा रस्ता बहामनी राजवटीपासूनच रोखला गेला होता. अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीचे साम्राज्य बुडविले खरे; पण येथून थोडेफार जडजवाहीर आणि गोपाल नायकासारखा संगीतज्ञ एवढेच त्याने दिल्लीला नेले. अल्लाउद्दीन खिलजीबरोबर अमीर खुसरो हाही देवगिरीस आला होता. हा अमीर खुसरो संगीताचा जाणता आणि शास्त्रांचा व्यासंगी होता. याने गोपाल नायकाची संगीतातील अलौकिक साधना लक्षात घेऊन त्यास आग्रहाने आपल्याबरोबर दिल्लीस नेले. तेथे अमीर खुसरो आणि गोपाल नायक यांनी इराणी आणि वैदिक संगीताचा समन्वय करून आधुनिक भारतीय शास्त्रोक्त संगीताची

निर्मिती केली. यास 'चतुर्दंडी' म्हणतात. यापूर्वी वेदकालापासून 'ग्राम-मूर्च्छना' पद्धती चालत आली होती. गोपाल नायकाने आभारतीय अशी मुकामपद्धती स्वीकारून रागांचे वर्गीकरण केले. आणि तेव्हापासून इराणी बारा स्वरांच्या आधारावर रागांचे वर्गीकरण प्रचलित झाले. हा गोपाल नायक ज्ञानेश्वराचा समकालीन मराठी माणूस होता. दक्षिणेतून उत्तरेत नेण्यात आलेली सर्वांत मोठी लूट अल्लाउद्दीनाची आणि अल्लाउद्दीनाची सर्वांत मोठी लूट म्हणजे गोपाल नायक![१०३] या गोपाल नायकाने संपूर्ण संगीताचीच क्रान्ती केली. सांगावयाचा मुद्दा हा की, दक्षिणेकडून दिल्लीकडे संपत्तीचा ओघ कधीच मोठ्या प्रमाणावर होत नव्हता; १८ व्या शतकाच्या मध्यापर्यंत जागतिक बाजारपेठेत भारताचा ऱ्हास होऊन गेलेला होता. कंपनीची भारतातील व्यापारी मक्तेदारी ब्रिटिश कायद्याने संरक्षित नसती तर भारताचा जागतिक बाजारपेठेतील ऱ्हास अधिक वेगाने झाला असता; पण कंपनीच्या योगाने तो थांबला. आणि नंतर हळूहळू येथील पूर्वापार उद्योगधंद्याला गळती लागल्यानंतर क्रमाक्रमाने नवे उद्योगधंदे सुरू करण्यास कंपनीने प्रोत्साहन दिल्यामुळे जागतिक बाजारपेठेतील आपली घसरण कशी थांबली आणि चढण कशी सुरू झाली हे लक्षात येण्यापूर्वीच भारतीय बाजारपेठेने जागतिक क्षेत्रात आपले स्थान नव्याने निर्माण केले.

## ब्रिटिश पार्लमेंटचा दुखरा अहंकार

कंपनीचे सरकार जाऊन राणीचे सरकार येण्यापूर्वी अशा रीतीने कंपनीने जागतिक राजनीतीत आणि जागतिक बाजारपेठेत भारतीयांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याची आपली कुवत आणि हिम्मत सिद्ध केली होती. आणि त्यामुळे कंपनीचे सरकार हे वस्तुतः संपूर्ण हिन्दुस्थानचे स्वायत्त आणि स्वतंत्र सरकार म्हणून आपल्या पायावर उभे झाले होते. ब्रिटिश पार्लमेंटने या सरकारचा ताबा रक्ताचा एकही थेंब न सांडता स्वतःकडे घेतला. जर लॉर्ड मेकॉले आणि लॉर्ड बेंटिंक या जोडगोळीने हिंदुस्थानातील सार्वजनिक व्यवस्थेच्या पायाखालचा धर्मविवेकाचा आधार उध्वस्त केला नसता तर हे कंपनीचे सरकार ब्रिटिश पार्लमेंटला आपल्या घशात घालता आले नसते. १७७६ साली अमेरिकन वसाहतींनी ब्रिटिश पार्लमेंटच्या दाबातून आणि

जाचातून आपली सुटका करून घेतली होती आणि आपले स्वतंत्र सरकार स्थापन केले होते. इकडे कंपनीने आपले स्वतःचे सरकार, पार्लमेंटच्या विरोधाला आडवळणांनी वळसे घालीत आणि भारतीय लोकांचा विश्वास हळूहळू संपादन करीत करीत स्थापन केले होते. ते ब्रिटिश पार्लमेंटने गिळून टाकले. अमेरिकन वसाहतींच्या स्वातंत्र्यामुळे ब्रिटिश पार्लमेंटच्या अहंकाराला जो तडा गेला होता तो कंपनीसरकारच्या कब्जामुळे भरून निघाला.

## पहिला लोकनिष्ठ लोकोत्तर पुरुष

हा सर्व प्रकार महात्मा जोतीबा फुले याना आपल्या कार्यास आरंभ करण्यापूर्वीच घडून गेला होता. त्यामुळे त्यांच्या कार्यालाही विशिष्ट आणि विवक्षित दिशा मिळाली. विशेषतः संपूर्ण मराठा समाजाचे क्रमाक्रमाने होत गेलेले निःशस्त्रीकरण त्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिले होते आणि १८५७ च्या बंडातील सशस्त्र उठावाच्या मर्यादा त्यांना दिसल्या होत्या. पुढे लहूजी मांगाच्या तालमीत वासुदेव बळवंताचा परिचय झाल्यानंतरही ते सावकारांविरुद्धच्या दरवड्यांमध्ये सामील झाले नव्हते. ब्रिटिश राजवटीविरुद्ध उठाव करावयाचा नाही अशी त्यांची मनोधारणा आधीच होऊन गेलेली होती. परंतु ब्राह्मण्याविरुद्ध जो उठाव करावयाचा तोही सशस्त्र करावयाचा नाही, अशी त्यांनी खूणगाठ कां बांधली? ब्रिटिश राजवटीच्या काळात बहुजनांच्या वतीने ज्ञानाचेच शस्त्र त्यांनी कां परजले? याचे कारण हे की, पाश्चात्य विद्या आणि तंत्रविज्ञान ह्यांच्या माऱ्यामुळे गलितगात्र झालेल्या ब्राह्मण्याचा आणि त्या ब्राह्मण्याला संरक्षण देणाऱ्या परंपरागत राज्यसंस्थेचा मेकॉलेप्रणीत शिक्षणव्यवस्थेने त्रिफळाच उडविला आहे, हे त्यांच्या पूर्णपणे ध्यानात येऊन चुकले होते. म्हणूनच त्यांनी हंटरकमिशनपुढे साक्ष देताना प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व शिक्षणाची द्वारे सर्व जाती-जमातींसाठी सरकारने एकदम खुली करावी; भारतातील प्रत्येक स्त्रीपुरुष साक्षर आणि शिक्षित झाला पाहिजे; तसे झाले म्हणजे आपले बरेवाईट समजावून घेण्याची त्याची क्षमता वाढेल आणि तसा तो प्रौढ झाला म्हणजे त्याच्यावरील अन्यायाचे सर्व बोजे तोच एका दमात फेकून देईल, अशी त्यांची खात्री होती. अशी खात्री असणारा भरतवर्षातील १९ व्या शतकातील पहिला पुरुष जोतीबा हेच होत.

### या लोकनिष्ठेचे जिवंत आणि जागते रूप

ब्रिटिश राजवटीने सत्तेच्या व्यवहाराचे संधान आणि अनुसंधान पार बदलून टाकले आहे, हे जोतीबांच्या सर्वांत आधी ध्यानात आले. आणि त्यामुळेच त्यांनी लोकांची मने वळवून त्यांना कार्यप्रवृत्त करण्याची भूमिका ज्ञानेश्वर आणि तुकोबा यांच्याइतक्याच लोकनिष्ठेने घेतली. ज्ञानेश्वरांना लोकनिष्ठ म्हणण्याचे कारण हे की, त्यांच्यापूर्वी सतत तीनचार शतके मराठी लोकजीवनात ब्राह्मणधर्माच्या प्रसाराची लाट आली होती. बौद्ध मताला अद्वैत तत्त्वज्ञानात सामावून घेण्याचा आद्य शंकराचार्यांचा प्रयत्न यशस्वी झाल्यानंतर महाराष्ट्रात म्हणजे आपण ज्यास कोंकण आणि पश्चिम महाराष्ट्र म्हणतो त्या भागात जैन आणि ब्राह्मण यांच्यात वैचारिक आणि सामाजिक संघर्षाला तोंड फुटले. या संघर्षास खरे म्हणजे पूर्व महाराष्ट्रात (म्हणजे बस्तरपासून नांदेडपर्यंत) त्या आधीच तोंड फुटले होते. या संघर्षाचे स्वरूप दोन प्रकारचे होते. पहिला प्रकार म्हणजे जैनांच्या पाखंडी तत्त्वज्ञानावर मात करण्याचा. आणि दुसरा प्रकार म्हणजे जैन असलेल्यांना पुन: ब्राह्मणी धर्मात घेण्याचा. विवेकसिंधूची रचना करणाऱ्या मुकुंदराजाचे चरित्र या जैन-ब्राह्मण संघर्षातूनच घडले. जैनपाळ राजाची गोष्ट प्रसिद्धच आहे. तात्त्विक वादात ब्राह्मण पंडितांची आणि जैन मुनींची जो चर्चा होई त्यात शंकराचार्यांच्या सिद्धान्तांचा जय वा पराजय जसा व्हावयाचा तसा होई; त्याचा लोकमानसावर किंवा राजाश्रयावर काहीच परिणाम होत नसे. कारण लोक आणि राजे हे दोन्ही बाजूंच्या पंडितांचा सारखाच आदर करीत. पण शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाचा असा केवळ वरवर व्यवहार होणे योग्य नव्हे; ते तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोचले पाहिजे आणि लोकांनी जोपर्यंत त्याचा स्वीकार केला नाही तोपर्यंत आपले कार्य अपुरेच राहील असे ज्यांना वाटे, ते लोकांत मिसळून आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रचार लोकभाषेत करीत. या प्रयत्नाला प्रतिष्ठित ब्राह्मणी पंडितांचा तीव्र विरोध होता. कारण वेदांचे ज्ञान हे सार्वत्रिक करावयाचे नाही असा त्यांचा सनातन दंडक होता. वेद लोकभाषेत आले की त्यांचे पावित्र्य भंगले अशी त्यांची धारणा होती. या तत्कालीन ब्राह्मण्याविरुद्ध प्रथम मुकुंदराजाने आणि नंतर ज्ञानेश्वराने बंड पुकारले. आणि 'माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिके' अशी प्रतिज्ञा करून सर्व वैदिक ज्ञान त्यांनी

लोकभाषेत आणले. म्हणून मुकुंदराज व ज्ञानेश्वर यांना लोकनिष्ठ म्हणावयाचे. तुकोबांची लोकनिष्ठा ही तर सदैवच संशयातीत आणि वादातीत राहिलेली आहे. जेव्हा भारतातील पूर्वापार चालत आलेली राज्ययंत्रणा आणि समाज-व्यवस्था मोडून, तोडून, भंगून पडली तेव्हा नवसमाजरचनेसाठी आवश्यक असलेली विचारधारा, विवेकबुद्धी आणि व्यवहार-संहिता, कशी आणि कोणती असावी; याविषयी लोकांची खात्री आपल्या आचार-विचारांद्वारे पटविण्याचा प्रचण्ड उद्योग महात्मा फुले यांनी ज्ञानबा, तुकोबांच्या लोक-निष्ठेनेच हाती घेतला. सत्यशोधक समाजाची स्थापना हे या लोकनिष्ठेचेच जिवंत आणि जागते रूप होते. [१०३]

## लोकांच्या मनाचा तवा तापलेला होता

ज्या काळात महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली त्या काळात असे अनेक समाज स्थापन झाले होते. ब्राह्म-समाज, प्रार्थना-समाज, परमहंस-सभा अशा अनेक समाजांची स्थापना झालेली होती. एकूणच सुशिक्षित समाजात धर्मसुधारणेचे वारे वाहू लागले होते. पैकी आर्य समाज सोडला तर अन्य समाज वेदांचे प्रामाण्य नाकारीत होते. पण त्यापैकी सत्यशोधक समाज सोडला तर कोणीही स्थानिक लोकजीवनाची स्वायत्तता प्रमाण मानून त्या समाजाच्या देवदेवतांचा प्रथा-परंपरांचा, किंवा सणावारांचा आत्मीयतेने विचार करीत नव्हता-सत्यशोधक समाजाचे वैशिष्ट्य हे की. त्याने आपले सगळेच्या सगळे अस्तित्व मराठी लोकांच्या पायांशी जखडून टाकले. पण हेही तितकेच खरे की, जोतीबांना जेजुरीच्या खंडोबा-प्रमाणे चौऱ्यागडचा महादेव काही आठवला नाही. त्यांचा महाराष्ट्र पेशवाईच्या सीमांनीच मर्यादित झाला होता. त्यावेळी जोतीबांचीच काय. पण त्या आधीच्या शिंदे-होळकरांची दृष्टी देखील महाराष्ट्र म्हणजे पेशवाईचा मुलूख अशीच स्थिरावली होती. तसे पाहिले तर वऱ्हाड जरी १७४० च्या सुमारास भोसल्यांच्या हाती आला तरी १७५१ पर्यंत नागपूर प्रांताचा आणि तत्कालीन मराठशाहीचा एकजीव राजकीय संबंध नव्हता. संपूर्ण झाडीपट्टीत म्हणजे वर्ध्यापासून बालाघाटपर्यंत गोंडांचेच राज्य होते. या गोंड राजाचा पराभव १७५१ साली रघूजी भोसल्याने केला. आणि नंतर थोडाफार संबंध पेशवाईशी आला.

पण ज्यास एकजीव राजकीय संबंध म्हणता येईल असा प्रथम ब्रिटिश राजवटीतच आला. आणि तोही मुंबई ते कलकत्ता असा रेल्वेमार्ग तयार झाल्यानंतर. आपण ज्यास आज मराठवाडा म्हणतो तोही प्रदेश हैद्राबाद संस्थानात समाविष्ट होता. त्यामुळे तिथेही भिन्न वातावरण होते. महात्मा फुले यांच्या नजरेपुढे पेशवाईने सीमित असलेलाच महाराष्ट्र होता यात नवल नाही. याच महाराष्ट्रात ब्राह्मणशाहीचा स्वैर संचार पेशवाईच्या काळात झाला आणि पुणे म्हणजेच महाराष्ट्र असे समीकरण तयार झाले. महात्मा फुले ब्राह्मण्याच्या विरुद्ध शड्डू ठोकून उभे झाले खरे; पण पुणे म्हणजेच महाराष्ट्र हे ब्रह्मवृन्दांचे समीकरण त्यांनीही नकळत मान्य केले. पुणे शहराला हे जे महत्त्व पेशवाई बुडाल्यानंतरही मिळाले ते एलफिन्स्टन साहेबाच्या कृपेने. एका बाजूने एलफिन्स्टनने पेशवाईतील जुनी वतने कायम ठेवली आणि दुसऱ्या बाजूने रयतवारी धारापद्धती अंमलात आणली. त्याचा परिणाम होऊन वतनदारांची जमिनीवरची माया तुटली आणि कुळांची वतनदारावरील निष्ठा संपली. जमिनीवरील भांडवल गुंतवणूक आणि अंगमेहनत यांच्यामध्ये पूर्वी जो एकोपा होता तो राहिला नाही. त्यातच जमिनीचा कायदा बदलल्यामुळे आणि सावकाराला कर्जवसुलीचा हक्क मिळाल्यामुळे सामान्य प्रजेची सर्व बाजूंनी कुचंबणा झाली. लोकहितवादी यांनी लिहिल्याप्रमाणे, " सरकारचा पैसा खाऊ नये तर कोणाचा खावा अशी म्हणच या नेटिव्ह लोकांत पडली आहे. "[१०४] अशी भयावह स्थिती आली होती. या सर्वांचा एकसमयावच्छेदे परिणाम होऊन ब्राह्मण्य झुगारून देण्यासाठी आवश्यक ती मनोभूमी तयार झाली होती.

## भूतकाळाचे थडगे उकरायचे नव्हते

जोतीबा यांचे स्वागत करावयास पश्चिम महाराष्ट्रातील लोकमानस तयार होते. या लोकमानसाची जाण जोतीबा फुले यांना अगदी वेळेवर झाली यात त्यांची सूक्ष्मदर्शी बुद्धीच दिसून येते. पण जोतीबांची बुद्धी केवळ सूक्ष्मदर्शी नव्हती, ती दूरदर्शीही होती आणि म्हणून त्यांनी जसा वर्तमानाचा शोध घेतला तसा भविष्यकाळाचा वेधही घेतला. त्यांनी भूतकाळाविषयी जे नि:संकोच लिखाण केले ते सर्व वर्तमानाच्या जाणीवेसाठी आणि भविष्याच्या धारणेपोटी महात्मा जोतीबा फुले यांनी सतत चाळीस वर्षे मानेवर खडा ठेवून,

आपल्या जिवाचा जो आटापिटा आणि जो आकांत केला, तो काही येथील आर्यभटांच्या मुखियांशी दोन हात करण्यासाठी नव्हे. मात्र तसा समज आजही महाराष्ट्रात सर्वत्र रूढ आहे. पण तो समज काही यथार्थ नाही. कारण ते कार्य आधीच होऊन गेले होते. खुद्द जोतीबांनीच म्हटले आहे, "आर्याजीची नीति अति अमंगळ। कथिली गोपाळ। देशमुखे॥" पण असा समज जोतीबांच्या समकालीनांनी करून घेतला होता, हे मात्र खरे. त्यामुळेच नंतरच्या पिढ्यांची नजर जोतीबांच्या कार्याच्या मूळ संदर्भावर कधीच स्थिर होऊ शकली नाही. पेशवाईच्या अस्तामुळे आणि इंग्रजांच्या आगमनामुळे 'आर्यभटांचे' 'चातुवर्ण्य' आधीच मोडून पडले होते. त्यावर हल्ला करून ते पाडून टाकण्याचे कार्य, हे जोतीबांचे जीवितकार्य होऊच शकत नव्हते. तो कालविपर्यास ठरला असता. किंबहुना जोतीबांच्या कार्याला असा काल-विसंगत समज जळूसारखा चिकटलेला असल्यामुळेच महात्मा फुले यांच्या-विषयी आजवर सर्वांगीण विचारविनिमयही होऊ शकलेला नाही. गेली वीस वर्षे मी 'अखंडांचे' सतत परिशीलन करतो आहे, पुनः पुनः माझी प्रमेये तपासून पाहतो आहे, माझ्या आता पक्के ध्यानात आले आहे की, जोतीबांनी जो हुंबा घेतला होता तो खुद्द लॉर्ड मेकॉले याचेशीच! जोतीबा हे भूत-काळाची थडगी उकरीत नव्हते तर भविष्यकाळाची पायाभरणी करू पहात होते. आणि या कार्यावर त्यांची बुद्धी एकाग्र झाल्यामुळे फक्त त्यांच्याच हे प्रथम ध्यानात आले की, "अरे! या पराभूत आर्यभटांनी तर जगज्जेत्या इंग्लंडच्या राणीलाच मोहिनी घातली आहे." 'शेतकऱ्यांचा आसूड' काय किंवा 'गुलामगिरी' काय किंवा 'हंटर कमिशन पुढची साक्ष' काय त्या सर्वांच्या मुळाशी नवसमाजनिर्मितीचा हव्यास आहे. महात्मा फुले यांच्या मनाला जी हिम्मत आली होती ती या द्रष्टेपणामुळे; त्यांच्या मनाची जी तगमग आणि लगबग होती ती, "बुडती हे जन। देखवेना डोळा।" या तुकोबा वृत्तीमुळेच.

## हे भावी काळाच्या ऐरणीवरचे घाव

जोतीबांचा सत्यशोधकी घण भावी काळाच्या ऐरणीवर घाव घालीत होता, भूतकाळाच्या चिरा गेलेल्या चबुतऱ्यावर नव्हे! आपल्याला या विधा-

नाची तात्काळ प्रचीती हवी असेल तर छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा संपल्यानंतरचा अभंग आपण पाहा : " सत्ता तुझी राणी बाई। हिन्दुस्थानी जागृत नाही ॥ १ ॥ जिकडे तिकडे ब्राह्मणशाई। डोळे उघडून पाही ॥ २ ॥ ........चहुकडे भटशाही। कुणब्याची दाद नाही ॥ ८ ॥ जोती म्हणे धाव घेई। दुष्टापासून सोडवी ॥ ९ ॥ " येथे आपण प्रथम हे पाहिले पाहिजे की जोतीबांचे तत्कालीन कालाविषयीचे निश्चित निदान कोणते होते. आपण त्यांची विधानेच एकापुढे एक ठेवू : [१०५]

१. अंत्यजांनो, तुम्ही उपकार स्मरा। पोटी गच्च धरा। इंग्लिशास ॥
२. ब्राह्मणांनो तुम्ही कृतघ्न का होता। इंग्रजी निंदिता। जोती म्हणे ॥
३. आर्या हाती सर्व अधिकार येता। शूद्रां नाही गाता। जोती म्हणे ॥
४. ब्राह्मणेतरांनो विचारासी करा। अभिमान धरा। मानवाचा ॥
५. वेदातील मर्म मैदानी आणावे। जगा दाखवावे। जोती म्हणे ॥
६. मनु धिःकारूनी एकीकडे फेका। माना शूद्रादिका। बंधुपदी ॥
७. बंधु आर्यराया दयावान व्हावा। जाळून टाकावा। मनु ग्रंथ ॥
८. इंग्रजाचे माना तुम्ही उपकार। मनु हद्दपार। जोती म्हणे ॥

ही आठ विधाने अखंडामध्येच आहेत. एकूण अखंड संख्या ९९९ आहे. पवाडे, कवने आणि प्रार्थना यांची गणना या संख्येत केलेली नाही. या ९९९ अखंडांचा स्वतंत्र अभ्यास केल्यावरच हे ध्यानात येते की, जुनी चातुर्वर्ण्य व्यवस्था मोडून पडलेली आहे, याविषयी जोतीबांच्या मनात मुळीच शंका उरली नव्हती. पण इंग्लंडची राणी आपल्या सल्लागारांच्या हातची बाहुली बनली होती आणि हे सल्लागार तिला कुटिलपणाने फसवून देश पुनः एकदा ब्राह्मणांच्याच हाती देत होते. ही जी उलटी दिशा येथील राजकारणाला मिळाली ती जोतीबांचे चित्त फाडून टाकीत होती. 'ब्राह्मणांचा भोंदूपणा' या पदात जोतीबा म्हणतात, 'नांव देशाचे सांगूनी। आपण पार्लमेंटी व्हावे। शूद्रादिकांनी रणामध्ये लढून मरावे ॥ सिव्हील सर्व्हिसची मनी हाव सभेत निंदावे। हक्कासाठी उगीच इंग्रजा धोंडे मारावे ॥' असा हा खोटेपणा समाजाची

सर्वस्वी दिशाभूल करतो आहे, हे पाहून त्यांचे मन विषण्ण होत असे. मनाच्या या विषण्ण अवस्थेत त्यांनी समाजाचे चित्र रेखाटले आहे. त्यात सूडबुद्धी नाही.

### असा द्रष्टा एकच !

सारांश हा की, जुनी समाजव्यवस्था मोडून पडली आहे याविषयी जोतीबांच्या मनाची स्थिती निःशंक होती. म्हणूनच त्यांनी 'जाळूनी टाकावा मनुग्रंथ।' असा उपदेश खुद्द ब्राह्मणांनाच केलेला आढळतो! ब्राह्मणांनी मनुस्मृती जाळण्याचे टाळले म्हणून अखेर ५० वर्षांनंतर एके दिवशी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी ती जाळली. 'महात्मा फुले हे माझे राजकीय गुरू होत' असे जाहीर करताना बाबासाहेबांच्या मनात मनुस्मृति जाळण्याचा हा आदेशच गर्दी करून उतरला असावा! या अर्थाने दलित क्रान्तीची मूस जोतीबांनीच घडविली हे मात्र परस्पर सिद्ध होते. पण केवळ दलित क्रान्तीचीच नव्हे तर एकूण भारतीय लोकजीवनाच्या विसाव्या शतकातील अस्तित्वाची आणि व्यक्तित्वाचीही मूसच महात्मा फुले यांनी घडविली आहे. आपल्या शिक्षणक्षेत्रात जे त्रिभाषा सूत्र आज आले आहे, ते या देशात सर्वांत प्रथम जोतीबांनी सांगितले :

स्वभाषा लिहावी भाषण करावे। सद्गुणी असावे। स्वभावात ॥१॥
इंग्रजी लिहावे भाषण करावे। जगात त्यागावे। व्यसनास ॥ २ ॥
यवनी लिहावे भाषण करावे। सर्वस्वी त्यागावे। व्यसनास ॥ ३ ॥
तीन भाषेमध्ये सध्या जे निपूण। सद्गुणी संपन्न। मानवंत ॥ ४ ॥
चाळीशीच्यावर मुख्य दीक्षा घ्यावी। गादी सांभाळावी। समाजाची ॥५॥

आणि पुढे तर त्यांनी असेही लिहून ठेवले आहे की,

सर्व भाषेमध्ये असे जो निपूण। सद्गुणी संपन्न। सत्यवादी ॥ ६ ॥
त्याला नको दीक्षा गादी पाठबळ। वर्षांची अगळ। त्याला नको ॥ ७ ।

आपल्या देशाची लोकस्थिती आणि मनःस्थिती ही नेमकी कशी आहे याचे स्पष्ट आणि स्वच्छ निदान झाले असल्याशिवाय असा नेमका रेखीव आणि

ठाशीव विचार कुणाच्याही लेखणीतून उतरणे शक्य नाही. लॉर्ड मेकॉलेने भारतीयांच्या शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल केल्यामुळे भराभर इंग्रजी शिकणाऱ्यांचीच संख्या वाढत गेली, पण पद्धत जरी बदलली तरी प्रथा मात्र जुनीच कायम होती- म्हणजे असे की, फक्त उच्चवर्णीयांना शिक्षण दिले. सार्वत्रिक शिक्षणाची आज गरज नाही असा तो निर्णय होता. शिक्षणाचा झरा उंच डोंगरावर बांधावा तेथून त्याचे पाझर हळूहळू पायथ्याशी पोचतील अशी ती भूमिका होती. यास ' डाऊनवर्ड फिल्ट्रेशन थिअरी ' असे गोंडस नाव देण्यात आले होते. आणि महात्मा जोतीबा फुले यांच्या अवलोकनात आले की यामुळेच मुळात मरून गेलेली ब्राह्मणशाई पुनश्च जिवंत होत आहे. त्यांच्या मनाला लागलेल्या त्या उत्कट तळमळीने जोतीबांच्या अखंडांना तुकोबारायांच्या अभंगाइतकी आर्तता, आर्द्रता आणि अपूर्वता मराठी भाषेत प्राप्त करून दिली आहे! भारत स्वतंत्र झाल्यावर ' सत्यमेव जयते ' असे ब्रीदवाक्य राजमुद्रेवर कोरले गेले. महात्मा फुले यांनी आपल्या प्रत्येक पत्रावर ' श्री ' च्या जागी ' सत्यमेव जयते ' असे शब्द लिहिलेले आढळतात. अनेकांची समजूत ही की, महात्मा गांधी यांच्या प्रभावामुळे ' सत्यमेव जयते ' हे आपले ब्रीदवाक्य झाले. पण केवळ गांधीजींचा हवाला पुरेसा ठरत नाही. एकतर कालप्रवाह हा कोणाही व्यक्तिमत्त्वापेक्षा प्रबळ असतो आणि गांधीजी हे महात्मा फुले यांच्यानंतरच्या काळात जन्मले आणि वाढले. यापुढे भारतात कोणताही एक धर्म लोकजीवनाला आकार, आधार किंवा आशय देऊ शकणार नाही; जेथून धर्म उद्भवतो त्या सत्याच्या गुहेतच मानवाला आसरा आणि आनंद शोधावा लागेल हे गौतम बुद्धाच्या, येशू ख्रिस्ताच्या आणि महंमद पैगंबराच्या श्रद्धेने एकोणीसाव्या शतकात अत्यंत निखालसपणे कोणी सांगितले असेल तर ते फक्त महात्मा जोतीबा फुले यांनीच. ते म्हणतात :

सत्याविण नाही धर्म तो रोकडा । जनाशी वाकडा । मतभेद ॥ १ ॥
सत्य सोडू जाता वादामध्ये पडे । बुद्धीस वाकडे । जन्मभर ॥ २ ॥
सत्य तोच धर्म करावा कायम । मानवा आराम । सर्व ठायी ॥ ३ ॥
मानवांचा धर्म सत्य हीच नीती । बाकीची कुनीती । जोती म्हणे ॥ ४ ॥

संपूर्ण गांधीविचार आणि सगळे सर्वोदयी तत्त्वज्ञान हा देखील ज्या बीजाचा वृक्ष होय, ते बीज अखंडातच सापडते. जोतीबा म्हणतात :

"निर्मिकाने जर एक पृथ्वी केली । वाही भार वाली । सर्वत्रांचा ॥ १ ॥
तृण वृक्षभार पाळी आम्हासाठी । फळे ती गोमटी । छायेसह ॥ २ ॥
सुखसोयीसाठी गरगर फिरे । रात्रंदिन सारे । तीच करी ॥ ३ ॥
मानवांचे धर्म नसावे अनेक । निर्मिक तो असे । जोती म्हणे ॥ ४ ॥
सर्वांचा निर्मिक आहे एक धनी । त्यांचे भय मनी । धरा सर्व ॥ ५ ॥
न्यायाने वस्तूंचा उपभोग घ्यावा । आनंद करावा । भांडू नये ॥ ६ ॥
धर्मराज्यभेद मानवा नसावे । सत्याने वर्तावे । ईशासाठी ॥ ७ ॥
सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतो । आर्यास सांगतो । जोती म्हणे ॥ ८ ॥"

म्हणजे 'त्रिभाषासूत्र', 'सत्यमेव जयते' हे ब्रीद आणि 'सर्वोदया'चे तत्त्वज्ञान ही सर्व महात्मा जोतीबा फुले यांच्या प्रतिभेने हेरली होती, पाहिली होती आणि मांडली होती. म्हणजे, भारतीय लोकजीवनाची विसाव्या शतकाची जणू काही मूसच जोतीबांनी ओतली, असे आपणांस सर्वार्थाने म्हणता येणार नाही काय ? असा द्रष्टा एकच ![१०६]